२७
अ/3/1959

३५(३)१५१

## शेक्स्पियर-कविकृत नाट्यमाला,
## खंड ३ रा.

# व्हेनिस नगरचा व्यापारी,

अर्थात्

## धि मर्चंट आफ व्हेनिस.

प्रस्तावना, गुणदोषविवेचनात्मक उपोद्घात व कथानक यांसहित.

भाषांतरकार

## खंडेराव भिकाजी बेलसरे.

कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं नवरसांचे वोघ लोटले ।
नाना सुखांचें उचंबळलें । सरोवर हें ॥

रामदास.

प्रकाशक

के. सी. कुळकरणी आणि मंडळी, मुंबई.

मुद्रक

केशव रावजी गोंधळेकर, जगद्धितेच्छु प्रेस, पुणें.

सन १९१०

किंमत रु० २

( भाषांतराचे, पुनरावृत्तीचे, रंगावृत्तीचे व प्रयोगाचे
हक्क राखले आहेत.



सर जॉर्ज सिडनहॅम क्लार्क, मुंबईचे गव्हर्नर.
सन १९१०.

# व्हेनिस नगरचा व्यापारी,

अर्थात्

## धि मर्चंट आफ व्हेनिस.

# प्रकाशकाची सूचना.

शेक्स्पियर कवीवर इंग्रज लोकांचें किती प्रेम आहे,' याची वास्तविक कल्पना पुढील उद्गारांवरून वाचकांस होईल.

" Carlyle once posed a curious question---namely. whether the British people would sooner lose their Shakespeare or their Indian Empire; and he decided in favour of the latter. Because, he said,---' your Indian Empire, in any case, must go sooner or later; but Shakespeare cannot go. He lasts for ever with us. We cannot give up our Shakespeare. ' Well,... there is no reason why we should lose either. Let us keep both. Let India remain *our India*, just as much as Shakespeare is our Shakespeare,----that is to say. as *a part of the inalienable heritage of Englishmen. and the lasting glory of the British race !* "—LORD CURZON, at *the London Union Club, 1st. August, 1904.*

ह्या अवाढव्य भरतखंडाचें सार्वभौमत्व एकीकडे व शेक्स्पिअर कवि एकीकडे—एवढा मान इंग्रज पंडित व इंग्रज मुत्सद्दी त्याला देतात अशा ह्या त्यांच्या आवडत्या कवीचे सर्व ग्रंथ आह्मी भाषांतररूपानें मराठींत आणून. आमच्या देशबंधूंस त्यांचा लाभ करून देत आहों. हा आमचा उद्योग सर्वांस पसंत पडेल अशी आह्मास आशा आहे.

TO HIS EXCELLENCY

**SIR GEORGE SYDENHAM CLERKE,**

G. C. M. G., G. C. I. E., &c.

*Governor of Bombay.*

**नेक नामदार सर जॉर्ज सिडेन्हॅम क्लार्क,**

**मुंबईचे गव्हरनर साहेब यांस**

WHO HAS, BY HIS WISE POLICY AND PRUDENT ADMINISTRATION, ENDEARED HIMSELF TO THE PEOPLE OF MAHARASTRA,

**हा ग्रंथ**

This Volume

is, with permission, respectfull dedicated, as a tribute of devotion and loyalty, by His His Excellency's faithful and obedient servant,

KHANDERAO B. BELSARE,

*THE AUTHOR.*

**खंडेराव भिकाजी बेलसरे,**

**ग्रंथकार यांनीं,**

परवानगी, घेऊन राजनिष्ठबुद्धीनें, बहुमानपूर्वक, नम्रपणें अर्पण केला असे.

## शेक्स्पिअर-कृत नाट्यमालेचे खंड कोणकोणास अर्पण करण्यांत आले त्यांचें टांचण.

खंड १ ला. **तुफान.** अर्थात् **धि टेम्पेस्ट.**—श्रीमन्महाराज **शाहु छत्रपति सरकार करवीर,** कोल्हापूर. यांस

खंड २ **प्रेमाचा कळस** अर्थात **रोमियो आणि ज्यूलियट.**—श्रीमन्महाराज **सयाजीराव गायकवाड** सर-कार बडोदें. यांस

खंड ३ **व्हेनीस नगरचा व्यापारी** अर्थात **मर्चंट ऑफ व्हेनिस.**—नेक नामदार **सर जॉर्ज सिडेनहॅम क्लार्क** मुंबईचें गव्हर्नर साहेब. यांस

आणखी कित्येक नामांकित पुरुषांनीं समर्पण स्वीकारण्याचें आश्वासन दिलें आहे.

## शेक्स्पियरकृत नाट्यमालांतर्गत संविधानकावलीचे अंक कोणकोणास अर्पण करण्यांत आले त्यांचें टिपण.

कथा १ ली तुफान अर्थात धि टेम्पेस्ट—श्रीमती सौ० माणिकबाई नानुजी कोठारे, मुंबई. यांस

कथा २ री, प्रेमाचा कळस अर्थात रोमियो आणि ज्यूलियट—श्रीमती सौ० लक्ष्मीबाई चंदावरकर, मुंबई. यांस

कथा ३ री, व्हेनिस नगरचा व्यापारी.—श्रीमंत सौ० लक्ष्मीबाईसाहेब पंतसचीव सं. भोर पुणें. यांस

आणखी कित्येक नामांकित स्त्रियांनीं समर्पण स्वीकारण्याचें आश्वासन दिलें आहे.

वझेकृत कफनाशक गोळ्या:—ल
सुशी वगैरे रोग होतात त्यावर अत्यंत
भाटवडेकर व डॉ. देशमुख यांनीं पसंत केले
मालक—वि. शि. वझे. सावंतवाडी. ब्रँ
वझे शारदाप्रेस गिरगांव मुंबई.

बाळंतरोग व क्षयरोगः—बरे करण्यांत प्र...
पांडुरंग यज्ञेश्वरशास्त्री पिटकर ( केतकर )
सभेचे सेक्रेटरी. यांचें औषध अप्रतिम आहे. किं. १ रु.
कामदेव गुटिका, शक्तिवर्धक औषध. विशेष तीव्र
त्यास समक्ष भेटावें किंवा पत्र व्यवहार करावा.

पत्ताः—फणसवाडी, काळकादेवी पो

नानू यांचा पितळी कामाचा कारखाना जुन्या सनीस्त्र
असून, पितळी व लोखंडी पाळणे, पलंग, खाट
खाटा, खुर्च्या, बेडस्टेड्स्, खुंट्या, पितळी मेणवत्तीचे
विकत मिळतात. आणि हरएक धातूचें सामान सु
मिळेल.

लाव्हा मलम-त्वचेच्या विकारावर सुप्रसिद्ध
१ डबीस ४ आणे. ब्राह्मी बाम मगजशुद्धी व म
बाम. किं. १ डबीस ४ आणे.
पत्ता-डॉ. खरे, लाव्हा आफिस. सदाशिव पे

डोंगरे यांचें बालामृत लहान मुलांच्या रोगांवर
आहे. तें घेतेवेळीं बाटलीवर आमच्या नांवाचें
बाटल्या घ्याव्या. बाटलीची किंमत १२ आणे. ट. ख.

के. टी. डोंगरे आणि कं.

फार
बेल
४ अ

# थ कृष्णाजी क्षत्रिय.

## यांचीं औषधें.

| | रु. | आ. |
|---|---|---|
| गण ... ... ... | १ | ० |
| दिवसांत हटकून गुण ... | १ | ० |
| बंद करण्याचें वस्ताद ... | ० | १२ |
| नंबर १ च्या गोळ्या—बलवर्धक, शक्तिवर्धक. | | |
| ० गोळ्यांस ... ... ... ... | ३ | ८ |
| चा. रु. १ डझन बाटल्यांस ... ... | ८ | ० |
| ... ... ... ... ... | ० | ६ |
| ... ... ... ... ... | ० | ६ |
| गोळ्या नंबर २ अफुचें व्यसन घाल- | | |
| टक ... ... ... ... ... | १ | ० |
| दूषित रक्त साफ करण्यास ) ... ... | १ | ० |
| करण्याचा कलप ... ... ... | १ | ४ |
| रु—१०० गोळ्यांस ... ... | ० | १२ |
| ... ... ... ... ... | ० | ६ |
| ख .. ... ... ... ... | १ | ० |
| ... ... ... ... ... | ० | ४ |
| -दम्यावर फारच गुणकारी ... | १ | ० |
| ... ... ... ... ... | ० | १२ |
| ... ... ... ... ... | ० | ४ |
| ल... ... ... ... ... | १ | ० |
| -( आंकडीवर रामबाण ) ... ... | ३ | ० |
| ध ... ... ... ... ... | १ | ० |

वांस टपाल व बंगीखर्च निराळा. सचित्र औषधांचा हिंदुस्थानांत भरलेल्या निरनिराळ्या प्रदर्शनांतून औष- र्वी, ४ रुप्याचीं १ ब्रँझचें व ९ सर्टिफिकिटें मिळालीं

नाथ कृष्णाजी क्षत्रिय पहिली सदाशिवजीची गल्ली, ई.



वैद्य गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रिय.

# अनुक्रमणिका.

प्रकाशकांची सूचना.

समर्पण

आतांपर्यंत कोणकोणास नाट्यमालेचे खंड
अर्पण करण्यांत आले त्याचें टिपण.

प्रस्तावना १३-४०

पहिले वर्गाचे वर्गणीदारांस प्राप्त होणारें श्रेय ...१३
मराठी भाषेच्या अभिवृद्ध्यर्थ आमचा प्रयत्न ...१४
प्रस्तुत नाट्यमालेची लोकमान्यता... ... ...१५
मराठी भाषेच्या आस्थेवाईक मंडळीचे यत्न ...१६
त्यांतील मोठें व्यंग—भाषेच्या अभ्यासाची
व व्यासंगाची हेळसांड ... ... ...१७
ह्या हेळसांडीचे परिणाम—भाषादूषण व
लेखकाचें हासें ... ... ... ...१८
कांहीं उदाहरणें—'मातृभाषा' व 'मातृदेश'...१९
'घड्याळाचे हात'... ... ... ... ...२३
'सहानुभूति' 'रुद्राक्ष'... ... ... ...२४
मी आणि आह्मी ... ... ... ... ...२८
रसहीन व पाणचट ग्रंथ ... ... ... ...३३
मराठीच्या आस्थेवाइकांस प्रार्थना ... ... ...३४
एका शोचनीय वधाविषयीं दुःखप्रदर्शन... ...३५

उपोद्धात ... ... ... ... ... ...४१-८४

उपन्यास ... ... ... ... ... ...४१
प्रस्तुत नाटक केव्हां रचलें... ... ... ...४२
कोणकोणत्या कथानकांच्या आधारानें रचिलें ...४५
त्याची लोकप्रियता ... ... ... ... ...५१

पर्यालोचन ... ... ... ... ...५७
अंक १ ला ... ... ... ... ... ...५७
अंक २ रा ... ... ... ... ... ...६४
अंक ३ रा ... ... ... ... ... ...६७
अंक ४ था ... ... ... ... ... ...६८
अंक ५ वा ... ... ... ... ... ...६९
प्रस्तुत नाटकाच्या उत्कृष्टत्वाचा विशेष गुण ...७०
प्रस्तुत नाटकांतील उपन्यस्त तत्त्व ... ...७७
मुख्य मुख्य पात्रांचें स्वभाववर्णन... ... ...
मृच्छकटिक नाटकाशीं तुलना ... ... ...
उपसंहार ... ... ... ... ... ...
संविधानक ... ... ... ... ... ... १-३२
मूळ-नाटक ... ... ... ... ... ..१-१८८

## चित्रांचें टिपण.

नेकनामदार सर जार्ज सिडनहॅम क्लार्क—अर्पणासमोर
अंटोनियो व त्याचे दोघे मित्र.
लान्सलाट याची बापापुढें बढाई.
शायलॉक याची काळिजाला हात घालण्याची तयारी;
व्यवहाराची चौकशी.
बेलमान्ट येथील उपवनाची शोभा.

## जाहिरातींची सूची.

# प्रस्तावना.

आतांपर्यंत आह्मीं शेक्स्पियर नाट्यमालेचा पहिला, दुसरा, तिसरा असे, तीन खंड प्रगट करण्यास समर्थ झालों, हें सारें फळ आमच्या आश्रयदात्यांच्या, ह्मणजे पहिले वर्गाच्या वर्गणीदारांच्य कृपेचें होय, हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे. पहिले वर्गाच्या वर्गणीसंबंधानें काय फेरफार केला आहे, हें त्यांस आगाऊ विनंतिपत्रद्वारें प्रकाशक के० सी० कुळकर्णी यांनीं जाहीर केलेंच आहे. त्यांच्या विनंतीस बहुतेकांनीं मान दिला असून, आपला आश्रय कायम ठेवला, याबद्दल आह्मीं त्यांचे फार फार आभार मानतों. हा आमचा उद्योग केवळ लोकाश्रयावरच अवलंबून आहे. विनंतिपत्रकांत ह्मटल्याप्रमाणें, हें मराठी भाषेच्या अभिवृद्धीचें एक कृत्य असून, तें तडीस नेण्याबद्दल सर्व मराठी भाषा बोलणारांस अभिमान असला पाहिजे.

मराठी भाषा ही आमची एकट्याची आहे, असें नाहीं; तर आपणां सर्वांचीच आहे व यासाठीं या कामीं सर्वांनींच मदत करणें अवश्य आहे. ही मदत मिळाली असल्यामुळें, आह्मीं पुढील खंड लवकर लवकर काढण्यास समर्थ होऊं, अशी आह्मांस मोठी उमेद आहे.

आपली जन्मभाषा जी मराठी तिची सेवा आपल्या हातून व्हावी अशा बुद्धीनें, आह्मीं हा उद्योग मुख्यत्वेंकरून हातीं घेतला आहे. त्यायोगानें शेक्स्पियर कवीसारख्या एका सर्वमान्य कवीच्या सर्व ग्रंथांचा लाभ मराठी भाषेस होईल, व शेक्स्पियर हें काय प्रकरण आहे, हें वाचकांस मराठींत कळण्यास मार्ग होईल, असें आह्मांस वाटतें. प्रस्तुतसारख्या पुस्तकांत भाषासरणी ही एक मुख्य गोष्ट आहे, तसेंच शेक्स्पियरचीं नाटकें वाचावयाचीं तीं केवळ मनोरंजनाच्या दृष्टीनें वाचणें बरोबर नाहीं.——नाटकेंच आहेत, त्यापक्षीं मनोरंजन त्यांजपासून होईल हें खरें; तथापि त्याहून कांहीं अधिक लाभ व्हावा, अशी आपली अपेक्षा असावी हें योग्य आहे. आमच्या पुस्तकांत विशेषतः ह्या गोष्टीकडे लक्ष पुरविलें आहे, हें वाचकांस कळून आलेंच असेल. आमचीं ह्यासकट तीन पुस्तकें सध्यां वाचकांपुढें आहेत, तेव्हां हातच्या कांकणाला आरसा नलगे. ह्यांत भाषांतराची पद्धत कशी आहे, भाषासरणी कितपत सुबोध आहे, उपोद्घातांतील गुणदोषविवेचन कितपत हृदयंगम आहे, तसेंच अर्थसादृष्यादि प्रकार कितपत बहुश्रुतपणाचा लाभ करून देणारे आहेत, इत्यादि गोष्टींचा प्रत्यय वाचकांस येण्यासारखा आहे. आणि कळविण्यास संतोष वाटतो, कीं हा आमचा यत्न महाराष्ट्रांतील थोर थोर मंडळीस पसंत पडला आहे

व याबद्दल अभिज्ञ गृहस्थांचीं अनुकूल मतें पत्रद्वारें आह्मांकडे आली आहेत. *डेक्कन व्हरनॅक्युलर सोसायटी या नांवाच्या मंडळींनीं पहिला व दुसरा खंड पसंत केला असून, कर्त्यांस बक्षीस दिलें आहे, हीही संतोषाची गोष्ट येथें कळविण्यासारखी आहे.

ह्या तिसऱ्या खंडांत कोणती नवी तऱ्हा अमलांत आणली आहे, हें यांतील चित्रांकडे नजर गेली असतां वाचकांच्या सहज लक्षांत येईलच. आमचीं पुस्तकें होईल तोंवर माहितीनें पूर्ण व दिसण्यांत सुबक करून, चिरकालिक उपयोगाचीं व संग्राह्य करण्याविषयीं आमची किती उत्कंठा आहे, हें यावरून लक्षांत येईलच.

सांप्रत मराठी भाषेच्या अभिवृद्धीकडे बरेंच लोकांचें लक्ष लागलें आहे; आणि आमचा उद्योगही मराठी भाषेच्या सेवेचाच आहे; तेव्हां ह्या संबंधानें चार शब्द येथें लिहिलें असतां ते अप्रासंगिक होतील असें वाटत नाहीं. मराठी ही आपली जन्मभाषा आहे, आणि जन्मभाषेची सेवा करणें व तिच्या अभिवृद्धीविषयीं झटणें हें आपलें कर्तव्य आहे. कदाचित्, ह्याहून अधिक श्रेष्ठ व पवित्र कृत्य दुसरें कोणतेंहि नसेल. जन्मभाषेला मातेची उपमा दिली आहे; व ती अगदीं यथार्थ आहे. कारण, तशीच तिची योग्यता आहे. इंग्रजी भाषेच्या प्रचारामुळें मराठी भाषेविषयीं ज्यांच्या मनांत अनास्था उत्पन्न झाली आहे, अशांस

*हीं सर्वमतें सर्वांस कळण्यासाठीं आह्मीं प्रसंगानुरोधानें प्रसिद्ध करणार आहों. कै० शंकर मोरो रानडे यांचें मत, इंदुप्रकाश, काळ, नेटिव ओपीनियन वगैरे वर्तमानपत्रकर्त्यांचीं मतें फारच उत्तम पडलीं आहेत, तीं यापूर्वीच प्रसिद्ध झालीं आहेत.—प्रथम खंड, तुफान प्रस्तावना पहा पृष्ठें ४४-४५.

उद्देशून एका आधुनिक कवीनें जे उद्गार प्रगट केले आहेत, ते जसें समर्पक तसेंच अत्यंत हृदयंगम आहेत. त्यांचा सर्वांनीं अवश्य विचार करावा. तो म्हणतोः—

म्हणतात जे–'मराठी भाषा होणार ही असे नष्ट ।
मिळणार काय करुनी व्यर्थ हिला वांचवावया कष्ट ?–' ॥

त्यांना हेंच पुसा कीं 'मरणोन्मुख होय आपुली माय ।
औषध म्हणुनि पुत्रीं कांहीं देऊं नये तिला काय ?'॥

माता तशी स्वभाषा सेवाया योग्य आपणा उचित ।
किंबहुना, मातेहुनि अधिक हिची योग्यता असे खचित ॥

**मोगरे कवि.**

स्वभाषेची ही योग्यता लक्षांत घेऊनच, मराठीच्या पुरस्कर्त्या गृहस्थांनीं तिच्या अभिवृद्धीचा विचार चालविला आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. आलीकडे कांहीं वर्षें मराठी भाषेच्या आस्थेवाईकांचें व ग्रंथकारांचें संमेलन भरूं लागलें आहे, हें सर्वांस ठाऊकच आहे. आणि ह्या वर्षीं श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांनीं बरीच मोठी रक्कम देऊं केल्यामुळें, चालू सालचें संमेलन, 'महाराष्ट्र साहित्य परिषद' हें प्रौढ नांव धारण करून नुकतेंच बडोदें येथें भरविण्याचा मोठा समारंभ झाला, हेंहि वर्तमानपत्रांवरून मशहूर आहे. ह्या प्रसंगीं, मराठी भाषेची अभिवृद्धी कशी होईल ह्याविषयीं पुष्कळसा ऊहापोह झाला; वक्त्यांचीं भाषणें झालीं आणि पंडितांचें निबंध परिषदेपुढें आले. तथापि त्यांत एका महत्वाच्या गोष्टीकडे आस्थेवाईक मंडळींचें लक्ष गेलें आहेसें दिसत नाहीं. ती गोष्ट ही कीं, ग्रंथ लिहूं इच्छिणारांनीं अगोदर मराठी भाषेचा अभ्यास केला पाहिजे, व तिचा व्यासंग ठेवला पाहिजे. मराठी भाषेच्या अभिवृद्धीला ही

गोष्ट किती अगत्याची आहे हें कोणासही सांगणें नलगे. पण इकडे कोणाचें तरी लक्ष गेलें आहे काय? खरोखर ही स्थिति पाहून फार वाईट वाटतें. सर्वांचा कटाक्ष पहावा तों मराठी भाषेंत पुष्कळसे ग्रंथ व्हावेत, व ते नानाप्रकारच्या विषयांवर व्हावेत एवढाच दिसतो. परंतु हे ग्रंथ शुद्ध सरळ भाषेंत लिहिलेले असावेत. तसेच ते सुबोध असावेत, ह्मणजे सामान्य मराठी वाचकांसही समजेसे असावेत, ही गोष्ट अगत्याची नाहीं काय? ग्रंथलेखनाचा उद्देश पाहिला तर ते लोकांच्या वाचण्यांत येऊन त्यांस ज्ञानलाभ व्हावा हा आहे. पण ग्रंथ दुर्बोध झाले असतां, ते वाचण्यांत यावे कसे? हा विचार मराठींत ग्रंथ लिहिणारांच्या मनास सध्या शिवत असेलसें दिसत नाहीं. आम्हास तर असें वाटतें कीं जोंपर्यंत मराठी भाषेचा अभ्यास व तिचा व्यासंग करून शुद्ध सरळ मराठी भाषेंत ग्रंथ लिहिण्याकडे ते लिहिणारांची प्रवृत्ति झाली नाहीं, तोंपर्यंत तिची वाढ होण्याची आशा व्यर्थ आहे.

मराठी भाषेच्या अभ्यासाच्या अवश्यकतेविषयीं वर जें म्हटलें आहे, त्यांत मराठी भाषेच्या अभ्यासाची सध्यां हेळसांड होत आहे ही गोष्ट गृहित धरलेली आहे. खरें म्हटलें असतां ही गोष्ट एवढी उघड आहे कीं, तिच्या सत्यतेविषयीं विस्तारानें लिहिण्याची कांहीं जरूर नाहीं. मराठीं भाषेंत सामान्यतः अलीकडे जे ग्रंथ होतात तें पाहिले असतां, ह्या गोष्टीचें प्रत्यंतर सहज मिळण्यासारखें आहे. मराठी भाषेच्या अभ्यासाची हेळसांड होत आहे, हा बोभाटा कांहीं नवीन नाहीं. हा सध्यांच्या शिक्षणक्रमांतलाच दोष आहे. सध्यांचा क्रम असा आहे कीं, कोणालाही तीन चार इयत्ते-

पर्यंत सरासरी मराठीचें जें काय शिक्षण मिळतें तें मिळतें. पुढें इंग्रजी भाषेचा अभ्यास होऊन इंग्रजी विद्यापीठाच्या तीन चार परिक्षा पास होईतोंपर्यंत मजल येते; एवढ्या अवकाशांत प्रौढदशा प्राप्त होते; व बुद्धीलाही बराच संस्कार होतो. त्यामुळें स्वभाषेंत कांहीं करावें अशी इच्छा होऊन लिहिण्याकडे प्रवृत्ती होते इतकेंच ! परंतु मराठी भाषेचा आस्थापूर्वक अभ्यास व्हावा, व तिचा व्यासंग व्हावा तो मात्र होत नाहीं. हें व्यंग लक्षांत आणून विद्यापीठाच्या शेवटच्या परिक्षेला मराठी भाषा हा एक विषय ठेवला आहे. व खालच्या कांहीं परिक्षांसही, तो ठेवावा म्हणून खटपट चालू आहे. बडोदें येथील संमेलनाचें वेळींही याच आशयाचा एक ठराव झाला आहे. हें सर्व ठीक आहे. परंतु याप्रमाणें तजवीज झाली असतांही वरील आमच्या लिहिण्याला कांहीं बाध येईल असें आह्मांस वाटत नाहीं. परिक्षांकरितां केलेला अभ्यास किती तुटपुंजीचा असतो हें कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं. आमचा लिहिण्याचा भावार्थ हा आहे, कीं ग्रंथकर्तृत्वाला कांहीं विशेष अभ्यास पाहिजे, ह्या मुद्यासंबंधानें कोणाचें वेगळें मत होईल असें वाटत नाहीं.

आतां मराठी भाषेच्या अभ्यासाची व तिच्या व्यासंगाची ही जी हेळसांड होत आहे, तिचे परिणाम काय झाले आहेत व होत आहेत त्यांकडे अंमळ लक्ष देण्यासारखें आहे. एकंदरीनें पहातां, ते मराठी भाषेला अनर्थावह आणि तिच्या अभिवृद्धीला अपायकारक असेच आहेत, यांत संशय नाहीं. मराठी भाषेचा अभ्यास होत नसल्यामुळें, भाषेंत अशुध्द भाषापद्धत, शब्दांचे अपप्रयोग घोंटाळ्याची वाक्य-

योजना, इत्यादि भाषादूषणांची रेलचेल झाल्यामुळें ती बिघडून जाऊन बुडण्याच्या पंथास लागल्याची शंका येऊं लागली आहे; हें एक भाषेच्या संबंधानें झालें. आतां अशा या ग्रंथाकडे पाहिले असतां वरील हेळसांडीचें प्रायश्चित्त त्याच्या कर्त्यासही मिळाल्यावांचून रहात नाहीं. कारण, पहा कीं, ह्या भाषादूषणांच्या योगानें बहुधा ग्रंथाबरोबर त्यांच्या कर्त्यांचेंही हांसें होण्यास कारण होतें. विषयासंबंधानें पुष्कळ लिहिण्यासारखें आहे; पण तसें करण्यास येथें सवड नाहीं. तथापि इंग्रजी भाषेच्या अनुकरणानें अशुद्ध शब्द व शब्दांचे अपप्रयोग यांचें सध्यां मराठी भाषेंत कसें बंड माजलें आहे, हें दाखवावें असें मनांतून आहे. ह्यासाठीं कांहीं शब्द मात्र येथें देतों; व त्यांच्या योजनेंमुळें अर्थाचा अनर्थ होऊन कशी मौज होते हें दाखवितो.

प्रथमारंभीं आह्मी 'मातृभाषा' हाच शब्द घेतों. अलीकडे कोणीही मराठींत लिहूं लागला ह्मणजे बहुदा प्रस्तावनेंत स्वभाषेचा मोठा कळवळा दाखवून ह्मणतो कीं, 'मातृभाषे'ची सेवा करण्याची आमची इच्छा आहे. आणि हा मातृभाषा शब्दही जड, अवघडसा त्याच्या बुद्धीला वाटला व अगदीं साध्या व सोप्या भाषेनें बोलावेंसें त्याच्या मनांतून आलें तर त्या ऐवजीं 'मायभाषा' हा शब्द देखील योजण्यास तो चुकत नाहीं. आतां ह्या लिहिणाराच्या मनांत क्वचितच येत असेल कीं, आपल्या लिहिण्याचा विपरीत अर्थ होऊन, अनर्थास कारण होईल. पहा कीं, 'मातृभाषा' याचा अर्थ 'मातेची भाषा' असा होतो. हा अर्थ त्यास इष्ट आहे काय ? मातेची भाषा असें ह्मटलें असतां लिहिणाराची भाषा वेगळी व त्याच्या मातेची भाषा वेगळी

अशा दोन वेगवेगळया भाषा विवक्षित आहेत असें ध्वनित होतें. पाश्चिमात्य देशांत आई इंग्रज तर तिचा पती फ्रेंचमन ही गोष्ट संभवनीय असल्यामुळें, आई, बाप, व लेक यांच्या वेगवेगळया भाषा असणें संभवनीय आहे. व्हेनीस नगरचा व्यापारी ह्या नाटकांतच पाहिलें तरी पोर्शियेच्या स्वयंवराला वेगवेगळया देशचे राजपुत्र येतात; त्यांच्या भाषा पोर्शियेच्या भाषेहून वेगळया आहेत. असें आपण पहातों. इंग्रजी गृहस्थाशीं जेव्हां तिची गांठ पडते तेव्हां त्यास इ-टॅलियन भाषा व पोर्शियेस इंग्रजी येत नसल्यामुळें दोघां-वरही मूकस्तंभ होऊन राहण्याची पाळी आली तेणेंकरून कशी मौज उडाली ती कवीनें स्वतः पोर्शियेच्याच तोंडून वदविली आहे.* स्वतःची भाषा एक व आईची किंवा बा-पाची भाषा वेगळीं अशी तऱ्हा हिंदुस्थानांत तरी फारशी संभवनीय नाहीं. यास्तव मातृभाषा म्हणजे मातेची भाषा असा असंभाव्य शब्दप्रयोग करणें बरोबर नाहीं. संस्कृत अलंकार शास्त्रज्ञांनीं अशा प्रकारच्या शब्दयोजनेस दोषांत काढिलें अ-सून, 'विरुद्धार्थमतिकृतदोष' असें नांव त्यास दिलें आहे. ‡

---

* "व्हेनिस नगरचा व्यापारी" अंक १ प्रवेश २ पृष्ठ १९ पहा.

‡ प्रसिद्ध अलंकारशास्त्रज्ञ मम्मटभट यानें 'भवानीपति' हा शब्दप्रयोग देखील सदोष असल्यावरून त्याज्य लेखिला आहे भव ह्मणजे शंकर, त्याची स्त्री ती भवानी, तिचा पति तो भवानी पति हा शब्दप्रयोग भवभूतिकृतमहावीरचरितांतील पुढील श्लोकांत आला आहे.

न त्रस्तं यदिनामभूतकरुणासंतान शांतात्मन·
तेनव्यारुजता-धनुर्भगवतो देवाद्भवानीपतेः।

हा श्लोक उतरून घेऊन तो ह्मणतो--' इत्यत्रभवान्याः पत्यंतरं-सूचीतम् '

काव्यप्रकाश, उल्लास ७

याचें नेहमींचें उदाहरण ह्मटलें ह्मणजे ' अंबापति ' ( आईचा नवरा ) हें होय. याच दोषास ' मातृभाषा ' हा शब्दप्रयोग पात्र झाला आहे हें कोणाचेही सहज लक्षांत येईल. भाषेस मातेसमान लेखणें ही कल्पना अगदीं योग्य आहे. वर रा० मोगरे यांच्या कवितेंत हीच कल्पना आणली आहे. आणि तेथें ती किती शोभते हें कोणासही सहज कळण्यासारखें आहे. परंतु भाषा ही मातेसमान आहे असा अर्थ दाखविण्याकरितां ' भाषामाता ' असा शब्दप्रयोग करावयास पाहिजे होता. तो तसा न केल्यामुळें वर दर्शविल्याप्रमाणें घोंटाळा झाला आहे. मग 'मा ृभाषा' हा अशुद्ध व असंभाव्य अपप्रयोग आला कोठून ? हें जर पाहिलें तर मदरटंग ' (Mother tongue ) याचें शब्दास शब्द ठेऊन देऊन केलेलें हें निव्वळ भाषांतर होय. हें दोन्ही भाषांतील पदांकडे पाहिलें असतां सहज कळण्यासारख आहे. यावर आमचें असें ह्मणणें आहे कीं हें भाषांतर मराठी भाषेच्या शब्दप्रयोगास बिलकूल धरून नाहीं. इंग्रजी मध्यें ' लेडीमॅकबेथ् ' ( Lady Macbeth ) ' फादर लरेन्स '( Father Lawrence ) 'मदर शिजेल (Mather schegal) असें म्हणण्याचा प्रघात आहे. परंतु मराठींतला प्रचार याच्या उलट आहे. आपली रीत म्हटली म्हणजे ' कालीमाता ' ' मरी आई' ' मॅकबेथ बाई ' ' लॉरेन्स बावा' असें, म्हणण्याची आहे. या रितीस अनुसरून म्हटलें म्हणजे ' मदर टंग ' ( Mother tongue ) याचें भाषांतर ' भाषामाता ' असेंच झालें पाहिजे हें उघड आहे, ' मातृभाषा ' याचा अर्थ ' मातृरूपभाषा ' असा करतां येणार नाहीं. कारण हा कर्मधारय समास होय. कर्मधारय

समासांत उत्तर पद प्रधान असतें; व माता हें प्रधान पद आहे. व तेंच येथें इष्ट आहे. कारण भाषेला मातेची उपमा देण्यांत मातेविषयीं आपले मनांत जें प्रेम व जो बहुमान वसत असतो तोच भाषेविषयीं दर्शवावा असा आपला हेतु असतो. तो अन्यरीतीनें समास करून सिद्धीस जावातसा जाण्यासारखा नाहीं. सारांश ' मातृभाषा ' हा शब्द-प्रयोग कोणत्याही दृष्टीनें पाहिला तरी अशुद्ध असून अप्रयोजक होय, असें आम्हांस वाटतें, खरें म्हटलें तर 'मदरटंग' ( Mother tongue ) याचे ऐवजीं ' स्वभाषा ' ' जन्म भाषा ' हे उत्कृष्ट शब्द रूढ आहेत, आणि मातृविषयक प्रेमच व्यक्त करावयाचें असलें तर ' भाषामाता ' ' भाषा-जननी ' हे शुद्ध शब्दही योजण्यास नड नाहीं. पण मराठी भाषेचा व्यासंग नसल्यामुळें या योग्य शब्दाची आठवणही कोणास होत नाहीं, व अनुकरणेच्छेनें त्यांचें मन अपप्रयोगाकडे धावतें ही केवढ्या खेदाची गोष्ट आहे !

मातृभाषा ' मायभाषा ' याच शब्दाच्या नमुन्यावर ' मातृदेश' व मायदेश' हे शब्दही अलीकडे चांगल्या चांगल्या लेखांतून घुसूं लागले आहेत; तेव्हां त्यांचाही उल्लेख येथें करणें जरूर आहे. हे शब्द 'मदरकन्ट्री' ( Mother country) यांचे पर्याय होत हें सांगणें नलगे. वरील शब्दांचें ठिकाणीं जे दोष आहेत ते तर ह्यांत आहेतच ! पण आणखी या शब्दांत माधुर्यही नाहीं, ही गोष्ट विशेष आहे. एके दृष्टीनें पाहिलें तर ' मातृभाषा ' ह्यांतील दोन्ही पदें स्त्रीवाचक असल्यामुळें हा शब्दप्रयोग येवढा कानाला वाईट लागत नाहीं. पण ' मातृदेश ' 'माय देश' ह्यांतलें एक पद स्त्रीवाचक व दुसरें पुरुषवाचक असल्यामुळें

हे शब्दप्रयोग कानाला गोड लागत नाहींत. इतकेंच केवळ नाहीं तर त्यांत अरसिकपणाचीही झाक दिसून येते असें म्हणावयास चिंता नाहीं. अशा ओंगळ शब्द प्रयोगाच्या ऐवजीं 'स्वदेश' ' जन्मभूमि ' हे शब्द उत्कृष्ट असून चांगलें शुद्ध आहेत. आणि मातृविषयक प्रेमाचा पान्हाच फोडावयाचा असेल तर 'भूमाता' व क्वचित् ' देशजननी हे शब्दही प्रशस्थ आहेत. ते योजण्यांत येतील तर किती बरें होईल.

परंतु मराठी भाषेकडे पूर्ण दुर्लक्ष असल्यामुळें आणि इंग्रजी भाषेच्या अत्यंत परिचयामुळें, केव्हां केव्हां तर मराठींत योग्य शब्द न सुचतां त्या अर्थाच्या इंग्रजी शब्दाचें निव्वळ भाषांतर होऊन बोलण्यांत व लिहिण्यांत येते तेव्हां जी मजा उडते ती कांहीं पुसूं नये. असें एक उदाहरण नुकतेंच आम्हास ऐकावयास मिळालें तें येथें सांगण्यासारखें आहे. कोणी गृहस्थ म्हणाले–अहो, तेवढे ते 'घड्याळाचे' हात सारून घड्याळ लावाल काय?" यावर दुसरे गृहस्थानें उत्तर केलें "घड्याळ लावतों, पण तुमच्या घड्याळाला हात कधीं फुटले?" हें शब्द ऐकतांच पहिले गृहस्थ एकदम शुद्धीवर आले व त्यांस आपली चूक तत्काळ कळून आली; तशीच ती आमच्या वाचकांसही कळून आल्यावांचून रहाणार नाहीं. इंग्रजींत ( The hands of a clock ) असें ह्मणतात. पण मराठींत घड्याळाचे हात असें न ह्मणतां कांटे ह्मणण्याची वहिवाट आहे, हें कोणासही सांगावयास पाहिजे असें नाहीं. अशाच प्रकारची मौज मराठींत प्रसिद्ध झालेल्या कित्येक ग्रंथांतून व मासिक पुस्तकांतील लेखांतून आढळून येऊं लागली आहे. तेव्हां मराठी भाषेच्या आस्थेवाइकांचें लक्ष तिकडे जाणे जरूर आहे.

आतां दुसरा एक शब्द सांगतों. तो सिद्ध करतांना शब्दाचे भाग पाडण्याची रीत अंगीकारण्यांत आली आहे ती कशी चमत्कारिक आहे हें पहाण्यासारखें आहे. 'सिम्पथी' ( Sympathy ) हा इंग्रजी शब्द आहे. ह्याला प्रतिशब्द म्हणून सहानुभूति हा मराठींत बोलण्यांत व लिहिण्यांत येऊं लागला आहे. पण सिम्पथी (Sympathy) याच्या अर्थाचा यथार्थ बोध 'सहानुभूति' या शब्दावरून होतो काय ? असें आह्मी विचारतों. आमच्या मतानें तर बिलकूल होत नाहीं. मग हा सहानुभूति शब्द आला कोठून ? व सिद्ध झाला कसा हें जर पाहिलें तर मोठा चमत्कर वाटतो. खरोखर ज्याच्या डोक्यातून प्रथम हा शब्द निघाला असेल, त्याचें तें डोकें मोठें विलक्षग ह्मटलें पाहिजे. सहानुभूति ह्याची उपपत्ती पहावयाची असली तर 'सिम्पथी' (Sympthty) शब्दाच्या उपपत्तीपर्यंत मजल मारली पाहिजे. 'सिम्पथी' ( Sympathy ) शब्दाची उपपत्ति अशी आहे. Syn together अथवा with ह्मणजे सह, सहित आणि Pathos feeling ह्मणजे अनुभव, आणि अनुभव ह्मणजे अनुभूति; अशा परंपरेनें 'सिम्पथी' ( Sympathy ) ह्मणजे सहानुभूती' असा शब्द सिद्ध झाला. कोण हा द्राविडी प्राणायाम! आणि येवढा हा द्राविडी प्राणायाम करूनही, ह्या शब्दाचे ठिकाणीं शब्दसौष्ठव नाहीं तें नाहींच!व त्यापासून इष्टार्थाचा व्हावा तसा बोधही होत नाहीं तो नाहीं. सिम्पथी ह्या शब्दाच्या अर्थाचा बोध 'समदुःख सुखत्व' ह्या शब्दानें कांहीं होतो, पण हाही शब्दसमुच्चय तोकडाच पडतो यांत शंका नाहीं. सिम्पथी शब्दांत, एकास दुःख तर दुसऱ्यास दुःख,

एकास सुख तर दुसऱ्यास सुख असे अर्थ असूनही आणखी दुसऱ्याविषयीं अनुकूलता, कळकळ, दयाबुद्धि, ममत्व, ममता वाटणें वगैरे अनेक अर्थ ग्रथित आहेत. तेव्हां एवढया सर्व अर्थांचा मराठींतील एकाच शब्दानें बोध करितां येणें कठीणच. यासाठीं प्रसंगानुरोधानें वेगवेगळे मराठी शब्द योजणें हेंच प्रशस्त आहे असें आमचें मत झालें आहे. 'सिम्पथी' (Sympathy) शब्दाला मराठींत चांगलासा शब्द नाहीं. ही गोष्ट खरी आहे. तसाच तो असावा हेंहि इष्ट आहे. तथापि ह्यासाठीं हे रांगडे शब्द उपयोगांत आणणें कितपत योग्य आहे, याचा विचार मराठी भाषेच्या आस्थेवाइकांनीं करावा, ह्याहून आमच्यानें येथें अधीक कांहींच ह्मणवत नाहीं.

मराठींत इंग्रजीवरून शब्द आणतांना शब्दास शब्द ठेवून देऊन कधीं चालणार नाहीं, हें जसें खरें आहे तसेंच शब्दाचे भाग पाडून भाषांतर करण्याची रीतही अप्रयोजक आहे, हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तसें केलें असतां विलक्षण प्रकार कसा होतो, ह्याचें एक मौजेचें उदाहरण आमच्या पाहण्यांत आलें आहे तें येथें लिहिण्यासारखें आहे. कोणा एका परीक्षा पास झालेल्या गृहस्थाची व एका गांवगुंडाची एकदां गांठ पडली. तेव्हां गांवगुंडानें त्यास फजीत करण्याच्या बुद्धीनें ह्मटलें 'कायहो! तुह्मांस इंग्रजी चांगलें येतें तर आम्हास ' रुद्राक्ष ' याला इंग्रजी शब्द काय हें सांगाल काय ? ' सदर गृहस्थानें तत्काळ आपलें अज्ञान कबूल केलें. तेव्हां गांवगुंड ह्मणाला, ' बस! तुह्मांला नाहीं येत तर मी सांगतों. अहो रू ह्मणजे ' काटन ' (Cotton) आणि द्राक्ष ह्मणजे 'ग्रेप' (Grape)

अर्थात्, रूद्राक्ष ह्मणजे कॉटनग्रेप (Cotton grape) असा शब्द सिद्ध झाला! एका भाषेंतील शब्द दुसऱ्या भाषेंत नेण्याची ही खाशी युक्ति! 'खरोखर, नवीन नवीन शब्द मराठींत सिद्ध करण्याची ही युक्ति जशी मासलेवाईक आहे, तशीच ती अगदीं अपूर्व आहे! अशा रीतीनें शब्दांचे व वाक्यांचे भाग पाडून भाषांतरें होऊं लागलीं ह्मणजे मराठी भाषेंत भराभर भाषांतरें करितां येऊं लागतील! व मराठींत वाटेल त्या विषयावर ग्रंथ बनवितां येऊं लागतील! केवढा या युक्तीचा प्रभाव! जे कोणी मनःपूर्वक ह्या युक्तीचा आदर करतील त्यांच्या हातून मराठी भाषेचें एक मोठेंच कार्य झालें असें होईल व त्याबद्दल मराठी भाषा बोलणारे सर्व लोक त्यांचे फार फार आभार मानतील यांत शंका नाहीं. परंतु शब्द बनविण्याची ही युक्ति कोणी बिचाऱ्यानें मराठींत चालविल तर चालवो! परंतु हीच युक्ति मराठी शब्दांचें भाषांतर इंग्रजींत करताना कोणी चालवील तर ती इंग्रजी ग्रंथकारास कितपत पसंत होईल याची बरीक शंका आहे. बहुधा ती त्यास बिलकूल पसंत पडणार नाहीं. इतकेंच नव्हे तर अशा युक्तिबाजास ते मूर्खांतच काढतील, हें आह्मी खात्रीनें सांगतों. तथापि इंग्रजी शब्दांना मराठींत वाटतील तसे शब्द ठोकून देण्याचा क्रम ज्यांनीं धरिला आहे, अशा मराठीची सेवा करावयास निघालेल्या आस्थेवाईक मंडळींनीं मात्र ह्या युक्तीचा अवश्य आदर करण्यासारखा आहे, असें आमचें मत आहे.

आतां मराठी भाषेच्या सध्याच्या स्थितीकडे पाहिलें असतां इंग्रजी शब्दांचें व वाक्यांचें भाषांतर करण्याची तर पाळी हरहमेश येते, आणि नवे नवे शब्द योजावे लागतात.

तेव्हां हें भाषांतर कसें करावें, नवे नवे शब्द कसे निर्माण करावे हे प्रश्न उत्पन्न होतात. वस्तुतः हे प्रश्न जसे अत्यंत महत्वाचे आहेत तसेच ते फार विचाराचे आहेत असें आह्मांस वाटतें. एका भाषेंतील शब्द दुसऱ्या भाषेंतील शब्दाशीं अर्थानें तंतोतंत नेहमीं जुळतीलच असें बहुधा होणें कठीण! तशांत इंग्रजी भाषा चांगली परिपक्क दशेस येऊन पोंहचली असून तिच्यांत असे कित्येक शब्द आहेत कीं, त्यांस मराठींत शब्दच नाहींत. तेव्हां त्यांचें भाषांतर करण्यास फार जड जातें. व त्यांच्या ठिकाणीं नवे नवे शब्द योजणें भाग पडतें. पण असे नवे नवे शब्द आणावे कोठून ? ही नेहमीं अडचण पडत असल्याकारणानें शब्दास शब्द ठेऊन देऊन भाषांतरें दडपून देण्याची कित्येकांची वहिवाट आहे. त्यांचें म्हणणें असें पडतें कीं, इंग्रजींतून मराठींत भाषांतर करतांना शब्दाच्या टाकटेकीकडे किंबहुना शुद्धते-कडे देखील एवढें लक्ष देण्याची कांहीं गरज नाहीं. पाव-लो पावलीं शब्दांची निवड करूं म्हटलें तर कसें चालेल ? आपला अभिप्रेत अर्थ कसा तरी व्यक्त करतां आला म्ह-णजे पुरे. “ अर्थारितात्पर्यं, न तु शब्दारि” हे प्राचीन सुभा-षित प्रसिद्धच आहे. त्यावर नजर देऊन ते आपला कार्यभाग उरकून घेतात. पण हा दडपशाहीचा मार्ग कोणाला पसंत असेल तो असो. आम्हास तर तो अगदीं अयोग्य वाटतो. राज्यकारणी प्रकरणांत दडपशाहीचें तत्व अंगिकारल्या वांचून चालत नसेल हें खरें; पण सरस्वतीच्या राज्यांत तरी या तत्वाचें अवलंबन करण्याचें कांहींच प्रयोजन नाहीं, अशी आमची समजूत आहे. कारण इंग्रजी शब्दांचें भाषां-तर करतांना ही जी मोठी अडचण येऊन पडते तींतून

मुक्त होण्याला एक चांगला उपाय आहे, आणि त्या उपायानें दडपशाहीच्या तत्वाचें प्रयोजनच मुळीं पडणार नाहीं. हा उपाय म्हटला म्हणजे स्वभाषेचा अभ्यास हा होय. पण सध्यां स्वभाषेचा अभ्यास होत आहे कोठें? तो व्हावा तसा होत नाहीं व इंग्रजीसारखी परिपक्व भाषा-जिचा चांगला अभ्यास होत आहे—ती जवळ उभी आहे. अशा वेळीं शब्द अडला म्हणजे इंग्रजीभाषेकडे लिहिणारांची दृष्टि वळावी हें स्वाभाविक आहे व त्यांनीं इंग्रजींतील शब्दाचें अनुकरण करावें हें योग्य आहे. परंतु तसें करतांना त्यांनीं आपली बुद्धि खर्चून तारतम्य ठेविलें पाहिजे, व शब्दांच्या योग्यायोग्यत्वाचा विचार केला पाहिजे. तसा विचार सध्यां होत नाहीं एवढेंच आमचें म्हणणें आहे. आणि जर विचार होत नाहीं तर तो अविचारच म्हटला पाहिजे हें उघड आहे. त्याचेंच भाषादूषण हें फळ होय. डोक्याला शीण न देतां शब्दास शब्द ठेऊन देऊन इंग्रजी शब्दाचें व वाक्याचें भाषांतर करण्याची रीत अत्यंत अप्रयोजक आहे, असें येथें शेवटीं म्हटल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

आतां 'मी' आणि 'आम्ही' या शब्दांचा उपयोग मराठींत कसा होतो हें आपण पाहूं. 'मी' हें एकवचन व 'आम्ही' हें त्याचें अनेकवचन होय. अर्थात स्वतःविषयीं व्यक्तिविषयक कांहीं बोलणें किंवा लिहिणें झाल्यास 'मी' असा एकेरी प्रयोग करणें प्रशस्त आहे, तसेंच पुष्कळ व्यक्तींविषयीं लिहिणें झाल्यास 'आम्ही' असा बहुवचनी प्रयोग केला पाहिजे, हेंहीसर्व संम्मत आहे. परंतु 'मी' असा एकेरी प्रयोग करणें प्रशस्त असतांही त्याच्या ठिकाणीं 'आम्ही' असा प्रयोग करण्याची मराठी भाषेची

जी रुढी आहे, ती लक्षांत ठेवण्यासारखी आहे. पण कित्येक लेखकांचें अनेक प्रसंगीं ह्या रुढीकडे दुर्लक्ष होतें, असें दिसून येतें. उदाहरणार्थ, 'नाना आणि महादजी' ह्या लहानशा पुस्तकाचीच प्रस्तावना पहा. हें पुस्तक मराठींतील प्रसिद्ध विद्वान् लेखक प्रो. चिंतामण गंगाधर भानू यांनीं लिहिलें आहे. सदर पुस्तकाच्या पांच सहा ओळींच्याच प्रस्तावनेचा आशय हा आहे कीं, 'नाना आणि महादजी' ह्या मुत्सद्यांच्या संबंधानें जे कित्येक निबंध त्यांनीं लिहून केसरी पत्रांत प्रसिद्ध केले होते तेच त्यांनीं स्वतंत्र पुस्तकरूपानें वेगळे छापून काढले. केसरींतील लेख संपादकाच्या नात्यानें लिहिले असल्यामुळें त्यांत ठिकठिकाणीं स्वमत दर्शवितांना स्वत:विषयीं 'आम्ही' असा प्रयोग त्यांनीं केला होता. त्याच्या ऐवजीं ह्या स्वतंत्र पुस्तकांत 'मी' असा एकेरी प्रयोग योजिला आहे. एवढाच काय तो फरक केला आहे. याशिवाय दुसरा कोणताही फेरफार केलेला नाहीं. आणि हा फेरफार करण्याचें कारण ते असें दर्शवितात, कीं ह्यांत दर्शविलेले विचार आपले एकट्याचे असल्यामुळें 'मी' असा एकेरी प्रयोग करणेंच योग्य आहे. ह्याप्रमाणें प्रोफेसर साहेबांनीं येथें आपली लीनता दाखविण्याचा जो मोठा आव घातला आहे तो केवळ अस्थानीं होय असें आम्ही नम्रपणें म्हणतों. मराठी भाषेंत 'मी' ह्या शब्दांत कोणता अर्थ दाखविण्याचें सामर्थ्य आहे आणि 'आम्ही' ह्या शब्दांत किती अर्थ संकेतित केलेला आहे ह्याविषयीं प्रोफेसर साहेबांनीं विचार केला आहे काय? केला आहे असें दिसत नाहीं. ते केवळ इंग्रजी भाषेंतील रुढीकडे पाहून घसरले आहेत असें म्हणणें प्राप्त आहे. इंग्रजी भाषेच्या व्याकरणाचें

कोणतेंही पुस्तक घेतलें तरी त्यांत असा नियम दिलेला आढळतो कीं, स्वतःसंबंधानें व्यक्तिविषयक बोलणें झालें तर नेहमीं 'मी' ( I ) हा शब्द योजीत जावा. राजे, पत्रकर्ते, अध्यक्ष इत्यादिकांनीं मात्र 'आम्ही' ह्या शब्दाचा उपयोग करावा. ह्याच शाळेंत पाठ केलेला नियम लक्षांत घेऊन प्रोफेसर साहेबांस वरील फेरफार करण्याची बुद्धि झाली, हें उघड आहे. पण मराठी भाषेंतील रुढि ह्या नियमाच्या उलट आहे. ही गोष्ट त्यांच्या लक्षांत आली नाहीं. कारण मराठीचा अभ्यास व व्यासंग कोठें आहे? तो जर असता तर त्यांच्या तत्काल लक्षांत आलें असतें कीं, मराठी भाषेंत स्वमत सांगतांना जर 'मी' असा प्रयोग केला, तर त्यांत अहंपणाचा अर्थ सूचित होऊन, बोलणाराचे पदरीं अविनयाचा दोष येतो, इतकेंच केवळ नाहीं तर उलटपक्षीं अशा ठिकाणीं 'आम्ही' असा प्रयोग केला असतां समुच्चयाचा बोध न होतां विनयाचा मात्र बोध होतो. हें मराठी भाषेचें सूक्ष्म निरीक्षण केलें असतां कोणासही कळून येईल, असें आम्हास वाटतें. यासाठीं आपल्यामध्यें कसें बोलण्याचा प्रघात आहे एवढेंच वाचकांनीं पहावें, असें आमचें त्यांस सांगणें आहे. 'हें घर कोणाचें' म्हणून जर आपणांस कोणी विचारलें तर 'हें घर आमचें आहे' असें आपण चटकर उत्तर देऊं. तेंच 'हें घर माझें आहे' असें उत्तर दिलें तर तें उद्धटपणाचें होत नाहीं काय? अशी उदाहरणे बोलण्यांत नेहमीं येतात. त्यांकडे विचारपूर्वक लक्ष देण्याचीच काय ती जरूर आहे, तें दिलें असतां वरील आमच्या म्हणण्याचा प्रत्यय येईल. 'मी, मी' व 'माझें व माझें' असा स्वतःविषयीं एकेरी

प्रयोग केल्यानें अहंपणाचा बोध होतो. अशी आपली समजूत आहे, आणि अशी आपली समजत जोंपर्यंत आपणांत आहे तोंपर्यंत तिच्याकडे दुर्लक्ष करून उपयोगही नाहीं. 'मी' व 'माझें' ह्या शब्दांच्या प्रयोगांत जो अहंपणाचा व उद्धटपणाचा अर्थ आहे, त्यावर कटाक्ष ठेवून, प्रसिद्ध माहाराष्ट्र कवि विठोबा अण्णा यांनीं एक मजेदार आर्या संस्कृतांत रचलेली प्रसिद्ध आहे, ती हीः—

सदनं मे, वसनं मे, जाया मे, मित्रबंधुवर्गो मे।
इति मे मे कुरवाणं कालवृको हरति नरमेषम्॥

सुश्लोकलाघव.

ह्याचा भावार्थ हा कीं—'मे' ह्मणजे माझें अर्थात 'हें घर माझें, हें वस्त्र माझें, ही भार्या माझी आणि हा मित्रवर्ग व बंधुवर्ग माझा. याप्रमाणें 'मी, मी' करणाऱ्या अशा नररूप मेषाला (मेंढ्याला) काळरूपी लांडगा तत्काळ गट्ट करून टाकतो. यास्तव आमचें असें सांगणें आहे कीं, मराठींत लिहिणारांनीं 'पोरकटपणानें 'मी, मी' ह्मणून मेषपात्र न बनतां 'आह्मी' व 'आमचे' अशा प्रौढ शब्दांचा उपयोग करावा; हेंच त्यांस योग्य आहे. 'मी' च्या ठिकाणीं 'आह्मी' म्हटल्यानें व्यक्तिसमुच्चयाचा मुळींच बोध होत नाहीं. हें लक्षांत ठेविलें पाहिजे. एकवचनीं शब्दाच्या ऐवजीं अनेकवचनीं शब्दांचा उपयोग करून, विनय अथवा आदरबुद्धि दर्शविण्याची रीत सार्वत्रिक आहे. आदरार्थी बहुवचनीं प्रयोग केला ह्मणून बाहुल्याचा बोध होतोच असें नाहीं. पहा कीं, 'बाबा आले?' असें मुलानें म्हणतांच त्याला 'अरे मुला, तुला किती बाबा आहेत' असा प्रश्न कोणी करतो काय? सारांश,

बहुवचनीं प्रयोग केला असतां तो अशा ठिकाणीं आदरार्थींच समजतात व तेणेंकरून एकवचनाचाच बोध होतो असें मानतात. मग स्वतःसंबंधानें व्यक्तिवाचक बोलावयाचें झालें असतां एक वचनाच्या ऐवजीं बहुवचनीं प्रयोग करण्यास तरी काय हरकत आहे? व तेणेंकरून एकत्वाचाच बोध होतो असें मानावयास तरी काय हरकत आहे? इंग्रजी भाषेंत एकाच व्यक्तीविषयींबोलणें झालें तर (ती व्यक्ति किती सन्माननीय असो) तिजविषयीं नेहमीं एकवचनींच प्रयोग करण्याची वहिवाट आहे. उदाहरणार्थः–Lord Morley, saysतसेंच Sir George Clerk declares, Justice Sir, Narayanrao Chandevarkar concludes इत्यादि. याचेंच भाषांतर करणें झालें तर मोर्ले ह्मणतो, सर जार्ज क्लार्क जाहीर करतो. न्यायमूर्ति सर नारायणराव चंदावरकर निर्णय सांगतो वगैरे अशा एकेरी शब्दांचा प्रयोग करणें योग्य नाहीं, हें कोणीही सांगेल. आणि जर कोणी करतील तर त्यांनीं जाणून बुजून सदर थोर राजमान्य व्यक्तींचा अपमान किंबहुना तिरस्कारही केल्याबद्दल नवीन कायद्याप्रमाणें राजद्रोहाचा आरोप त्यांजवर आणल्यास कांहीं चूक होईल काय? आणि एथवरही जरी कोणी मजल न आणली तरी आमच्या सरस्वतीच्या राज्यांत तरी त्याच्या पदरीं अविनयाचा व पोरकटपणाचा दोष बांधण्यास आह्मी चुकणार नाहीं. एकत्वाचा अर्थ दाखवावयाचा असतांही आदरार्थीं बहुवचनीं प्रयोग करण्याची चाल आमच्या मराठी भाषेंतच आहे असें नाहीं, तर ज्या इंग्रजी भाषेचें आमची मंडळी एवढें अनुकरण करूं इच्छितात, त्या इंग्रजी भाषेंतही अशी तऱ्हा नाहीं असें

नाहीं. उदाहरणार्थ–तूं म्हणजे Thou ह्या एकेरी अर्थाच्या शब्दाच्या ऐवजीं you म्हणजे तुम्ही हा अनेकवचनीं शब्द सामान्येंकरून नेहमीं योजितात, हें सर्वांस ठाऊकच आहे. आणि ह्याचें कारणही हें उघडच आहे कीं, दुसऱ्याशीं बोलतांना 'तूं, तूं' 'तुझें,तुझें' असें एकेरी बोलणें उद्धटपणाचें वाटतें. ह्याप्रमाणें एकवचनाच्या ठिकाणीं अनेकवचनीच प्रयोग करण्याची वहिवाट एवढी सार्वत्रिक असतांही, प्रोफेसर भानू यांचें तिकडे लक्ष गेलें नाहीं ही मोठी आश्चर्याची गोष्ट नव्हे काय ? मराठींत नावाजलेल्या लेखकांची जर ही दशा तर तेथें सामान्य जनांची कथा काय ? यास्तव एकवचनाची व अनेकवचनाची ही कथा आम्ही मुद्दाम वाचकांपुढें गाइली आहे. तरी तिचा ते योग्य विचार करतील असा आम्हांस भरंवसा आहे.

एथवर इंग्रजी भाषापद्धतीच्या अनुरोधानें मराठी भाषेंत शब्दाचें जे अपप्रयोग होऊं लागले आहेत, त्याविषयीं लिहिलें. ह्या अपप्रयोगांच्या सुळसुळाटामुळें भाषेची कशी हानी होत आहे, व तिच्या अभिवृद्धीला कसा अडथळा येत आहे त्याचा विचार करणें अत्यंत महत्वाचें काम आहे. त्याचप्रमाणें मराठी भाषेंत असे कित्येक ग्रंथ व लेख पाहण्यांत येतात कीं, त्यांचाही विस्तारानें वेगळा विचार करण्याची फार आवश्यकता आहे. ह्या ग्रंथांत व ह्या लेखांत बहुधा अर्थाची उणीव, मुद्देसूद विचारांची उणीव, व सामान्यतः रसिकत्वाची उणीव, अशी सर्वच प्रकारें उणीव असते. त्यांचें थोडक्यांत वर्णन करूं म्हटलें तर असे ग्रंथ व लेख 'अरसिकत्वाचे दर्शक होत' एवढें सांगितलें म्हणजे पुरे. हे ग्रंथ व लेख एकंदरीनें पाहतां मराठी

भाषेच्या अभिवृद्धीला अत्यंत अपायकारक होत असें आमचें म्हणणें आहे. कारण, मजकुराचा पुळपुळीतपणा, व पोरकटपणा पाहून वाचणारांस त्यांचा केवळ कंटाळा येऊनच राहात नाहीं, तर त्यामुळें एकंदरीनें स्वभाषेविषयीं तिटकारा येण्यास देखील कारण होतें. अशा ग्रंथासंबंधानें व लेखासंबंधानें आमच्याकडे आमच्या एका विद्वान मित्राचें एक लांबचलांब पत्र आलें आहे. त्यांतून येथें लागू पडण्यासारखा कांहीं भाग आम्ही उतरून घेतों. हे मित्र लिहितात:–

"मराठींत अलीकडे जे रसहीन ग्रंथ व लेख येऊं लागले आहेत त्यांसंबंधानें मी आपल्याजवळ पुष्कळ वेळां बोललों आहें. मला वाटत होतें कीं, ह्यासंबंधानें कोठें तरी कोणी कांहीं लिहिल, पण कांहीं नाहीं! जिकडे तिकडे गपचीप! नुकतींच माझ्या हातीं 'रंजित रंजक नाटकांची कांहीं पुस्तकें आलीं. मला नाटकें वाचण्याचा नाद आहे. हें आपणांस माहितच आहे. म्हणून, तीं घेऊन वाचूं लागलों, तों वर म्हटलेल्या रसहीन पुस्तकांचाच नमुना पहावयास मिळाला.सकृद्दर्शनीं ह्या नाटकमालेच्या नांवाचा अर्थ तरी काय ? हाच प्रश्न माझ्या पुढें उभा राहिला. आणि मीही आपणास हाच प्रश्न करितों कीं, 'रंजित रंजक' तें काय हो? कृपा करून याचा अर्थ तुम्हीं सांगाल काय ? ह्याचा अर्थ बसविण्याची मी तर आमच्या मित्रमंडळीशीं पुष्कळ खटपट केली. पण नीटसा अर्थ बसेना. शेवटीं, म्हाताऱ्या मनुष्याच्या तोंडावर पडलेल्या सुरकुत्यांतून जसा एखादा श्लोक कोणी बसवतात, अथवा शेतांत उन्हानें जमिनीला पडलेल्या भेगांतून जशा अक्षरांच्या ओळी

उत्पन्न करण्याचा यत्न कोणीं उद्योगी मनुष्य करितात, तसाच यत्न केल्यावर 'रंजित' रंजकाचाही कांहीं अर्थ बसला. तथापि तो कितपत खरा आहे हें एक परमेश्वरास तरी विचारलें पाहिजे किंवा प्रत्यक्ष या मालेच्या निर्माण कर्त्यानेंच या गोष्टीचा उलगडा केला तर न कळे! पुस्तकाला समर्पक नांव देणें, ही खरोखर मोठी महत्वाची गोष्ट आहे, तशीच मोठ्या विचाराचीही आहे. केवळ ग्रंथाच्या व लेखाच्या नांवावरूनच लेखकाच्या चातुर्याची कल्पना होते व आंतील मजकुराची किंमत होते. पण 'रंजित रंजक' नाटकापैकीं कांहीं अशीं आहेत कीं, त्यावरून पुस्तकाला वाटेल तें नांव दिलें तरी चालतें. अशीच तें लिहिणाराची सरासरी समजूत आहे असें म्हणावें लागतें. हीं नाटकें लिहिणाराला विषयाची निवड म्हणून कांहीं आहे, या गोष्टीचा गंधही नाहीं. चालू प्रचलित विषयांवर नवीं कोरीं करकरीत नाटकें लिहून वाचकांस अर्पण करण्याचा त्याचा बाणा आहे. ह्याबद्दल तो स्वतःच आपल्या प्रसिद्धिपत्रकांत आश्वासन देत आहे. अमूक गोष्ट म्हणजे नाटकाचा विषय होण्याला अपात्र आहे किंवा हातीं धरण्याला अग्राह्य आहे असें त्याला वाटत असल्याचें बिलकूल दिसत नाहीं. बंगाल्यांत बंगभंगाची हुल्लड उठली कीं पुरे, यांना नाटकें लिहिण्याला प्रचलित विषय मिळालेच. 'बंगभंग नाटक' 'टिळककेस नाटक' बारिसाल धामधूम नाटक' 'स्वदेशी आणि बहिष्कार नाटक.' ह्या नाटकेंच नाटकें! उद्यां मुंबईसारख्या गडबडीच्या शहरांत खटारा गाडी रस्त्यावर मोडली व शेंकडों लोक सभोंवतीं जमा झालेले ह्यांनीं पाहिलें कीं, ह्यांना नाटकाला प्रचलित विषय मिळलाच, आणि यांचें 'खटारागाडी नाटक'

तयार झालेंच! नाट्यकलेविषयीं कोण ही विचित्र कल्पना! सरासरी संवाद रूपानें मजकूर लिहिला व त्यांत प्रवेश अंक असे भाग पाडले, कीं झालें नाटक तयार, अशीच या 'रंजितरजंक नाटकां'च्या निर्माणकर्त्यांची समजूत आहे कीं काय कोण जाणें! आतां या कर्त्यानें "रंजित व रंजक" शब्द कोठून आणले. हें पाहूं? वस्तुतः हे शब्द कधीं कोणाच्या बोलण्यांत व लिहिण्यांत येत असतील किंवा कोठें आले असतील असें वाटत नाहीं. मग असे अप्रसिद्ध व संदिग्ध अर्थाचे शब्द पुस्तकाच्या नांवातच गोंवून देण्यांत काय मतलब असेल तो असो. कदाचित्, हें नांव वाचून याचा अर्थ तरी काय याचाच विचार वाचकांनी करीत रहावें असा तर हेतु यांत नसेल? कारण, प्रत्यक्ष आंतला मजकूर वाचून तर वांचकांचें जें मनोरंजन होणार, तें पुढें होईल. पण प्रथमारंभीं नुसतें नांव वाचूनच मंडळींनीं खूष व्हावें, अशी ही युक्ति दिसते. असें असेल तर मोहक नांवावर आपलीं औषधें खपवूं पाहणाऱ्या कित्येक वैद्यांच्या युक्तीप्रमाणेंच हीही अजब म्हटली पाहिजे. अर्थात् त्यांचाच कित्ता वरील युक्ति योजणारांनीं उचलला हें उघड आहे. बरें, अशा ह्या अमोल पुस्तकांना किंमत ठेविली असून त्यावर तीं घेणारास एक हजार पानांचें "पाश्चात्य देशच्या नामांकित नाटककारांच्या भाषांतराचें एकेक भलें लठ्ठ पुस्तक बक्षिस देऊं केलें आहे तें वेगळेंच. अर्थात् 'रंजित रंजक' पुस्तकें किंमतवान् होत, आणि पाश्चात्य देशच्या नामांकित नाटककारांचीं नाटकें फुकट बिन किंमतीचीं, त्यांना किंमत नाहीं! अशीच ही तऱ्हा झाली ह्मणावयाची, नव्हे काय? आतां बोला!

यांत रसिकत्वाला कांहीं सीमा राहिली ? बरें, अशीं हीं ताज्या प्रचलित विषयावर रचलेलीं कोरीं करकरीत पुस्तकें दर वर्षास सहा सहा वाचकांच्या हातीं देण्याचा ' रंजित रंजक ' नाटकांच्या कर्त्याचा संकेत आहे, धन्य आहे ! बिचारा शेक्सपिअर !–त्याची बुद्धिमत्ता येवढी लोकोत्तर खरी पण त्याच्यानें देखील वर्षांकाठीं एखाद-दुसरें नाटक रचण्यापलीकडे कांहीं झालें नाहीं. एकूण ह्या नाटकमालेच्या निर्माणकर्त्यानें शेक्स्पिअर कवीवरही ताण केली ! खरोखर, ज्या वटोदर नगरांत (वडोदेशहरांत) अशीं अजब नाटकें निर्माण झालीं त्या नगराला व गुणज्ञतेनें ज्यानें आश्रय देऊन तिचे कर्त्याला रसिकतेनें प्रोत्साहन दिलें त्या वटोदर नगराच्या अधिपतीलाही हें मोठें भूषण होय, अधिक काय म्हणावें ? इ. इ." एवढें पुरे. अशा या रसहीन लेखांविषयीं व ग्रंथाविषयीं जितकें लिहावें तितकें हवेंच आहे. तथापि सध्याच आम्ही तसें करूं इच्छित नाहीं. केवळ वरील पत्रद्वारा याचें आम्हीं दिग्दर्शन करून वाचकांचें लक्ष तिकडे वेधेल एवढेंच येथें केलें आहे, तरी मराठी भाषेच्या आस्थेवाईकांनीं त्याचा अवश्य विचार करावा असें आम्ही इच्छितों.

मराठी भाषेची अभिवृद्धि व्हावी, व आपल्या हातून तिची सेवा व्हावी, अशी पुष्कळांची इच्छा संप्रत दिसून येते, तशीच ती आमचीही आहे. यास्तव मराठी भाषेच्या अभिवृद्धीला अपायकारक म्हणून ज्या गोष्टी असतील त्या सर्वांच्या नजरेस आणणें, व त्यांचा स्पष्टपणें निषेध करणें

हें आमचें कर्तव्य आम्ही समजतों व याच बुद्धीनें आम्ही वरील लेख लिहिण्यास प्रवृत्त झालों, तरी वर सांगितलेल्या अपायकारक गोष्टींचा मराठी भाषेच्या आस्थेवाइकांनीं व तिची सेवा करूं इच्छिणारांनीं योग्य विचार करून त्या टाळण्याचा यत्न करावा, अशी त्यांस आमची मनःपूर्वक विनंती आहे. मराठी भाषेची सेवा करितों म्हणून म्हणावयाचें, आणि तिला अपायकारक अशा गोष्टींचा अंगीकार करून तिचे लचके तोडायाचे ! ही काय सेवेचीरीत ! व हा काय आस्थेचा प्रकार ! ही मराठी भाषेच्या आस्थेवाईकांची तऱ्हा पाहून आम्हास तर ' गोसावी आणि त्याचें माकड' ह्या गोष्टिचीच आठवण होते. ही गोष्ट थोडक्यांत अशी आहे कीं, एका गोसाव्यानें एक माकड पाळलें होतें. तें मोठें झालें, तेव्हां मला कांहीं सेवा सांगा म्हणून धन्याला म्हणूं लागलें. नको नको म्हणत असतांही, माकड ह्मणालें—" स्वामी, तुह्मी समाधी लावून बसलां म्हणजे, कोणापासून पीडा होऊं नये म्हणून मी तुमचे जवळ पहारा करीत बसतों.' फारच आग्रह पाहून, गोसावी म्हणाला—'बरें, तसें कर.' मग गोसावी समाधी लावून बसला असतां व जवळ माकड त्याजकडे डोळे लावून पहारा करीत असतां, एक माशी गोसाव्याच्या गालावर येऊन बसली. माकडानें दोन चार वेळां तिला हाकलली, तरी ती पुन्हां पुन्हां येऊन बसे. तेव्हां माकडास मोठा त्वेष येऊन माशीस पकडण्याच्या बुद्धीनें त्यानें गोसाव्याच्या गालावर कडाडकन पंजा मारला व गालाचें रक्त काढलें ! मराठी भाषेचा योग्य अभ्यास न करितां व तिचा व्यासंग न ठेवतां

जे कोणी तिची सेवा करण्यास प्रवृत्त होतात, त्यांची ही करणी आमच्या दृष्टीनें वरील माकडाच्या कृतीसारखीच होय. आणि खरोखर, मराठीचा अभ्यास न करतां व व्यासंग न ठेवतां आम्ही तिची सेवा करितों व तिची आस्था बाळगतों, असें ह्मणणें म्हणजे केवळ माकडचेष्टाच नव्हत काय? ह्यासाठीं, ज्यांच्या हृदयांत खरी आस्था व सेवा करण्याची बुद्धि वागत असेल त्यांस नम्रपणें एवढेंच आमचें सांगणें आहे कीं,—बाबांनों अगोदर मराठी भाषेचा अभ्यास करा व तिचा व्यासंग ठेवा. याखेरीज तिच्या अभ्युदयाचें सर्व यत्न लंगडे होत. केवळ इंग्रजी थाटाचीं संमेलनें भरविल्यानें, व कोणा राजानें पुष्कळसे पैसे दिले, कीं अशा संमेलनास येऊन कोरडी वटवट केल्यानें, कांहीं कार्यभाग होईल असें नाहीं. मराठी भाषेचा अभ्यास व व्यासंग ठेवणें हाच तिच्या अभिवृद्धीचा उत्तम उपाय आहे. आणि तो सर्वांच्या हातचा आहे. तो अमलांत आणण्यासाठीं दुसऱ्यावरअवलंबून राहण्याची कांहीं गरज नाहीं. यासाठीं त्याचाच अंगीकार करून तिच्या सेवेची खटपट करावी; हें मराठी भाषेच्या आस्थेवाईकांस सरतेशेवटीं सुचवून हा लेख पुरा करितों.

आतां आमच्या एका मित्राचे आभार मानण्याचें मात्र उरलें आहे. हे मित्र ह्मणजे रा० रा० दाजीसाहेब ऊर्फ **वासुदेव नारायण वैद्य.** हे होत. पुणें शहरांत ज्या ज्या गृहस्थांशीं नाट्यमालेच्या कामीं आमचा संबंध आला, त्या सर्वांत वरील गृहस्थांइतकी मदत आम्हास कोणाची झाली

नाहीं. यास्तव त्यांचे येथें प्रसिद्धपणें आभार मानून प्रथमपासून त्यांचा जो आधार आम्हास मिळाला तो शेवटपर्यंत मिळत राहो एवढेंच आम्ही इच्छितों.

शेवटीं, एका अत्यंत उद्वेगजनक गोष्टीचा येथें उल्लेख केल्यावांचून व त्याबद्दल मनापासून आपली दिलगिरी प्रसिद्ध केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं. ती गोष्ट ह्मणजे स्वर्गवासी ए. **एम. टी. ज्याक्सन** यांचा नासिक येथें झालेला खून. हे गृहस्थ मोठे विद्वान् होते व अत्यंत विद्याभिलाषी होते, यांस संस्कृतांत सोन्याचें पदक बक्षिस मिळालें होतें व त्यांस संस्कृत भाषेची व मराठी भाषेचीही फार आवड असे. शेक्सपिअरकृत नाट्यमालेला प्रथमपासूनच ह्यांचा आश्रय मिळाला होता. अर्थ साद्दश्यादि स्थळें, जीं आम्हीं आमच्या भाषांतरांत दर्शविलीं आहेत, तीं त्यांना फार आवडलीं होती, व पत्रद्वारें त्यांनीं वारंवार आम्हांस प्रोत्साहन दिलें होतें. अशा समर्थ विद्वानाचा आमच्या नाट्यमालेला वियोग झाला ही तिची मोठी हानि झाली ती भरून येणें कठीण आहे. याबद्दल फिरून दुःख प्रदर्शित करून पुरें करितों.

# उपोद्घात.

प्रस्तुत खंडांत ' व्हेनीस नगरचा व्यापारी ' हें नाटक दिलें आहे. हें शेक्सपिअर कवीच्या ' मर्चंट आफ व्हेनीस ' चें भाषांतर होय. हें नाटक सुखपर्यवसायी आहे. या कवीनें जितकीं म्हणून सुखपर्यवसायी नाटकें लिहिलीं आहेत, त्या सर्वांमध्यें याची गणना प्रमुखत्वानें केली आहे. यांत वेगवेगळ्या प्रकारचीं तीन चार वेगवेगळीं कथानकें घेऊन तीं कवीनें अशा कुशलतेनें एकत्र गुंफलीं आहेत कीं, त्या सर्वांची मिळून एकच सुरस गोष्ट झाली आहे. कवीचें हें कौशल्य केवळ अप्रतिम आहे. ते सामान्य वाचकांच्या किंवा टीकाकाराच्याहि एकाएकीं लक्षांत येत नसल्यामुळें, या संबंधानें पुढें प्रसंगानुरोधानें लिहिण्यांत येणारच आहे. तेव्हां असें हें सर्वोत्कृष्ट नाटक सध्यां वाचकांपुढें येत आहे; त्याचा ते उत्सुकतेनें आदर करतील अशी आशा आहे.

प्रथमतः त्या नाटकासंबंधानें जी अवांतर माहिती सांगण्यासारखी आहे ती सांगतों. त्या माहितीचा क्रम म्हटला म्हणजे नेहमींप्रमाणें असा आहेः—( १ ) हें नाटक कवीनें केव्हां रचलें; ( २ ) कोणत्या कथानकाच्या पायावर व कोणत्या आधारानें रचलें; व ( ३ ) या नाटकाची लोकप्रियता कशी काय आहे वगैरे. तर ही माहिती त्याच क्रमानें सादर करतों.

कोणत्याहि ग्रंथाच्या रचनेचा काळ मुक्रर करावयाचा म्हणजे तो तीन प्रमाणांनीं बहुधा मुक्रर करितात. हीं तीन प्रमाणें म्हणजे ( १ ) प्रत्यक्ष प्रमाण; ( २ ) बाह्य प्रमाण; व ( ३ ) अंतःप्रमाण; तर ह्या तीन प्रकारचीं प्रमाणें या नाटकासंबंधानें कसकशीं उपलब्ध आहेत, हें पाहूं. प्रत्यक्ष प्रमाण सांपडतें तें हें कीं, या नाटकाची नोंद स्टेशनर्स रेजिस्टर (Stationer's Registor ) येथें सन १५९८ त केलेली आहे. यावरून हें सन १५९८ सालाचे सुमारास कवीनें रचलें असें स्थूल मानानें ठरतें. प्रत्यक्ष प्रमाणावरून जें कळतें तें इतकेंच. आतां बाह्य प्रमाणें कोणतीं आहेत, हें पाहिलें तर तीं या नाटकाचा उल्लेख इतर कांहीं ग्रंथांत केलेला आढळतो त्यावरून मिळतात. त्यांत फ्रान्सीस मियर्स ( Francis Meres ) यानें केलेला पॅलॅडिस स्टॅमिना ( *Palldis Stemina* ) हा ग्रंथ विशेष महत्वाचा आहे. हा ग्रंथ त्यानें सन १५९८ त रचलेला असून त्यांत त्यानें सर फिलीप सिडनें, मारलो व स्पेन्सर यांच्या नांवाबरोबरच शेक्सपियरच्या नांवाचाहि पांच सहा स्थळीं उल्लेख केला आहे इतकेंच केवळ नाहीं, पण आनंदपर्यवसायी नाटकाविषयीं बोलत असतांना, शेक्सपिअरकृत "व्हेनीस नगरचा व्यापारी " या नाटकाचा देखील उल्लेख स्पष्टपणें केलेला आहे. अर्थात् सन १५९८ पूर्वी शेक्सपिअर कवीनें हें नाटक रचलें असें जें वर म्हटलें आहे, त्याला ह्यानें बळकटी येते. तथापि १५९८ सालापूर्वी कोणत्या सालीं हें निश्चित होत नाहीं तें नाहींच. तें निश्चित करावयाचें तें इतर पुराव्यावरूनच केलें पाहिजे. हा पुरावा मि. मॅलोन या नावाच्या शेक्सपियर कवीच्या एका प्रसिद्ध भक्तानें पुढें आणला आहे. मि. मॅलोन यानें या संबंधाचा शोध चालविला असतां हेन्स्लो ( Henslow ) नांवाच्या गृहस्थाचें कांहीं कागदपत्र व रोजनिशा त्याच्या हातीं आल्या, त्यांत ' व्हेनिशीयन कॉमेडी या नाटकाचा उल्लेख आहे. हा हेन्स्लो १५९२ चे सुमारास एका नाटकमंडळीचा व्यवस्थापक होता. त्यानें आपली

व शेक्सपियरची नाटकमंडळी एकत्र केली. अशीएकवटलेली मंडळी ज्या नाटकाचे प्रयोग करीत असत त्यांत 'व्हेनिशियन कॉमेडी' (*Venitian Comedy*) या नांवाचें एक नाटक होतें. ही व्यवस्था १५९४ पासून १५९६ पर्यंत चालू होती. वर सांगितलेली 'व्हेनिशियन कॉमेडि' हेंच शेक्सपियरचें प्रस्तुत नाटक असावें असें पुष्कळांचें ह्मणण आहे. यावरून हें नाटक १५९४ त कवीनें लिहिलें असावें असें मानितां येईल. मॅलोनच्या या मताला बऱ्याच टीकाकारांचीहि संमति आहे. तथापि कित्येक जण हा काल आणखीहि मागें नेतात, व याचे कारण येवढेंच कीं मारलो याच्या'ज्यू आफ माल्टा'(*Jew of Malta*)या नाटकाशीं शेक्सपीयरच्या प्रस्तुत नाटकाचें फार साम्य आहे; किंबहुना तें नाटक रंगभूमीवर आलेलें पाहूनच त्यासारखेंच प्रस्तुतचें नाटक लिहिण्याची शेक्सपीयरला स्फूर्ती झाली असें त्यांचें म्हणणें आहे. पण हें मत खरें दिसत नाहीं. कारण शेकसूपियर कवीनें त्या वेळीं स्वतंत्र रीतीनें नाटकें लिहिण्याला सुरुवातहि केली नव्हती. मग हें नाटक त्यानें त्यावेळीं लिहिलें असें म्हणण्यांत काय अर्थ आहे? सारांश, १५९४ हेंच साल सर्वानुमतें जें ठरलें आहे तेंच बरोबर आहे. आतां अंतःप्रमणावरून काय ठरते हे जर पाहिलें तर तें वरील अनुमानाशीं प्रतिकूळ नाहीं. अंतःप्रमाणांत मुख्यत्वें ज्या गोष्टींचा अंतर्भाव होतो त्या गोष्टी ह्मटल्या ह्मणजे कवीची बिचारपद्धती, त्याची भाषासरणी, कवितेची तऱ्हा वगैरे होत. ह्या संबंधानें प्रस्तुत नाटक व "टू जन्टलमेन आफ व्हेरोना" हें नाटक, या दोहोंत बरेंच साम्य आढळून येतें. सदर नाटक त्यानें प्रथम सन १५९१ त लिहिलें असून पुढें सन १५९४--९५ या सुमारास सुधारून व वाढवून शेवटचें प्रगट केलें. आतां या नाटकाच्या व प्रस्तुत नाटकाच्या विचारपद्धतींत, संविधानकाच्या कांहीं प्रसंगांत व भाषासरणींतहि बरेच साम्य दिसून येतें. तें असें कीं, नायिका व तिची दासी या दोघींचें, नायिकेच्या पाणिग्रहणानिमित्त आलेल्या मंडळीसंबंधानें टीकात्मक संभाषण, अंगठीची गोष्ट,

स्त्रीनें पुरुष वेश घेणें, दोघां खुषमस्कऱ्याचें साम्य, आणि भैलीचें उज्वलतत्व वगैरे. यावरून असें सिद्ध होतें कीं ' टू जन्टलमन ऑफ व्हेरोना ' हें नाटक जर कवीनें सन १५९४ त लिहिलें हें खरें आहे तर त्याच सुमारास प्रस्तुत नाटकही लिहिलें असलें पाहिजे. एथवर अंतःप्रमाणासंबंधानें झालें.

आतां प्रस्तुत नाटकांत एक दोन प्रसिद्ध ऐतिहासिक गोष्टींचा कवीनें उल्लेख केला आहे, त्याविषयीं लिहितों. असा उल्लेख करण्याची बहुतेक कवींची चाल आहे. तिचाच अंगीकार शेक्स्पीयर कवीनेंहि आपल्या नाटकांतून केला आहे. अंक तीन, प्रवेश दोन, यांत नूतन राजाच्या राज्यारोहणसमारंभाचा जो उल्लेख केला आहे तो बहुधा फ्रान्सचा राजा चौथा हेन्री याच्या राज्यारोहणसमारंभास अनुलक्षून केला आहे असें मॅलोननामें टीकाकाराचें मत आहे. हा समारंभ मोठ्या कडाक्यानें साजरा करण्यांत आला होता, व त्या संबंधानें इंग्लंड देशांत पराकाष्टेची नांवाजणूक चालली होती. ही एक गोष्ट. दुसरी गोष्ट म्हटली म्हणजे लोपेझ या नांवाच्या स्पॅनीश यहुदी डाक्टराची होय. या डाक्टरानें डॉन ॲन्टोनियो नावाच्या ख्रिस्ती मनुष्याला व इलिझाबेथ राणीला वीषप्रयोग करण्याची मसलत केल्याबद्दल जिकडे तिकडे गवगवा झाला होता. या गोष्टींत कितपत तथ्य असेल तें असो; तरी त्या वेळीं लोकांचीं मनें अतिशय खवळून गेलीं होतीं. तीं इतकीं कीं, हे यहुदी फार नीच होत, त्यांस एकदम फाशीं दिलें पाहिजे असे लोक धडधडीत म्हणूं लागले. त्याप्रमाणें पुढें लवकरच त्या यहुदी डाक्टराला फाशी देण्यांत आलें. तेव्हां या गोष्टीला लक्षून शेक्सपियर कवीनें या नाटकांत शायलॉक हें पात्र आणून लोकांस खुष करण्याचा यत्न केला असावा असें दिसतें. हें खरें मानण्याला असें कारण आहे कीं डॉ. लोपेझ या यहुद्यानें ज्याला विष घातलें म्हणून बाहेर आलें होतें त्याचें नांव अंन्टोनियो असें होतें व त्याच नांवाचें पात्र शेक्सपीयर कवीनें

आपल्या नाटकांत आणलें आहे. व त्याचा शायलॉक या यहुद्या-कडूनच जीव घेण्याचा यत्न करविला आहे. सारांश वर दिलेली विषप्रयोगाची हकीकत लोकांच्या मनांत ताजी असतांनाच शेक्सपि-यर कवीनें हें नाटक लिहिलें असावें असें मानावयास जागा आहे. या दोन्ही गोष्टी सन १५९४. त किंवा त्या सुमारास घडल्याचें प्रसिद्ध आहे. यांत जर कांहीं तथ्यांश असेल तर प्रस्तुत नाटक सन १५९४ त कवीनें लिहिलें असें दर्शविणारीं जीं वर कित्येक प्रमाणें सांगितलीं त्यांतच यांचाहि समावेश करणें अवश्य आहे. याप्रमाणें प्रस्तूत नाटक कवीनें सन १५९४ त लिहिलें यांत कांहीं संशय नाहीं. तथापि तें त्याच सालीं छापून प्रसिद्ध झालेलें मात्र दिसत नाहीं. वस्तुतः त्यांतले पहिले चार प्रवेश बदलून कवीनें नवीन रचलेले दिसतात. असें सुधारून तयार केलेलें हें नाटक सन १६०० शांत कवीच्या संमतीनें अखेर छापून प्रगट झालें.

एथवर प्रस्तुत नाटकाच्या रचनाकालाचा निर्णय झाला. आतां ह्या नाटकाचें संविधानक कवीनें कोणत्या गोष्टींच्या आधा-रानें तयार केलें हें पहावयाचें. प्रस्तुत उपोद्घाताच्या आरंभीं आह्मीं सांगितलेंच आहे कीं ह्या नाटकांत कवीनें तीन चार वेगवेगळीं कथानकें एकत्र करून एक नवीनच संविधानक निर्माण केलें आहे. तीं कथानकें हीं:—(१) कर्जाकरितां मांस कापून घेण्याची गोष्ट; (२) लग्नाकरितां करंडकाची निवड करण्याचा पण; (३) बापाच्या घरून मुलीस पळवून नेल्याची गोष्ट; (४) आंगठ्यांची गोष्ट. वगैरे. तेव्हां हीं कथानकें त्याला कोठें आढ-ळलीं हें पाहिलें पाहिजे. वस्तुतः हीं त्यास एक दोन ग्रंथातच एके ठिकाणीं ग्रथीत केलेली मिळालीं. अर्थात हीं त्यानें निरनि-राळ्या पुस्तकांतून मिळविलीं असें मानावयास कांहीं आधार नाहीं. तथापि हें ध्यानांत ठेविलें पाहिजे कीं, बहुधा अशी कथा-नकें दंतकथांच्यारूपानें देशोदेशच्या लोकांत प्रचलित असतात; आणि यांचा शोध शेक्स्पियर कवीच्या टीकाकारांनीं मोठ्या

शोधकबुद्धीनें लाविलाहि आहे, तथापि त्या गोष्टींवरून कवीला आपलें नाटक रचण्यांत कांहीं स्फूर्ति मिळाली असें मात्र म्हणतां येणार नाहीं. किंबहुना सदरहु गोष्टीशीं कवीचा अर्थाअर्थी कांहीं एक संबंध नाहीं हें जरी खरें आहे. तरी ज्या गोष्टी देशोदेशच्या लोकांस एवढ्या प्रिय वाटल्या त्यांचीच निवड शेक्स्पियर कवीनें कशी केली, हें पाहण्यासारखें आहे. खरोखर लोकांची आवड व कवीची निवड यांचा अशा रीतीनें येथें मिलाफ झालेला पाहून कवीच्या चातुर्याचें कोणालाहि क्षणभर कौतुकच वाटेल.

पहिल्याने आपण कर्जाकरितां मांस कापून घेण्याची गोष्ट घेऊं. अशा आशयाची जी एक गोष्ट महाभारतांत आहे, ती कित्येक पाश्चिमात्य लेखकांनीं हुडकून काढिली आहे. ही गोष्ट म्हणजे महाभारताच्या वनपर्वांतील उशिनरा राजाची कथा होय. या कथेंत असें सांगितलें आहे कीं एके काळीं इंद्र व अग्नि या देवांनीं त्या राजाचें सत्व पहाण्याचा बेत करून, कपोत आणि खगांतक यांचीं रूपें घेतलीं. मग गरूड कपोताच्या मागें लागला असतां, कपोत स्वसंरक्षणार्थ राजाकडे आला. राजानें त्याला अभय दिलें. लगेच गरूडही मागोमाग तेथें येऊन पोंहोचला; व माझें भक्ष्य मला दे म्हणून कपोतास राजापाशीं मागूं लागला. राजा देईना. तेव्हां राजाचा व गरूडाचा जो संवाद झाला, त्यांत शेवटीं असें ठरलें कीं कपोताच्या भारंभार राजानें आपलें मांस गरुडाला भक्षणार्थ द्यावें. मग गरुडानें तराजू आणून, एका पारड्यांत कपोताला घातलें व दुसऱ्यांत राजाच्या आंगाचें मांस काढून घेऊन तें घातलें. परंतु कपोताचें पारडें खालीं बसूं लागलें. ह्याप्रमाणें जास्त जास्त मांस काढून घातलें तरी देखील कपोताचें पारडें नमतेंच दिसूं लागलें. शेवटीं स्वतः राजा पारड्यांत जाऊन बसला तेव्हां मात्र दोन्हीं पारडीं समान झालीं. असें पाहून, बरें आहे ‘ मला खा, पण कपोताला नखही लावूं नको ’ असें राजा गरुडाला म्हणाला. मग राजा सत्वास ढळत नाहीं असें पाहून देव प्रसन्न झाले व त्यांनीं राजाला मोक्ष-

पदाप्रत नेलें. आतां यांत कर्ज घेतल्याचा उल्लेख प्रत्यक्ष नाहीं हें खरें, तथापि शरणागताचें रक्षण करणें हा राजाचा धर्मच आहे, व एकदां अभय दिल्यावर आपलें वचन पाळणें हेंहि नीतिदृष्ट्या त्याचें कर्तव्यच आहे, हें लक्षांत आणलें असतां, राजानें कपोताच्या मोबदला म्हणून भारंभार माझें मांस मी देतों असें ह्मटल्यावर, कर्जाऊ पैसा परत देण्या इतकाच जबाबदारीचा बोजा त्याच्या शिरावर आला असें होतें हें उघड आहे. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां, कर्जाकरितां मांस देण्याच्या गोष्टीचें मुलभूत तत्व, अगदीं साध्या स्वरूपानें, महाभारतांतल्या ह्या गोष्टींत दृष्टीस पडतें, यांत शंका नाहीं. याचप्रमाणें किंबहुना याहिपेक्षां विशेष निकट संबंध दाखविणारी अशी एक गोष्ट फारशी भाषेंत प्रसिद्ध आहे. तींत एका मुसलमानानें आपल्या शेजाऱ्यापासून आच्छेर मांस कापून देण्याच्या शर्तीवर कर्जाऊ पैसे काढल्याची हकीगत आहे; इतकेंच केवळ नाहीं तर हा शेजारीहि श्रीमंत यहुदीच होता असेंही सांगितलें आहे. ही हकीकत म्यालोन नामें एका शेक्‌स्पियर कवीच्या शोधक भक्तानें बाहेर आणिली आहे. ह्या गोष्टी कशाही मनोवेधक असल्या, व इतर देशांत कितीही लोकप्रिय झालेल्या असल्या, तरी त्या शेक्‌स्पियरच्या कानापर्यंत पोहोंचल्या असतील असें मानावयास कांहीं जागा नाहीं. वस्तुतः आपलें संविधानक तयार करण्यांत शेक्‌स्पियर कवीचा सगळा आधार 'धी ज्यू '(*The Jew*)आणि 'गियानेटो ' याची अचाट कृत्यें अथवा पराक्रम ' ( *The Adventures of Gaoneis* ) या दोन पुस्तकांवरच मुख्यत्वें करून आहे. 'धी ज्यू ' हें एक नाटक असून तें शेक्‌स्पियरचें ' मर्चंट ऑफ व्हेनीस ' हें नाटक सन १५९८ यांत प्रसिद्धिस येण्याच्या पूर्वीं सुमारें एकोणीस वर्षांवर रंगभूमीवर आलेलें होतें. ह्याविषयीं स्टीफन गॉसन ( Stephon Gosson ) नामें पुस्तककर्त्यानें आपल्या ' धी स्कूल ऑफ एब्यूज ' ( *The School of Abuse* ) या पुस्तकांत उल्लेख केला आहे. ' धी ज्यू , या

नाटकांत ऐहिक विषयांची अधाशीपणानें इच्छा धरणारांची काय दशा होते व व्याजबट्टा करणाऱ्या नीच सावकारांची दुष्ट कृत्यें किती भयंकर असतात, हें मुख्यत्वें करून दाखविलें असल्यामुळें, शेक्स्पियर कवीनें ह्याच हकीगतीवरून आपली करंडकाच्या निवडणुकीची हकीकत व शायलॉक यहुद्याच्या अटीच्या कर्जरोख्याची हकीकत घेतली असावी असें दिसतें; निदान शेक्स्पियरला ह्या नाटकाचा बराच उपयोग झाला असें मानावयास चिंता नाहीं.* सांप्रत 'धी ज्यू' हें नाटक उपलब्ध नाहीं. बहुधा तें सामान्य प्रतीचेंच असल्यामुळें लौकरच मागें पडलें असावें, आणि शेक्स्पियर कवीचें 'मर्चंट ऑफ व्हेनीस', हें उत्कृष्ट नाटक प्रगट झाल्यावर तर त्याचा अगदींच लोप झाला यांत कांहीं नवल नाहीं. त्याची एखादी प्रत आपल्या हातीं आली असती तर शेक्स्पियर कवीनें त्याचा कितपत उपयोग केला, कोणतें पात्र कशा तऱ्हेनें सुधारून आपल्या नाटकांत घेतलें, हें आपणांस पहातां आलें असतें. तसें करण्यास सध्यां जरी कांहीं मार्ग नाहीं. तरी 'धी ज्यू' हें नाटक रचलें गेलें त्याच सुमारास 'गियानेटो याची अचाट कृत्यें', ही कादंबरी नुकतीच प्रसिध्द झाली होती. वस्तुतः ती जरी १३७८ रांत मूळ इटाली भाषेत रचली गेली होती, तरी विशेष प्रसिद्धीस आलेली नव्हती; ती पुढें दोनशें वर्षांनी म्हणजे १५७८ रांत प्रथम छापून निघाली अर्थात ती सहजच शेक्स्पियर कवीच्या वाचण्यांत आली व त्यानें तिचा उपयोग करून घेतला. शेक्स्पियरच्या नाटकाचा आधार मुख्यत्वें याच गोष्टीवर आहे, असें सदर गोष्टीतील मजकुरावरून उघड उघड दिसून येतें. फार कशाला 'धी ज्यू' हें नाटक देखील या इटाली भाषेतील गोष्टीच्या आ-

* स्टीफन गॉसन यानें 'धी ज्यू' या नाटकाचें वर्णन देतांना जे शब्द योजलें आहेत ते फार जोरदार असून बव्हर्थसूचक आहेत ते हे:-

The play represents the greediness of wordly choosers and bloody minds of usurers.

धारानें रचलें असलें पाहिजे असें मानावयास बळकट आधार आहे. शेक्स्पियरकवीनें तर आपल्या नाटकांतील बहुतेक हकीगत 'गियानेटो' या गोष्टीतूनच घेतली आहे हें वर सांगितलेंच आहे.

आता दुसरें कथानक 'करंडकांची निवड' हें होय. बहुधा हें कथानक शेकस्पियरकवीनें 'गेस्टा रोमॅनोरम' (*Gesta Romanoram*) या ग्रंथांतून घेतलें आहे. हा ग्रंथ मूळ इटाली भाषेंत असून त्यांत अनेक चमत्कारिक गोष्टींचा संग्रह आहे. त्याचें भाषांतर शेकस्पियरकवीच्या पूर्वी इंग्लंडांत झालें होतें. अर्थात तें त्याच्या पहाण्यांत आलें यांत शंका नाहीं. यांत 'गियानेटो' या गोष्टीचाच बहुतेक अनुवाद केला असून, करंडकाच्या निवडीचें प्रकरण मात्र कांहीं पालटून घातलेलें आहे. व आपल्या कवीनेंहि याचेंच अनुसरण आपल्या नाटकांत केलेलें आहे असें तुलनेवरून दिसून येतें. करंडकाच्या निवडणूकींत जें तत्व ग्रथित केलें आहे तें हें कीं, जगांत गाजरपारखी लोक फार, ते वस्तूंच्या बाहेरच्या आविर्भावाला मात्र भूलतात. हें चांगलें नाहीं. अनेक वेळां बाहेरून ओंगळ दिसणाऱ्या वस्तूंतहीं स्पृहणीय असा गूढ अर्थ साठविलेला असतो. यास्तव जे सुज्ञ आहेत ते वास्तविक गोष्टींचीच निवड करितात, हें तत्व सामान्यें करून अनेक पुरातन काळच्या दंतकथांतहि प्रदर्शित केलेलें दिसून येतें. कोणा राजानें फाटकीं वस्त्रें अंगावर असलेल्या व ओंगळ दिसणाऱ्या भिकाऱ्यास जवळ बोलावून त्याचा आदरसत्कार केला; आणि हें कृत्य पाहून दरबारची सरदार मंडळी आश्चर्यांत पडली असतां त्यांचा भ्रम घालविण्यासाठीं म्हणून, त्यांजपुढें सोन्याचे व लोखंडाचे असे कित्येक करंडक त्यानें ठेविले, व त्यांस त्यांची निवड करण्यास सांगितली. दरबारच्या मंडळींनीं सोन्याचे तेवढे करंडक निवडून घेतले. पुढें राजानें सर्व करंडक सर्वांसमक्ष उघडविलें तों सोन्याच्या करंडकांतून हाडकें वगैरे ओंगळ पदार्थ निघाले व लोखंडाचें करंड्यांतून हिरे, माणके वगैरे निघालीं.

त्याजकडे बोट दाखवून राजा म्हणाला बाहेरच्या देखाव्यावर गेल्यानें व्यवहारांत अशी फसगत होते इ. इ. अशी एक दंतकथा प्राचीन ग्रीक भाषेंत प्रसिद्ध असल्याचें एका शोधक टीकारानें लिहिलें आहे. आपल्या इकडेही अशा कित्येक कथा वर्णिल्या आहेत. रामदासस्वामींच्या बखरींत अशीच एक गोष्ट सांगितली आहे ती मराठी वाचकांस येथें आठवेलच. स्वामी धोतांडी आहेत असा त्यांच्या काळच्या कित्येक लोकांचा समज होता, व ते त्यांच्या चेष्टाहि करीत. एकदां स्वामी कृष्णानदींत उभे राहून पुरश्चरण करीत असतां, कांहीं मंडळी नदीवर स्नान करीत होती व एकीकडे स्वामींची कुटाळकी करीत होती. मंडळी घरोघर जाऊं लागली, तेव्हां त्यास स्वामींनीं हांक मारून म्हटलें हें घ्या. असें ह्मणून मूठ मूठ रेती प्रत्येकास देऊं लागले, तेव्हां सर्वांनीं एकमेकांकडे पाहून, हांसून ती फेंकून दिली. पण त्यांच्यांत एकजण भाविक होता. त्यानें मात्र, स्वामींच्या या कृतींत कांहीं तरी गूढ असेल असें समजून दिलेली रेती उपवस्त्राच्या पदरीं बांधून घरीं आणली. दुसरेदिवशीं पाहतों तों रेती सोन्याची झाली आहे या हकीगतीकडे भाविक दृष्टीनें न पाहतां व्यावहारिक दृष्टीनें पाहिलें तर यांत सदर भाविक गृहस्थाचें चातुर्यच दिसून येतें असें ह्मणणें भाग आहे. याचप्रमाणें द्रौपदी, सीता इत्यादि भारतीय स्त्रियांच्या स्वयंवराच्या वेळच्या पणांतही निवडणुकीचेंच तत्व आहे. पण ह्या सर्व कथानकांतलें सामान्य तत्व लक्षांत घेऊन व तत्संबंधाच्या साध्या-सरळ हकीगतीचा विचार करून शेक्स्पियर कवीनें आपलें करंडकांच्या निवडणुकीचें मनोहर कथानक कसें तयार केलें व तें एकंदर संविधानकांत कसें गोंवून दिलें हें फार फार पाहण्यासारखें आहे.

यापुढील तिसरें कथानक बापाच्या घरून मुलीस पळवून नेल्याची गोष्ट. यास आधार ह्मटला म्हणजे मॅसुशियो डी सॅलरनो ( Massusio de salerano ) नामें मनुष्याची जी गोष्ट इटालीयन भाषेंत प्रसिद्ध आहे तिचा आहे असें दिसतें. वस्तुतः

ही गोष्ट एवढी ह्मणण्यासारखी चटकदार नाहीं किंवा तींत कांहीं मोठें गूढ तत्वही भोंवून दिलेलें नाहीं; तथापि तिची हकीकत 'व्हेनिस नगरचा व्यापारी' या नाटकांतील जेसीका व लॉरेन्झो यांच्या हकीगतीशी बरीच मिळती आहे. तेव्हां या गोष्टीचा शेक्स्पियर कवीनें उपयोग केला असेल असें मानावयास जागा आहे आणि शेवटलें आंगठीचें कथानक तर 'गियानेटो' च्या गोष्टींतूनच जशाच्यातसेंच कवीनें घेतलें आहे.

याप्रमाणें संविधानकांतील मूळकथानकांचा व उपकथानकांचा इतिहास झाला. त्यावरून कवीनें कोणकोणत्या ग्रंथांचा व लेखांचा आधार प्रस्तुत नाटक रचतांना घेतला ह्याचा बराच खुलासा होईल.

यापुढील कलम, प्रस्तूत नाटकाच्या लोकप्रीयतेचें; त्याविषयीं आतां लिहावयाचें. वर सांगितलेली कथानकें पाहिलीं तर तीं किती साध्यास्वरूपाचीं आहेत हें कोणासहि सांगणें नलगे. पण ह्माच ओबडधोबड आधारावर आपल्या कवीनें कशी टोलेजंग इमारत उठविली ती आपणापुढें उभी आहेच. तिच्या अप्रतीम शोभेकडे लक्ष गेलें असतां, प्रेक्षकजन केवळ तटस्थ होऊन जातात हें कवीच्या कुशलतेचें फळ होय. मूळचीं साधीं कथानकें जर लोकप्रीय झालीं होतीं तर त्यांनाच विशेष आकार देऊन शेक्स्पियरसारख्या कवीनें आपल्या कलमानें रंग चढविल्यावर ती कृति अत्यंत मोहक झाली यांत काय नवल? प्रस्तूत नाटकांत कवीच्या बुद्धिमत्तेचा पूर्ण विकास झालेला दिसून येतो. ज्यावेळीं कवीनें हें नाटक लिहिलें त्या वेळीं त्याचें वय चांगलें चौतिशीला आलें होतें; आणि अनेक व्यवसायांच्या मनुष्यांनीं गजबजलेल्या लंडन शहरीं सरासरी बारा वर्षें नाटकाचा धंदा त्यानें चालविला होता. अशा स्थितींत अनेक गोष्टींचा त्याला अनुभव येऊन चुकला होता, व आपल्या धंद्यांतहि त्यानें चांगलें प्राविण्य संपादन केलें होतें. ऐन तारुण्यांत असणारी त्याची उच्छृखल वृत्ति या वेळीं मावळून गेली होती. आनंदपर्यवसायी नाटकामध्यें अनंगाच्या चंचल रंगाहून अधिक महत्त्वाचें कांहीं

असावें असें त्याला त्या वेळीं वाटूं लागलें होतें. या वेळीं त्यानें निरनिराळ्या विषयांचें बरेंच सूक्ष्म निरीक्षण केलें होतें. त्याच कारणामुळें त्याचे प्रौढ विचार, त्याची आनंदीवृत्ति वगैरे गुण या नाटकांतील बहुतेक प्रवेशांत, किंबहुना प्रत्येक पात्रांत प्रतिबिंबीत झाले आहेत. अर्थात एकंदर नाटकाची भाषा–सरणी, संविधानक जुळविण्यांत त्यानें ग्रथित केलेले विचार, नाट्यकलेमध्यें त्यानें संपादिलेलें प्राविण्य, निरनिराळ्या पात्रांच्या स्वभावांचा परिपोष करण्याची त्याची शैली, तत्त्वज्ञानाची किंचित झांक आणि उदात्त विचार हें गुण प्रस्तूत नाटकांत पूर्णत्वास पोहोंचलेलें दिसून येतात. तेव्हां अनेक गुणांनीं परिपूर्ण असें हें नाटक प्रसिद्ध झाल्यावर लौकरच लोकप्रीय झालें; व ही लोकप्रीयता त्यास तीनशें वर्षें होऊन गेली तरी आतांपर्यंत अबाधित आहे. या नाटकांत मुख्य पात्र म्हटलें म्हणजे शायलॉक हें होय. आणि तें कवीनें कसें वठविलें आहे व कशा अर्थानें येथें आणलें आहे हें लक्षांत घेऊन तें तसें वठविण्यांत अनेक इंग्रज नटांनीं आपलें बुद्धिकौशल्य खर्चलें आहे. वस्तुतः प्रस्तूत नाटकाच्या लोकप्रीयतेचा इतिहास म्हणजे शायलॉक या पात्राची भूमिका घेणाऱ्या नटांच्या कुशलतेचाच इतिहास होय, असें ह्मणावयास चिंता नाहीं. कवीनें हें नाटक रंगभूमीवर आणलें त्यावेळीं रीचर्ड बरबॅज ( Richard Burbadge ) नांवाच्या नटाकडे शायलॉक ह्या पात्राची भूमिका होती. तो शेक्सपियर कवीचा समकालीनच होता, तथापि त्याला या पात्राच्या कृतींतलें रहस्य बरोबर कळलें होतेंसें दिसत नाहीं. त्याच्या मतें शायलॉक कसा होता?– तर शायलॉक म्हणजे एक जख्ख म्हातारा, पोकवळलेला, क्रूर, दुष्टबुद्धि, खाष्ट, मानसिक भ्रष्टतेमुळें चळ लागलेला असा कोणी यहुदी होता; व असेंच तो त्याचें सोंग आणित असे. आणि याच धोरणावर बसविलेल्या रंगावृत्तीचें पुस्तक 'लॅन्स डाऊन्स व्हर्शन' ( *Lancedown's Version* ) या नांवानेंहि प्रसिद्ध

होतें; व त्याचे प्रयोग कित्येक वर्षे सारखे चालले होते. बरबेज याचेंच अनुकरण डॉगेट ( Dogget ) हा नटहि करीत असे. असा धांगडधिंगा घालून हे दोघे नट प्रेक्षकसमूहांत घटकांच्या घटका हांशा पिकवून गंमत करीत असत. पण पुढें मॅक्लीन ( Macklin ) नामें एक नट प्रसिद्धीस आला. त्यानें या पात्राचें रूप अगदीं पालटून टाकलें. यानें शायलॉक हा जख्ख म्हातारा न दाखवितां, अगदीं जवान जरी नव्हे, तरी पन्नाशीला आलेला असा प्रौढ बुद्धीचा मनुष्य होता असें धरून, तो मोठा कावेबाज, दृढनिश्चयी, विचारनिमग्न व आपल्या विचारसरणींत अचूक, हेकेखोर, डावपेच लढविण्यांत कुशल असा रंगभूमीवर आणला. त्यानें दाखविलेलें शायलॉकचें हें स्वरूप व त्याची बतावणी त्या काळच्या प्रेक्षकांस पटली, व सर्वांनीं त्याच्या चातुर्याची फार वाहवा केली * यानंतर कीन (Kean) या नांवाचा दुसरा एक नट पुढें आला व शायलॉक या पात्राच्या भुमीकेचे मॅक्लीन यानें दाखविलेल्या स्वरूपांत व बतावणींत त्यानें आणखी बरीच सुधारणा केली. व तेणेंकरून शायलॉक हा फार विचारी व गंभीरवृत्तीचा असून, त्याला आपल्या पुरातन, पवित्र व पूज्य जातीचा पूर्ण अभिमान होता असें प्रेक्ष-

---

* मॅक्लीन या नटाची एक मौजेची आख्यायिका येथें सांगण्यासारखी आहे, तीवरून तो आपल्या काळीं किती लोकप्रिय झाला होता याची बरीच कल्पना होते, ही आख्यायिका मुळ इंग्रजींत जशी आढळली तशीच येथें देतों:—

Mr. Macklin happened to be in a large company of ladies and gentlemen, among whom was the celebrated Mr. Pope. The conversation having turned upon Mr. Macklin's age, one of the ladies addressed herself to Mr. Pope, and suggested that he should write an epitaph when Mr, Macklin died. 'That I will, Madam' Said Mr. Pope. Whereupon the lady rejoined---'Nay, I will give it now.':--

'Here lies the Jew
That Shakespeare drew.'

कांस भासू लागलें. ख्रिस्तीलोक आपल्या जातीची जी अवहेलना करीत होते व आपल्या जातिबांधवांवर जो गहजब ते करीत असत त्याचा प्रतीकार केला पाहिजे या एकाच विचारानें तो मनांत जळफळत होता. व ही त्याची वृत्ति मनुष्यस्वभावास अनुसरून होती. अशी प्रेक्षकांची खात्री झाली. या दोघां प्रसिद्ध नटांनीं वर सांगितल्याप्रमाणें शायलॉक या पात्राच्या स्वरूपांत जो फरक केला त्याच्या योगानें इंग्लंड देशच्या लोकमतांत मोठाच फेरफार झाला, व यहुदी लोकांविषयीं पूर्वी जे दुराग्रह व जे गैरसमज कित्येक शतकें ख्रिस्ती लोकांच्या मनांत घर धरून बसले होते ते लयास गेले; व त्यांजविषयीं त्यांस करुणा व आस्था वाटूं लागली.* मॅक्लीन व

* शेकस्पियर कवीचे वेळीं इंग्लंड देशांत यहुदि लोकांविषयीं लोकमत कसें होतें याची कल्पना मागें (पृष्ठ ४४) डॉ० लोपेझ याजवरील आरोपाचा जो उल्लेख केला आहे त्यावरून वाचकांस बरीच होईल. विशेष माहिती पुढील उताऱ्यावरून कळून येईलः—

"At the gallows the Doctor made an endeavour to address the vast mob that had collected to see him die, but his first utterances were interrupted with the cruelest jeers. Exasperated by the treatment he received from, the unruly crowd, he contented himself with crying out before the hangman adjusted the noose, that he loved the Queen and Antonio as well as he loved Jesus Christ.-The irony called forth loud peals of laughter, and as the bolt fell the people shouted, 'He is a Jew!' The excitement that his death cread was not allowed by the Government to subside immediately. No less than five official accounts of Lopez's treason, with many Semi---official pamphlets, were prepared for publication, to keep the facts of this important case well before the public mind. 'THE JEWS IN ENGLAND.' P. P. 396.

FURNESS' VARIORUM.

कीन यांच्याच कल्पनेचा अनुवाद करून अलीकडील प्रसिद्ध नट सर हेन्री इर्व्हिंग यानेंहि या पात्राच्या वर्तावणींत बरीच सुधारणा केली. तो असें ह्मणतो कीं ' व्हेनिस नगरचा व्यापारी ' या नाटकांत शायलॉक या पात्राचें जें चरित्र आलें आहे त्याचें पृथक्करण केलें तर त्यांत तीन वेगवेगळे भाग, तीन वेगवेगळ्या स्वरूपांनीं दिसून येतात. तो व्याजबट्टा करणारा सावकार होता हें त्याचें एक स्वरूप; परधर्मी नीच अतएव द्वेष्य अशा ख्रिस्त्यांनीं त्याच्या मुलीला त्याच्या घरांतून काढून नेल्यामुळें कोणाहि बापाच्या मायाळू अंतःकरणांत जें दुःख व्हावयाचें तशा दुःखानें गांगरून गेलेला असा तो एक दुखीकष्टी प्राणी होता, हें त्याचें दुसरें स्वरूप; आणि ज्या कुळानें त्याची जन्मभर विटंबनाच केली अशा कुळाचा सूड कधीं घेऊं व कसा घेऊं असें ज्याला झालें आहे व शेवटीं सुडाची संधी ज्याला प्राप्त झाली आहे असें पाहून कृतार्थ झालेला तो एक धनको व पक्षकार होता हें त्याचें तिसरें स्वरूप. अशीं हीं तीन चित्रें लक्षांत आणून इर्व्हिंग हा जेव्हां रंगभुमीवर आपलें काम करी, तेव्हां त्याची कर्तबगारी पाहून प्रेक्षकजन केवळ थक्क होऊन जात, व मूळ नाटकाची खुबी लक्षांत येऊन त्यांस पराकाष्टेचा संतोष होई. सारांश, मूळचें नाटक सुंदर व तें वठविण्यांत उत्तम उत्तम नटांचें साहाय्य मिळाल्यामुळें तें इंग्लंड देशांत आबालवृद्धांस अत्यंत प्रिय झालें आहे. आणि आपल्या इकडेही हें नाटक अशा पद्धतीनें व अशा मार्मिक दृष्टीनें जर वाचकांच्या वाचण्यांत येईल तर तें त्यांसही प्रिय झाल्यावांचून राहणार नाहीं. असा भरंवसा आहे.

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )

सांप्रत लोकमताचें हे मान अगदीं फिरून गेलें आहे ही संतोषाची गोष्ट आहे. हें श्रेय पुष्कळ अंशानें शेक्सपियर कवीला दिलें पाहिजे असा आमचा ग्रह झाला आहे. यासंबंधानें लॉर्ड मेकॉलें यांचा " Civil Disabilities of the Jews हा निबंध वाचून पाहण्याविषयीं वाचकास आमची शिफारस आहे.

प्रस्तुत नाटकाच्या गुणदोषविवेचनास आरंभ करण्यापूर्वी एका लहानशाच पण महत्त्वाच्या मुद्याची येथें चर्चा करण्यासारखी आहे. हा मुद्दा म्हटला म्हणजे या नाटकाच्या नामकरणाचा होय. ह्या नाटकास 'व्हेनिस नगरचा व्यापारी' असें जें लांबलचक नांव कवीनें दिलें आहे तें कां? ह्या नाटकांतलें मुख्य व महत्त्वाचें पात्र कोणतें?–शायलॉक कीं अँटोनिओ? तसेंच 'व्हेनिस नगरचा व्यापारी' म्हणून म्हटला आहे तो कोण?–शायलॉक कीं अँटोनियो? खरें म्हटलें असतां, बॅसॅनिओ व पोर्शिया हीं या नाटकांतलीं नायक व नायिका होत; तेव्हां त्यांच्या नांवांवरून प्रस्तुत नाटकास नांव दिलें पाहिजे होतें. पण तसें कवीनें केलें नाहीं. नांव देण्यांत त्यानें तिसऱ्याच पात्राला पुढें केलें आहे. तें पात्र कोणतें?–तर 'व्हेनिस नगरचा व्यापारी.' बरें, व्हेनिस नगरचा हा व्यापारी बॅसॅनिओ असेल काय?–नाहीं, खचित नाहीं. कवीनें त्याचें जें वर्णन दिलें आहे तें "तो चतुर व सरदारी बाण्याचा दिसला" * इतकेंच. यावरून तो व्यापारी होता असें म्हणतां येत नाहीं. मग हा व्यापारी कोण?—अर्थात शायलॉक किंवा अँटोनिओ यांतून कोणी तरी एक असला पाहिजे. शायलॉक हें पात्र या नाटकांत महत्त्वाचें व मुख्य आहे यांत शंका नाहीं. व त्याच्या नांवानें नाटकाचें नामकरण करण्यास तो सर्वथा योग्य आहे. फार कशाला?–प्रस्तुत नाटकाच्यापूर्वी होऊन गेलेलीं जीं दोन नाटकें प्रसिद्ध आहेत त्यांचीं नांवें शायलॉक या पात्रासारखीं जीं पात्रें त्यांत आहेत त्यांजवरूनच ठेविलीं आहेत. तीं नाटकें 'धी ज्यू' (*The Jew*) आणि 'धी ज्यू ऑफ माल्टा' (*The Jew of Malta*) हीं होत. यांचा उल्लेख मागें आलेलाच आहे. पण शेक्स्पियर कवीनें प्रस्तुत नाटकांत जो ज्यू आणला आहे व त्याचें जें वर्णन दिलें आहे त्यावरून पाहतां त्याच्या दृष्टीनें शायलॉक हा 'व्हेनिस नगरचा व्यापारी' नव्हे. कारण, शायलॉक

* अंक एक, प्रवेश दोन पहा.

हा देवघेवीचा, व्याजवट्याचा व्यवहार करणारा एक सावकार होता; पण व्यापारी नव्हता. तेव्हां कवीच्या दृष्टीनें अँटोनिओ हाच खरा व्यापारी होय व तोच येथें इष्ट आहे हें उघड आहे. मुख्य पात्र बाजूस ठेवून तिसरेंच पुढें आणावयाचें, तसेंच नाटकांतला इष्टार्थ छपवून ठेवावयाचा ही शेक्सपियर कवीची सामान्यैकरून रीतच होती. ती लक्षांत ठेविली तर या नाटकाचें नामकरण त्या रीतीस अनुसरूनच झालें आहे असें म्हटलें पाहिजे.

याप्रमाणें सांगण्यासारखी अवांतर माहिती सांगून झाल्यावर आतां प्रस्तुत नाटकाच्या पर्यालोचनास आरंभ करितों.

**अंक १ ला. प्रवेश १ ला.**—शेक्सपियर कवीच्या नेहमींच्या परिपाठाप्रमाणें प्रस्तुत नाटकाचा आरंभ त्यानें एकदमच केला आहे; व ज्या पात्रावरून प्रस्तुत नाटकाला त्यानें नांव दिलें तेंच आरंभाला तो आपणांपुढें आणून उभें करितो. हें पात्र म्हटलें म्हणजे 'व्हेनिस नगरचा व्यापारी,' अँटोनिओ हें होय. तो येतो तो आपल्या दोन मित्रांसह येतो. पुढें लौकर आणखी दोन चार मित्र त्याला वाटेंत भेटतात. काय असेल तें असो, त्याचे जिवाला चैन नव्हतें, त्याचें तोंड उतरलेलें दिसत होतें, व दृष्टि जड झाली होती, जमलेल्या मित्रमंडळींत त्याच्या प्रकृतीविषयीं स्वाभाविकपणेंच प्रश्न निघतो व ते आपआपल्या मतें त्याच्या अस्वस्थतेचीं कारणें शोधूं लागतात. खरें म्हटलें असतां, अँन्टोनिओ याला कोणत्याही गोष्टीची उणीव नव्हती. विपुल संपत्ति व मनासारख्या मित्रांचें प्रेम यांची अनुकूलता असल्यावर त्यास अशी कोणती चिंता असावी हें मनांत येऊन वाचकांस व प्रेक्षकांस त्याच्याविषयीं सहजच कळवळा वाटूं लागतो. व ते उत्सुकतेनें पुढें काय होतें याकडे त्यांचें लक्ष लागतें. खरोखर, अँन्टोनिओ याला आरंभींच असा उदासीन कवीनें कां आणला असावा याचा विचार करण्यासारखा आहे. बहुधा त्याजवर पुढें जें संकट यावयाचें होतें त्याचें सूचक

म्हणून तर हा उदासपणा नसेल? विचारी व सुज्ञ मनुष्यास अशी सूचना कांहीं अंतःस्त प्रेरणेनें होत असते असें कालिदास कवीप्रमाणेंच या कवीचेंहि मत होतें असें वाटतें. पुढील श्लोकाची वाचकांस येथें आठवण होईलच.

> रम्याणि वीक्ष्य मधुरांश्च निशम्य शब्दान्
> पर्युत्सुकीभवति यत् सुखितोऽपि जंतुः ।
> तच्चेतसा स्मरति नूनममोवपूर्वम्
> भावस्थिराणि जननांतरसौहृदानि ॥

शाकुंतल.

परंतु कार्यकारणभाव न दाखवितां केवळ दैववादावर भिस्त ठेवणारा शेक्स्पियर नसल्यामुळें प्रत्येक गोष्टींत कार्यकारणभाव दर्शविण्याची त्याची रीत आहे. तिला अनुसरून या पात्राच्या ठिकाणीं उदासीनता त्यानें दाखविली यांत त्याचा कांहीं हेतु असावा. तो हेतु कोणता हें पाहिलें पाहिजे. ॲन्टोनिओ हा चांगला विचारी व व्यवहारज्ञ होता, त्यानें शायलॉकसारख्या आपल्या वैऱ्यापासून पैसे कर्जाऊ काढण्यास तयार व्हावें व अच्छेर मांस कापून देण्याची अट कर्जरोख्यांत लिहून द्यावी हें विलक्षण नाहीं काय? त्याचा नेहमींचा परिपाठ कसा होता, तो स्वतः तोच बोलून दाखवितो—'मी जरी कोणास कर्ज देत नाहीं किंवा कोणाकडून घेत नाहीं, आणि कदाचित असा व्यवहार केला तरी त्यावर व्याज घेण्याचा किंवा देण्याचा माझा परिपाठ नाहीं.'* असें असून तो अशी अट लिहून देण्यास तयार झाला यांत जो विचित्रपणा आहे त्याचें कारण काय हें दाखवावें एवढाच कवीचा हेतु दिसतो. हें कारण म्हटलें म्हणजे ॲन्टोनिओ याचें चित्त अस्वस्थ होतें हेंच होय. व म्हणूनच तो अशी अट लिहून देण्यास तयार झाला हें उघड आहे. हें कारण लक्षांत आणलें असतां या पात्राची कृति विसंगत नाहीं असें दिसून येईल.

---

* अंक १ प्रवेश ३ पान २८ पहा.

याप्रमाणें ॲन्टोनिओ याच्या अस्वस्थपणाची चर्चा चालली असतां, त्याचा एक मित्र ग्रॅशियानो हा त्यास सपाटून बोलण्याचा उपदेश करितो. ग्रॅशियानो हें पात्र हास्यरस उत्पन्न करण्याकरितांच कवीनें या नाटकांत आणलें आहे. त्याचें 'चतुर्मुख ब्रह्मदेवाच्या चतुर्विध सृष्टी'चें वर्णन फार मासलेवाईक आहे. तरुण असून आजोबाचें सोंग घेणाऱ्या बकध्यानी मंडळीवर त्यानें जो येथें ताशेरा झाडला आहे तो तशा मंडळीस झोंबल्यावांचून आणि इतरांस हांसें आणल्यावांचून खचित राहणार नाहीं. पुढें कांहीं मित्रमंडळी निघून जातात व कांहीं नवीन येतात. या नवीनांतच या नाटकांतला नायक जो बॅसानिओ तो येतो व त्याच्या मुखानें नायिका जी पोर्शिया तिच्या स्वरूपाचें वर्णन थोडक्यांतच पण टुमदार असें ऐकूं येतें व तेणेंकरून तिच्याविषयीं प्रेक्षकांच्या व वाचकांच्या मनांत उत्कंठा येथपासूनच उत्पन्न होते.

**प्रवेश २ रा.**—पहिले प्रवेशांत नायिकेविषयीं जी उत्कंठा वाचकांच्या किंवा प्रेक्षकांच्या मनांत उत्पन्न होते ती तृप्त करण्याकरितां–अथवा वाढवण्याकरितां असेंच म्हणावें–लगेंच हा पोर्शियेचा प्रवेश घातला आहेसें दिसतें. ती येते ती चिंतातुर व उदासवाणी अशीच येते व येतांच ती आपल्या चिंतेची कहाणी आपल्या बरोबरच्या दासीशीं अथवा मैत्रिणीशीं सुरू करिते. मागील प्रवेशांत ॲन्टोनिओ येतो तोहि असाच चिंतातूर व उदासीन असा येतो, आणि पोर्शिया येते तीहि तशाच स्थितींत येते. परंतु दोघांच्या उदासीनपणांत फार अंतर आहे तें लक्षांत ठेविण्यासारखें आहे. ॲन्टोनिओ याजपाशीं संपत्ती विपुल होती. तो म्हणतो;—'आणखी माझी किती तरी जिनगी आहे. मी कांहीं यंदाच्याच उत्पन्नावर बसलों नाहीं.' (मागें पृष्ठ ४ पहा). पोर्शियेची स्थिती तरी अशीच होती. ती वर्णून, तिची सखी नेरिसा म्हणते, 'बाईसाहेब, आपणाला कोणत्याहि गोष्टीची वाण नाहीं, आणि दुःख कसें तें माहित

नाहीं.' दोघांची स्थिती अशी असून ख्यालीखुशालींत वाढलेले हे दोघे प्राणी दुःखीकष्टी पाहून कोणासहि त्यांची फार कींव येईल यांत शंका नाहीं. संपत्ती असली म्हणजे मनुष्य चैनींत व सुखांत असतो अशी जी पुष्कळांची समजूत असते ती किती भ्रममूलक आहे हें या उदाहरणावरून सहज कळून येईल. तथापि अॅन्टोनिओ याच्या उदासीनपणाचें कांहीं एक कारण प्रत्यक्षतः कवीनें दाखविलें नाहीं. पोर्शियेची मात्र अशी गोष्ट नाहीं. स्वयंवरांतली आडकाठी हें तिच्या चिंतेचें कारण स्पष्टच आहे. चिंतेच्या कारणांतल्या या फरकामुळें पहिलें पात्र चिंतेखालीं केवळ दडपून जातें. व कर्जरोख्यांत एक विलक्षण अट लिहून देण्याचें कृत्य करण्यास सिद्ध होतें. पण दुसरें सावध राहून विचारानें वागतें. या दोन पात्रांच्या वर्तनांत पडलेला हा फरक कोणाच्याहि सहज लक्षांत येईल.

यापुढें स्वयंवराला आलेल्या देशोदेशच्या राजवंशीय मंडळीच्या गुणावगुणाविषयीं पोर्शिया जीं टीकारूप भाषणें करिते तीं फार खुबीदार आहेत यांत शंका नाहीं. त्यांत सामान्येंकरून त्या त्या देशच्या लोकांच्या आंगच्या गुणदोषाचेंच वर्णन करण्याची कवीनें तजवीज केली आहे. नायिकेच्या मुखानें केलेलीं हीं वर्णनें वाचून रघुवंशांतील इंदुमतीच्या स्वयंवराच्या वेळच्या वर्णनांची वाचकांस आठवण होईल. दमयंतीच्या स्वयंवराच्या वेळचें 'पंचनळी'चें वर्णनहि याच मासल्याचें आहे.

**प्रवेश ३ रा.**—यांत प्रस्तुत नाटकांतलें महत्त्वाचें व संकटास कारणीभूत असें शायलॉक हें पात्र येतें. शायलॉक हा जातीनें यहुदी होता; व तो सावकारीचा धंदा करीत असे. सावकारलोक कसे खाष्ट असतात, कसे मतलबी असतात, व कसे हिशोबी व करारी असतात, त्यांची विचारसरणी कशी मुद्देसूद व अढळ असते हें सर्वांस ठाऊकच आहे; आणि शेक्स्पियर कवीनेंहि याच नमुन्यावर हें पात्र कसें सुरेख रेखलें आहे हें कोणाच्याहि सहज ध्यानांत येईल. पण शायलॉक हा यहुदी

होता, तेव्हां त्याच्या जातीस अनुलक्षून अशा ज्या कित्येक गोष्टी त्याच्या भाषणांत येथें आल्या आहेत त्याचें स्पष्टीकरण करणें अवश्य आहे.

शायलॉक हा ॲन्टोनिओ याचा द्वेष करितो असें आपण पहातों; आणि तो कां?–तर ॲन्टोनिओ हा ख्रिस्ती होता म्हणून. तसेंच, ॲन्टोनिओ शायलॉक याचा तिरस्कार करितो आणि याचें कारण इतकेंच कीं शायलॉक हा ख्रिस्ती व्यापाऱ्यांस कर्जाऊ पैसे देऊन त्यांजपासून जबर व्याज घेत असे म्हणून. हीं कारणें जरी येथे कवीनें दिलीं आहेत, तरी याच कारणास्तव एकानें दुसऱ्याचा एवढा पराकाष्ठेचा द्वेष किंवा तिरस्कार कां करावा हें गूढ वाचकांस पडल्यावांचून राहणार नाहीं. वस्तुतः याचें बीज यहुदी लोकांच्या इतिहासांत आहे. यहुदी लोकांचा हा इतिहास थोडक्यांत असा आहे कीं, पुरातनकाळीं अरबस्थानाच्या उत्तरेस यहुदी लोकांचें फार मोठें व बलाढ्य राज्य होतें. बायबलांतल्या जुन्या करारांत जो धर्म प्रतिपादिला आहे तो त्यांचा धर्म होय. पुढें कालेंकरून त्यांच्यांतच येशुख्रिस्त हा जन्मास आला. त्यानें नवा धर्म काढिला, व त्याचा उपदेश तो लोकांस करूं लागला. लोकाचाराप्रमाणें येशुख्रिस्तास बाप नव्हता व तो एका कुमारिकेच्या पोटीं आला असल्यामुळें त्याला आईहि नसल्या सारखीच होती. अशा या अनाथ पोरानें नवीन धर्माचें काढलेलें खूळ त्या वेळच्या सनातन धर्माभिमानी प्रतिष्ठित यहुदी पुढाऱ्यांस कसें मान्य व्हावें? अर्थात् ते त्याची अवहेलना करून लवकरच त्याचा छळहि करूं लागले. तथापि ख्रिस्ताच्या मतांचा प्रसार होऊं लागला. व त्याला पुष्कळ अनुयायी मिळत चालले. तेव्हां हें पोर आवरत नाहीं असें पाहून यहुदी धर्माधिकाऱ्यांनीं राजाची आज्ञा मिळवून त्याला भर चव्हाट्यावर सुळीं दिलें, व त्याच्या शरीरांत मेखा ठोकून त्याचा जीव घेतला. तेव्हां प्राण सोडतेवेळीं त्यानें यहुद्यांस शाप दिला. तो असा कीं, 'तुमचें राज्य नष्ट होईल व तुह्मी देशोधडीस लागाल, जगांत

तुह्मांस कोठेंहि थारा उरणार नाहीं.' मरतेवेळच्या तळतळाटानें उच्चारलेली ही शापवाणी पुढें खरी झाली; इतकेंच केवळ नव्हे, तर ख्रिस्ती धर्माचा लौकरच चहूंकडे प्रसार झाल्यामुळें ख्रिस्तास जे अनुयायी मिळाले त्यांनीं ती खरी केली असेंहि ह्मणावयास चिंता नाहीं, त्यांनीं तर यहुद्यांस दे माय धरणी ठाय करून सोडलें. व त्यांस कोठेंहि थारा मिळूं नये असें केलें. स्पेन व इंग्लंड देशांतून तर त्यांस किती वेळां तरी हद्दपार केलें असेल, कोणी यहुदी कोठें आढळला तर त्याची विटंबना वाटेल त्या ख्रिस्त्यानें करावी. त्याची दाद कोठेंहि लागत नसे. तसेंच, त्याची मालमिळकत अनेक कारणांवरून सरकारांत जप्त करून घ्यावी अशाविषयीं सदरहु देशांत मुद्दाम कायदे केले होते. यहुद्यांनीं आपल्या धर्मप्रवर्तकास सुळीं दिलें ही जी अढी ख्रिस्तीलोकांच्या मनांत पडली ती कित्येक शतकें झालीं तरी नाहींशी झाली नाहीं. ख्रिस्तीलोक यहुद्यांचा द्वेष कां करितात याचें बीज वरीलप्रमाणें आहे. उलटपक्षीं यहुदीलोक परागंदा होऊन दीन होत्साते उद्योगधंदा करून राहूं लागले. कोणाचा आधार नाहीं, अशा स्थितींत सर्वांस वश करणारा जो पैसा त्याचा आधार त्यांनीं जोडला. परंतु आपणांस छळणाऱ्यांविषयीं त्यांच्याहि मनांत द्वेषभाव उत्पन्न झाला तो नाहींसा होण्याला त्यांस कांहीं मार्ग मिळाला नाहीं. बहुधा हे लोक मितव्ययानें राहून सावकारी करीत असत. मनुष्य एकदा सावकारी करूं लागला कीं, तो धनलोभी होतो व तदनुषंगानें अनेक दोष त्याच्या वागणूकींत उत्पन्न होतात. या दोषांतच जबर व्याज वसूल करण्याची जी इच्छा त्याला होते तिचा समावेश केला पाहिजे. अशा रीतीनें पाहिलें तर शायलॉक हा यहुदी आहे अर्थात नीच आहे म्हणून, आणि तो व्याजखाऊ आहे म्हणून, अशा दोन कारणांवरून ॲन्टोनिओ त्याचा द्वेष करितो. उलटपक्षीं, ॲन्टोनिओ हा ख्रिस्ती आहे अर्थात आपला छळ करणारा आहे, तसाच तो आपल्या धंद्यांच्या आड येणारा असून आपली विटंबना करणारा आहे.

अशा दोन कारणांस्तव शायलॉकहि त्याचा द्वेष करितो. अशी ही त्यांच्यामधील चुरशीच्या कारणांची सांखळी आहे. तिचे दुवे एकांत एक कसे गुंफलेले आहेत हें लक्षांत ठेविलें असतां, शायलॉक याच्या भाषणांतली खोंच वाचणारांस तत्काळ कळेल. या प्रवेशांतील शायलॉक याच्या भाषणांतील विचारसरणीकडे लक्ष दिलें असतां ॲन्टोनिओ याच्या पतीविषयीं त्यानें आढून घेतलेली शंका व समुद्रावर गलबतांतून सांठविलेल्या संपत्तीचा अनिश्चितपणा असल्यामुळें त्यानें घेतलेली सावधगिरी या गोष्टी त्याच्या स्थितीस अगदीं शोभेशा आहेत.

पुढें ॲन्टोनिओ याची प्रत्यक्ष मूर्ति पाहिल्याबरोबर शायलॉक याच्या मनांत बहुतकाल धुमसत असलेला द्वेषाग्नि एकदम कसा पेट घेतो हे कवीनें एथें थोडक्यांत फार खुबीदार रितीनें दाखविलें आहे. दाबून टाकलेल्या असंतोषाचें व द्वेषाचें स्वरूप कसें भयंकर असतें याचें हे एक मासलेवाईक उदाहरण आहे.

सावकार लोक आपल्या सोन्यारुप्याला शेळ्यामेंढ्या कल्पून त्यांना कसें व्यायाला लावतात ही शायलॉक याची विलक्षण कल्पना ऐकून त्याच्या मजेदार लोभीपणाचें कोणासहि क्षणभर हांसें आल्यावांचून राहणार नाहीं. तशीच प्रतिपक्षानें कितीहि गर्दी केली तरी घाई न करितां थंडपणानें बोलणेंचालणें करण्याची व आपला मुद्दा न चुकवितां सावधगिरीनें वागण्याची सावकार लोकांची रीत ज्यांस माहीत असेल त्यांस या प्रवेशांतील शायलॉक याची भाषणपद्धति अत्यंत हृदयंगम वाटेल यांत शंका नाहीं.

पुढें योग्य संधी पाहून शायलॉक हा आपले पोटांत डंवचत असलेले विचार एकदम प्रगट करितो. व ॲन्टोनिओ यानें त्याची कसकशी मानखंडना केली व त्याच्याशीं उद्दामपणानें कशी वागणूक केली हा पाढा वाचून तो त्याची त्यास आठवण देतो. या भाषणांत शायलॉक यानें काढलेल्या उखाळ्यापाखाळ्यांचा विचार केला असतां ख्रिस्तीलोकांच्या राज्यांत यहुदी-

लोकांची कशी भयंकर अवस्था झाली होती याचें बरेंच ज्ञान आपणांस होतें.*

याप्रमाणें या पहिल्या अंकांत या नाटकांतलीं मुख्य मुख्य पात्रें कवीनें आपणापुढें उभीं केली असून पुढें येणारीं संकटें कशीं उद्भवलीं व त्यांचें बीज कसें पेरलें गेलें हें आपणास दाखविलें आहे.

**अंक २ प्रवेश १ ला**—मागील अंकांत प्रस्तूत नाटकांतली नायिका जी पोर्शिया तिजवर स्वयंवराच्या पणामुळें कोणतें संकट ओढवलें होतें त्याचें नुसतें दिग्दर्शन मात्र कवीनें केलें होतें. पण या अंकांत तिच्या पाणिग्रहणाच्या इच्छेनें आलेल्या देशोदेशच्या राजपुत्रांस रंगभूमीवर आणून सदरहु संकट केवळ काल्पनिक नव्हेत इतकेंच केवळ नाहीं तर नायिकेच्या दृष्टीनें कसें भयंकर होतें हें दाखविण्याची तजवीज कवीनें केली आहे. प्रथमच मोरोक्को देशचा शिद्दी राजपुत्र येतो. हा शिद्दी म्हणजे आपलेकडील पुराणांतरींच्या 'शितिकंठधनु' उचलूं पाहणाऱ्या दशकंठाचीच मूर्ति होय असें त्याच्या स्वपराक्रमाविषयींच्या दर्पोक्तीवरून वाटण्यासारखें आहे. सितास्वयंव-

---

* यहुदी लोकांच्या स्थितीचें वर्णन एका प्रसिद्ध ग्रंथकारानें येणेंप्रमाणें केलें आहेः—

In past ages, to the Jew Government was oppression---a power which seized on every pretext which could supply it with an excuse for confiscation of property, insolent scorn, the dungeon, the thumb-screw, the rack, and death by rope or fire; the priest and the public torturer walked hand in hand; and the despised Jew saw in every Christian an oppressor. They weighed the princes and governors of the land of their adoption in the golden scales of heaven, and found them tyrants and extortioners---hypocritical and savage; and they muttered---these be the Christian rulers! 'HALLIWELL.'

रांतील प्रसंगाचा सुगावा भाषांतरादिकाच्या रूपानें शेक्‌स्पियर कवीला लागला होता कीं काय अशी शंका येथें घेण्यास जागा आहे. मागील अंकांत पोर्शिया ही आपल्या पित्यानें करून ठेवलेल्या पणाबद्दल चिंतायुक्त खिन्नता जेव्हां प्रगट करिते, तेव्हां ती, सीतेच्या वाणींचें अनुकरण करून:—

अहह ! दारुण, तात ! तुझा पण !*

असेंच जणों ह्मणत आहे असें भासतें. तथापि अशा ठिकाणीं प्रसंगसादृश्यामुळें भाषणसादृश्य उत्पन्न झालें आहे, असें मानावयास चिंता नाहीं.

**प्रवेश २ रा. पृष्ठ ४१**—येथें लॅन्सलॉट प्रवेश करितो. हें पात्र हलक्या प्रतीचें असून पशुवृत्तीनें वागणाऱ्या माणसाचा हा एक नमुना आहे. तो सरासरी विदुषकाचेंच कार्य करितो. ॲन्टोनिओ यास पुष्कळसें सपाटून बोलण्याचा उपदेश करणारा 'बहुभाष' ग्रॅशियानो हा नुकताच मागें येऊन गेला आहे, तोहि विदुषकाचेंच काम करितो हें खरें; तथापि त्याची पायरी लॅन्सलॉट याच्याहून वरची आहे. लॅन्सलॉट हा प्रथम शायलॉक याच्या घरीं नोकर होता, व तो तेथून निसटून जाऊन बसॅनिओ याजकडे नोकरीस राहूं इच्छितो. शायलॉक याची गृहस्थिति कशी होती याचें ज्ञान वाचकांस व प्रेक्षकांस करून देण्याकरितां हें पात्र कवीनें योजिलें आहे हें उघड आहे. चारचौघांत त्याची चालचलणूक कशी होती हें तर आपण पहातोंच. पण तेवढ्यानें त्याच्या चित्ताचें एक अंग मात्र आपल्या दृष्टीस पडतें. परंतु लॅन्सलॉट याच्या व शायलॉक याची मुलगी जेसिका हिच्या

* वामनपंडितकृत सीतास्वयंवरांत सीतेचा उद्गार ज्या श्लोकांत आहे तो समग्र श्लोक येणेंप्रमाणें आहे:—

मदनशत्रुशरासन हें महा
मदनमूर्तिच केवळ राम हा।
करिल सज्ज कसें धनु आपण ?
अहह ! दारुण, तात ! तुझा पण !॥

भाषणांवरून त्याचें अंतरंग आपणांस व्यक्त होतें. अशा रीतीनें या पात्राचें अंतर्बाह्य स्वरूप आपणांस दाखवून शायलॉक याचा सबंद पुतळा कवीनें आपल्यापुढें उभा करण्याची तजवीज केली आहे.

लॅन्सलॉट याच्या पहिल्याच भाषणांत आपल्या धन्याच्या घरून निघून जावें कीं तेथेंच रहावें याविषयीं त्याच्या मनांत जी गडबड उडाली ती तो बोलून दाखवीत आहे. वस्तुतः पहातां, सारासारविचारानें वागणारें मन व केवळ स्वेच्छेनें वागणारी हौस यांच्या मधील भांडण कवीनें या पात्राच्या मुखानें येथें वर्णिलें आहे, व त्यांत अखेरीस पशुवृत्तीस अनुरूप असा अविचाराचा म्हणजे हौसेचाच जय झाल्याचें दर्शविलें आहे.

पुढें लॅन्सलॉट याची व त्याच्या बापाची रस्त्यांत गांठ पडते. तो विचारा वृद्ध व आंधळा; त्याची क्षणभर थट्टा करून मजा करण्याची बुद्धि लॅन्सलॉट सारख्या पशुवृत्ती मनुष्यावांचून कोणाला होईल ? पण हें पात्र हास्यरस उत्पन्न करण्याकरितांच योजिलें असल्यामुळें हा चारगटपणा त्याला शोभसाच आहे असें म्हटलें पाहिजे. त्यांतहि तो मर्यादेच्या बाहेर नेलेला नाहीं हें लक्षांत ठेविण्यासारखें आहे.

याच प्रवेशांत शेवटीं ‘ बहुभाष ’ ग्रॅशियानो याला आणून, नुकताच निष्कांत झालेल्या पशुवृत्ति विदुषकाशीं वरच्या दर्जाच्या बहुभाष विदुषकाचा मुकाबला करून दाखवावा असें कवीनें योजिल्याचें दिसतें. ग्रॅशियानो याच्या मुखानें, फाजील सभ्य-पणाबद्दल कवीनें कशी टर उडविली आहे. तिच्यांतील नाजुक खोंच सभ्यपणाचा डौल घालणारांस बहुधा झोंबल्यावांचून राहणार नाहीं.

**प्रवेश ४ ते प्रवेश ६**—या तीनहि प्रवेशांत जेसिकेच्या पलायनाचें उपकथानक घातलें असून किरकोळ पात्रांच्या आगमननिर्गमनादिकांच्या योगानें गडबड उडवून देऊन प्रेक्षकांस केवळ जागृत ठेवण्याचा यत्न केलेला आहेसें दिसतें. वस्तुतः हे प्रवेश केवळ सोंगारिभरती करतां आहेत असें म्हणावयास चिंता नाहीं.

**प्रवेश ७ वा**—यांत स्वयंवरांच्या पणाची कथा सुरू झाली असून मोरोक्को देशाचा राजपुत्र करंडकांची निवड करण्यास येतो. प्रस्तुत दुसऱ्या अंकाच्या आरंभीं याच राजपुत्राला आणून कवीनें आपणांस त्याची ओळख करून दिली आहे. त्याच्या आरंभीच्या वागणुकींतला व भाषणांतला डामडौल याहि प्रवेशांतल्या भाषणांत कवीनें कायम ठेविला आहे. करंडकांची निवड करतांना त्यांवर खोदलेल्या लेखांचे अर्थ तो आपल्यामतें कसे लावतो हें पहाण्यासारखें आहे. तो केवळ बाह्य स्वरूपावर जाऊन सुवर्णाचा करंडक पसंत करून फसला असें आपण पहातों.

**प्रवेश ९ वा**—यांत करंडकांच्या निवडणुकीसाठीं ॲरेगॉन देशचा राजपुत्र येतो. करंडकांवरील लेखांचे तो कसे अर्थ करितो हेंहि पहाण्यासारखें आहे.

**अंक ३ रा**—प्रस्तुत अंकांत करंडकांच्या निवडणुकीचें काम समाप्त होऊन स्वयंवराचें दुसरें कथानक पुरें होतें. यांत प्रस्तुत नाटकाचा नायक जो बसॉनिओ हा पण जिंकण्यांत इकडे यशस्वी होतो खरा, पण तिकडे व्हेनिस नगरांत त्याच्या प्रियमित्रावर आधींच मोठें संकट येऊन गुदरतें. ॲन्टोनिओ याचीं सर्व गलबतें फुटून बुडालीं. आणि त्याची संपत्ती लयास गेली अशी अफवा चोहोंकडे पसरते. ती ऐकून शायलॉक याच्या द्वेषास जोर येतो व त्याची सूड घेण्याची इच्छा बळावते; आणि तो ॲन्टोनिओ याच्या काळजाला हात घालण्याची प्रतिज्ञा करितो.

**प्रवेश १ ला**—यांत पृष्ठ ८७ येथें शायलॉक हा आपली व आपल्या जातीच्या छळणूकीची कहाणी नेहमींप्रमाणें मोठ्या वीरश्रीनें सांगत आहे, त्याचे दुःख मानवजातीच्या दृष्टीनें अगदीं खरें आहे. खिस्तीलोकांनीं त्याजवर व त्याच्या जातीवर जो कहर मांडला होता तो इतिहासप्रसिद्ध असल्यामुळें शेक्सपिअर कवीनें यहुदी लोकांचा कैवार घेऊन त्यांची बाजू जशी होती तशीच दर्शविण्याचा प्रामाणिक यत्न केला आहे याबद्दल तो सर्वथा प्रशंसेस पात्र आहे.

शायलॉक याच्या भाषणांतील तर्कशास्त्र अगदीं मुद्देसूद असून दुर्भेद्य आहे असें कोणास वाटणार नाहीं ? तसेंच तें ऐकून कोणा सुज्ञ व सज्जन मनुष्यास त्याची कींव आल्यावाचून राहणार नाहीं ?

**अंक ४ था**—प्रस्तुत अंकांत अॅन्टोनिओ याजवरील संकटाचा कळस झाला आहे. असें दाखविलें आहे. त्याजवरील फिर्यादीची चौकशी होते. मागील अंकांत स्वयंवरनिमित्तानें पोर्शियेवर ओढवलेल्या संकटाचा परिहार बसॅनिओ याच्या सद्सद्वीचाराच्या बळानें झाला आहे. तसा आतां त्याजवर व त्याचा मित्र अॅन्टोनिओ याजवर आलेल्या संकटाचा परिहार त्यानें प्राप्त करून घेतलेल्या पत्नीच्या चातुर्याच्या बळावर होतो. यामुळें त्या सर्वांच्या परस्परांवरील प्रेमांत विशेषच भर पडते यांत शंका नाहीं.

या अंकांत मुख्यत्वेंकरून अॅन्टोनिओवरील फिर्यादीच्या चौकशीचा विषय आहे. नेहमींप्रमाणें शायलॉक याचें तर्कशास्त्र दुर्भेद्य व केवळ अचूक आहे असेंच आढळून येते. आपली इच्छा तृप्त करून घेण्याची सारी त्याची भिस्त कायद्याप्रमाणें आपला करारनामा पुरा करून घेण्यावर आहे. सदर करारनाम्यांतील अर्थ बसविण्यांत जो कोटीक्रम पोर्शियेनें लढविला तो केवळ कोटिक्रमच

---

* या संबंधानें चांगल्यांपैकीं एका टीकाकाराचे उद्गार लक्ष देण्यासारखे आहेत, तो म्हणतो:—

Shylock was an ill-used Man and Champion of an oppressed race; nor is he a hypocrite, like Richard. In fact, Shakespeare, whilst he lends himself to the prejudices of Christians against Jews, draws so philosophical a picture of the energetic Jewish character, that he traces the blame of its faults to the inequity of the Christion world. Shylock's arpuments are more logical than those his opponents, and the latter over come him only by a legal quibble.

THOMAS CAMPBELL.

आहे; तो न्याय नव्हे. तेणेंकरून अन्टोनिओच्या संकटाचें पारडें फिरलें हें पाहून नाटकांतील पात्रांप्रमाणेंच प्रेक्षकांसही मोठा संतोष होतो यांत शंका नाहीं.

प्रस्तुत अंकांतील मुकदम्याच्या चौकशीचा व एकंदर न्यायाचा नमुना कसा आहे हें फार फार लक्षांत घेण्यासारखें आहे. न्याय हा कायद्याप्रमाणें व्हावा किंवा सदसद्विचाराच्या तात्विक दृष्टीनें व्हावा किंवा परिस्थिती लक्षांत घेऊन जिकडे आपल्या मनाचा कल असेल त्या कलाप्रमाणें व्हावा—हे सर्व प्रश्न अत्यंत गहन व मोठे विचाराचे आहेत. तथापि पोर्शियेनें पुरुषवेष घेऊन वकीली थाटानें व्हेनीसच्या राजापुढें जें काम चालविलें तें नांवाजण्यासारखें आहे. त्यांतहि तिनें प्रथम दयाभूत अंतःकरण करण्याविषयीं जो मुद्दा पुढें आणला आहे तो कोणत्याहि न्यायासनास व राजासनास शोभेसा आहे ह्यांत शंका नाहीं. पोर्शिया काय सांगते तें ऐका:—

"दया ही आकाशांतून सहजासहजी पृथ्वीवर हळू हळू पडणाऱ्या पावसाच्या बिंदुसमुदायासारखी आहे.......दया ही श्रेष्ठाहून श्रेष्ठ आहे. शिरावर धारण केलेल्या मुकुटापेक्षांहि दयेच्या श्रेष्ठ भूषणानें मंडित असलेला सार्वभौम राजा फारच शोभतो.......कोणत्याहि कामांत न्यायाची व दयेची जर जोड झाली तर ऐहिक सत्ता ही परमेश्वरी-सत्तेप्रमाणें दिसूं लागते."

**अंक ५ वा**—मागील अंकांत चौकशीचें काम पुरें झाल्यावर व दयेचें व्याख्यान संपल्यावर अंक संपवितां संपवितां आंगठ्यांच्या कथानकांचें एक कुलंगडें कवीनें उपस्थित करून ठेविलें. त्याचा उपयोग पूर्णपणें या अंकांत करून त्यानें नाटकाचें पर्यवसान जें सुखांत व आनंदांत केलें आहे तें फारच बहारीचें झालें आहे. मागील अंकांतील चौकशी पहाण्याकरितां आलेल्या उत्कंठित लोकांची गर्दी व त्यांची ओरडाओरड व गडबड या अंकांत कोठेंहि दिसत नाहीं. प्रेक्षकजन, एकदम बेलमांट येथील शांतस्थळीं, थंडगार मोकळ्या हवेंत, आणि चंद्राच्या सुखकारक मृदु चांदण्यांत येऊन उभे राहतात. दोन्ही अंकातल्या देखाव्यांत हा

फरक कवीनें फार चातुर्यानें आणिला आहे, यांत शंका नाहीं. अशा स्थळीं सर्व मंडळी 'व्हेनीस नगरच्या व्यापाऱ्या' वरील सर्व संकट विसरून जातात आणि आंगठ्याच्या गमतीदार भांडणांत दंग होतात. *

येथवर प्रस्तुत नाटकाचें पर्यालोचन करून, त्यांतील लक्ष देण्यासारख्या कांहीं गोष्टींचें टिपणही दिलें; तेव्हां त्याच्या उत्कृष्टत्वाचा जो एक विशेष गुण म्हणून नांवाजलेला आहे, त्याजविषयीं आतां यथा अवकाश विचार करणें योग्य आहे. हा विशेष गुण म्हटला म्हणजे प्रस्तुत नाटकांत तीन चार संविधानकें एकत्र जुळवून सर्वांची एक कथा सिद्ध करण्याचा होय. यांत कवीची जी कुशलता दिसून येते, ती केवळ अप्रतिम होय. हीं तीन चार संविधानकें कोणतीं तीं मागें दिलींच आहेत. तथापि प्रस्तुत नाटकांत ह्या चारांतून कोणतें संविधानक कवीनें मुख्य धरलें आहे, हें सांगणें कठीण आहे. हीं सर्व कथानकें अशा रीतीनें एकांत एक मिसळून दिलीं आहेत कीं, प्रत्येक कथानक आपआपल्या परीनें विस्तार पावत गेले असल्यामुळें महत्वाचेंच वाटूं लागतें. तथापि निवड

* प्रस्तुत नाटकाचा शेवट सुखकारक करतांना कवीनें कशी बहार केली आहे त्याचें वर्णन एका इंग्रज टीकाकार स्त्रीनें केलें आहे. तें फारच मार्मिक आहे तें येणेप्रमाणें:--

Shylock and his machinations being dismissed from our thoughts, and the rest of the Dramatis Personae assembled together at Belmont, all our interest and all our attention are riveted on Portia, and the conclusion leaves the most delightful impression on the fancy. In conclusion, when Portia invites her company to enter her palace to refresh themselves after their travels, and talk over 'these events at full,' the imagination, unwilling to lose sight of the brilliant group, follows them in gay procession from the lovely moonlit garden, to marble halls and princely revels, to splendor and festive mirth, to love and happiness.

MRS. JAMESON.

करूं म्हटलें तर करंडकांच्या निवडीचेंच कथानक मुख्य धरून बसॉनियो व पोर्शिया यांच्या विवाहसमारंभास प्रस्तुत नाटकांत मुख्य स्थळ दिलें आहे यांत शंका नाहीं तथापि सर्व नाटकांतील संकटाला कारणीभुत गोष्ट म्हटली म्हणजे अँन्टोनियो व शायलॉक या दोन पात्रांमधील हाडवैर ही होय; व ह्याच गोष्टीचा उठाव कवीनें पहिले अंकापासूनच केला आहे; व याच उठावामुळें नाटकाला विशेष गंभीर स्वरूप प्राप्त होतें हें उघड आहे. तेव्हां हेंच संविधानक मुख्य होय असें वाटूं लागतें. पहा कीं, या नमुन्याचीं जीं पूर्वी दोन नाटकें प्रसिद्ध झालीं होतीं तीं ह्याच गोष्टीस उद्देशून रचिली होती व त्याच गोष्टीस उद्देशून "दि ज्यू" (*The Jew*) आणि "दि ज्यू-आफ माल्टा" (*The Jew of Malta*) अशीं त्यांचीं नांवें त्यांचे कर्त्यांनीं ठेविली होतीं* फार काय सांगावें?—अँन्टोनियो व शायलॉक यांजमधील हाडवैराला कवीनें एवढें गंभीर स्वरूप दिलें आहे कीं, प्रस्तुत नाटक शोकपर्यवसायी करावयाचें असाच कवीचा प्रथमपासून बेत होता कीं काय असाहि संशय कोणासही येण्यासारखा आहे.†परंतु

* आपले इकडेही "मर्चंट आफ व्हेनिस" याचें जें एक भाषांतर आमचे पाहण्यांत आहे, त्याचेंही नांव भाषांतरकारानें "जशास तसे" असें ठेविलें आहे. यावरून ही सदर भाषांतरकारांस ह्या हाडवैराची गोष्टच फार महत्वाची वाटली, असें दिसतें.

† प्रसिद्ध टिकाकार रोये (Rowe) यानें या नाटकासंबंधानें जे उद्गार काढले आहेत ते प्रत्यंतराकरतां वाचकांनीं येथें पहावे म्हणजे झालें, तो म्हणतोः—

Though we have seen the Play (The Merchant of Venis) received and acted as a comedy, and the part of the Jew performed by an excellent comedian. Yet I can not but think it was designed Tragically by the Auther: There appears in it such a deadly Spirit of Revenge, such a savage fierceness and Fellness, and such a bloody designation of cruelty and Mischief, as can not agree either with the Style or charactera of comedy.

THE LIFE of SHEKESPEAR.

हीच गोष्ट गौणरूपानें आणली असती तर प्रस्तुत नाटक म्हणजे एक मौजेचा फार्स असेंच होऊन बसलें नसतें काय? अर्थात शॉयलॉक व अॅन्टोनियो यांजमधील हाडवैराची हकीकत प्रस्तुत नाटकांत फारच महत्वाची असल्यामुळें हेंच कथानक मुख्य होय असें ह्मणणें प्राप्त आहे. परंतु नाटकाच्या पूर्णतेला विशेष अगत्याची गोष्ट म्हटली म्हणजे त्या नायक व नायिका असल्या पाहिजेत ही होय; तीं हाडवैराचा कथानकांत नाहींत हें त्यांत मोठें वैगुण्य आहे. यास्तव हें कथानक मुख्य म्हणतां येत नाहीं. आंगठ्यांची गोष्ट ही तर प्रस्तुत नाटकाच्या ४ थ्या अंकाचे शेवटीं शेवटीं जोडलेलें केवळ शेंपूट होय; तें नसतें तर चार अंकांतच हें नाटक समाप्त झालें असते, पण हें शेंपूट जोडून एकंदर नाटकास कसें आनंदपर्यवसायी केलें आहे, याकडे फार फार लक्ष देण्यासारखें आहे. कित्येकांस तर हें आंगठ्यांचें शेंपूट हाच नाटकाचा मुख्य विषय असें वाटत असल्याचा भास होतो. पण वस्तुतः तें एक तातपुरतें जोडलेलें शेंपूटच होय. याहून त्यास ज्यास्त महत्व देतां येत नाहीं, हें उघड आहे* याचप्रमाणें जेसिकेच्या पलायनांची हकीकतही दुय्यम प्रतीचीं असल्यामुळें तेही केवळ गौण कथानक असून त्यासही विशेष महत्व देतां येत नाहीं. करंडकांच्या निवडणूकीचें कथानकांत मात्र नायक व नायिका आहे व कथेची पूर्णताही झालेली आहे, यास्तव हेंच कथानक मुख्य आहे हें उघड आहे. पण नुसतें हें कथानकच पाहिलें तर तें इतकें साधें आहे, व त्यांत विविध प्रसंगांचा इतका अभाव आहे कीं, त्यांत चमत्कार वाटण्यासारखें असें कांहीं भासत नाहीं. तथापि

* याचें प्रत्यंतर पाहिजे असल्यास प्रस्तुत नाटकाचीं जीं दोन भाषांतरें मराठींत यापूर्वीं होऊन गेलीं आहेत, त्यास भाषांतरकारांना जीं नांवें दिलीं आहेत, यावरून येईल. एका भाषांतराचें नांव "मोहनेची आंगठी" आणि दुसऱ्याचें "प्रणयमुद्रा" अशीं आहेत. यावरून आंगठ्यांचें कथानकच भाषांतरकारांस नाटकांत मुख्य विषय वाटत असून त्यावरून नाटकास नांव देण्यास तो योग्य आहे, अशी त्यांची समजूत झाली आहे असें दिसतें.

कवीनें वर सांगितलेल्या कथानकांची त्यांत इतकी भर घातली आहे कीं, त्यामुळें सदर कथानकास फारच मनोवेधकता आली आहे.*

वस्तुतः कांहींएक चमत्कारिक गोष्ट किंवा कथानक घेऊन तिच्यावर नाटक रचण्याचा कवींचा प्रघात आहे. अर्थात एका नाटकांत सामान्यतः एकच गोष्ट किंवा कथानक ग्रथित केलेलें

---

* प्रस्तुत नाटक या कवीच्या सुखपर्यवसायी नाटकांमध्यें सर्वोत्कृष्टांपैकीं एक आहे. याची प्रशंसा कितीही केली तरी थोडीच आहे. तथापि पाश्चमात्य विद्वानांचे याविषयीं अभिप्राय काय आहेत ते वाचकांस कळावे यासाठीं त्यांतून कांहीं येथें देतों.

"Of The Merchant of Venise the style is even and easy, with few peculiarities of diction, or anomalies. of construction, The comic part raises langhter, and the serious fixes expectation. The probability of either the one or the other story cannot he maintained. The union of two actions in one events is, in this drama, eminently happy."

DR. JOHNSON.

" It is prochigally full of poetry; passages of the most exalted beauty are scattered evey where with the wanton profusion of a genius that was ever full, and feared no exhaustion, " HALLIWell.

"The Merchant of Venice is generally esteemed the best of Shakespeare's comedies...... In the management of the plot which is sufficiently complex without the slightest confusion or incoherence, I do not conceive that it has been surpassed in the annals of any theatre. The variety of characteristis in The Merchant of Venice, and the powerful delineation of those upon whom the interest chiefly depends; the effectiveness of any scenes in the representation; the copiousness of the wit and the beauty of the language, it would be superfluous to extol; nor is it our office to repeat a tale so often told as the praise of Shakespeare. "

HALLAM.

असतें. शेक्सपिअर कवीच्या बहुतेक शोकपर्यवसायी नाटकांत व ऐतिहासिक नाटकांत ही तऱ्हा आढळून येते. परंतु कित्येक वेळा त्याच्या आनंदपर्यवसायी नाटकांत दोन किंवा अधिक कथानकें घेऊन त्यांच्या मिसळीनें एक नवेंच संविधानक सिद्ध करण्याचा यत्न कवीनें केकेला आढळून येतो. शोकपर्यवसायी नाटकांत कांहींतरी अघटित, किंबहुना ध्यानींमनींही न येण्यासारखी गोष्ट अचानक घडवून आणण्याचा हेतु असल्यामुळें बहुतकरून दोन तीन संविघानकांचा मिलाफ जुळवून आणण्याचें कार्य कठीण जात नसेल असें वाटतें, परंतु ही तऱ्हा आनंदपर्यवसायी नाटकांत जुळवून आणणें फार सोईचें असलेमुळें शेक्सपिअर कवीनें हिचा आदर आपल्या बऱ्याच नाटकांतून केला आहे. प्रस्तुत नाटक हें अशापैकीं एक होय. " तुफान " नाटकांतही अशीच खटपट कवीनें केली आहे, हें नाटक सूक्ष्म दृष्टीनें वाचलें असतां वाचकांच्या लक्षांत येईलच. केवळ वरवर पाहिलें असतां ह्या वेगवेगळया गोष्टी कोठून तरी आणून कशा तरी गोवून दिल्या आहेत, असें वाटतें. पण सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें असतां त्या सर्वांत कांहींएक साधारण सर्वमान्य तत्व ग्रथित केलेलें आढळून येतें, व तें लक्षांत घेऊन नाटकाच्या कथानकाच्या घटनेचा विचार केला असतां सर्व भाग विसकळीत नसून अगदीं सुसंगत आहेत. असें लक्षांत येऊन मनावर हितावह असा परिणाम होतो. याशिवाय जीं दोन तीन कथानकें एकत्र जुळविण्यांत येतात त्यांचा मिलाफही फार कुशलतेनें केला असतो; ह्मणजे प्रत्येक कथानक वेगवेगळें विस्तार पावत जाऊन, तें इतरांस व विशेषतः मुख्य कथानकास पोषक असें होतें. प्रस्तुत नाटकांत हा मिलाफ कवीनें कसा केला आहे, हें पाहण्यासारखें आहे. वर दाखविलेंच आहे कीं, प्रस्तुत नाटकांत मुख्य कथानक करंडकांची निवड अर्थात पोर्शीया आणि बसॅनियो यांचा विवाह हें होय. आणि तदनुषंगानें त्यांच्या परस्परांमधील प्रेमाचें वर्धन व पोषण करणें हें होय. हें कार्य कवीनें असें साधिलें आहे कीं, बसॅनियो कर्ज काढतो,

तें आपणास पोर्शियेची प्राप्ति व्हावी ह्मणून काढतो, व तेणे-करून त्याचा जिवश्चकंठश्च मित्र अन्टोनियो याजवर मोठें संकट येतें. पुढें पोर्शियेचा व बसॅनियो याचा विवाह होतो आणि या विवाहानें प्रेमबद्ध झालेली पोर्शियाच वकिलाच्या रूपानें पुढें येऊन अंन्टोनियो याजवरील संकटांतून त्यास व त्याच्या सर्व इष्टमित्रांस मुक्त करून, आनंदित करते. यामुळें, लग्नाकरितां कर्ज व त्या कर्जातून मुक्त होण्याकरितां लग्नाचा योग हेंच साधन, अशी अन्योन्याश्रय घटित कार्यकारणांची सांखळी गुफलेली आपल्या येथें दृष्टीस पडते. ती पाहून जो चमत्कार वाटतो तो केवळ स्वसंवेद्य आहे, इतरानें कितीही सांगितला तरी समजणें कठीण. यास्तव स्वतःच अनुभवून पहावा अशी वाचकांस आमची शिफारस आहे.

याप्रमाणें कर्जरोख्याचें कथानक व विवाहाचें कथानक यांची सांगड घालून दिल्यावर आणि एकानें दुसऱ्या कथानकांचा यथावकाश परिपोष केल्यावर कवीनें या दोन्ही मुख्य कथानकास दोन उपकथानकांचा जोड दिला आहे. हीं दोन उपकथानकें ह्मणजे शायलॉक याच्या मुलीला त्याच्या घरांतून एका ख्रिस्ती मनुष्याकडून नेवाविणें, व विवाहकालीं प्रेमाची खूण ह्मणून अर्पण केलेल्या आंगठ्या—ज्या प्रतिग्रहीत्यानें प्राणापलीकडे जपून ठेऊं ह्मणून शपथ घेतली आहे, त्या आंगठ्यांचें कथानक हीं होत. या दोहोंचीहि जोडणी कवीनें प्रस्तुत नाटकांत फार कुशलतेनें व चातुर्यानें केली आहे. व तेणेंकरून दोनही मुख्य कथानकांतील रसाचें पोषण उत्कृष्ट रितीनें केलें आहे. आमचे एक मार्मिक मित्र तर कविच्या या कुशलतेच्या 'जोडणी'स जोडणी न ह्मणतां 'फोडणी' ह्मणतात, सारांश या सुरस फोडणीनें सदर कथानकास कांहीं अप्रतिम चटकदारपणा आला आहे, यांत शंका नाहीं. ज्या ख्रिस्ती लोकांविषयीं शॉयलॉक याच्या हृदयांत एवढा द्वेष बाणला होता, त्याच ख्रिस्त्यांपैकीं एका यःकश्चित इसमानें त्याच्या मुलीस पळवून न्यावें हें त्यास किती दुःसह झालें असेल व तेणेंकरून त्याच्या हाड-

वैरास केवढा जोर आला असेल, त्याची कल्पना करणेंच पुरें आहे. आणि जी आंगठी मिळावी म्हणून बसॅनियो याच्या प्रित्यर्थ अॅन्टोनियो हा आपले प्राण खर्ची घालतो, तीच जीवापलीकडे जपून ठेवावयाची आंगठी बॅसानियो हा त्याच अॅन्टोनियोयाला संकटमुक्त करणाऱ्या वकिलाला देतो. हें पाहून बसॅनियो याजवर व बॅसनियो याचें अॅन्टोनियो याजवर किती निःसीम प्रेम होतें याची कल्पना आपणांस होऊन आपणांस त्यांच्या परस्परांवरील प्रेमाचे मोठें कौतुक वाटतें. पण महाशय अन्टोनियोस त्याच्या संकटांतून जिनें सोडविलें व सुज्ञ बसॅनियो यासही आंगठीच्या हानीमुळें वाटलेल्या मरणप्राय मानहानीची क्षमा जीनें केली ती पोर्शियाच होय असें जेव्हां आपण पाहतों तेव्हां तिच्या सुजाणपणाचें व उदारबुद्धिचें जें कौतुक वाटू लागतें त्यास कांहीं सीमाच राहत नाहीं असें आम्हांस वाटतें.

प्रस्तुत नाटकांत जीं तीन चार कथानकें एकत्र गुंफण्याची खटपट कवीनें केली आहे तिचा विचार करीत असतां, आपले इकडील शूद्रक कविकृत “ मृच्छकटिक ” नाटकाची आठवण चतुरस्र वाचकांस झाल्यावांचून राहणार नाहीं. शूद्रक कवीनेंही आपले नाटकांत अशीच खटपट कांहींशीं केली आहे; हें तर काय?—पण एकंदरीनें पाहतां, प्रस्तुत नाटकाशी शूद्रक कवीच्या या कृतीचें बऱ्याच गोष्टींत फार साम्य आहे. असें दोहोंचें मार्मिक दृष्टीनें अवलोकन केलें असतां दिसून येईल, या साम्यासंबंधानें बरेंच लिहिण्यासारखें आहे, तें प्रसंगानुरोधानें लिहूं. सध्यां, एकाहून अधिक कथानकें एकत्र गुंफण्याची खटपट शूद्रक कवीनें कशी केली आहे, हें पाहिलें तर असें आढळून येतें कीं, वसंतसेना व चारुदत्त यांचें परस्परांवरील प्रेम वर्णन करण्याचा जो कवीचा मूळ हेतु त्यास अनुसरून नाटकाची रचना करीत असतां, त्यांतच पालक राजाच्या राज्यकारभारांतली अव्यवस्था वर्णून, आर्यक नांवाच्या मनुष्याला “सिद्धादेशा” प्रमाणें राज्यपद मिळून राज्य-

क्रांति झाल्याची हकीगत कवीनें जोडून दिली आहे. परंतु ह्या दोनही हकीगतींचा मिलाफ शूद्रक कवीला चांगलासा करितां आला नाहीं, असें ह्मणणें भाग आहे. वस्तुतः, चारुदत्त व वसंत सेना यांच्या सुरतोत्सवाशीं राज्यक्रांतीच्या हकीगतीचा अथाअर्थी कांहींएक संबंध बसत नाहीं, इतकेंच केवळ नाहीं तर एका हकीगतीनें दुसऱ्या हकीगतींतील कथेचा परिपोष व्हावा हें इष्ट असतांही, तो मृच्छकटिकांतल्या कथाभागांत झाल्याचें दिसत नाहीं. शेक्सपिअर कवीच्या प्रस्तुत नाटकांत हा परिपोष कसा उत्कृष्ट रितीनें झाला आहे, हें वर सांगितलेंच आहे. तथापि दोन कथानकें एकत्र गुंफण्याची तऱ्हा शूद्रक कवीसारख्या अतिप्राचीनकाळीं होऊन गेलेल्या आपल्या इकडील कवीच्या मनांत येऊन गेली होती हीं गोष्ट अभिमानपूर्वक येथें उल्लेखित करून ठेवण्यासारखी आहे.

वस्तुतः एकाहून अधिक कथानकें एकत्र ग्रथित करणें हें बरेंच कठिण असून, त्यांत कौश्यल्यहि विशेष आहे. अशा जुळणीस मार्मिक टीकाकारांनीं अनेक तंतूंनीं विणलेल्या पटाची उपमा दिली आहे. पट विणतांना कारागीर जसें निरनिराळ्या रंगांचे तंतु घेऊन कांहीं सरळ–उभे व कांहीं आडवे अशा रितीनें त्यांची एकांत एक गुंफणी करून पट तयार करतो; तशीच नाटककाराचीही गोष्ट आहे. आमच्या मतें तर कवीच्या अशा कृतीस गंगा, यमुना, व सरस्वती या नद्यांचा प्रयाग येथें जो त्रिवेणी संगम झाला आहे त्याचीच उपमा अधिक शोभेल. या ठिकाणीं या तिन्ही नद्यांचे प्रवाह वेगवेगळे दिसत असूनही, ते एकांत एक अशा रितीनें मिसळून गेले आहेत कीं, त्या सर्वांचें मिळून एकच पात्र झालें आहे. हा चमत्कार प्रत्यक्ष परमेश्वरी लीलेचाच होय; व म्हणूनच तो इतका आल्हादकारक व पवित्र होऊन बसला आहे. या त्रिवेणी संगमाची वर्णनीय शोभा निज-

गन्नट श्रीकृष्ण यानें गुंफलेल्या सत्यभामेच्या वेणीचें वर्णन करीत असतां, वामन पंडितांनीं वर्णिली आहे ती येणेंप्रमाणें:—

हरिकिरिं यमुना हो मूद गंगावनाचीं,
मिरविं धवल पुष्पीं दीप्ति गंगा-वनाची।
असित-सित नद्यांच्या संगमीं श्री त्रिवेणी,—
तशिच यदुपतीनें घातली चित्र वेणी ॥

**वामन-कृत भामाविलास.**

आणि शेक्सपियर कवीनेंही प्रस्तुत नाटकांत तीन चार कथानकांची अशीच चित्रवेणी घातली आहे. महाकवि हे तरी ईश्वरांशच होत, व त्यांची कृति ईश्वरी लीलेप्रमा च चमत्कारमय व वंदनीय होय. तेव्हां अशा कृतीस वरील उपमा सर्वथा शोभणारी आहे, हें उघड आहे.

वर संविधानकांची जुळवाजुळव कवीनें कशी केली आहे. याचा ऊहापोह करीत असतां, असें ह्मटलें आहे कीं, कांहीं एक साधारण सर्वमान्य तत्व ज्यांत ग्रथित केलेलें दिसत आहे, अशा कांहीं गोष्टी एकत्र करून प्रस्तुत नाटकाचें संविधानक कवीनें सिद्ध केलें आहे; तेव्हां हें तत्व कोणतें असा प्रश्न सहजच उत्पन्न होतो. त्याचा खुलासा येथें करणें अवश्य आहे. नाटक रचण्यांत कवीचा हेतु काय आहे हें स्पष्टपणें सांगण्याचा शेक्स्पियर कवीचा परिपाठ नाहीं. प्रस्तुत नाटकाशीं बऱ्याच गोष्टींत साम्य पावणाऱ्या "मृच्छकटिक" नाटकाच्या आरंभींच कवि उद्दिष्ट कार्याचें दिग्दर्शन करतो तें असें कीं, अवंतीपुरींत राहणाऱ्या चारुदत्त व वसंतसेना यांच्या परस्परांवरील प्रेमास अनुलक्षून,

.........सुरतोत्सवाश्रयं
नयप्रचारं व्यवहारदुष्टताम्।
खलस्वभावं भवितव्यतां तथा
चकार सर्वं कविशूद्रको नृपः ॥

हेंच कार्याचें दिग्दर्शन प्रस्तुत नाटकाच्या संबंधानेंही उपयोगीं पडण्यासारखें आहे, हें मार्मिक वाचकांस सांगणें नलगे. परंतु अशी कांहीं परिस्फुटता शेक्स्पियर कवीनें ह्या नाटकांत किंवा

त्याच्या इतर कोणत्याही नाटकांत केल्याचें आढळून येत नाहीं. त्याची रीत ह्मटली म्हणजे आपला आशय गूड ठेवावयाचा; तो वाचकानें व प्रेक्षकानें पाहिजे तर प्रयत्न करून हुडकून काढावा. यासंबंधानें डाक्टर अलरिसी ( Dr. Ulrisi ) ह्या नांवाच्या एका विद्वान् टीकाकाराचे विचार विशेष लक्ष देण्यासारखे आहेत.* त्याचें असें ह्मणणें आहे कीं, कवीनें ह्या नाटकांत "समम्

---

* डाक्टर अलरिसी हे एक जर्मन गृहस्थ असून, शेक्सपिअर कविचे रसिक भक्त आहेत. त्यांनीं कवीचा आशय सांगतांना शेवटल्या आंगठ्यांच्या गोष्टीस टाळा दिला आहे हें खरें. तथापि तींतही कवीचा आशय कसा प्रतिबिंबित झालला आहे हें दाखविण्याचा यत्न आह्मीं वर केला आहे. हें चाणक्ष वाचकांच्या लक्षांत येईलच. त्यांचा ह्मणण्याचा समग्र आशय एका इंग्रज ग्रंथकारानें इंग्रजी भाषेंत थोडक्यांत आणिला आहे. तोच इंग्रजी भाषा जाणणारांसाठीं येथें देतों:--

"Throughout many of Shakspere's plays, the leading fundamental idea, concentrated in itself, is intentionally hidden.--- But there are sufficient intimations of the meaning of the whole scattered throughout; so that whoever has in some degree penetrated into the depths of the Shaksperean art cannot well go wrong. The sense and significancy of the process between Antonio and the Jew rest clearly upon the old juridical precept, *smmum jus, summa injurias* ( the trictest law the highest injustice or injury ). Shylock has, clearly, all that is material, except justice, on his side; but, while he seizes and follows his right to the letter, he falls through it into the deepest and most criminal injustice; and the same injustice, through the internal necessity which belongs to the natura of sin, falls back destructively on his own head. The same aspect in which this principal is presented to us in its extremest harshness, in the case of Shylock, shows itself in various out bursts of light and shadow throughout all the remaining elements of this drama; The arbitrary will of her father, which fetters Portia's in-

पुढें चालू )

जस् समा इन्जूरिया"(Summum jus, Summa injuria) ह्या तत्वाचा उपन्यास करून, ' दुष्ट व्यवहारा' मध्यें 'नयप्रचार" कसा असावा हें दाखविण्याचा यत्न कवीनें केला आहे. वरील तत्व हें पाश्चिमात्य देशांतील न्यायशास्त्रांतलें असून, त्याचा अर्थ सामान्यतः असा आहे कीं, जों जों कायद्यांचा व नियमांचा कडकपणा अधिक, तों तों अन्यायाचा मात्र प्रादुर्भाव होऊन, तज्जन्य पीडा व नुकसानी सोसण्याची पाळी सर्वांवर येते. प्रस्तुत नाटकांत या तत्वाचा केवळ उपन्यासच करून कवि थांबला नाहीं; तर त्यानें आणखी असेंही दाखविलें आहे कीं, अशा अन्यायजन्य अर्थात अन्याय्य नुकसानींचा व त्रासाचा प्रतीकार करणें म्हणजे न्याय करणेंच होय. या तत्वाचा उपन्यास कवीनें कसा केला आहे, हें आतां पाहूं. प्रथमतः शायलॉक व ॲन्टो-नियो यांजमध्यें झालेल्या कर्जरोख्याचीच हकीगत घेऊं. शाय-

---

( मागील पानावरून चालू )

clination, and robs her of all participation in the choice of a husband, rests certainly upon paternal right; but even this right, when carried to an extreme, becomes the highest injustice. The injustice which lies in the enforcement of this paternal right, would have fallen with tragical weight, if chance had not conducted it to a fortunate issue. The flight and marriage of Jessica, against her father's will, comprehends a manifest injustice. Novertheless, who will condemn her for having with drawn herself from the power of such a father ? in the sentence laid upon the Jew, by which he is compelled to recognise the marriage of his daughter, is a gain reflected the precept---*Summum jus, Summa injuria*. right and unright are here so closely driven up into the same limit, that they are no longer separated, but immediately pass over one to the other. Thus we see that the different, and apparently hetro geneous, events unite themselves on the whole into one point. "

CHARLES KNIGHT.

लॉक यानें आपल्या मतें मोठ्या काव्यानें, अमुक मुदतीला कर्ज-फेडलें नाहीं, तर रिणको याच्या शरीरांतून आच्छेर मांस कापून घेण्याची अट कर्जरोख्यांत लिहून घेतली; आणि त्याला असें वाटलें कीं, कायद्याप्रमाणें आपला हक्क आपण चांगला दृढ करून घेतला. पण असें करण्यांत न्यायाच्या वरील तत्वाप्रमाणें कायद्याचें व नियमांचें बंधन इतकें संकुचित व घट्ट झालें कीं, तेणें करून 'व्यवहारदुष्टता' उत्पन्न झाली. पुढें पोर्शियेनें कायदेशीर कोटी लढवून याच व्यवहारदुष्टत्वाचा प्रतीकार करून न्याय केला; अर्थात दुष्टत्वाचा प्रतीकार केल्यानें न्याय झाल्याचें कवीनें येथें स्पष्टपणें दाखविलें आहे. आतां करंडकांच्या पणाच्या हकीगतीकडे पाहिलें, तर तींतही वरील तत्वच वरील रितीनेंच उपन्यस्त केलें आहे. पोर्शियेच्या बापानें, आपल्यामतें मुलीच्या कल्याणाकरितां ह्मणून, आपले पैत्रिक प्रभुत्वास अनुसरून, मरतेवेळीं करंडकांचा पण करून ठेविला; व जो संकेतित करंडक निवडील त्यासच मुलीनें वरिलें पाहिजे, असें ठरविलें. आतां यांत कायदेशीर रीतीनें आपल्या मुलीवर बापाचें पूर्ण प्रभुत्व होतें हें खरें; तथापि तें गाजविण्यांत त्याच्याहातून बंधन घट्ट होऊन त्याचा दाब फार झाला व तेणेंकरून, दुष्टबुद्धीचा लवलेशही नसतां, अन्याय उत्पन्न झाला. तेव्हां त्याचा प्रतीकार किंवा परिहार, मुलीच्या सुदैवानें इच्छित वराच्या हातून योग्य करंडकाची निवड झाल्यानें, झाला म्हणून बरें झालें; नाहीं तर तो मोठा सदोष असा अन्यायच ह्मणाचा लागला असता. वस्तुतः, ह्या ठिकाणीं कवीनें " भवितव्यते " चेंच घोडें मध्यें घालून सरासरी वेळ मारून नेली आहे यांत शंका नाहीं. यापुढें तिसरी हकीगत जेसिकेची घेऊं. जो शायलाक आपल्या सन्मान्य कुळाशीं एवढ्या कडकपणानें वागतो, त्याचें आपल्या मुलीवर कितीही प्रेम असलें तरी त्याची वागणूक फारशी मायाळूपणाची असण्याचा संभव कमीच. आपणास ठाऊकच आहे कीं, तो आपल्या मुलीस घराबाहेर कोठेंही जाऊं देत नव्हता. रात्रीचे वेळीं तो तिला एकटीला घरांत ठेवून बाहेर जाऊं लागला

तेव्हां तो तिला बजावून सांगतोः—" दारांना नीट कुलुपें घाल. आणखी रस्त्यांत ढोलकी, तुतारी वगैरे वाजतांना ऐकूं आली तरी गडबडीनें रस्त्यांत काय चाललें आहे तें पाहायला उगीच खिडकीशीं जाऊं नको; माझ्या घराचे सर्व कान बंद कर, ह्मणजे मी ह्मणतों घराची खिडकीन खिडकी बंद करून घे."* यावरून त्याचा आपल्या मुलीवर किती कडक अम्मल होता हें स्पष्ट होत आहे. आणि त्याचें आपल्या मुलीवर जर एवढें कडक प्रभुत्व होतें तर त्यांतही सदोष असा अन्यायच होत होता, असें ह्मटलें पाहिजे. अर्थात ती अशा स्थितींतून आपल्या बापास सोडून गेली, व बापाच्या कडकपणाचा अशा रीतीनें तिनें प्रतीकार केला यांत न्यायच झाला असें कवीनें दाखविलें आहे. आतां शेवटलें आंगठ्यांचें प्रकरण घेऊं. यांत पाहिलें तरी देखील प्रत्यक्ष पोर्शियेनेंच आपल्या पतीवर प्रभुत्व गाजविण्याचा यत्न केल्याचें दिसून येतें. तिनें लग्नसमयीं त्याच्या बोटांत प्रेमाची ह्मणून आंगठी घातली व शपथपूर्वक ती त्यानें प्राणापलीकडे जपून ठेवावी, कोणत्याही कारणावरून हातची जाऊं देऊं नये असें त्याचेकडून कबूल करून घेतलें. प्रिय पत्नीच्या प्रेमाची ती खूण—तिचें केवढें बंधन ह्मणून सांगावें! परंतु आपण पुढें असें पाहतो कीं, ज्या मित्राच्या साहाय्यानें लग्नाचा योग जुळून येतो, त्या मित्रावर जेव्हां संकट येतें तेंव्हां त्यांतून त्याची मुक्तता करणारा वकील ती आंगठी मागतो. अशा वेळीं नाहीं म्हणणें हें कृतघ्नपणाचें असून मरणाइतकेंच दुःखकारक होतें. सारांश आंगठी देणें हेंही मरणाइतकेंच दुःखकारक व नाहीं म्हणणें हेंही तेवढेंच दुःखकारक, अशा वेळीं बसॅनियो यानें शपथेचें बंधन तोडून व वैवाहिक प्रितीचें बंधन शिथिल करून अंगठी हातची जाऊं दिली यांत वस्तुतः वरील तत्वास अनुसरून त्यानें अपराध केला नाहीं; तर केवळ न्याय्य तेंच केलें, असें सहजच म्हणावें लागतें—आणि सर्वांत चमत्काराची व कवीच्या कुशलतेची परमावधी म्हटली म्हणजे

*व्हेनिस नगरचा व्यापारी अंक २ पृष्ट ५९-६०.

ही कीं, हा प्रतीकार स्वतः पोर्शिया आपले यजमानास थोर मनानें क्षमा करून आपणास मान्य आहे असें दर्शविते व यांत न्यायच झाला असें सिद्ध करतें!

प्रस्तुत नाटकांत मनन करण्यासारख्या विशेष गोष्टी कोणत्या आहेत त्यांची चर्चा केल्यावर, आतां यांतील मुख्य मुख्य पात्रांची घटना कवीनें कशी कशी केली आहे, हें थोडक्यांत पाहूं. पहिलें ठळक पात्र ह्मटलें ह्मणजे 'व्हेनिस नगरचा व्यापारी' ॲन्टोनियो, हें होय. अन्टोनियो याजपाशीं संपत्ति विपुल होती; आणि तो तिचा व्ययही इतरांच्या उपयोगीं पडण्यांत करीत असे. स्वभावानें सरळ, मनानें मवाळ, आणि हाताचा सढळ,-अशा या गृहस्थास मित्रांचा काय तोटा? त्यांच्यांतही त्याचा एकावर फारच जीव होता. त्याच्यासाठीं तो आपले प्राणही खर्ची घालण्यास सिद्ध झाला. अशा प्रकारचें मित्रत्व ह्मणजे निरपेक्ष व निर्व्याजच समजलें पाहिजे. ह्याचें लक्षण धीर जनांच्या मताप्रमाणें भर्तृहरि सांगतो तें असें:—

पापान्निवारयति योजयते हिताय
गुह्यंच गूहति गुणान् प्रकटीकरोति ।
आपद्गतं च न जहाति ददाति काले--
सन्मित्रलक्षणमिदं प्रवदन्ति धीराः ॥

**नीतिशतक.**

ह्या शाब्दिक अमूर्त लक्षणालाच शेक्सपीयर कवीनें येथें ॲन्टोनियो हें मूर्त स्वरूप दिलें आहे, हें उघड आहे. ॲन्टोनियो याच्या आंगचा मुख्य गुण ह्मटला ह्मणजे उदारपणा हा होय. आणि जे उदार असतात ते बहुधा निष्कपट व सरळ असतात. अर्थात् मनांत एक व बाहेर एक अशी त्याची वागणूक नव्हती ह्मणूनच बसॅनियो पैशाची मदत मागायला आला असतां त्यानें तत्काल उत्तर दिलें कीं:—'मजपाशीं जें कांहीं आहे नाहीं, तें सर्व जरी तूं उडविलेंस, तरी त्याचें मला काडीइतकेंही वाईट वाटणार नाहीं. पण अमुक करशील का असा संशय तूं घेतोस हें पाहून

मात्र मला अतिशय वाईट वाटतें !' * त्याच प्रमाणें त्याचें हृदयही अत्यंत मृदु व मायाळू होतें. प्रिय मित्राचा कांहीं काळपर्यंत होणारा वियोग देखील त्याच्यानें सहन करवेना. याच कारणास्तव त्याचे मित्र त्याला 'सज्जन' ह्मणतात, व "त्याच्याइतके कोमल हृदयाचे फार थोडे" † अशी त्याची वाखाणणी करतात. परंतु शायलॉक याशीं ह्याच 'सज्जना'ची वागणूक पहावी तों कांहीं विचित्रच ! तो शायलॉक यास कशी धमकी देतो पहा ऽ 'अरे जा जा ! आजपर्यंत जसा मी तुझ्याशीं वागत आलों तसाच यापुढेंही वागेन, मी तुला कुत्रा ह्मणेन, तुझ्या अंगावर थुंकेन व लाथांनीं तुझी संभावनाही करीन; पक्कें समज.' अशा प्रकारची वागणूक ह्मणजे वाटपाड्या तंट्या भिल्लाच्या दांडगाईची बरोबरी करणारी नाहीं असें कोण ह्मणेल ? यावरून पाहतां ॲन्टोनियो ह्याच्या ठिकाणीं त्याच्या आंगच्या चांगल्या गुणांचा केवळ अतिरेक झाला होता असें दिसून येतें. व याचें प्रायःश्चित्तही पुढें लवकरच त्याला मिळालें. तथापि तो एक "उत्तम मित्र" होता असें ह्मणावयास कांहीं चिंता नाहीं.

ॲन्टोनियो याच्या तोलाचें दुसरें ठळक पात्र ह्मटलें ह्मणजे पोर्शिया हें होय. ती अन्टोनियो याच्याप्रमाणेंच धनसंपन्न होती व त्याच्याप्रमाणेंच स्वभावानें सरळ व सढळ हाताची होती असेंही मानावयास जागा आहे. कारण तिच्या पदरीं दासदासींचा परीवार बराच असून तो सर्व संतुष्ट व तिच्यावर प्रेम करणारा होता असें आपण पाहतों. बॅसॅनियो यानें करंडकांची निवड केल्यावर व विवाह निश्चित झाल्यावर जेव्हां अन्टोनियो याजवरील संकटाची हकीगत तिला कळते, तेव्हां ती मागें पुढें न पाहतां, एकदम ह्मणते:—‡ 'कर्जाच्या वीसपट

* 'व्हेनिस नगरचा व्यापारी' अंक १ ला पृष्ठ ११

† व्हेनिस नगरचा व्यापारी अंक २ पृष्ठ ७५

ऽ व्हेनिस नगरचा व्यापारी अंक १ ला पृष्ठ २३

‡ व्हेनिस नगरचा व्यापारी अंक ३ रा पृष्ठ ११५

रक्कम देण्याला मजजवळ सोनें तयार आहे, ते द्या व कर्ज देऊन टाकून आपल्या मित्राला संकटांतून सोडवून बरोबर आणा.' यावरून तिचें थोर मन व उदारपण यांची साक्ष आपणास पटते. याप्रमाणें ॲन्टोनियो या पात्राशीं जरी तिचें बरेंच साम्य आहे, तरी ॲन्टोनियो याच्या आंगीं नाहींत असें कांहीं गुण तिच्या ठिकाणीं दिसून येतात. विपुल संपत्तीच्या अनुषंगानें प्राप्त होणारें जें औदासीन्य त्याचीही छाया अन्टोनियो याच्याप्रमाणें तिच्या मनावर पडली होती. पण विशेष गोष्ट ही कीं, अन्टोनियो हा आरंभापासून शेवटपर्यंत त्या छायेतून मुक्त होत नाहीं. परंतु पोर्शिया प्रसंग येतांच ताजी तवानी होते, व प्रसंगास योग्य असें शहाणपणाचें व धूर्ततेचें वर्तन करते. ॲन्टोनियो याच्या प्रमाणें ती निष्क्रिय होवून बसत नाहीं. संकटाचें धोरण दिसतांच तिला कायद्यांतील कोटी आपोआप सुचते व व्यवहारांतील लटपट ही तिच्या लक्षांत येऊन तत्काळ, प्रसंगावधान धरून ती कार्यास सिद्ध होते. या तिच्या अंगच्या गुणास्तव कित्येक टीकाकारांनीं पोर्शिया ही फाजील हुषार किंवा धूर्त आहे, एवढा नाचरेपणा स्त्रीत्वास शोभत नाहीं असे ह्मटलें आहे.* परंतु वास्तविक विचार केला असतां, जें कार्य तिच्या हातून घडवून आणण्याचा कवीनें घाट घातला आहे, त्या कार्याला लायक अशीच या पात्राची रचना

---

* हें मत प्रसिद्ध जर्मन टीकाकार हॅझलिट (Hazlit) यांचें आहे. यास उत्तरादाखल म्हणून जी टीका एका टीकाकार स्त्रीनें केली आहे, ती लक्ष देण्यासारखी असल्यावरून तींतील लहानसा उतारा येथें देतोंः–

"Portia clever! why, the word clever implies something common-place, in as much as itspeaks the presence of the active and perceptive with a deficiency of the feeling and reflective powers. Portia hangs beside the terrible and incorrigible Jew, the brilliant light of her character set off by the shadowy power of his, like a magnificent baeuty--breathing Titian by the side of a Jorgeous Rembrant." Mrs. JAMEISON.

कवीनें केली आहे. तिची विद्वत्ता, मोठे विचार व व्यवहारज्ञता हे गुण स्त्रियांच्या ठिकाणीं तर काय ?—पण पुरुषवर्गांत देखील फारच थोड्यांच्या वांट्यास येत असतील. याच गुणास्तव तिची विचारसरणी व भाषणपद्धतिही फार ढबदार व मुद्देसूद अशी आहे. दयाभूत अंतःकरण करण्याविषयीं शायलॉक यास तिनें केलेला बोध कसा मासलेवाईक आहे तो पाहण्यासारखा आहे. या पात्राच्या मुखानें कवीनें प्रत्येक गोष्टींत ' चालढाळपणा ' ठेवण्याचा अर्थात् तारतम्य पाहून वागण्याचा बोध केला आहे.

तिसरें महत्वाचें पात्र बॅसनियो हें आहे. हें पात्र मुख्यत्वेंकरून मागील दोन पात्रांस जोडणाऱ्या सांखळीच्या फांशासारखें आहे. एकीकडून तो ॲन्टोनियो याचा प्रिय मित्र असून एकीकडून पोर्शियेचा प्रियकर आहे. या पात्राच्या आंगचा विशेष गुण ह्मटला ह्मणजे विवेकबुद्धी हा होय. तो स्वतः उंच कुळांतला असून शीलानें संभावित असा आहे. ही गोष्ट तो अभिमानपूर्वक स्वतः आपल्या तोंडानें बोलून दाखवितो ती अशी:—*"मजजवळ जी कांहीं संपत्ति आहे, तें माझें थोर कुलशील." त्याजपाशीं संपत्ती नव्हती, असें असूनही पोर्शियेसारखी 'धूर्त' स्त्री त्याला भाळते यावरून तो रूपानें देखणा होता, हें स्पष्टच आहे. विशेषतः पोर्शिया त्याच्या पाणीदार डोळ्यांचें व त्याच्या बाणेदार वर्तनाचें मार्मिकतेनें वर्णन करते तें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. तथापि त्याचें प्रेम पोर्शियेवर किती होतें, याचा अंदाज करतां येण्यास आपणापाशीं कांहीं साधन नाहीं. किंबहुना धनप्राप्तीच्या इच्छेनें तर पोर्शियेशीं लग्न करण्याचें धाडस त्यानें मनांत आणलें नसेलना, असाही संशय घेण्यास जागा आहे परंतु यांत संतोषाची गोष्ट एवढीच कीं, प्रेमस्थान व द्रव्यप्राप्तीचें स्थान हीं दोन्हीही येथे एकच झालीं असल्यामुळें वरील आरोपांस कवीनें सवड ठेवली नाहीं असें आह्मांस वाटतें.

चवथें पात्र शायलॉक हें होय. यासंबंधानें पर्यालोचनांत

* व्हेनिस नगरचा व्यापारी अंक ३ रा पुष्ठ ११२

अगोदरच पुष्कळसा मजकूर येऊन गेला आहे. यास्तव त्याचें उद्‌घाटन येथें करण्याचें कारण दिसत नाहीं. तथापि ह्या पात्राचा विचार करीत असतां स्वतः संबंधाची व्यक्तिविषयक अशी एक गोष्ट येथें सांगितल्यावांचून राहवत नाहीं. प्रस्तुत भाषांतर कित्येक मित्रांनीं वाचल्यावर, यांत शायलॉक याचीं भाषणें फार चांगली उतरलीं असून, विशेषतः हें पात्र सुरेख वठलें असल्याविषयीं त्यांचें ह्मणणें पडलें; आणि आह्मांसही तें पटलें हें प्रांजलपणें आह्मी कबूल करतो. याचें कारण आह्मांसतरी एवढेंच दिसतें कीं, एका दुष्ट सावकारानें आमच्या एका जिवलग मित्राच्या ' काळिजाला हात घालण्याची तयारी ' करूनच न थांबतां त्याच्या ' अर्ध्या उत्तमांगा ' चा सर्वस्वीं नाश करून, त्याला जगांतून उठविलें, तो प्रसंग आमच्या हृदयांत निरंतर उभा आहे, व त्याच्या हृदयभेदक शिव्याशापांची व छळणुकीची आठवण ताजी आहे. अशा ह्या नीच माणसाचें नांव येथें लिहून कागदास डाग पाडणें बरें दिसत नाहीं. जगांतून दुष्ट मनुष्यांचा सर्वस्वीं नायनाट होणें असंभाव्यच; तरी परमेश्वरा ! चांगल्या कामांतही शायलाक सारख्याची मदत घेण्याची बुद्धि तूं कोणास होऊं देऊं नकोस, एवढेंच तुजपाशीं हात जोडून मागणें आहे.

याशिवाय आणखी दोन पात्रें येथें उल्लेखीत करण्यासारखीं आहेत; तीं नेरिसा व जेसिका हीं होत. यांजपैकीं पहिली पोर्सियेच्या स्त्री परीजनांपैकीं असून थेट तिच्या वळणाची आहे; आणि जेसिका ही शायलॉक याची मुलगी असून, तिची आई तिच्या लहानपणीं तिच्या आठवणीच्या आधींच वारली होती. व ती शायलॉक यासारख्या धनलोभी व खाष्ट बापाचे घरीं लहानाची मोठी झाली असल्यामुळें मायेचा मृदु हात तिच्या पाठीवरून कधीं फिरला असेल असें वाटत नाहीं. सारांश ती प्रेमळ वागणुकीस पहिल्यापासूनच पारखी असल्यामुळें लॉरेन्झो याजसारख्या प्रेमळ गृहस्थाची गांठ पडून मायाळूपणाचा ओलावा मिळतांच ती प्रेमाच्या पाशांत पडते, व आपल्या

बापासही सोडून जाण्यास सिद्ध होते यांत काय नवल आहे? यांत तिच्या हातून कांहींसा अत्याचार होतो हें खरें; तथापि ज्या स्थितींत ती होती तिचा विचार केला असतां तशा स्थितींत तिचा जन्मभर निभाव होणें कठिण होतें, व तिनें जें केलें तें निरुपायास्तव केलें असें समजून कोणीही सुज्ञ मनुष्य सहृदय अंतःकरणानें तिला क्षमाच करतील असा भरंवसा वाटतो.

आपल्या इकडील एखाद्या नाटकाशीं प्रस्तुत नाटकाची तुलना करून दाखविली असतां, ह्या नाटकाचा उत्कृष्टपणा वाचकांच्या विषेष लक्षांत येईल, असें वाटतें. प्रस्तुत नाटकांशीं कित्येक गोष्टींत साम्य पावणारें नाटक म्हटलें म्हणजे प्रसिद्ध ‘ मृच्छकटिक ’ नाटक होय, हें मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. ही तुलना सविस्तर यथास्थित करणें हा जसा महत्त्वाचा तसाच मौजेचा विषय आहे. संविधानकाच्या प्रकरणांत शेक्स्पियर कवीप्रमाणेंच ‘ मृच्छकटिका’च्या कर्त्यानेंही दोन हकीगतींची एकत्र सांगड घालून देण्याची कशी खटपट केली आहे याचा उल्लेख मागें केलाच आहे. याशिवाय ज्या पात्रांत विशेष साम्य आढळून येतें तीं येणेंप्रमाणें:—उच्च कुलशील, व पूर्णदारिद्र्य ह्या बॅसनियो याच्या ठिकाणीं असलेल्या दोन गोष्टी व औदार्य आणि उपजीवनाचें साधन—व्यापार ह्या ॲन्टोनियो याच्या ठिकाणीं असलेल्या दोन गोष्टी—अशा चारी गोष्टी ‘ मृच्छकटिकां’तील चारुदत्ताचे ठिकाणीं एकवटलेल्या दिसून येतात. शेक्स्पियर कवीनें कुलशीलानें संपन्न अशीच नायिका प्रस्तुत नाटकांत आणली आहे, तशी शूद्रककवीनें आणलेली नाहीं. त्यानें वसंतसेनेसारख्या गणिकेच्या मुलीला आपल्या नाटकांत नायिका करून अग्रस्थान दिलें आहे हें योग्य केलें नाहीं, असे कोणासही कबूल करावें लागेल. परंतु त्यानें असेंच कां केलें हा प्रश्न सदर नाटक जो कोणी वाचतो किंवा पाहतो त्याच्या मनांत एकदम उभा राहतो, व त्याचा खुलासा एकाएकीं होत नसल्यामुळें त्याचें मन चकीत होतें.

शूद्रक कवीला प्रौढ नायिका नाटकांत पाहिजे होती, पण आपले देशांत बालविवाहामुळें व स्त्रियांच्या पडदपोशीमुळें त्याची इच्छा पूर्ण होण्याला कांहीं मार्ग त्याला दिसला नाहीं; यास्तव त्यानें एकदम गणिकेच्या मुलीकडे धाव मारली असें आम्हांस वाटतें. तथापि पोर्शियेच्या आंगीं असलेले प्रौढपणा, विनयसंपन्नता व श्रीमंती हे गुण वसंतसेनेच्या ठिकाणीं शूद्रक कवीनें आणण्याचा यत्न केला आहे, असें म्हणावयास कांहीं चिंता नाहीं.

मृच्छकटिकांतलें शर्विलक हें पात्र बरेंच शिक्षणसंपन्न व खटपटी दिसतें. शर्विलक हा राज्यप्रकरणीं उलथापालथींत पडलेला असून, कांहीं निमित्तानें चोरी करण्यास सिद्ध झालेला आपण पाहतों. पण तो मुळचा चोर होता असें दिसत नाहीं. चोरी करतांना तो शास्त्रांतलीं म्हणून जीं वचनें बोलून दाखवितो तीं हास्यरस उत्पन्न करण्याचें कार्य उत्कृष्ट रीतीनें करितात. यावरून तो फाजील सभ्यपणाची टर उडावणाऱ्या "बहुभाष" ग्रॅशियानो या पात्राची जणों बरोबरी करीत आहे असें कोणास वाटणार नाहीं? या पात्राचीं भाषणें वाचून व त्याचे चार पाहून हा केवळ चोर आहे; अर्थात् निंद्य आहे असें दाखविण्याचा कवीचा बेत असावा असें वरवर विचार करणास वाटेल. परंतु या पात्राविषयीं आमची समजूत वेगळी झाली आहे. आंतून निंद्यकर्मे करून बाहेरून शास्त्रोक्त वचनें बोलून दाखविणाऱ्या व धार्मिकपणाचा डौल घालणाऱ्या दांभिक पंडितांची टर उडविण्याचा कवीचा हेतु असावा असें दिसतें. शकार हें पात्रही हास्यरस उत्पन्न करणारें आहे. व त्याची तुलना व्हेनिस नगरचा व्यापारी या नाटकांतील 'दीर्घ शकारा'शीं म्हणजे शायलॉक या पात्राशीं केली असतां चालेल. शायलॉक हें पात्रही कवीनें हास्यरस उत्पन्न करण्याकरितांच आणिलें आहे. अशी सामान्यतः एकेकाळीं समजूत होती. हें मागें सांगितलेंच आहे. तींत जसा अलीकडे फरक पडला आहे तसाच शर्विलक व शकार यांच्या भाषणांत, अभिनयांत व एकंदर आविर्भावांत फरक पडण्याची अवश्यकता आहे असें आम्हांस वाटतें. शकार हा कांहीं मूळचा मूर्ख किंवा भोळा दिसत नाहीं. त्याचे चार कांहीं अधिकाराच्या घमेंडीचे व कांहीं मतलबाचे स्पष्टपणें दिसतात. वस्तुतः मूर्खपणा हें आपल्या लबाड्या जिरविण्याकरितां त्याचें ढोंग होतें. यास्तव त्याच्या हृदयाचा ठाव घेऊन आपले इकडील कोण नट

त्याचें यथार्थ स्वरूप दाखविण्याचें यश घेतो हें पहाणें आहे. वरील दोन्ही नाटकांतील साम्य केवळ रेखामात्रेंकरून येथें दर्शविलें आहे. इतर अडचणीप्रमाणेंच छापण्याच्या जबरदस्त गैरसोईस्तव याहून अधिक कांहीं करतां येत नाहीं, म्हणून तूर्त येथेंच थांबतों, असें दुःखानें येथें कळविल्याखेरीज राहवत नाहीं.

मृच्छकटिक नाटकाच्या तुलनेचा विषय वांचकांपुढें असतांनाच, ह्यासंबंधाची एक सूचना उपसंहारादाखल करून, हा उपाद्घात आम्हीं पुरा करितों. शेक्स्पिअर कवीचीं नाटकें वाचावयाचीं तीं केवळ मौजेकारितांच असूं नयेत; त्यांच्या वाचनाबरोबरच अभ्यास आणि मनन यांचीहि जोड ठेवणें अवश्य आहे, असें आमचें मत झालें आहे यास्तव ही गोष्ट आमच्या वाचकांच्या लक्षांत आणून देणें फार अगत्याचें आहे असें आम्ही समजतों. नाट्यकला आपल्या इकडे प्राचीन काळापासून प्रचारांत आहे व ती बऱ्याच उर्जितावस्थेस एकेकाळीं येऊन पोंहचली होती, यांत शंका नाहीं. तेव्हां आपल्या इकडील संस्कृत नाट्यग्रंथाशीं शेक्स्पिअर कविच्या नाटकांची तुलना जेथें जेथें करून दाखवितां येईल तेथें तेथें करून दाखवावी, निदान अशा तुलनेकडे वाचकांचें लक्ष वेधावें असें आम्हीं योजिलें आहे. तरी ही योजना त्यांस पसंत पडेल, व अशा अभ्यासास व मननास बरीच मदत होईल अशी आशा आहे.

कळविण्यास संतोष वाटतो कीं, आमचा नाट्यमालेचा उद्योग आपले सध्याचे लोकप्रिय गव्हरनरसाहेब नेक नामदार **सर जार्ज सिडेनहेम क्लार्क** ह्यांस पसंत पडला असून त्यांचे खासगी कारभारी ह्या संबंधानें कळवितात कीं, "**नाट्यमालेला पहिले वर्गाचे वर्गणीदार व आश्रयदाते ( पेट्रन )** होण्याची नेक नामदारांची मर्जी आहे; ह्या कामीं आपणांस पूर्णयश प्राप्त होवो असेंही ते इच्छितात." ह्या कृपाप्रसादाबद्दल आम्ही नेक नामदारांचे फार फार आभारी आहों. प्रस्तुत लेख पुरा करण्यापूर्वी आमचे जुनें मित्र **राजश्री दामोदर रामचंद्र चिपळुणकर बी. ए.** ह्यांचें स्मरण वाचकांस देण्याचें सांप्रत अगत्य आहे. हे शेक्स्पिअर कवीचे एक भक्त असून बाणेदार मराठी लेखक आहेत. ह्यांचें साहाय्य आम्हांस चांगलें आहे, ह्या गोष्टीचा आम्हांस मोठा अभिमान वाटतो.

**समाप्त.**

# व्हेनिसनगरचा व्यापारी

## या नाटकाचें संविधानक.

शायलॉक या नांवाचा कोणी यहूदी व्हेनिसनगरीं राहत असे. तो सावकारी करून ख्रिस्ती व्यापाऱ्यांस भारी दरानें पैसे व्याजीं देत असे. अशा रीतीनें त्यानें अतोनात पैसा मिळविला होता. त्याचा स्वभाव खाष्ट होता, आणि व्याजीं दिलेल्या पैशाचा वसूल करण्यांत त्याला कोणाची दयामाया येत नसे. यामुळें त्या शहरांतील सर्व भलेमाणसांना तो आवडत नसे, विशेषेंकरून व्हेनिसनगरचा एक तरुण व्यापारी, ॲन्टोनियो, याचा व त्याचा याच कारणावरून उभा दावा पडला होता. ॲन्टोनियो हा संकटांत सांपडलेल्या लोकांना पैसे देत असे व त्याबद्दल कोणापासून कधीं कवडी देखील व्याज घेत नसे. एकंदरीनें पाहतां, ॲन्टोनियो याच्यासारखें दयाळू मनुष्य फारच थोडें.

द्रव्यासंबंधानें ॲन्टोनियो याची स्थितीहि कांहीं वाईट नव्हती व परोपकार करण्यांत तो नेहमीं तत्पर असे. सारांश याचीं कृत्यें पाहून, औदार्याविषयीं व थोरपणाविषयीं प्राचीन रोमन लोकांची जी ख्याती होती तिची आठवण झाल्यावांचून रहात नसे. त्या वेळीं असें मनुष्य सर्व इटली देशांत पाहूं जातां, क्वचितच सांपडलें असतें. व्हेनिसनगरचे सर्व लहान थोर लोक त्याजवर प्रेम करीत असत. तथापि बसॅनियो ह्मणून त्याचा एक जिवश्चकंठश्च मित्र होता, त्याचें प्रेम विशेष होतें. त्याचे बापानें त्याला मालमत्ता फारच थोडी ठेवली होती. आणि जी होती ती त्यानें खर्चीकपणानें वागून सारी उधळून टाकली होती. तथापि ॲन्टोनियो व बसॅनियो यांचा मित्रत्वानें जसा एक जीव होता, तशी दोघांची पेटीहि एकच होती; यामुळें त्याला पैशाची उणीव भासत नसे.

एके दिवशीं, बसॅनियो हा उठून ॲन्टोनियो याजकडे आला आणि ह्मणूं लागलाः—' मित्रा थाटानें एक लग्नाचा बार उडवून द्यावा व माझी गेलेली संपत्ति पुन्हां घर-येती करावी असा घाट मीं घातला आहे. माझें एका धनिक स्त्रीवर प्रेम जडलें आहे. तिच्या बापानें तिला पुष्कळ मालमिळकत ठेविली आहे, व त्या सर्वाची ती एकटीच मालकीण आहे. या स्त्रीनें अनेक वेळां प्रेमप्रेरित दृष्टीनें मजकडे पाहिलें आहे.

आणि प्रत्यक्ष तोंडानें जरी उच्चार केला नाहीं, तरी नेत्रकटाक्षांनीं मला प्रेमसूचक बहुत निरोप पाठविले आहेत. या चिन्हांवरून मला तर बुवा वाटतें कीं, जर तिच्याशीं लग्नाचें बोलणें काढलें, तर बहुदा माझा अव्हेर होणार नाहीं. परंतु करावें काय! अशा मोठ्या श्रीमंत स्त्रीशीं जो कोणी लग्नाची गोष्ट बोलण्यास तयार होईल त्याला जो इतमाम असावा तो बाळगण्याचें माझे आंगीं सामर्थ्य कोठें आहे?' असें ह्मणून अ‍ॅन्टोनियो यानें जशी अनेक वेळां यापूर्वीं पैसे देण्याची कृपा केली होती तशी आणखी एकवार करून तीन हजारांची रक्कम देणेंविषयीं बसॅनियो यानें त्याची प्रार्थना केली.

अ‍ॅन्टोनियो याजपाशीं या वेळीं देण्याला पैसा नव्हता; परंतु मालानें भरलेलीं कांहीं गलबतें लवकरच बंदरांत यावयाचीं होतीं. हें लक्षांत आणून तो म्हणाला:— ‘ चिंता नाहीं, आपण त्या धनाढ्य यहूदी सावकाराकडे जाऊ आणि या माझ्या गलबतांच्या भरंवशावर कर्जाऊ पैसा घेऊं.'

मग अ‍ॅन्टोनियो व बसॅनियो हे दोघे शायलॉक यहूद्याच्या घरीं गेले आणि अ‍ॅन्टोनियो यानें त्याजपाशीं तीन हजारांची रक्कम कर्जाऊ मागितली आणि ह्मणाला:— ‘ माझीं जीं गलबतें दूरदेशांहून यायचीं आहेत, तीं आलीं कीं त्यांतील मालानें तुमच्या पैशाची फेड, तुह्मी मागाल

तेवढ्या व्याजासहित करून देईन.' हें ऐकून, शायलॉक आपल्या मनांत ह्मणालाः—'एकदा जर कां ही स्वारी माझ्या तावडींत सांपडेल तर कसें पण मी मागचें उट्टें काढीन. अरे, आमच्या पुराण्या पवित्र जातीची निंदा करतोस, नाहीं ? भर बाजारांत ज्या ठिकाणीं व्यापारी लोक जमायाचे त्या ठिकाणीं सर्वांसमक्ष आमची अब्रू घेतोस, नाहीं ? आमच्या व्यवहाराची टर उडवतोस, नाहीं ? आह्मी मेहनत करून कष्टानें पैसा मिळवितों त्याला ' व्याज, व्याज ' ह्मणून आमच्या नांवानें खडे फोडून आमची निंदा करतोस, नाहीं ? जर मी याला या वेळीं क्षमा केली, तर धिःकार असो माझ्या जातीस!' शायलॉक हा कांहीं उत्तर देत नाहीं, पण मनांतले मनांत कांहीं विचार करीत आहे, असें पाहून अॅन्टोनियो यानें त्याला हांक मारून ह्मटलें:—'कायरे बाबा, मी काय ह्मणतों ऐकलेंस ? मला पाहिजे आहे तेवढी रक्कम कर्जाऊ देतोस का ?'

यावर शायलॉकनें उत्तर केलें:—' काय हो राजश्री, सराफकट्ट्यांत आपली गांठ पडली असतां आपण माझ्या व्याजबट्ट्याबद्दल व माझ्या पैक्याबद्दल किती वेळां बरें निंदा केली आहे ? पण याबद्दल मी तुह्माला कधीं कांहीं बोललों तरी ? आपण जें जें बोललां तें सर्व निमूटपणें सोसून घेतलें आणि जाऊं द्या, असें ह्मणून स्वस्थ बसलों. कारण, सहनशीलत्व हें

आमचे जातीचें ब्रीदच आहे; आठवण आहे का?—तुह्मीं मला नेहमीं काय ह्मणतां? तूं पाखंडी आहेस, गळेकापू आहेस, कुत्र्यासारखा लघाळ आहेस, इतकें बोलूनच थांबत नाहीं, पण आणखी माझ्या पायघोळ अंगरख्यावर सपशेल थुंकतां आणि दाराशीं परकी कुत्रा आला असतां त्याला जसें लाथाळावें तसें मला तुह्मी लाथाळतां, नव्हे का? ठीक आहे, आतां माझ्या मदतीची तुह्माला गरज आहे, असें दिसतें. कारण तुह्मी मजकडे येतां आणि मला ह्मणतां:—'शायलॉक शेटजी आह्माला पैसा दे,' पण काय हो, कुत्र्याजवळ पैसे असतात का? कुत्र्याला तीन हजारांची रक्कम देतां येईल का?—खरेंच सांगा, येईल का? अथवा मी असें तरी बोलूं का—थोर गृहस्थ हो आपण गेलेच बुधवारीं माझ्या अंगावर थुंकलां, अमुक अमुक दिवशीं आपण मला लाथाडलें, आणखी दुसरे एके वेळीं आपण मला श्वान ह्मटलें, आणि इतक्या इतक्या प्रकारांनीं आपण हा जो माझा बहुमान केला, त्याबद्दल आतां आपल्याला मी हें कर्ज देतों, घ्या.'

यावर ॲन्टोनियो संतापून ह्मणाला:—'अरे जा, जा, आजपर्यंत जसा मी तुझ्याशीं वागत आलों तसाच यापुढेंहि वागेन, मी तुला कुत्रा ह्मणेन, तुझ्या अंगावर थुंकेन, व लाथांनीं तुझी संभावनाही करीन, पक्कें समज. जर तुझ्या मनांतून कर्ज द्यावयाचें असेल तर दे. तें तूं

आपल्या मित्राला देत आहेस व त्याच्यावर आपण मोठे उपकार करीत आहों, असें समजून मुळींच देऊं नको. तेव्हां तूं जें कर्ज देणार आहेस, तें प्रत्यक्ष आपल्या शत्रूला देत आहेस असें समजून दे. कारण त्याची फेड ठरल्याप्रमाणें झाली नाहीं, तर त्या अपराधाबद्दल दंडासुद्धां तुला सर्व कर्जाची भरपाई करून घेतां येईल.'

त्यावर शायलॉक ह्मणतोः—'अमळ थांबा हो, येवढे खवळलां कां? तुमच्याशीं मैत्री करावी, तुमचें प्रेम संपादावें, असा माझा दिल लागत आहे. आजपर्यंत माझी जी जी मानखंडणा आपण केली, ती सर्व विसरून जावी, सध्यांच्या प्रसंगीं तुह्माला हात द्यावा, व व्याजादाखल एका कवडीचीही इच्छा धरूं नये, असा माझा इरादा आहे. मी तर असें ह्मणत आहें. 'ऐकलें'?

हें वर वर दयाळूपणाचें दिसणारें त्या यहुद्याचें बोलणें ऐकून ॲन्टोनियो याला मोठें आश्चर्य वाटलें. मग शायलॉक यानें तसाच दयाळूपणाचा आव कायम ठेवून ह्मटलें:—'मी जें हें करतों तें सारें तुमचें प्रेम संपादन करावें ह्मणून; व यासाठींच मी तुह्माला ही तीन हजारांची रक्कम देतों; इतकेंच नव्हे, पण मी तीवर व्याज देखील घेत नाहीं. फक्त तुह्मी मजबरोबर वकिलाच्या घरापर्यंत चला, व मला आपल्या स्वतःच्या सहीनिशीं एक कागद करून द्या, ह्मणजे झालें. यांत

कांहीं मोठासा अर्थ आहे असें नाहीं. पण ही माझी एक लहर आहे, इतकेंच. त्यांत असें लिहा कीं, 'अमुक दिवशीं, अमुक ठिकाणीं, अमुक अमुक रक्कम परत करूं, न केल्यास किंवा त्यांत चूक झाल्यास माझ्या शरीराच्या वाटेल त्या अवयवांतून एक अच्छेर मांस तुह्मीं कापून घ्यावें, मी हरकत करणार नाहीं.'

यावर ॲन्टोनियो ह्मणाला:—' कबूल. तुह्मी ह्मणतां त्या अटी लिहून माझ्या सहीनिशीं करारपत्र लिहून देण्याला माझी कांहीं हरकत नाहीं. इतकेंच नव्हे, तर तुह्मी फार सदय आहांत असेंही मी ह्मणेन '. तेव्हां बसॅनियो मध्येंच बोलूं लागला:—' छे, छे, मित्रा अशा करारपत्रावर माझ्या-करितां तूं खचीत सही करूं नकोस. ' तथापि ॲन्टो-नियो निक्षून ह्मणाला:—' अरे, एवढा भितोस कां ? यावर सही करण्याला मला कांहीं हरकत वाटत नाहीं. मुदत संपली नाहीं तोंच, माझीं गलबतें कर्जाऊ रक-मेच्या कितीतरी अधिक किमतीच्या मालानें भरलेलीं येऊन पोचतील.'

हीं यांचीं भाषणें ऐकून शायलॉक मोठ्यानें हांसून ह्मणाला:—' अरे अरे अरे हे ख्रिस्ती लोक कोण तरी विचित्र आहेत पहा! हे स्वतःचे व्यव-हारांत दुष्ट, आणि ह्मणूनच हे इतरांविषयीं येवढी शंका घेतात. ' असें ह्मणून, तो बसॅनियो याजकडे वळून

आणखी बोलला:—‘ काय हो, तुह्मी मला एवढेंच सांगा— मुदतींत यांनीं माझी रक्कम आणून दिली नाहीं, आणि माझ्याशीं केलेला करार मोडला, तर ह्या अटीपासून मला काय लाभ? एकाद्या माणसाचें एक अच्छेर मांस मिळालें, तर ती ह्मणजे मोठी आनंदाची गोष्ट आहे किंवा फायद्याची आहे, असें मुळींच नाहीं. त्यापेक्षां गोऱ्ह्याचें, किंवा गाईचें, किंवा बोकडाचें मांस मिळालें, तर बरें नाहीं का? हें पहा—केवळ यांची मेहेरबानी संपादन करण्याकरितां हें मित्रत्वाचें कृत्य मी करीत आहें, दुसरें कांहीं नाहीं. असलें पसंत तर होय ह्मणा; नाहीं तर राम राम!’

शेवटीं ॲन्टोनियो यानें वर सांगितलया प्रकारच्या कर्जरोख्यावर सही केली; त्याला तर असें वाटलें कीं, हा यहूदी ह्मणतो त्याप्रमाणें हा रोखा ह्मणजे केवळ मौजेखातर केलेला कागद आहे, दुसरें कांहीं नाहीं.

ज्या धनिक स्त्रीशीं बसॅनियो यानें लग्नाचें बोलणें लाविलें होतें, ती व्हेनिसनगरापासून जवळच बेलमॉन्ट ह्मणून एक ठिकाण होतें तेथें राहत होती. ती स्वरूपानें जसी अत्यंत सुंदर होती, तशी विचारानें फार प्रौढ होती. केटो याची मुलगी व ब्रुटस याची स्त्री पोर्शिया ह्मणून जी इतिहासांत प्रसिद्ध आहे, व जिचें फार फार वर्णन कवींनें केलेलें आहे तिच्याहून कोणत्याहि प्रकारेंही उणी नव्हती.

याप्रमाणें, अॅन्टोनियो यानें आपलें जीवित धोक्यांत घालून, बसॅनियो यांस पुरेसा पैसा मिळवून दिल्यावर, बसॅनियो हा चाकरनोकरांसहित, मोठ्या दिमाखानें, बेलमॉन्ट येथें येऊन पोहोंचला. तेव्हां त्याजबरोबर ग्रॅशियानो या नांवाचा आणखी एक तरुण गृहस्थ आलेला होता.

बसॅनियो हा ज्या उद्देशानें आला होता, तो उद्देश सफळ झाला, व पोर्शिया हिनें त्याशीं लग्न करण्याचें कबूल केलें.

पुढें लवकरच बसॅनियो यानें आपली वास्तविक स्थिति काय आहे, ती, प्रसंगाप्रसंगानें, आपल्या प्रियेला कळविली, तो म्हणालाः—' प्रिये, माझें तुझ्या ठिकाणीं असलेलें प्रेम, ज्या वेळीं मी तुला कळविलें, त्याच वेळीं मी तुला हेंहि कळविलें होतें कीं, मजजवळ जी कांहीं संपत्ति आहे, तें माझें थोर कुळशील. आणि तें कांहीं खोटें नाहीं.' पोर्शिया हिचें त्याच्यावर जें प्रेम जडलें होतें, तें केवळ त्याच्या अंगच्या गुणावरून जडलें होतें; आणि तिजपाशीं संपत्ती पुष्कळ होती; अर्थात् पति श्रीमान् आहे किंवा कसें याची तिला फारशी परवा नव्हती. मग मोठ्या विनयानें व मर्यादशील-पणानें तिनें ह्मटलें:—' आपणाला मी शोभतें कीं नाहीं, याची मात्र माझ्या मनाला शंका येते; व तेव-ढ्याचकरितां मला असें वाटूं लागतें कीं, सध्यां आहें

त्याहून सहस्रपटींनें अधिक लावण्यसंपन्न व शतसहस्र-पटींनें ऐश्वर्यसंपन्न मीं असतें तर बरें झालें असतें.' पुढें ती विनयानें असेंही म्हणाली कीं:——'मी आपली एक अजाण, अशिक्षित, व वेडीवागडी, अनुभव-शून्य अशी एक कन्यका आहें. असें आहे, तरी यांत ही एक समाधानाची गोष्ट आहें कीं, अजून माझें शिकण्याचें वय गेलें नाहीं; बरें, लहानपणीं, माझे मनावर शिक्षणाचा संस्कार मुळींच झालेली नाहीं असेंही नाहीं; तेव्हां ह्मणतें, मी आपली यापुढेंहि शिकेन. इतकेंच केवळ नाहीं, पण सर्व प्रकारें, आपणच माझे प्राणेश्वर, माझे नियंते, व माझे स्वामी असें मी समजेन.' याप्रमाणें कांहींसा विनय दाखवून तिनें आणखी असें सांगितलें कीं—' महाराज, आजपर्यंत हें सर्व माझें होतें, पण आतां आपलें झालें आहे. हें मोठें थोरलें मंदीर, हे माझे नोकरचाकर, फार तर काय, हें माझें शरीर व प्रत्यक्ष मी, या सर्वांची आजपर्यंत मी धनीण होतें, पण या घटकेपासून यांचा धनीपणा आपणांकडे आला आहे. तर आतां या सर्वांसह मी ही अंगठी आपणांस अर्पण करितें; हिचा आपण स्वीकार करावा.' असें बोलून तिनें एक अंगठी बसॅनियो याच्या बोटांत घातली.

आपणासारख्या गरीब स्थितींतल्या मनुष्याला अशा श्रीमान् व लावण्यसंपन्न स्त्रीनें वरिलें, हें पाहून तो आश्चर्यानें फारच चकीत झाला, व हें तिचे आप-

णांवर मोठे उपकार झाले असेंहि त्याला वाटलें. तथापि हा आपला आनंद व आपली कृतज्ञताबुद्धि कशी प्रगट करावी हें त्यांस कळेना. मग त्यानें प्रेमसूचक शब्द तुटक तुटक बोलत, ती अंगठी स्विकारली.

याप्रमाणें पोर्शियेनें बसॅनियो याला वरिलें. तो सोहळा चालला असतां त्या ठिकाणीं ग्रॅशियानो व नेरिसा हीं दोघें उभीं होतीं. व तेव्हां ग्रॅशियानो यानें, बसॅनियो व पोर्शिया यांस उद्देशून, ह्मटलें:—' परमेश्वरानें आपणांस निरंतर आनंदींत ठेवावें अशी माझी त्याजपाशीं प्रार्थना आहे.' असें बोलून त्यानें पुढें ह्मटलें कीं, ' लग्न करावें अशी माझीहि इच्छा आहे. तरी तें याच वेळीं करून घेण्याची आपली परवानगी असावी.'

बसॅनियो संतोष दर्शउन उत्तर करतो:—' ठीक आहे, तूं म्हणतोस तसेंच करूं बरें, हें तुला अगदीं मनापासून सांगतों, पण कोणी बरीशी बायको मात्र मिळाली पाहिजे ' त्यावर ग्रॅशियानो ह्मणतो:—' आपल्या कृपेनें ती मिळाली आहे.' माझें मन बाईसाहेबांच्या या दासीवर बसलें आहे व हिनें लग्नाविषयीं मला वचनहि दिलें आहे. पण ही गोष्ट बाईसाहेबांच्या व आपल्या या मंगलकारक योगावर अवलंबून होती. मग पोर्शियेनें तिला विचारिलें ' कायग हें खरें का ? ' नेरिसेनें यावर मान डोलविली आणि ह्मणाली. ' होय बाईसाहेब, पण आपली मर्जी होईल तर ! ' या गोष्टीला पोर्शियेनें

आपली आनंदानें संमती दिली. तेव्हां बसॅनियो थट्टेनें म्हणाला ' तुमच्या लग्नानें खचीत आमच्या समारंभास मोठीच शोभा येईल.'

याप्रमाणें या जोडप्यांचा विनोद चालला असतां त्यांत जणों बिघाड पाडण्याकरितांच ह्मणून एक निरोप घेऊन कोणी मनुष्य तेथें आला. त्यानें ॲन्टोनियो याजकडून एक पत्र आणलें होतें व त्यांत दुःखकारक हकीकत दिलेली होती. हें पत्र वाचीत असतां बसॅनियो याचा चेहरा एकाएकीं इतका उतरला कीं, कोणा जिवलग मित्राच्या मृत्यूची खबर पत्रांत असावी असेंच पोर्शियेला वाटलें. मग, येवढें वाईट वाटण्याचें कारण तरी काय, अशी बातमी यांत काय आहे, ह्मणून तिनें विचारलें. तेव्हां तो ह्मणाला—'काय सांगू प्राणवल्लभे इतक्या अप्रिय शब्दांचा आजपर्यंत कोणत्याहि कागदाला डाग लागला नसेल ' प्रिये ज्या वेळीं, माझें तुझ्यावरील प्रेम मी तुला कळविलें, त्याच वेळीं मी तुला असेंहि कळविलें होतें कीं, मजपाशीं जी काय संपत्ति ह्मणून आहे, तें माझें थोर कुळशील; त्याच वेळीं तुला हेंही आणखी सांगावयास पाहिजे होतें कीं, मजपाशीं संपत्ती नाहीं तर नसो, पण उलट मला बरेंचसें कर्ज आहे. या पुढें त्यानें आणखी जी हकीकत सांगितली ती पूर्वीं येथें आलेलीच आहे. तिचा सारांश इतकाच कीं, बसॅनियो यानें आपला मित्र ॲन्टोनियो याजपा-

सून कर्जाऊ पैसा घेतला आहे व तेवढी रक्कम ॲन्टोनियो याच्या हाताशीं नव्हती ह्मणून त्यानें ती शायलॉक नांवाच्या यहुद्याकडून काढून त्याला दिली. पण त्याच वेळीं ॲन्टोनियो यानें सदरहू यहुद्यास एक कर्जरोखाहि लिहून दिला असून, त्यांत अमुक दिवशीं सदर रक्कम ॲन्टोनियो यानें जर परत केली नाहीं, तर यहुद्यानें त्याच्या अंगाचें अच्छेर मांस काढून घ्यावें. व तें ॲन्टोनियो यानें काढूं द्यावें. असें त्यानें लिहून दिलें आहे. वगैरे वगैरे हकीकत सांगितल्यावर बसॅनियो यानें ॲन्टोनियो याचें आलेलें पत्र वांचून दाखविलें तें येणेंप्रमाणें:—

> "प्रियमित्रा बसॅनियो, माझीं सर्व जहाजें समुद्रांत बुडालीं. त्या यहुद्याच्या करारनाम्याची मुदत टळून गेली आणि त्यांतील शर्तीप्रमाणें यहुद्यानें वागणूक केली तर मी जीवंत राहीन असें वाटत नाहीं. माझी शेवटची इच्छा तुला एकदां भेटावें अशी आहे; पण ती पुरी करणें किंवा न करणें हें सर्वस्वीं तुझ्यावर अवलंबून आहे. माझ्यावर जर तुझें प्रेम असलें व मला भेटावें असें तुला वाटत असलें तर मला येऊन भेट. केवळ पत्रच आलें आहे येवढ्याच करितां ह्मणून येण्याचें कारण नाहीं."

वरील मजकूर ऐकतांच पोर्शिया चपापली आणि आपल्या प्रियकराला ह्मणाली अहो, असें जर आहे तर सर्व कामें बाजूला ठेवा आणि आधीं निघण्याची त्वरा करा पाहूं? माझ्या प्रियकर बसॅनियोच्या निमित्तानें अशा दयाळू अंतःकरणाच्या मित्राच्या केंसालाही धक्का लागतां कामा नये. हें येथें सोनें आहे, कर्जाऊ

रकमेच्या वीसपट रक्कम देण्याला हें पुरेसें आहे. आणि अशा प्रकारें जर मी माझ्या प्रियकराला येवढा पैसा खर्चून आपलेंसें करीत आहें तर मी त्यांवर अत्यंत प्रेम ठेवून फार फार काळजीनें जपत जाईन. पण पोर्शिया ह्मणाली:—' आपण एकदां आपला लग्नविधि उरकून घेऊंया. ह्मणजे माझ्या पैशावर आपला हक्क पोंहचेल. मग आपण खुशाल जावें. मग त्या उभयतांचें त्याच दिवशीं लग्न झालें. आणि याच लग्नाबरोबर ग्रॅशियानो व नेरिसा यांचेंहि लग्न झालें. याप्रमाणें लग्नविधि उरकून घेतल्यावर बसॅनियो व ग्रॅशियानो हे मोठ्या त्वरेनें व्हेनिसनगराकडे निघून गेले. बसॅनियो तेथें जाऊन पोहोंचला. त्या वेळेस अॅन्टोनियो हा बंदिखान्यांत होता त्याला तो लगेच जाऊन भेटला.

मुदत टळून गेली असल्यामुळें जो पैसा देणेंसाठीं ह्मणून बसॅनियो यानें पुढें केला तो यहूदी घेईना. तो ह्मणूं लागला कीं, घेईन तर मी अॅन्टोनियोच्या अंगाचें अच्छेर मांस घेईन असा त्यानें हट्ट धरिला. शेवटीं शहारे उत्पन्न करणारा हा खटला व्हेनिसनगरच्या राजाकडे गेला व न्याय देण्याचा एक दिवस नेमण्यांत आला. इकडे न्याय काय मिळतो याविषयीं बसॅनियो याला मोठी चिंता पडली व तो मोठ्या कष्टानें चवकशीच्या दिवसाची वाट पहात राहिला.

बसॅनियो बेलमॉन्ट येथून निघाला त्यावेळीं पोर्शि-

येनें त्याशीं मोठ्या आनंदीत मुद्रेनें उत्तेजनपर भाषण केलें व ह्मणाली तुम्ही याल तेव्हां तुमचे मित्रालाही बरोबर घेऊन या. ती असें बोलली, तरी न जाणो यांत ॲन्टोनियो याच्या जिवाला धोका बसेल असें तिला वाटलें. मग बसॅनियो निघून गेल्यावर ती एकटीच राहिली असतां आपल्याशीं विचार करूं लागली. ती ह्मणाली:—'कोणत्या तरी उपायानें जर मला माझ्या प्रियकराच्या मित्राचा जीव वांचवितां येईल तर किती बरें होईल. असें कांहीं मला करितां येईल काय? असें ह्मणून आपल्या एकटीच्याच बुद्धिमत्तेच्या बळावर निश्चय करून, स्वतः व्हेनिस शहराला जावें आणि ॲन्टोनियो याच्या वतीनें भाषण करावें असें तिनें ठरविलें.

मग स्वतः पोर्शियेनें पुरुषाचा वेष घेतला आणि नेरिसेलाही तसाच वेष दिला. इतकें केल्यावर तिनें वकिलाचा एक झगा आणविला व तो घालून ती व्हेनिसनगराला जावयास निघाली व बरोबर कारकून ह्मणून नेरिसेला घेतली. ती व्हेनिसनगराला आली त्याच दिवशीं ॲन्टोनियो याच्या खटल्याचा न्याय व्हावयाचा होता. खटल्याची चौकशी व्हेनिस नगरच्या राजापुढें व त्याच्या मंत्र्यांपुढें चालली होती. अशा वेळीं या न्यायमंदिरांत पोर्शिया येऊन दाखल झाली. व तिनें बेलॅरिओ नांवाच्या एका विद्वान् व

विख्यात वकिलाकडून आणलेलें पत्र राजाचे हातीं दिलें. त्यांत त्या वकिलानें लिहिलें होतें कीं, 'अॅन्टोनियो याच्या तर्फेनें भाषण करण्याकरितां स्वत: मीच येणार होतों, पण माझ्या जिवाला बरें नसल्यामुळें मला येतां येत नाहीं याबद्दल क्षमा करावी. तथापि मी बाल्थेसर या नांवाच्या एका तरुण वकिलास हें पत्र देऊन पाठवीत आहें, त्यांना माझ्या ठिकाणीं काम करूं देणेंची कृपा करून परवानगी द्यावी.' ही गोष्ट राजानें मान्य केली. आणि या नवीन आलेल्या वकिलाची तरुणपणची टवटवी पाहून आश्चर्यानें त्याची फार तारीफ केली.

मग या महत्त्वाच्या खटल्याच्या चौकशीस सुरवात झाली.

जें कार्य पोर्शियेनें हातीं घेतलें होतें तें एवढें महत्वाचें होतें कीं, त्यामुळेंच तें नेटानें तडीस नेण्याचें धैर्य तिला प्राप्त झालें, व नेटानें तिनें आपल्या कामास सुरवात केली. पहिल्यानें ती शायलॉक यहूद्याकडे वळली व त्याला म्हणाली:—'शेठजी व्हेनिस नगरच्या कायद्याअन्वयें समजा तुम्हांला या रोख्यांत लिहिलेल्या अटीची अम्मलबजावणी करण्याचा हक्क पोंचत आहे. तरीपण दुसऱ्यावर दया करणें हें केवढें थोरपणाचें कृत्य आहे बरें! दया ही आकाशांतून सहजासहजीं पृथ्वीवर मंदमंद पडणाऱ्या पावसासारखी

आहे. दया करण्यांत दोन्हीं रीतींनीं कल्याणच आहे. जो कोणी दया करतो त्याचें कल्याण होतें आणि ज्याचेवर दया होते त्याचें कल्याण तर होतेंच होतें. दया ही श्रेष्ठाहून श्रेष्ठ आहे. शिरावर धारण केलेल्या मुकुटापेक्षांहि दयेच्या श्रेष्ठ भूषणानें मंडित असलेला सार्वभौम राजा फारच शोभतो. दया हा एक ईश्वरी गुण आहे. कोणत्याही कामांत न्यायाची आणि दयेची जर जोड झाली तर ऐहिक सत्ता ही परमेश्वरी सत्तेसारखी दिसूं लागते. म्हणून शेटजी, या गोष्टीचा नीट विचार करा. ईश्वरानें आपणावर दया करावी असें जर आपण इच्छितों तर मग आपण एकमेकांशीं वागतांना एकमेकांवर दया करावी असेंच सिद्ध होत नाहीं काय ?' यावर शायलॉक यहूद्यानें एवढेंच ह्मटलें, 'कायद्या-प्रमाणें माझा खराखरा काय तो न्याय व्हावा व मला हें करारपत्र पुरें करून मिळावें, एवढीच माझी इच्छा आहे. आणखी कांहीं नको.' मग तो ढळत नाहीं असें पाहून तिनें विचारलें:—'पण काय हो तुमचें कर्ज फेडण्याला याला ऐपत नाहीं काय ?' यावर बसॅनियो यानें एकदम उत्तर दिलें:—'हो, हो, आपल्या समक्षच सगळी किंबहुना तो ह्मणेल तेवढी रक्कम मोजतों.' परंतु शायलॉक यहूद्यानें 'ती मी घेत नाहीं' म्हणून साफ सांगितलें. आणि तो अॅन्टोनियो यांचें मांस घेण्याचाच हट्ट धरून बसला. तें पाहून बसॅनियो यानें

त्या तरुण वकिलाची विनवणी करून म्हटलें ' अॅन्टोनियो यांचा जीव वांचावा म्हणून कायदा अमळ बाजूस ठेवतां येणार नाहीं का, तथापि पोर्शियेनें गंभीर मुद्रेनें सांगितलें छे, छे, कायद्यानें एकदा ठरलें म्हणजे तें कधीं बदलावयाचें नाहीं. पोर्शियेचे हे शब्द ऐकून शायलॉक यहूद्याला वाटलें कीं, हा वकील आपल्या तर्फेनें आपल्याला हितकारक असें बोलत आहे. मग तेव्हां तो जोरानें म्हणाला:—' अहाहा! मला तर वाटतें आज हे येथें प्रत्यक्ष धर्मराज अवतरले आहेत. खरोखर आपली जितकी स्तुति करावी तितकी थोडीच. ' आपण सुज्ञ आहां, प्रत्यक्ष न्यायमूर्तीच आहां, आपल्या मुद्रेवरून तर आपण केवळ तरुण दिसतां पण ज्ञानानें व विचारानें आपण फार वृद्ध आहां ! '

नंतर पोर्शिया त्या यहूद्याला ह्मणाली तुमचा तो करारनामा कोठें आहे मला दाखवा पाहूं ? मग तो वाचून पाहिल्यावर ती पुन्हा ह्मणाली ' बः ह्याची मुदत तर टळून गेली आहे. आणि याच्या अन्वयें अॅन्टोनियो याच्या काळजा जवळचें मांस कापून घेण्याचा पूर्ण हक्क शायलॉक शेटजीला प्राप्त झाला आहे' मग ती यहूद्याकडे वळून ह्मणाली:—'शेटजी, तथापि दया करा आणि आणलेला पैसा घ्या. आणि हा कागद मला फाडून टाकूंद्या. ' परंतु त्या यहूद्याला तिळमात्र दया न येतां तो आपला मोठा थोरला सुरा अॅन्टोनियो

याच्या आंगाचें मांस कापून घेण्याकरितांह्मणून चपळतेनें व भराभरा पाजवूं लागला. तेव्हां पोर्शिया अँन्टोनियो यास ह्मणाली:—‘ काय हो यांत तुह्मांला कांहीं बोलावयाचें आहे ? ’ त्यावर शांतपणें व पूर्ण निराशेनें त्यानें सांगितलें ‘ मला कांहीं बोलावयाचें नाहीं. माझी मरण्याची तयारी आहे. ’ मग बसॅनियो याजकडे वळून तो ह्मणाला:-‘मित्रा तुझा हात इकडे कर पाहूं ? ठीक आहे ! तुमचा आमचा हाच शेवटला नमस्कार.’

या वेळीं शायलॉक केवळ उतावळा होऊन मोठ्यानें ह्मणाला:—‘ हें हो काय ? वेळ विनाकारण फुकट चालला, अहो, माझी आपणाला पार्थना आहे कीं, आपण काय तो एकदां निकाल देऊन टाका !

या वेळीं न्यायमंदिरांत जमलेले सर्व लोक उत्कंठेनें व भयानें केवळ जागचे जागीं स्तब्ध होऊन राहिले. ज्याच्या त्याच्या हृदयांत बिचाऱ्या अँन्टोनियोविषयीं कळवळा वाटूं लागला.

पुढें पोर्शियेनें यहूद्याला विचारलें:—‘ कायहो, मांस तोलण्यास कांहीं काटाबिटा आणला आहे काय ? ’ असें विचारून ती बजाऊन ह्मणाली ‘ ऐकलेंत काहो, अगोदर कोणीं वैद्य बोलावा नाहीं तर हा बिचारा अतिशय रक्तस्राव होऊन प्राणाला मुकेल. ’ पण शायलॉक यहूद्याचा मुख्य हेतु तर हाच होता कीं, अँन्टोनियो याचें मांस कापून घ्यावें व तो प्राणास मुकावा.

ह्मणून त्यानें उत्तर दिलें:-'असें नाहीं कोठें करारपत्रांत लिहिलेलें' पोर्शिया ह्मणाली:-'असें या करारपत्रांत नाहीं कोठें लिहिलेलें हें खरें आहे, पण नसलें लिहिलें ह्मणून काय झालें? तरी पण सदय मन करून तुह्मीं त्याच्यावर एवढी मेहेरबानी केली तर चालणार नाहीं काय?' हें सर्व ऐकून घेऊन यहूद्यानें एकच उत्तर दिलें 'असें लिलिलेलें मला यांत कोठें दिसत नाहीं, असें या करारपत्रांत नाहीं कोठें लिहिलेलें, तेव्हां पोर्शिया ह्मणाली 'मग काय तर ॲन्टोनियाच्या शरीराचें अच्छेर मांस तुमचें आहे, कायदा तें तुमचें ह्मणून ठरवीत आहे, आणि न्यायासन तें तुह्मांला देववीत आहे.' हें ऐकतांच शायलॉक हर्ष पावून मोठ्यानें ओरडून ह्मणाला:-'वाः वाः उत्तम! उत्तम आपण अगदीं योग्य न्याय केला. आज केवळ धर्मराजच न्याय करण्याला आले आहेत! असें पुनःपुनः ह्मणत त्यानें आपला मोठा थोरला सुरा पुनःपुनः झरझर पाजविण्यास सुरवात केली. आणि ॲन्टोनियोकडे मोठ्या उतावळीनें टवकारून पाहून ह्मणतो 'येरे असा पुढें ये.'

पोर्शिया म्हणाली:—'शेटजी, पण अमळ थांबा यांत आणखी कांहीं आहे. या कागदावरून पाहतां तुह्मांला त्याच्या रक्ताचा एक बिंदूही मिळत नाहीं. हें पहा यांत फक्त 'एक अच्छेर मांस' एवढेच शब्द आहेत. तर आतां तुह्माला त्याच्या शरीरांतलें फक्त

अच्छेर मांसच काय तें घ्यावयाचें समजलां ना? पण हें मांस कापून घेतांना त्याच्या ख्रिस्ती रक्ताचा जर एक थेंब खालीं पडला तर संभाळा बरें? या व्हेनिस नगरच्या कायद्या अन्वयें तुमचा जमीनजुमला, तुमची सर्व मालमत्ता ही या व्हेनिस संस्थानांत जमा केली जाईल. आतां रक्ताचा थेंब पाडल्याशिवाय मांस कापून घेतां येणें सरासरी अशक्यच असल्यामुळें शायलॉक याचा निरुपाय झाला. रोख्यांतील शब्दांवरून पाहतां यहूद्याला मांस मात्र कापून घेण्याचा हक्क आहे. रक्तावर त्याचा हक्क नाहीं. ही जी कोटी पोर्शियनें काढली ती फार मौजेची आहे व तीमुळेंच अॅन्टोनियो याच्या जिवाचें रक्षण झालें. सर्व लोक ह्या तरुण वकिलाच्या कुशाग्र बुद्धीची वाहवा करूं लागले. व खाशी युक्ती काढली असें ह्मणूं लागले. लोकांनीं ही जी प्रशंसा चालविली तिनें तें सगळें न्यायमंदिर दणाणून गेलें. याप्रमाणें एकच गोंधळ चालला असतां ग्रॅशियानो यहूद्याचेच शब्द पुन्हां मोठ्यानें उच्चारूं लागला ते हे:—‘वाहवा काय पण उत्तम न्यायाधीश आहेत.’ ऐकलेंसरे यहूद्या ‘आज प्रतिधर्मराज अवतरले आहेत!’

आपला दुष्ट हेतु सिद्धीस गेला नाहीं असें पाहतांच शायलॉक हा निराश होऊन ह्मणाला ‘बरें आहे, आतां मला पैसा तरी द्या’ अॅन्टोनियो याच्या प्राणावरील

संकट टळलें असें पाहून बसॅनियो याला पराकाष्ठेचा आनंद झाला तो एकदम ह्मणाला ' हा घ्या आपला पैसा, हा येथें आहे. ' पण त्याला थांबवून पोर्शिया म्हणाली:—' थांबा एवढी घाई नको, या यहूद्याला कांहीं एक मिळावयाचें नाहीं, उलट दंड मात्र होईल. तर आतां शायलॉक शेटजी, हं तयार व्हा, आपलें मांस कापून घ्या. पण संभाळा बरें रक्ताचा एक थेंबही पाडूं नका. इतकेंच केवळ नाहीं तर अच्छेर मासांत एक रेसभरही उणें अधिक काढूं नका. किंवा तोलांत एका केसाचाही फरक पाडूं नका. तसें होईल तर तुमचे प्राणावर येऊन बेतलीच म्हणून समजा. याशिवाय तुमच्या सर्व मालमत्तेची जप्ती होईल ती वेगळीच. ' यावर शायलॉक म्हणतो:–' माझा मला पैसा द्या. मी आपला जातो ' बसॅनियो ह्मणतो:–' हा येथें तयार आहे. ' शायलॉक हा बसॅनियो यानें पुढें केलेला पैसा घेऊं लागला. परंतु पोर्शिया पुन्हां ह्मणाली:–' शेटजी थांबा ' आपणांवर आणखी एक आरोप मला ठेवावयाचा आहे व्हेनिसनगरच्या कायद्यांत असें सांगितलें आहे कीं, कोणी परक्या मनुष्यानें व्हेनिसनगरच्या कोणाहि नागरिकाचा जीव घेण्याचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें यत्न केला असें कायद्यानें सिद्ध होईल तर तो एक भयंकर अपराध होईल. व त्या बद्दल त्या इसमाच्या मिळकतीचा व मालमत्तेचा अर्धा

भाग सदरहू नागरिकाला देववावा व बाकीची मालमत्ता संस्थानाकडे जप्त करावी. शिवाय अशा अपराध्यावर दया करून त्याला जिवंत ठेवणें न ठेवणें हें केवळ येथल्या महाराज सरकारच्या मर्जीवर अवलंबून राहील. तेव्हां आतां महाराज सरकारापुढें गुडघे टेका आणि त्यांची क्षमा मागा दुसरी गोष्ट नाहीं.'

तेव्हां राजेसाहेब ह्मणाले:—'शेटजी, आमच्या व तुह्मां यहूदी लोकांच्या स्वभावांत किती फरक आहे तो पाहिलात? असो. तुह्मी मागण्याचें आधींच आह्मीं तुह्माला क्षमा केली आहे. तुमच्या मिळकतीचा अर्धा भाग ॲन्टोनियो याला मिळावा व बाकीचा अर्धा भाग सरकारांत जप्त व्हावा. असें आह्मीं ठरवितों!'

यावर मोठ्या थोर मनानें ॲन्टोनियो ह्मणाला:—'याच्या मिळकतीचा जो अर्धा भाग मला मिळावयाचा तोहि मी याला सोडण्याला तयार आहें. मात्र यानें मरतेसमयीं आपली सर्व मालमिळकत आपल्या मुलीच्या व जांवयाच्या नांवानें करून द्यावी व अशाबद्दल यानें आतांचे आतां एक कागद लिहून दिला पाहिजे.' कारण ॲन्टोनियोस माहीत होतें कीं, ह्या यहूद्याला एकुलती एकच मुलगी आहे. व तिनें याची संमती न घेतां लोरेन्झो नांवाच्या एका ख्रिस्ती मनुष्याशीं लग्न केलें आहे. हा लोरेन्झो ॲन्टोनियो याचा मित्रच होता. या गोष्टीला यहूद्याची संमती नसल्यामुळें

त्यानें आपल्या मुलीला बेवारशी करून तिला कांहीं मिळूं नये असें ठरविलें होतें.

निरुपायानें हें ह्मणणें शायलॉक यहूद्याला कबूल करावें लागलें. त्याचे सूड घेण्याचे सर्व बेत फसले व संपत्तीचें सर्वस्वीं नुकसान झालें. मग असें पाहून तो ह्मणालाः—' मला बरें वाटत नाहीं. मी आपल्या घरीं जातों तुह्मी ह्मणतां तो कागद मागाहून माझे घरीं पाठवून द्या मी सही करून देतों. ' तेव्हां राजेसाहेब ह्मणालेः—' जा चालता हो, मागाहून सही करून दे आणि आपला दुष्टपणाचा जर तुला पश्चात्ताप होत असेल, आणि तूं जर ख्रिस्ती होशील तर आह्मी ह्मणतों:—दंडादाखल ह्मणून जी अर्धी मिळकत सरकारांत जप्त व्हावयाची तीही तुझ्याकडे राहूं देऊं!'

इतकें झाल्यावर राजेसाहेब व त्यांचें मंत्रीमंडळ उठलें व न्यायमंदिरांतून निघून गेले. पुढें बॅसॅनियो पोर्शियेला म्हणाला. ' महाराज आज आपण आपल्या केवळ विद्वत्तेच्या व आपल्या बुद्धिकौशल्याच्या बळावर माझ्या मित्रावर व मजवर आलेलें अरिष्ट दूर करून आम्हांला मोठ्याच संकटांतून मुक्त केलें यांत संशय नाहीं. आतां त्या यहूद्याला जी रक्कम द्यावयाची ती आम्हीं आपल्याला देतों तिचा आपण स्वीकार करावा. येवढीच आमची प्रार्थना आहे.' ह्यावर ॲन्टोनियो म्हणालाः—' प्रेमाच्या किंवा सेवेच्या मोबदल्यानें

आपले आम्हांवरील उपकार कधींही फिटणार नाहींत आम्हीं आपले निरंतरचेच ऋणबद्ध झालों आहों.'

बसॅनियो यानें शिकस्त केली पण पोर्शिया म्हणून तो पैसा घेईना. तथापि कांहीं तरी बक्षिस मागा म्हणून बसॅनियो यानें आग्रह केला तेव्हां ती म्हणाली:-" बरें आहे तर तुमचे ते तेवढे हातमोजे मला द्या बरें. तुमची आठवण म्हणून मी ते घालीत जाईन.' तत्काळ बसॅनियो यानें मोजे काढले. ते काढतांच, पोर्शियेनें त्याच्या बोटांत जी आंगठी घातली होती, ती तिच्या दृष्टीस पडली. तेव्हा ही आंगठी आपण त्याजपासून काढून घ्यावी असें त्या धूर्त स्त्रिनें मनांत आणलें. कारण कीं, ती मिळाली असतां, बसॅनियो याची फिरून गांठ पडल्यावर विनोदानें त्याची मजा करतां येईल, असें तिला वाटलें, मागून घेण्याचें कारण हेंच. मग आंगठीकडे पाहून ती म्हणाली:-' तुमचा जर लोभ आहे तर एवढी अंगठी मला द्यावी.' हें ऐकतांच बसॅनियो याला अत्यंत वाईट वाटलें. जी वस्तु आपणाला देतां येत नाहीं. तीच वकिलानें मागावी ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे, असें लक्षांत आणून तो गोंधळांत पडला. व तो म्हणाला:-' माझा निरुपाय आहे. मला ही देतां येत नाहीं. माझ्या बायकोनें ही मला दिलेली आहे व मी ती आपल्यापासून दूर करणार नाहीं, अशी शपथ घेतली आहे. तरी चिंता नाहीं. सर्व व्हेनिस शहरभर

दवंडी पिटवून अत्यंत मौल्यवान अंगठी कोणापाशीं आहे ही चवकशी करवितों असें भाषण ऐकतांच आपणांस मोठा राग आला असें पोर्शियेनें दर्शविलें आणि न्यायमंदिरांतून एकदम उठून चालती झाली. जातां जातां इतकेंच म्हणाली कीं, फार चांगलें! भिकाऱ्याला कसें उत्तर देतात हें आपण मला चांगलें शिकविलें !

मग ॲन्टोनियो बसॅनियोकडे वळून त्याला म्हणतो मित्रा 'जाऊंदे' आंगठी त्यांना दे. त्यांचे आपणांवरील अनंत उपकार स्मरून व मजवरील प्रेमाकडे लक्ष देऊन ही आंगठी त्यांना दिल्याबद्दल तुझी बायको तुला जें बोलेल तें बोलूंदे—तें तूं निमूटपणें ऐकून घे. बसॅनियो याला भीड तुटेना नाहीं ह्मणण्याची त्याला लाज वाटली. मग त्यानें ती आंगठी ग्रॅशियानो याजपाशीं दिली व पोर्शियेच्या पाठोपाठ त्याला पाठवून ती तिला नेऊन दे म्हणून सांगितलें. ग्रॅशियानो तिकडे गेला तो तेथें नेरिसा होतीच तिनेंहि त्याला एक आंगठी दिली होती. ती तिनेंहि त्याजपाशीं मागितली. आणि उदारपणांत आपणही आपल्या धन्याहून कांहीं कमी नाहीं असें दाखविण्याच्या बुद्धीनें, त्यानेंही ती तिला दिली. याप्रमाणें आंगठ्या हस्तगत होतांच त्या दोघी स्त्रिया एकमेकींशीं हंसून ह्मणूं लागल्या.—' ठीक आहे. आतां घरीं परत आल्यावर आह्मीं आपल्या पतीं-

ना धमकावून कसें पण नाचवून सोडूं! इतकेंच केवळ नाहीं. पण शपथांवर शपथा वाहून असेंहि ह्मणूं कीं, तुह्मी त्या आंगठ्या कोणा तरी स्त्रियांस दिल्या.

पुढें पोर्शिया व नेरिसा या बेल्मान्ट येथें पोंहचून आपल्या वाड्यांत गेल्या व आपापले नेहमींचे पोषाख करून यजमान केव्हां येतात याची वाट पाहत बसल्या. तेही लवकरच येऊन पोंहोंचले. त्यांजबरोबर ॲन्टोनियो हाहि होताच त्याजकडे बोट करून बसॅनियो पोर्शियेला ह्मणाला:—' हाच तो माझा मित्र ' तेव्हां पोर्शियेला मोठें कौतुक वाटलें व तिनें बहुत प्रकारें त्याचा आदरसत्कार केला व मोठ्या अरिष्टांतून सुटलां आम्हांला मोठा आनंद झाला. असें तिनें पुनः पुनः ह्मणून, त्याचें अभिनंदन केलें. त्याचवेळीं, तिकडे एका कोपऱ्यांत ग्रॅशियानो व नेरिसा यांची कांहीं धुसपुस चालली आहे असें दिसून आलें. तेव्हां पोर्शिया म्हणाली ' काय इतक्यांतच धुसपुस! आहे तरी काय ' ग्रॅशियानो यानें सांगितलें बाई साहेब दुसरी कांहीं नाहीं. हिनें कोठलीशी एक मुलामा देऊन चकचकीत केलेली आंगठी मला दिली होती. तिच्यावर कांहीं ओळी कोरल्या होत्या. चाकूबिकूवर असतातना ?—' माझेवर प्रेम ठेवा आणि मला कधीं टाकून देऊं नका ' अशाच अर्थाच्या कांहीं!'

त्यावर नेरिसा ह्मणालीः–‘ तिजवर कांहीं लिहिलेलें असो ! त्यांत काय आहे ! तसेंच तिची कांहीं किंमत असो किंवा नसो, त्याशीं काय करावयाचें आहे ! पण जेव्हां मी ती तुह्मांस दिली तेव्हां शपथ वाहून तुह्मीं सांगितलें कीं मी हिला मरेतोंपर्यंत विसरणार नाहीं ’ आणि आतां तुह्मीं मला सांगतां कीं ती मीं वकिलाच्या कारकुनाला दिली. मला आहे ठाऊक ‘ तुह्मी ती कोणा-तरी स्त्रीला दिली आहे. ’ यावर ग्रॅशियानो यानें हात पुढें करून ह्मटलें:–‘ नाहीं ग मी ती या हातानेंच एका तरुण मनुष्याला दिली. खरें ह्मटलें तर तो सरासरी मुलगासाच होता. अगदीं पहा तुझ्या एवढाच, तुझ्या-हून कांहीं मोठा नसेल. ज्यानें ॲन्टोनियो शेटजींना आपल्या उत्कृष्ट भाषणानें अरिष्टांतून सोडविलें त्याच वकिलाचा तो कारकून होता. या मुलानेंच फी ह्मणून ती मजपाशीं मागितली आणि मला कांहीं नाहीं ह्मण-वेना. मोठ्या जिवावर आलें. ’ तेव्हां पोर्शिया त्याला ह्मणालीः–‘ खरेंच ही तुह्मीं मोठी चूक केली. बायकोनें दिलेली पहिलीच देणगी तुह्मीं अशा रीतीनें टाकून दिलीत हें कांहीं चांगलें केलें नाहीं. मीही यांना (बसॅनियो यांस) अशीच एक अंगठी दिली आहे. आणि माझी पक्की खात्री आहे कीं, कांहीं होवो ते ती आपल्या हातची कधीं जाऊं देणार नाहींत. ’ आपला गुन्हा कमी होईल. अशा बुद्धीनें, ग्रॅशियानो यानें लगेच हें

सांगितलें कीं, आमच्या बसॅनियो महाराजांनीं तर आपली अंगठी त्या वकिलाला दिली. मग मी दिली ह्मणून काय झालं ! मी तरी त्या वकिलाच्या कारकुनालाच दिली. त्यानें लिहिण्यामधें फार मेहनत घेतली होती.

हें भाषण ऐकतांच पोर्शियेला फार राग आला असं दिसलं; आणि माझी आंगठी तुह्मी दुसऱ्याला कां ह्मणून दिली असें ह्मणून ती बसॅनियो याला टोंचून बोलूं लागली. ती आणखी ह्मणालीः–' यांत खरी गोष्ट काय ती नेरिसेनेच मला मघांशीच सुचविली. मी साफ सांगते ती अंगठी कोणा स्त्रीशिवाय कोठें गेली नाहीं. अशा प्रकारें आपल्या प्रिय पत्नीचा अपराध आपले हातून घडला हें पाहून बसॅनियो याजला फार फार वाईट वाटलें. आणि तो निक्षून ह्मणालाः—' ती अंगठी कोणाही स्त्रीला दिलेली नाहीं. मी शपथ वाहून सांगतों, ती मी खचित एका विद्वान वकीलाला दिली. मी त्याला तीन हजार रुपये देत होतों, ते न घेतां त्यानें अंगठीच मागितली ' खरी गोष्ट अशी आहे. मी नाहीं म्हटलें तेव्हां तो फार नाखुष झालासा दिसला. मग मी काय बरं करावं ? नाहीं ह्मटल असत तर माझ्या माथीं कृतघ्नपणाचा दोष आला नसता ? मला तर त्याची पराकाष्ठेची शरम वाटूं लागली. शेवटीं निरुपाय होऊन मागाहून ती अंगठी त्याजकडे पाठविणें मला भाग झालें. तेव्हां, हे माझे प्राणवल्लभे ! आतां मजवर क्षमा कर.

आणखी काय ह्मणूं ? तूं जर त्या वेळीं तेथें असतीस तर तूंच ती अंगठी मजपासून घेऊन त्या थोर वकिलाला दिली असतीस.'

त्यांची ही बोलाचाली चाललेली पाहून ॲन्टोनियो ह्मणाला:—' अरेरे एकूण ह्या त्रासदायक भांडणाला मीच कारण झालोंना ? '

त्यांस पोर्शियेनें सांगितलें:—' ह्या भांडणामुळें तुह्मी कष्टी होऊं नका कारण आमचं कांहीं असलं तरी तुह्मी आमचे पाहुणे आहां, आणि तुह्मी अगदीं स्वस्थ मनानें असा.' त्यावर ॲन्टोनियो ह्मणाला:—' मी माझ्या मित्रासाठीं एकदां मी आपला देह खर्चीं घातला होता. आणि ज्याला आपले यजमानानीं अंगठी दिली तो जर नसता तर मी या वेळीं जिवंत असतो कीं नाहीं याची शंकाच होती. तर आतां मी फिरून आपले यजमान आपलें वचन मोडणार नाहींत अशी हमी घेतों, व त्यासाठीं मी माझ्या जिवाची जामिनकी देतों.' त्यावर पोर्शिया ह्मणाली:—मग काय ह्मणतां ? ' आपण यांना जामीन राहतां ? ' ठीक आहे. आतां ही अंगठी त्यांना द्या, आणि जपून ठेवा, पूर्वीं सारखी गमावूं नका म्हणून, बजावून सांगा.

बसॅनियो यानें त्या अंगठीकडे न्याहाळून पाहिलें, तेव्हां तो चकीत झाला. आणि ह्मणाला:—'मी जी देऊन टाकली ती हीच!' मग पोर्शिनेनें सर्व हकीकत खुलासे-

वार त्याला सांगितली. ती म्हणालीः—' ते तुमचे तरुण वकील ते कोण ?—मीच. आणि नेरिसा हीच तो माझा कारकून. ' हें ऐकून त्याला जो आनंद झाला व जें आश्चर्य वाटलें त्याचें वर्णन करतां येत नाहीं. एकंदरींत, आपल्या मित्राचा जीव वाचला तो केवळ आपल्या स्त्रीच्या चातुर्यामुळेंच वाचला, तसेंच तिनें जें काम केलें, तेही मोठ्या हिमतीचें केलें यांत शंका नाहीं. असें पाहून सर्वांस आनंद झाला.

मग पुन्हां पोर्शियेनें ॲन्टोनियो यांस बहुमानपूर्वक या बसा ह्मटलें. आणि त्याच्या हातीं कांहीं पत्रें दिलीं. आणि सांगितलें कीं, कांहीं चमत्कारिक रीतीनें हीं माझ्या हातीं आलीं आहेत. या पत्रांत ॲन्टोनियो याची जीं जहाजें बुडालीं ह्मणून खबर आली होती तीं बुडालीं नसून, सुखरूपपणें बंदरांत येऊन पोहोंचलीं आहेत. असा मजकूर होता. अशा रीतीनें व्हेनिस नगरच्या या श्रीमान व्यापाऱ्याला आरंभीं जें संकट प्राप्त झालें त्याचें निवारण होऊन शेवटीं सुख प्राप्त झालें. तें असें प्राप्त होईल असें कोणालाहि वाटलें नव्हतें. यामुळें त्या दुःखाचा सर्वांना लवकरच विसर पडला. आणि आतां तर करमणुकीखातर आणि अंगठ्यांच्या गोष्टी पुन्हां सांगून व नवऱ्यांना आपआपल्या

बायका देखील ओळखतां येत नाहींत असे पुन्हां पुन्हां टोमणे मारून हंसण्याची व हंसविण्याची वेळ आली. मग आमचे गमतीदार ग्रॅशियानों यानें पुढील कवितावद्ध गाणें ह्मटलें:—

श्लोक (चामर)

मला असे प्रिया, तिनें दिली सुवर्ण आंगुठी,
जगांत हेंच मागतों, कधीं नहो हिची तुटी।
अधीक काय सांगुमी—पडो कधीं न विस्मृतिः
जरी घडेल अन्यथा, तरी बरीच हो मृति ॥ १ ॥

# व्हेनिस नगरचा व्यापारी

अर्थात्

## मर्चंट आफ व्हेनिस.



ग्रेशियानो—लक्षांत ठेवा !—जितका पैशाचा हव्यास अधिक, तितका निराशेचा मात्र संभव. कायरे ही दशा तुझी !

व्हेनिस नगरचा व्यापारी अंक १, पृष्ठ. ६.

# व्हेनिस नगरचा व्यापारी.

## या नाटकांतील पात्रें.

### पुरुष वर्ग.

| | |
|---|---|
| ॲन्टोनियो ............ | व्हेनिस नगरांतलि एक प्रसिद्ध व्यापारी. |
| बसॅनियो ............... | ॲन्टोनियो याचा मित्र. |
| सॅलॅनियो, सॅलॅरिनो, ग्रॅसियानो ......... | त्यांचे उभयतांचे मित्र. |
| लोरेन्झो ................ | बसॅनियो याचा मित्र व जेसिकेला पळवून नेणारा. |
| शॉयलॉक ............... | प्रसिद्ध यहुदी सावकार. |
| टयूबॉल ................ | एक यहुदी गृहस्थ, शॉयलॉक याचा मित्र. |
| लॅन्सलाट गोबो .......... | विदूषकाचें कार्य करणारा एक आडाणी मनुष्य. |
| म्हातारा गोबो .......... | त्याचा बाप. |
| राजा .................. | व्हेनिस नगरचा डयूक (राजा) |
| मोरोक्कोचा राजपुत्र, अरॅगॉनचा राजपुत्र ... | पोर्शियेच्या विवाहेच्छेनें मागणी घालण्यास आलेले राजपुत्र |
| लियोनारडो ............ | बसॅनियो याचा नोकर. |

बॅलथेसर }
स्टिफनो } .........पोर्शियेच्या वाड्यांतील नोकर.

## स्त्री वर्ग.

पोर्शिया ...............एक श्रीमान् स्त्री.

नेरिसा ...............तिची दासी.

जेसिका ...............शायलॉक यहुद्याची मुलगी.

याशिवाय न्यायमंदिरांतील अधिकारी, बंदिखान्यावरील मुख्य, त्याचे बंदिपाल व इतर चाकर नोकर, कोर्टांत जमलेले लोक वगैरे.

स्थळ—प्रथम व्हेनिसनगर. मध्यंतरी बेलमान्ट येथें व फिरून व्हेनिसनगर.

# व्हेनिस नगरचा व्यापारी.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

**स्थळ—राजरस्ता.**

[ अन्टोनियो, सॅलॅरिनो, व सोलानियो येतात. ]

**अन्टोनियो**—खरेंच बुवा ! आज जिवाला कां चैन नाहीं, कांहीं कळत नाहीं. मला तर बुवा अगदीं त्रास आला आहे; आणि तूं ह्मणतोस, तुलाहि आला आहे; नव्हे ? पण, हें आहे काय लचांड ?—हें मागें लागलें कोठून ?—हें आलें कसें ?—हें उद्भवलें कशामुळें ? याचा कांहीं उलगडा पडेल तर बरें ! ह्या खिन्नतेनें मला असें गुंगवून टाकिलें आहे, कीं माझी काय स्थिति आहे तिचा माझा मलाच पत्ता नाहीं.

**सॅलॅरिनो**—मी सांगू ? समुद्रांत तुझीं तीं गलबतें आहेतना ?—त्यांजबरोबर तुझें मन लाटांवर हेलकावे खात आहे; दुसरें कांहीं नाहीं. आपले ते शेठिये आणि ते बनिये, बाजारांतून डुलत, डुलत व दुतर्फा लोकांचे मुजरे घेत, घेत, कसे जातात ?—तशींच तुझीं तीं गलबतें, त्यांचीं तीं अवजड व बोजड अवजारें पंखांप्रमाणें फडकावीत, आणि होडग्यांनी पडावें नी मचवे यांच्या गर्दीतून डुलत, डुलत, बंदरांत जात असतील, नाहीं बरें ?—अहाहा ! सागराचा हा परिवार त्या वेळीं त्याला फारच शोभा देत असेल !

**सॅलॅनियो**—( अन्टोनियोचा हात धरून ) खरें आहे; तुझ्याप्रमाणें माझीं तारवें, मालानें भरून जर दूरदेशीं गेलीं असतीं, तर माझा सारा जीव तुजप्रमाणेंच त्यांजबरोबर तरंगत राहिला असता. खोटें नाहीं सांगत, मीं तर दहा वेळां गवत हवेंत फेंकून, वारा कोणत्या दिशेनें वहात आहे हें पाहिलें असतें; सतरा वेळां नकाशे ताणले असते; आणि त्यांत बंदरें कुठें आहेत, खडक कुठें आहेत, मार्ग कुठें कसे जातात, हें सारें, वारंवार, डोळे लावून पाहिलें असतें. सारांश, तारवांना काडीइतका तरी धक्का पोंचतो आहे, अशी निशाणी जर दिसून येती, तर माझा जीव अशा वेळीं गर्भगळित झाल्यावांचून राहिला असता काय ?

**सॅलॅरिनो**--कसा राहाता हो ? मी जर सकाळचे प्रहरीं चहा प्यायला बसलों आणि तो निवावा म्हणून त्याला फुंकर घालूं लागलों, तर समुद्रांत गलबतांची काय दशा वाऱ्यानें उडविली असेल, हें क्षणोक्षणीं मनांत येऊन, माझें तर पोटांत अशा स्थितींत धडकी भरेल; घड्याळांतील वाळू गळतांना पाहिली तर समुद्रांतले लाग व वाळूचे ढीग माझे डोळ्यां-समोर उभे राहतील; आणि आमची महागिरी त्यांत रुतली आहे, व शिडाचा शेंडा नमवून, ढुंगण वर करून, त्या वालुकेश्वराच्या पायां पडत आहे, असेंच मनांत येईल. देवळास गेलों आणि त्याचे ते चिरे पाहिले, ह्मणजे समुद्रांतल्या त्या घातकी खडकांची, मला खचित खचित आठवण होईल; आणि माझीं तीं गरीब बिचारीं गलबतें आतां त्यांवर आपटणार, आणि त्यांतील सगळा हरत-ऱ्हेचा माल समुद्रास्तृप्यंतु होणार, आणि बहुमोल शाली, नी शालू, नी पैठण्या सोसावणाऱ्या त्या दांडग्या लाटा पांघरणार, अशी भीति मला खचित उत्पन्न होईल. अशी स्थिति एकंदरीनें असल्या-मुळें क्षणांत पहावें, तों आपण लक्षाधीश आणि क्षणांत भिक्षाधीश, असें कोणास बरें वाटणार नाहीं ? आणि म्हणूनच, या गोष्टींचा विचार करायला को-णाची बरें छाती होईल ? आणि छाती केली, तरी वाईट वाटल्यावांचून कसें बरें राहील ? या गोष्टी

सांगायाला का पाहिजेत ?—अगदीं उघड्या आहेत. आणि यामुळेंच, ह्याच्या जिवाला आपल्या मालाची चिंता वाटत असली तर त्यांत काय नवल आहे ?

**अन्टोनियो**—छे, छे ! तसें कांहीं नाहीं. आणि तसें कांहीं नाहीं, हें माझें दैवच. माझें एकच का गलबत आहे?—किती तरी आहेत, आणि तींहि किती तरी बंदरांत पडलीं आहेत याशिवाय, आणखी माझी किती तरी जिंदगी आहे. मी कांहीं यंदांच्याच उत्पन्नावर बसलों नाहीं. फार तर, एक सालचें उत्पन्न नाहीं आलें. त्यांत काय ? येवढ्यासाठीं ह्मणजे मी रडत बसेन असें नको समजूं.

**सॅलॅरिनो**—तर मग काय बुवा ? स्वारीचें मन कोठें प्रेमपाशांत गुंतलें कीं काय ?

**अन्टोनियो**--चल, चल ! हारे काय चहाटळपणा !

**सॅलॅरिनो**—प्रेमपाशांतहि नाहीं ? तर मग, तूं खुषींत नाहींस म्हणून उदास आहेस असेंच ह्मणावें, दुसरें काय ? कारण तूं जर उदास नसतास ह्मणजे खुषींत असतास, तर हंसण्याला, बोलण्याचालण्याला, उडण्याबागडण्याला कांहीं कमी केलें नसतेंस; खरें कीं नाहीं ? पण काय चमत्कार आहे ! चतुर्मुख ब्रह्मदेवानें जी चतुर्विध सृष्टि उत्पन्न केली आहे, तींत कांहींजण पहावे, तों ते पोपटांसारखे, गारोड्याची पुंगी ऐकूनच, नाचूं उडूं लागतात; आणि कांहींजण असे दुर्मुखलेले असतात, कीं केवढीहि हंसण्याजोगी मौज असो, ते म्हणून आपले ओठ कधीं

हालवतील, किंवा तोंड प्रफुल्लित करतील, अशी शंका मनांत देखील आणूं नये !

( बसॅनियो, लोरेन्झो व ग्रॅशियानो येतात. )

**सॅलॅनियो**—हा पहा बसॅनियो आला, हा तुझ्या आप्तांपैकींच आहे; आणि हा ग्रॅशियानो; आणि हा लोरेन्झो ! बरें आहे; घेतों आह्मी आतां आपली रजा. आमच्याहून चांगले सोबती मिळाले; हे घ्या !

**सॅलॅरिनो**—मी तर तुला नाचायला लावल्याशिवाय येथून हाललोंच नसतों ! पण आतां आमच्याहून चांगली चांगली मंडळी येथें मिळाली आहेत, तेव्हां त्यांजकडेच हें काम सोंपवावें हें बरें.

**अन्टोनियो**—छे, छे ! असें म्हणूं नकोस. माझ्या मतें, या कामीं तुझी सर कोणालाहि येणार नाहीं. तुझेंच कांहीं कामकाज असेल, म्हणून तूं ही शक्कल काढलीस; कोठून तरी तारी कापून जाण्याचा तुझा विचार दिसतो; मी समजलों.

**सॅलॅरिनो**—यावें रावसाहेब, यावें.

**बसॅनियो**—नमस्कार, यावें, यावें ! आपली जोडी चालली वाटतें ? ( सॅलॅरिनो याजकडे वळून ) आतां फिरून आपली कधीं भेट ? आणि आतां कधीं हंसवायाचें ? कधीं—कधीं बरें सांगा ? अलीकडे तूं फारच चमत्कारिक झाला आहेस. कितिका दिवसांत गांठ नाहीं. ही काय, रीत झाली ?

**सॅलॅरिनो**—एक दिवस, खरेंच बुवा, वेळांत वेळ काढून आपणास भेटायाला येऊं.—आलें पाहिजे, करतां काय ?

[ सॅलॅरिनो व सोलानियो जातात. ]

**लोरेन्झो**—( बसॅनियो यास ) रावसाहेब, अन्टोनियोची व आपली गांठ पडली आहे, तर आह्मी दोघे आतां आपली रजा घेतों. पण जेवणाचे वेळेला आपणाला कुठें जायाचें आहे तें लक्षांत आहेना ?

**बसॅनियो**—हो, हो, लक्षांत आहे तर.

**ग्रॅशियानो**—( अन्टोनियो यास ) काय रावसाहेब, तुमचें तोंड तर अगदीं उतरलेलें दिसतें, बुवा ! अलीकडे पहातों तों आपण जगांतल्या व्यवहाराखालीं फारच चुरून गेलेले दिसतां. पण ध्यानांत ठेवा बरं. जितकी जितकी पैशाची हाव अधिक, तितकी तितकी निराशा होण्याचा संभव अधिक, कायरे ही दशा तुझी !

**अन्टोनियो**—हें पहा, जोंपर्यंत जगांत रहावयाचें आहे, तोंपर्यंत जगाप्रमाणें चालणें भाग आहे. खरें ह्मटलें तर, जग ही एक रंगभूमि आहे. येथें ज्यानें त्यानें आपआपली भूमिका बरोबर वठविली पाहिजे. त्यांत माझ्या वांटणीला दुःखाची आली आहे !

**ग्रॅशियानो**—आणि माझ्या वांटणीला विदूषकाची आली आहे. मी नेहमीं ह्मणतों—आमचे दिवस हंसण्या खेळण्यांतच जाऊं द्या, बुवा ! दुखानें कुढत बसून, छाती फोडून घेणें आम्हाला नको. खचित सांगतों—दारू पिऊन काळीज करपून गेलेलें पुरवलें. पण चांगल्या धट्याकट्या तरुणांनीं, आजोबांचें सोंग घेऊन, जागचे जागीं बसून रहावें यांत काय अर्थ ? जागसूद असून निजल्यासारखें पडावें, आणि तिरसटपणा

करून डोकें तापवून घ्यावें, याला काय म्हणावें? मी सांगूं काय तें?—मित्रा, तुजवर माझा भारी लोभ आहे, आणि हा लोभच मला बोलवीत आहे; समजलास?—खचित सांगतों, जगांत अशीं कांहीं माणसें आहेत, कीं त्यांच्या मुद्रेवरून पाहतां, डबक्यांतल्या कोंडल्या पाण्यावर तवंग येतोना?—त्याचीच आठवण होते. हीं माणसें शांततेचा व गंभीरपणाचा मोठा डौल घालितात. यांत त्यांचा हेतु येवढाच असतो कीं, आपण मोठे शहाणे, पोक्त, गंभीर, धूर्त असें लोकांनीं ह्मणावें! जणों काय, हे कोणी मोठे आचार्य होत. आणि यांचे ओठ हालले ह्मणजे कोणी ब्र सुद्धां पुढें काढूं नये! अरे बाबा, अशा मंडळीला मी पुरा ओळखतों. हे अगोदर मुळीं बोलायाचेच नाहींत, आणि बोलत नाहींत ह्मणूनच शाहण्यांत मोडूं पहातात! पण बोलत नाहींत हेंहि एके अर्थीं बरेंच—' मौनं सर्वार्थसाधनम्. ' कारण, जर बोलतील तर ऐकणारे तत्काळ त्यांना मूर्खांत काढतील.—पण जाऊं दे; अतांच नको सगळें; पुनः केव्हां तरी सांगेन. पण आधीं ही तुझी गंभीरपणाची मुद्रा सोडून दे, पाहूं? लोकांकडून असें ह्मणवून घेण्यासाठीं हें बगळ्याचें सोंग कशाला? चल, ( लोरेन्झो ह्याचा हात धरून ) येतोसना? सध्यां आह्मी घेतों रजा. जेवण झाल्यावर मग चालवूं पुनः आमचें हें पुराण.

**लोरेन्झो**—बरें बुवा, जेवण होईतोंपर्यंत आह्मीहि आपले घेतों कशी रजा. आह्मी तरी आपले, यानें

आतां ह्मटलेल्या शांतस्वभावी शहाण्यांपैकींच बन-
लों आहों. कारण, हे पुराणिकबुवा आह्माला
बोलायला वेळ देतील तर किं नाहीं ?

**ग्रॅशियानो**—वेळ मिळाला नाहीं तर फार चांगलें, तूं पहिल्या प्रतीचा शहाणा होशील. माझ्या सहवासाला आणखी एक दोन वर्षें रहा, ह्मणजे तुझ्याच तोंडचे शब्द तुला कधीं ऐकायाला मिळायाचे नाहींत; आणि ऐकिलेस तर म्हणशील–' हे कोणाचे हो शब्द ? ' इतकी तूं आपल्या शब्दाची ओळख विसरशील.

**अन्टोनियो**--बरें आहे बुवा, या तर तुझा असा उपदेशच आहे, तर मी आपला आजपासून सपाटून बोलत जाईन.

[ ग्रॅशियानो व लोरेन्झो हे जातात. ]

**ग्रॅशियानो**—असें झालें तर आपली मोठी कृपाच झाली ह्मणावयाची. कारण, ज्याचे तोंडचें पाणी पळालें त्यानें, किंवा गिऱ्हाइकी नसलेल्या बाजारबसवीनें, पाहिजे तर तोंड मिटून बसावें.

**अन्टोनियो**—या बोलण्यांत कांहीं अर्थ आहे ?

**बसॅनियो**--जाऊं देरे; ग्रॅशियानो तो; वाटेल तें बोलेल ! त्याच्या इतका बहुभाष साऱ्या शहरांत कोणी नाहीं मिळायाचा. खंडीभर बोलण्यांतून चार दाणे हाताला लागतील तर शपथ. सारा दिवसभर, तो काय बोलला ह्मणून विचार करीत बसलों, तरी कांहीं कळायाचें नाहीं; आणि कळलें तरी त्यांत कांहीं अर्थ असायाचा नाहीं.

**अन्टोनियो**—बरें, तें राहूं दे सध्यां. पण तूं जिची मनधरणी चालविली आहेस ती कोण? तिचें नांव आज सांगेन ह्मणून कबूल केलें होतेंस.

**बसॅनियो**—मित्रा, तुला ठाऊकच आहे; माझी जिंदगी होती कितीक, व आतां उरली आहे कितीक. पण तिचा परिचय वाढावा ह्मणून आजपर्यंत मी मोठे-पणा दाखविण्याचा डौल घातला व शक्तीबाहेर किती तरी पैसा खराब केला. अशा खर्चीकपणानें माझा बहुतेक पैसा उडाला; इतकेंच नाहीं, पण बरेंचसें आणखीं कर्ज होऊन बसलें. असो; याचेंहि मला फारसें वाईट वाटत नाहीं. आतां काळजी लागली आहे ती हीच, कीं तरुणपणच्या धुंदींत केलेलें हें कर्ज फेडावें कसें? खरें सांगूं मित्रा? पैसा आणि ममता या दोहोंच्याहि संबंधानें, तुझें ऋण माझ्या डोक्यावर आजपर्यंत पुष्कळच झालें आहे. इतकेंहि असून, आणखी माझे पुढील बेतहि सिद्धीस नेण्यांत, माझी सारी भिस्त तुझ्या ह्या ममतेवरच आहे, मजलास? पण हे माझे बेत जर नीटपणें सिद्धीस गेले, तर कर्ज काय, हं हं ह्मणतां फिटेल, हें मी खचीत सांगतों.

**अन्टोनियो**—तुझे जे काय बेत आहेत, ते सांगेनास का मला एकदां? त्यांत जर कांहीं दूषणीय नसलें— आणि तूं करशील त्यांत तसें कांहीं नसायचेंच, तर माझा पैसा आणि जें कांहीं माझें ह्मणून आहे, तें

सर्व तुझें ह्मणून समज. फार काय सांगूं?—माझा हा सगळा देह तुझे कार्याला अर्पण केला आहे, आतां तर झालें?

**बसॅनियो**—हे तुझे केवढे उपकार ह्मणून सांगूं? पण मित्रा, लहानपणची एक गोष्ट तुला सांगतों. आह्मी जेव्हां तीरकमठ्यानें खेळत असूं, तेव्हां सोडलेला तीर कोठें पडला ती जागा शोधून काढण्यासाठीं, आह्मी तेवढ्याच जोरानें आणि त्याच दिशेनें दुसरा तीर मारीत असूं. मग सहजच हा दुसरा व पहिला असे दोनहि तीर एकेच ठिकाणीं बहुधा सांपडत; हा त्या वेळचा अनुभव, या प्रकरणांत या वेळीं, घेऊन पहाण्याचा माझा बेत आहे. कारण, जसा पहिला तीर खात्रीनें सांपडावयाचाच, तशी ही माझी शिकारहि आपोआप माझ्या हातीं लागावी असें आहे. यांत शंकेला फारशी जागा नाहीं. आतां तुझे तर मजवर अनंत उपकार आहेतच. आणि हा वेळपर्यंत तूं जे उपकार केलेस, ते मीं, एखाद्या छांदिष्ट मुलांप्रमाणें फुकट घालविले हेंहि खरेंच आहे. परंतु मी असें विचारतों, कीं जसा पहिला तीर एकदां मारलास, तसा त्याच धोरणानें आणखी एकदां मारशील काय? पहा बुवा! काय होतें तें मी लक्ष देऊन पहात राहतों—माझी तर खात्री आहे—यांत आपले दोन्ही नेम साधतील; निदान हा दुसरा तरी फसणार नाहीं हें खचीत.

आणि या वेळीं गेलेला तरी तुझा पैसा विनधोक परत येईल. मग, फार तर तुझ्या पूर्वींच्या उपकारांचेंच काय तें ऋण मजवर राहील. आणि त्याचाहि विचार पुढें मागें पाहतां येईल.

**अन्टोनियो**—माझा स्वभाव तुला ठाऊकच आहे; मग परिक्षा पाहण्यासाठीं, हें रिकामकें गुऱ्हाळ लावून, वेळ कां घालवितोस? आणि तुला खोटें सांगत नाहीं. मजपाशीं जें कांहीं आहे नाहीं, तें सर्व जरी तूं उडविलेंस, तरी त्याचें मला काडीइतकें वाईट वाटणार नाहीं. पण अमुक करशील का? तमुक देशील का? असा संशय तूं घेतोस, हें पाहून मात्र मला अतिशय वाईट वाटतें!—मग मी काय करूं ह्मणतोस? माझ्या हातून काय होईलसें तुला वाटतें? तसें कांहीं असलें तर सांग, ह्मणजे करतों, मजकडून उशीर नाहीं. हं, बोल.

**बसॉनियो**—सांगू तर?—बेलमान्ट येथें कोणी एक स्त्री आहे; ती मोठी श्रीमंत आहे, मोठी धूर्त आहे, आणि स्वरूपानें तर सर्वोत्कृष्टच आहे. फार काय सांगू?—मोठ्या आख्येच्या रूपवती स्त्रिया सुद्धां तिजवरून केवळ ओंवाळून टाकाव्या अशी आहे. आणि इतकेंहि असून, गुणांनीं व लक्षणांनींहि चांगली आहे. माझें तर मन तिजवर बसलें आहेच आणि मजवर आपला लोभ असल्याचें तिनेंहि

पुष्कळ वेळां मला नेत्रानें कळविलें आहे. तिचें नांव पोर्शिया. रोमच्या इतिहासांत केटोची मुलगी व ब्रूटसची स्त्री जी पोर्शिया, जिच्या गुणांचे व स्वरूपाचे येवढे पोवाडे गाइलेले आपण ऐकतों, तिला देखील हिची सर नाहीं. हिची ख्याति जगभर पसरली असून, हिच्या अभिलाषानें देशोदेशच्या श्रीमंत तरुण विलासी जनांच्या झुंडीच्या झुंडी नित्य हिजकडे येत आहेत. अहाहा ! हिचा केशकलाप तरी किती मनोहर !--जणों मोराचा रत्नमय पिसाराच ! अरे मित्रा, इतरांप्रमाणें मला जर द्रव्यबल या वेळीं चांगलेंसें असतें, तर हिच्या प्राप्तीची इच्छा मलाहि धरतां आली असती. मला पूर्ण भरंवसा आहे, यत्न केला तर मला खचित तिची प्राप्ति होऊन, जन्माचा मी कृतार्थ होईन.

**अन्टोनियो**--बाबारे ! माझें ह्मणून जें कांहीं आहे, तें सारें या क्षणीं समुद्रांत आहे; तें बाहेर येईल आणि हातीं लागेल तेव्हां आपलें. तोंवर तुला देण्याला मजपाशीं पैसा नाहीं, आणि मालावर पैसा काढूं ह्मटलें तर मालहि नाहीं. यासाठीं मी ह्मणतों, शहरांत चार ठिकाणीं चौकशी कर, आणि माझ्या नांवावर जर कोणी रक्कम देत असला तर पहा. तुझ्यासाठीं माझी पत खर्चीं घालायाला मी मागें पुढें पाहणार नाहीं.

मग खुशाल वेळूमंटला जा, आणि इच्छेप्रमाणें पोर्शियेला मागणी घाल. तर जा जा, चार ठिकाणीं प्रयत्न कर. मीहि त्याच तजविजींत आहे. अमुक ठिकाणीं रकम आहे आणि ती मिळण्याजोगी आहे असें असे असलें, तर मला सांग माझ्या पतीवर मिळो अथवा माझ्या नांवावर मिळो; ती काढण्यास मी मागें पुढें पहाणार नाहीं.

( दोघे जातात. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थळ**:—पोर्शियेच्या वाड्यांतील एक दालन.

( पोर्शिया व नेरिसा प्रवेश करितात. )

**पोर्शिया**—खरें सांगू, नेरिसे, मला किनई या अवाढव्य जगाचा भारी कंटाळा आला आहे.

**नेरिसा**—बाईसाहेब, कां बरें? आपणाला कोणत्याही गोष्टीची वाण नाहीं, आणि दुःख कसें तें माहीत नाहीं, मग असें कां ह्मणतां? श्रीमंतांची जर अशी रड; तर मग असेंच ह्मटलें पाहिजे कीं, आपली मध्यम स्थितीच बरी; कारण श्रीमंतीमध्यें वृद्धावस्था लौकर प्राप्त होते. पण मध्यम स्थितीं-

तले लोक पहावे, तर ते दीर्घकाळ सुखानें नांदतात.

**पोर्शिया**—अगदीं, अगदीं, खरें बोललीस. तुझें हें सुभाषित किनई फार गोड आहे.

**नेरिसा**—पण त्याकडे कान दिला तर सारा उपयोग.

**पोर्शिया**—मी तरी तेंच ह्मणतें; बरें काय आणि वाईट काय, हें समजणें वेगळें, आणि त्याप्रमाणें वागणें हें वेगळें. ह्या दोन्ही गोष्टी जर सारख्याच सोप्या असत्या, तर मग एवढें पाहिजे होतें कशाला ? अग देवळांरावळांच्या ऐवजीं जिकडे तिकडे आजला मोठमोठीं भव्य देवालयेंच झळकलीं असतीं; आणि गरिबांच्या झोंपड्या तरी कशाला दृष्टीस पडत्या ? त्यांच्या ठिकाणीं चोहोंकडे शोभिवंत राजवाडेच थाटलेले दिसले नसते का ? जो कोणी बोलतो, तसा वागतो तोच धर्मोपदेशक थोर. ऐकलेंस ? चांगलें काय आणि वाईट काय हें मला सुद्धां पुष्कळांना सांगतां येईल, परंतु तसें वागण्याचीच पाळी आली तर मला स्वतः तरी तसें वागतां येईल कीं नाहीं कोण जाणें ! मनुष्यानें कसें वागावें याबद्दलचे नियम मनानें हवे तसे ठरवावे. पण शांतपणीं व शांत मनानें केलेले हे नियम तापट वृत्ति टिकूं देईल तेव्हां कीं नाहीं ? खरें ह्मटलें तर, तरुण मनुष्यें हीं ससाप्रमाणें अवि-

चारी होत. ते ससे जसे सैरावैरा धांवूं पहातात तसे हे ससेही धांवूं पहातात; तेव्हां ह्यांना आंवरून धरण्याकरितां अनुभवी पोक्त मनुष्यांनीं सदुपदेशाचें जें जाळें ह्यांच्या सभोंवतीं पसरलें असतें, त्याला न जुमानतां त्यांवरून हे उड्या मारमारून केव्हां पार निसटून जातात, तें कळत सुद्धा नाहीं! हें सारें ठीक आहे; पण माझ्या स्वयंवराच्या कामांत ह्या विचारसरणीचा काय उपयोग? [ निःश्वास टाकून ] हाः हाः हा स्वयंवर शब्द किती तरी गोड आहे! पण ज्याचा मला मनापासून तिटकारा अशाला नको ह्मणण्याचें किंवा ज्याच्यावर माझें मन बसलें आहे अशाला वरण्याचें माझ्या हातीं कोठें आहे? काय सांगूं ग! इहलोक सोडून गेलेल्या माझ्या वडिलांच्या इच्छेनें इहलोकीं वास करीत असलेल्या, या त्यांच्या कन्येच्या इच्छेला, अशा रीतीनें बंधन पडलें आहे, याला काय करावें? अशा स्थितींत, खरेंच सांग नेरिसे, माझ्या मनाजोगा वर मिळणें कठीण नाहीं का?

**नेरिसा**—बाईसाहेब, आपले वडील अत्यंत धर्मनिष्ठ होते; आणि अशा महान् साधूंना अंतकाळीं ज्या वासना होतात त्या ईश्वरी प्रेरणेनेंच होतात यांत

कांहीं संशय नाहीं. ह्मणून ह्मणतें* तुमच्या स्वयंवराच्या कामीं सोनें, रुपें आणि शिसें या तीन धातूंच्या केलेल्या तीन करंडकांची जी योजना त्यांनीं केली आहे, ती योग्यच आहे. आणि या तिन्हींतून त्यांनीं निश्चित केलेला करंडक भलतासलता कोणी निवडून काढील असें होणार नाहीं, तें असो. पण

---

* हाच विचार महाकवि कालीदास यानेंही एके टिकाणीं प्रगट केला आहे. तो येथें दाखल करण्यासारखा आहे. ताडून पहातां यावें म्हणून मूळ येथें देतोः--

"Your father was ever virtuous; and holy men at their death have good inspirations: therefore the lottery, that he hath devised in these three chests of gold, silver and lead, whereof who chooses his meaning chooses you, will no doubt, never be chosen by any rightly but one who shall rightly love."

याशीं पुढील श्लोक ताडून पहा.

असंशयं क्षत्र-परिग्रह-क्षमा
यदेव मस्याम मभिलाषि मे मनः ।
सतां हि सन्देहपदेषु वस्तुषु
प्रमाणमंतःकरणप्रवृत्तयः ।

शाकुंतल अंक १

याचें भाषांतर परशुरामतात्या गडबोले यांनीं केलें आहे तें असें:--

माझें विशुद्ध मन लोभुनि हीस पाहे
क्षत्रास यावरुनही उपभोग्य आहे ।
होतो जयाविषयिं संशय सज्जनांतें
तेथें प्रमाण धरितातचि ते मनातें.

आज आपल्या येथें पाणिग्रहणाच्या निमित्तानें हे जे वैभवशाली गृहस्थ आले आहेत, त्यांजविषयीं तुमच्या मनांत कसकसें प्रेम आहे, हें मला सांगाल का ?

**पोर्शिया**—बरें, सांगतें. तर मग तूं त्यांचीं नांवें बोलत जा, ह्मणजे मी त्यांचें वर्णन करितें, त्यावरून माझा आशय तुला कळेल.

**नेरिसा**—पहिला तो **नेपल्सचा राजपुत्र.**

**पोर्शिया**—अं: तो काय !—केवळ एखाद्या उनाड तट्टासारखा आहे, झालें. कारण, तो किनई घोड्याच्या गोष्टीवांचून कधीं अक्षरही तोंडावाटे काढीत नाहीं. फार काय सांगूं ?—आपल्या घोड्याची नालबंदी मीच करितों असें ज्याला त्याला सांगण्यांतच त्याला मोठें भूषण वाटतें.

**नेरिसा**—बरें, दुसरा तो **काउंट पॅलेटाईन.**

**पोर्शिया**—हे तर एक तिरसिंगरावच ! तो ह्मणणार 'काय; मी तुला नको ?—तर, जाउंदे ! मला तरी काय तुझी पर्वा आहे ?' त्याच्याशीं तुह्मीं कितीहि गमतीच्या गोष्टी बोला, ही स्वारी ह्मणून कधीं, हंसत मुख दाखवावयाची नाहीं. जे राजश्री आपल्या तरुणपणीं इतके उदासीन ते ह्मातारपणीं चिरचिरे बनून रडत बसणार आणि शेवटीं त्यांना रडतराव ह्मणण्याची पाळी येणार हें निःसंशय आहे. खोटें नव्हे,—मी ह्मणतें माझें प्रत्यक्ष मृत्यूशीं लग्न झालें

तरी पुरवलें, पण ह्या दोघांपैकीं एकाशींहि प्रसंग नको ! देवा ! नकोरे बाबा असा प्रसंग आणूं !

**नेरिसा**---बरें, त्या तुमच्या फ्रेंच जहागीरदाराविषयीं काय ह्मणतां ?

**पोर्शिया**---ह्मणणार काय ? आहे हरीचा लाल, झालें; आणखी काय ? बाईग मी समजतें, विना-कारण कोणाच्याही कुचेष्टा करणें हें पाप आहे पण, ह्याची पहावी तों सर्वांवर ताण ! घोड्यांच्या बाबतींत नेपल्सकराला याची सर नाहीं येणार. आणि **पॅलेटाइन** जहागीरदारावरही याची वरचढ. खरें ह्मटलें तर, याला काय मनुष्य ह्मणावा ? तरी पण, प्रत्येक मनुष्याचे गुण याच्यांत खुशाल पाहून घ्यावेत ! बाई ! बाई ! कोण याची चटपट ! क्षण-भरहि एके ठिकाणीं ठरायचा नाहीं. मैना गाऊं लागली, तर हा मोर त्या तालावर थै थै नाचूं लागायचा ! काम नसलें तर हा आपल्या सांवली-शींच हात नाचवून, झटापट करीत बसावयाचा ! मी जर याच्याशीं लग्न लावलें, तर जाणो, दहा जणाशीं लग्न लावलें, असें मला होऊन जाईल ! खोटें नाहीं सांगत, त्यानें जर मला नाकारलें तर मी त्याच्या दहांदा पायां पडेन. कारण पहा, तो जर मजवर प्रीति करतों ह्मणेल, तर ती इतकी करील कीं, तितकी उलट माझ्यानें कांहीं त्याजवर

करवणार नाहीं. खचीत, मी तर बाई, त्याच्या प्रीतिखालीं दडपून जाईन एखादी ! मी त्याला कोठवर पुरी पडूं !

**नेरिसा**——बरें, आतां इंग्लंड देशचा तरुण जहागीरदार **फॉकनब्रिज** याजविषयीं तुह्मी कायसें बोललां होतां तें काय बरें ?

**पोर्शिया**——माझें त्याचें बोलणेंच मुळीं झालें नाहीं, यावरून काय तें समज. अग बोलणार कसें ? त्याला माझें बोलणें कळेना आणि त्याचें मला कळेना. बापड्याला लॅटीन येत नाहीं, फ्रेंच येत नाहीं, इटालियन येत नाहीं. आणि तुला ठाउकच आहे कीं, मला इंग्रजीचें अक्षरहि माहीत नाहीं. बाकी आहे दिसण्यांत बरा. पण आपला मूकस्तंभ, फार काय सांगूं बाई ! अशा मुक्या पुतळ्याशीं बोलावें तरी कसें आणि काय, हेंच मला कळत नाहीं. बिचाऱ्याचा पोषाख तरी किती विचित्र ! त्याच्या अंगांत पोषाख आहेना ?—त्यापैकीं निरनिराळे कपडे त्यानें निरनिराळ्या ठिकाणाहून पैदा केलेले दिसतात. त्याचें तें आवळ जाकीट इटली मधून, ती आंखूड तुमान फ्रान्स मधून, डोक्याची टोपी जर्मनीमधून, आणि वागणूक ठिकठिकाणाहून त्यानें संपादन केली कीं काय, असें वाटतें.

**नेरिसा**—बरें, पण त्याचा शेजारी तो स्कॉटलंड देशचा जहागीरदार आहे त्याच्याविषयीं तुमचें काय ह्मणणें आहे ?

**पोर्शिया**—तो ना ?—आहे मला ठाऊक. खचित त्याला शेजारधर्म फार चांगला कळतो. कारण, याचा शेजारी एक इंग्रज गृहस्थ आहे, त्याच्यापासून याला एकदां एक थप्पड मिळाली; ती परत कशी द्यावी, या विचारांत तो नेहमीं चूर आहे; ह्मणतो काय ?—'जरासें सामर्थ्य येऊं द्या, कीं पहा याची ठेव याला सव्याज कशी परत करतों तो !' मला वाटतें तो फ्रेंच गृहस्थ आहेना ?—त्यालाही अशीच चापट इंग्रजाकडून मिळाली आहे. आणि तोहि याला नेहमीं ह्मणत असतो कीं, 'इंग्रजाच्या या कर्जाची फेड अवश्य केली पाहिजे. तुह्मी आह्मीं मिळून करूं बरें का !'

**नेरिसा**—तें असो, पण बाईसाहेब, सॅक्सनीच्या जहागीरदाराचा पुतण्या तो तरुण जर्मन गृहस्थ आपल्याला कितपत आवडतो बरें ?

**पोर्शिया**—बाईग, सकाळचे प्रहरीं तो शुद्धीवर असला ह्मणजे तो अगदींच द्वाड. आणि संध्याकाळीं दारू पिऊन तर्र झाला ह्मणजे तर मग काय अगदीं कमाल ! स्वारी खुषींत असली ह्मणजे मनुष्य तर खरा पण थोडासा पशूसारखा. पण, एक-

दाकां तव्यत गेली कीं निव्वळ पशूच ! ह्मणून ह्मणतें वाटेल तें अरीष्ट मजवर ओढवलें तरी मी ह्मणून त्याचें नांव घेणार नाहीं.

**नेरिसा**—ह्मणजे?—आपण आपल्या वडिलांची आज्ञा मोडणार कीं काय? ते करंडक तो दाखवा ह्मणाला आणि निवड करतांना, निवडायाचा त्याच करंडकावर त्यानें बोट ठेविलें; तर मग आपण त्याला नाहीं ह्मणणार?

**पोर्शिया**—ह्मणूनच बाई, काय होतें कोण जाणें, ही मला धास्ती पडली आहे. यासाठीं असें कर, सर्वोत्कृष्ट मद्याचे ग्लास भरून भलत्याच करंडकावर ठेऊन दे, ह्मणजे त्याजवरच त्याचें लक्ष लागेल आणि ज्या करंडकावर तूं तो ठेवशील तोच तो निवडील, मी खचीत सांगते. मद्यासाठीं तो इतका तान्हेला आहे कीं, कांहीं पुसूं नये. कोठें थेंब कां दृष्टीस पडेना,—त्यानें घेतलाच चोखून! मी नाहीं ग बाई अशा टीपकागदाशीं लग्न लावावयाची!

**नेरिसा**—अहो पण थांबा. एवढ्या घाबरतां कां? या सर्वांचे विचार मला आधींच कळून चुकले आहेत; करंडक निवडण्याच्या समारंभापर्यंत ते येथें राहताहेत कोठें? ते तर उद्यांच जातों ह्मणताहेत घरोघर. करंडक निवडून काढण्याचा आपल्या

लग्नाचा पण आपल्या वडिलांनीं लावून ठेविला आहे, तो त्यांतून कोणालाहि पसंत नाहीं. ते ह्मणतात दुसरा कोणताहि पण करा, चालेल. हे करंडक निवडण्याच्या भानगडींत कोणीं पडावें ? ऐकलेंत ?

**पोर्शिया**—नका पडूं ह्मणावें. बाबांच्या इच्छेप्रमाणें पण जिंकणारा कोणी निघाला तर ठीकच आहे; नाहीं तर, कितीही मोठी वाढलें, किंबहुना, ह्मातारी झालें, तरी मी आपली अविवाहितच राहीन. आणि निष्पाप, निर्मळ आचरणांत आयुष्य घालवीन, सांगून ठेवतें तुला. सध्यां मी इतकाच आनंद मानतें कीं, हे आलेले गृहस्थ निघून जाताहेत. मी ह्मणतें हे खरेच फार शहाणे. कारण अमक्यानें रहावें असा यांत कोणीहि मला दिसत नाहीं. त्यांनीं खुशाल आपापले मार्ग सुधारावे. परमेश्वरा, बिचाऱ्यांना सुखरूप घरोघर जाऊंदे बरें, हीच माझी तुला प्रार्थना आहे.

**नेरिसा**—पण बाईसाहेब, वडील जिवंत असतां तुमचे येथें ते एक जहागीरदार येत असत तें आपणाला आठवतें का ? आणि त्यांच्याच बरोबर व्हेनिस नगरचा एक गृहस्थहि येत असे, तो मोठा चतुर व बाणेदार दिसला नाहीं बरें ?

**पोर्शिया**—हो, हो, बरी आठवण केलीस, **बसॅनियो** ह्मणून एक गृहस्थ येत असत खरे; आणि मला

वाटते त्यांचें नांव मीं आतां ह्मटलें तेंच आहे नव्हे का ?

**नेरिसा**—शाबास बाई आपली ! एवढें सुद्धां आठवतें ना ! माझ्यासारख्या वेडगळ स्त्रीला त्यांत काय समजतें आहे ह्मणा. पण हें पहा बाईसाहेब, आजपर्यंत मीं पुष्कळ पुरुष पाहिले. पण त्यांत त्यांच्यासारखा देखणा व चतुर पुरुष कोणीहि माझे पाहण्यांत आला नाहीं; त्याला तशीच कोणी स्त्री मिळेल तर किती बरें होईल !

**पोर्शिया**—तूं ह्मणतेस, ते खोटें नाहीं. तसेच ते आहेत. मला चांगलें आठवतें.

( एक चाकर प्रवेश करितो. )

**पोर्शिया**—कायरे, काय खबर आणली आहेस ?

**नोकर**—बाईसाहेब ते चौघेजण पाहुणे आले आहेत ना ?—ते आपला निरोप घेण्यासाठीं येतों ह्मणून विचारता आहेत. आणि मोरोक्को देशचे महाराजांकडून सूचनेसाठीं दूत आला आहे, तो ह्मणतो महाराजांची स्वारी आज रात्रीं भेटीला येणार आहे.

**पोर्शिया**—कशालारे बाबा ? या चौघांची भेट घेण्याची माझी छाती तरी होत आहे, पण त्या पांचव्याचें दर्शनही नको. कोण तो त्याचा काळे ढुस्सपणा ! आतां हे सिद्धीमहाराज बाहेरून जरी काळेकुट्ट असले, तरी अंतःकरणानें महान साधु व परम सज्जन आहेत, असें जर मला

कोणी सांगेल, तर मी आपली या गुरुमहाराजांना ह्मणेन–' महाराज लग्नाची गांठ बांधण्यासाठीं शेला पुढें न करतां तुह्मी मला आपला चेलाच कराना बरें! आणि मजवर जी गुरुकृपा करावयाची ती एवढीच कृपा करा कीं लग्नाचा नाद सोडून द्या, आणखी मी कांहीं मागत नाहीं. गडे नेरिसे चला, आपण आपल्या येथून जाऊं. ( नोकरास ) तूं हो रे पुढें. कोण मेला त्रास हा ! एकाला दिली जाण्याची मुभा, तर दुसरा दाराशीं दत्त ह्मणून उभा !

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळः**–व्हेनिस शहरांतील एक रस्ता.

( शायलॉक व बसॅनियो प्रवेश करितात. )

**शायलॉक**—किती ? तीन हजार ? मग–?

**बसॅनियोः**–होय शेठसाहेब, आणखी ते तीन महिन्यांच्या मुदतीनें.

**शायलॉक**—तीन महिने ?–मग ?

**बसॅनियो**—आणि मी पहिल्यानेंच सांगितलें आहे कीं रक्कम द्यायाची, ती **अंटोनियो** याच्या नांवावर.

**शायलॉक**—काय ह्मणालांत; ॲन्टोनियो याच्या नांवावर ?–मग ?

**बसॅनियो**—मग काय? एवढी मदत कराल काय? मोठी मेहेरबानी होईल. बोला, काय सांगतां?

**शायलॉक**—तीन हजार रुपये,—तीन महिन्यांची मुदत,–आणि **अन्टोनियो**याच्या नांवावर.–मग?

**बसॅनियो**—हो, पण यावर उत्तर काय?

**शायलॉक**—वाः! **अन्टोनियो** फार भला मनुष्य आहे!

**बसॅनियो**—कां बरें? त्याच्या पतीविषयीं शंका घेण्यासारखें आपण कांहीं ऐकलें आहे कीं काय?

**शायलॉक**—छे हो! छे! छे! **अन्टोनियो** चांगला मनुष्य आहे, त्याचा अर्थ, मी ह्मणतों, तो ऐपतदार आहे. तरी सुद्धां हें पहा–त्याची सारी दौलत व्यापारांत गुंतलेली आहे. त्याचें एक गलबत तुर्कस्थानांत गेलें आहे, दुसरें एक अमेरिकेकडे, आणि माझ्या हिशोबीं, एक इंग्लंडदेशाकडे, आणि एक हिंदुस्थानाकडे, याशिवाय आणखी पुष्कळ पसारा ठीकठिकाणीं पसरला आहे. अहो, पण कांहीं झालें तरी गलबतें हीं लांकडें होत, आणि खलाशी हीं माणसें होत.–हो! काय नेम सांगतां?–जमिनीवर उंदीर आहेत तसे पाण्यांतही आहेत; जमिनीवर चोर आहेत, तसे समुद्रावरहि आहेत, ह्मणजे मी ह्मणतों, चांचे आहेत; याशिवाय आणखी खडक आहेत, वादळें आहेत, अशीं शेकडों संकटें आहेत,

तीं वेगळींच!—तरी पण गृहस्थ सच्चा. कांहीं चिंता नाहीं. तीन हजार रुपये—नव्हे का? चिंता नाहीं. ते रोखा लिहून देतील काय?

**बसॅनियो**—हो, हो, खचित् लिहून देतील.

**शायलॉक**—तसें केलें ह्मणजे बरें, मग मला कशाचीही धास्ती नाहीं; आणि या बाबतींत कांहीं अडचण पडूं नये ह्मणून काय करावें याच विचारांत मी आहें. बरें, यासंबंधानें **अन्टोनियो** साहेबांची व माझी समक्ष गांठ पडेल काय हो एकदां?

**बसॅनियो**—तुमची मर्जी असेल तर आज रात्रीं तुह्मींच आमच्याकडे जेवायला यांना बरें?

**शायलॉक**—खासें! तुमच्या येथें मी जेवायला येऊं?—कशालाहो? तेथें डुकरांच्या मांसाची घाण घ्यायला? छे! छे!! मी तुमच्याशीं देवघेव करीन, तुमच्यापाशीं बोलेन चालेन, आणि दुसरा कोणताहि व्यवहार करीन; पण तुमच्या बरोबर जेवायला, दारू प्यायला, किंवा ईश्वराची प्रार्थना करावयाला कधींही येणार नाहीं. बरें तें असूं द्या. पण कायहो! बाजारची काय खबर आहे?

(अन्टोनियो प्रवेश करितो.)

**बसॅनियो**—हा पहा माझा मित्र **अन्टोनियोच** इकडे आला.

**शायलॉक**--( आपणाशीं ) कसा गुलाम मानभावी दिसतो पहा! मी तर याला शत्रु समजतों. कारण हा जातीनें ख्रिस्ती आहे, इतकेंच केवळ नाहीं, पण हा आमचें अनेक प्रकारें नुकसान करतो; स्वतः संभावितपणाचा मोठा डौल घालतो; आणि मोठा धार्मिक ह्मणवितो; आणि लोकांना बिनव्याजी पैसे देतो.-- गुलामानें व्हेनिस नगरांत आमचा व्याजाचा दर किंहो अगदीं बसवून टाकला ! एकदां जर कां ही स्वारी माझ्या तावडींत सांपडेल, तर कसें पण मी मागचें उट्टें काढीन !-अरे आमच्या पुराण्या पवित्र जातीची निंदा करतोस, नाहीं ? -भर बाजारांत ज्या ठिकाणीं व्यापारी लोक जमावयाचे त्या ठिकाणीं सर्वांसमक्ष आमची अब्रू घेतोस, नाहीं ?-आमच्या व्यवहाराची टर उडवितोस, नाहीं ?-आह्मी मेहनत करून कष्टानें पैसा मिळवितों त्याला 'व्याज, व्याज' ह्मणून आमच्या नांवानें खडे फोडून आमची निंदा करतोस, नाहीं ?-जर मी याला या वेळीं क्षमा केली तर 'धिःकार असो माझ्या जातीला !'

**बसॅनियो**--शेटजी, मी काय ह्मणालों तें ऐकलें ?

**शायलॉक**--आज माझ्या जवळ रोकड किती आहे याचा मी आपल्या मनाशीं अंदाज करीत होतों. पण अजमास पाहतां तीन हजारांची रक्कम आजच

मला देतां येईल असें बिलकुल वाटत नाहीं.–अं:, पण चिंता नाहीं. त्याचें काय एवढें? आमच्या जातीचा एक मोठा धनाढ्य सावकार आहे त्याचे कडून मला एवढी रक्कम सहज आणतां येईल. पण थांबा–ही रक्कम तुह्मांस किती महिन्यांच्या मुदतीनें पाहिजे ह्मणतां? (अन्टोनियाकडे वळून) या हो या, शेटजी, ईश्वर आपलें कल्याण करो. आपलीच गोष्ट आतां निघाली होती.

**अन्टोनियो**—शायलॉक शेटजी, मी जरी कोणास कर्ज देत नाहीं किंवा कोणाकडून घेत नाहीं, आणि कदाचित् असा व्यवहार केला तरी त्यावर व्याज घेण्याचा किंवा देण्याचा माझा परिपाठ नाहीं; परंतु माझ्या मित्राला रकमेची आतांच्या आतांच फार निकड आहे, ह्यासाठीं हा माझा परिपाठ मी मोडतों (बसॅनियोकडे पाहून) काय? यांना रक्कम मिळाली? काय हो? तुह्मांला किती पाहिजे आहे?

**शायलॉक**—हो, हो, हें त्यांनीं मला मघांशींच सांगितलें, यांना तीन हजार पाहिजेत.

**अन्टोनियो**—आणि ते तीन महिन्यांच्या मुदतीनें, होय ना?

**शायलॉक**—अगदींच विसरलों, तीन महिन्यांची मुदत, असेंच तुह्मीं ह्मणालां नाहीं काय? ठीक आहे

द्या कर्जरोखा लिहून. पण काय ह्मणतों ऐकलें? दिलेल्या किंवा घेतलेल्या रकमेवर तुह्मीं व्याज घेत नाहीं, किंवा देत नाहीं, खरें ना? असेंच तुह्मीं कांहींसें ह्मणालां नाहीं बरें?

**अन्टोनियो**—हो, हो, मग नाहींच तसें करीत.

**शायलॉक**—अहो, ऐकलें? जेव्हां जेकब हा आपल्या चुलत्याचीं मेंढरें चारूं लागला, तेव्हां—तुमचें देव भलें करो,—हा जेकब, त्या आपल्या पवित्र वडलांमागून तिसऱ्या हिश्शाचा धनी झाला. आणि ही सारी खटपट त्याच्या शहाण्या आईनें केली; आणि त्या खटपटीचें हें सारें फळ बरें.—हो, हो, अगदीं बरोबर.—तिसरा जिंदगीचा मालक.

**अन्टोनियो**—बरें, असेल. पण आपल्या व्यवहाराशीं त्याचा काय संबंध; तो व्याजबीज घेत असे कीं काय?

**शायलॉक**—छे, छे, तो व्याज घेत नसे हो! तुह्मीं जसें समजतां तसेंच अगदीं प्रत्यक्ष व्याज घेत नसे. जेकब काय करी तें नीट लक्षांत आणा. जेकबानें व त्याच्या चुलत्यानें असें ठरविलें कीं, जेकबानें मेंढ्या चाराव्या व त्यांना जीं काळीं बांडीं पिलें होतील तीं चारणबिद्दल त्यानें घ्यावीं. पुढें—देव तुमचें भलें करो.—शरदृतु आला, शेळ्या गाभण राहूं लागल्या, तेव्हां त्या कुशल मेंढपाळानें काय केलें,

आलें का लक्षांत ?—कांहीं वनस्पती गोळा करून आणल्या आणि त्या, त्या शेवाळलेल्या मेंढ्यांच्या दृष्टींसमोर बांधून ठेवल्या. ह्या योगानें त्यांना जीं पिलें झालीं ती काळीं बांडी झालीं. आणि ठरावा-प्रमाणें जेकबाच्या वांटणीस आलीं.

**अन्टोनियो**--अहो, यांत काय आहे; ही त्यानें एक युक्ति करून पाहिली. केवळ नशिबाची गोष्ट. असेंच व्हावें, हें त्याचे हातचें थोडेंच होतें? देवा-ची करणी ह्मणून तसें झालें इतकेंच. तुह्मीं ही जी जेकबाची गोष्ट सांगितली ती व्याजबट्टा करणें चांगलें असें दाखविण्याकरितां सांगितली वाटतें? पण तुमचें तें सोनें आणि रुपें ह्या काय शेळ्या मेंढ्या आहेत ?

**शायलॉक**--तें काय हें नाहीं मला सांगतां येत. पण आम्हीं आमच्या सोन्यारुप्याला तसेंच व्यायाला लावतों. ह्मणजे मी ह्मणतो त्यांचेपासून तसेंच उत्पन्न काढीत असतों. हें बरीक खरें. तरी पण राजश्री लक्षांत असूं द्या मी काय ह्मणतों तें--

**अन्टोनियो**--[ बसॅनियोकडे वळून ] खोटें नाहीं सांगत मित्रा ! कामापुरतें ब्रह्मज्ञान सैतानालाही सुचतें.—पाप्यानें धर्मशास्त्राचीं वचनें आपल्या कृत्याच्या समर्थनार्थ पुढें आणिलीं, ह्मणजे पोटांत लबाडी सांठवून ठेवून हसरें तोंड दाखविणाऱ्या

सोद्याची आठवण होते. आंतून कुजलेलें आणि बाहेरून सुंदर दिसणारें जसें फळ, तसाच हा प्रकार समजावा. अरेरे ! लुच्चेगिरीला असें सुंदर सोंग घेतां यावें हें फार वाईट नव्हे का ?

**शायलॉक**—मग काय ह्मणतां ? तीन हजार ? रक्कम तर भारी आहे. आणखी मुदत किती बारा महि-न्यांतले तीन महिने; मग त्याला व्याज काय ?

**अन्टोनियो**—[ त्रासून ] काय बुवा, आह्माला रक्कम देण्याची मेहेरबानी करावयाची आहे का ?

**शायलॉक**—अहो राजश्री, सराफकट्यांत आपली गांठ पडली असतां आपण माझ्या व्याजबट्या-बद्दल व माझ्या पैक्याबद्दल किती वेळां वेरें निंदा केली आहे ? पण मी तुह्माला कधीं काहीं बोललों तरी ? आपण जें जें बोललां तें सर्व निमूटपणें सोसून घेतलें आणि 'जाऊं द्या,' असें ह्मणून स्वस्थ वसलों. कारण सहनशीलता हें आमच्या जातीचें ब्रीदच आहे. अहो आठवण आहे का ? तुह्मी मला नेहमीं काय ह्मणतां ? तूं पाखंडी आहेस, गळेकापू आहेस, कुत्र्यासारखा लघाळ आहेस; इतकें बोलूनच थांबत नाहीं, पण आणखीं माझ्या पायघोळ आंगर-ख्यावर सपशेल थुंकतां ! हें सारें कां ?—तर मी माझ्या मालकीच्या पैशाची देवघेव करतों ह्मणून. ठीक आहे, मला वाटतें तुह्मांला त्या माझ्या पैशाची या

वेळीं गरज आहे; पण जा. मला तरी ही पंचायत कशाला पाहिजे? तथापि तुह्मींच मजकडे येतां आणि तुह्मींच ह्मणतां! काय बुवा आह्मांला रक्कम देतां कां? असें ज्या तोंडानें तुह्मीं ह्मणतां त्याच तोंडानें तुह्मीं माझ्या दाढीवर थुंकतां, नव्हे का? आणि दाराशीं परकी कुत्रा आला असतां त्याला जसें लाथाळावें तसें मला तुह्मीं लाथाळतां, नव्हे कां? आणि पुन्हां मजपाशीं येऊन पैसे मागतां? यावर मी काय बोलूं, सांगा? मला तर असेंच विचारावेंसें वाटतें,—" काय हो कुत्र्याजवळ पैसे असतात का? कुत्र्याला तीन हजारांची रक्कम देतां येईल का?—खरंच सांगा येईल का? अथवा मी असें तरी बोलूं का?—' थोर गृहस्थहो ' आपण गेल्याच बुधवारीं माझ्या अंगावर थुंकलां, अमुक अमुक दिवशीं आपण मला लाथाडलें, आणखी दुसऱ्या एका वेळीं आपण मला श्वान ह्मटलें आणि इतक्या इतक्या प्रकारांनीं आपण हा जो माझा बहुमान केला त्याबद्दल आतां आपल्याला मी हें कर्ज देतों, घ्या. आणि हें मी विचारतों तें आपल्या पुढें अगदीं नम्रपणानें, मोठ्या अदबीनें, व भीत-भीत अगदीं हलक्या आवाजानें, एकाद्या गुलामाप्रमाणें मी बोलत आहें तर आपणांस याचा राग येऊं नये.

**अन्टोनियो**--( संतापून ) अरे जा ! जा ! आजपर्यंत जसा मी तुझ्याशीं वागत आलों तसाच यापुढेंही वागेन, मी तुला कुत्रा ह्मणेन, तुझ्या अंगावर थुंकेन व लाथांनीं तुझी संभावनाही करीन; पक्कें समज. जर तुझ्या मनांतून कर्ज द्यावयाचें असेल तर तें तूं आपल्या मित्राला देत आहेस व त्याच्यावर मोठे उपकार करीत आहेस असें समजून मुळींच देऊं नको. कारण, मित्रामित्रांमधें होणाऱ्या शुष्क धातूंच्या व्यवहारापासून व्याज ह्मणून कांहीं उत्पन्न करण्याची त्यांच्या मनांत कधीं कल्पना तरी येईल काय? तेव्हां, तूं जें कर्ज देणार आहेस तें प्रत्यक्ष आपल्या शत्रूला देत आहेस असेंच समजून दे. कारण त्याची फेड ठरल्याप्रमाणें झालीं नाहीं, तर त्या अपराधांबद्दल दंडासुद्धां तुला सर्व कर्जाची भरपाई करून घेतां येईल.

**शायलॉक**—अमळ थांबा हो. येवढे खवळलां कां? तुमच्याशीं मैत्री करावी, तुमचें प्रेम संपादावें असा माझा दिल लागत आहे. आजपर्यंत माझी, जी जी मानखंडणा आपण केली, ती सर्व विसरून जावी, सध्यांच्या प्रसंगीं तुह्मांला हात द्यावा, व व्याजादाखल एका कवडीचीही इच्छा धरूं नये, असा माझा इरादा आहे. मी तर असें ह्मणत आहें—ऐकलें?

**अन्टोनियो**—खरोखरच ही तुमची मोठी मेहेरबानी झाली असती, पण—

**शायलॉक**—पण काय ? अहो, ही मेहेरबानी मी करितच आहें, तेव्हां माझ्या बरोबर रजिस्टराकडे चला व मला आपल्या स्वतःच्या सहीशिक्क्यानिशीं एक कागद करून द्या, ह्मणजे झालें. यांत कांहीं मोठासा अर्थ आहे असें नाहीं. पण ही माझी आपली एक लहर आहे इतकेंच. त्यांत असें लिहा कीं, अमुक दिवशीं अमुक ठिकाणीं अमुक अमुक रक्कम परत करूं; न केल्यास, किंवा त्यांत चूक झाल्यास, माझ्या शरिराच्या वाटेल त्या अवयवांतून एक अच्छेर मांस तुह्मीं कापून घ्यावें; मी हरकत करणार नाहीं.'

**अन्टोनियो**—कबूल ! तुह्मी ह्मणतां त्या अटी लिहून माझ्या सहीनिशीं करारपत्र लिहून देण्याला माझी कांहीं हरकत नाहीं इतकेंच नव्हे, तर तुह्मी फार सदय आहांत असेंही मी ह्मणेन.

**बसॅनियो**—छे ! छे ! मित्रा, अशा करारपत्रावर माझ्याकरतां तूं खचीत सही करूं नको. माझी गरज भागली नाहीं तरी चिंता नाहीं.

**अन्टोनियो**—अरे, एवढा भितोस कां ? मुदत टळण्याची धास्तीच नको. कारण, दोनच महिन्यांत ह्मणजे ठरलेल्या मुदतीच्या आधीं एक महिना कर्जाऊ रक्कम हातीं येईल, असा माझा अदमास आहे.

**शायलॉक**—अरे, अरे, अरे! हे ख्रिस्ती लोक कोण तरी विचित्र आहेत पहा. हे स्वतःच्या व्यवहारांत दुष्ट ह्मणूनच हे इतराविषयीं येवढीं शंका घेतात. [ बसॅनियोकडे वळून ] काय हो, तुह्मी मला येवढेंच सांगा—माझी हात जोडून तुह्मांला विनंति आहे. समजा, मुदतींत यांनीं माझी रक्कम आणून दिली नाहीं, आणि माझ्याशीं केलेला करार मोडला, तर ह्या अटीपासून मला काय लाभ ? एकाद्या माणसाचें एक अच्छेर मांस मिळालें तर ती ह्मणजे मोठी आनंदाची गोष्ट आहे किंवा फायद्याची आहे, असें मुळींच नाहीं; त्यापेक्षां गोऱ्ह्याचें किंवा गाईचें किंवा बोकडाचें मांस मिळालें तर बरें नाहीं का ? हें पहा—केवळ यांची मेहेरबानी संपादन करण्याकरितां हें मित्रत्वाचें कृत्य मी करीत आहें; दुसरें कांहीं नाहीं. असलें पसंत तर हो ह्मणा, नाहीं तर राम राम ! तुमच्यावर ही जी मी मेहेरबानी करीत आहें ती स्मरून माझी तुह्मांला हात जोडून एवढी प्रार्थना आहे कीं, बाबांनोरे मला विनाकारण कमी जास्ती बोलूं नका ! माझें अधिक कांहीं ह्मणणें नाहीं.

**अन्टोनियो**—बरें आहे, तुमच्या सर्व अटी मला कबूल आहेत; झालें ?

**शायलॉक**--तर मग आतां रजिष्टराच्या येथें येऊन मला तुम्ही भेटा. आणि हा जो सहज गमतीनें आपला कागद करावयाचा तो कसा काय लिहावयाचा तें त्याला सांगून ठेवा. आणि मीही असाच जाऊन तीन हजारांचा थैला तयार करतों. त्या हारामखोर आणि दगलबाज चाकरावर घर टाकून आलों आहे; तेव्हां तिकडेही थोडें बघून लागलींच तुम्हांकडे येतों.

**अन्टोनियो**—बरें, पण तुम्हीं लवकरच या बरें.

[ शायलॉक जातो. ] कायरे ही स्वारी तर बुवा ख्रिस्ती होणार. हा दिवसेंदिवस फारच दयाळू होत चालला.

**बसॅनियो**—बोलणें गोड व अंतर्याम खाटकाचें, हें नाहीं बुवा मला पसंत !

**अन्टोनियो**—मित्रा चलरे, यांत कसलें भय आलें आहे? मुदतीचे आंत एक महिना अगोदर माझीं गलबतें परत येणारच आहेत.

[ सर्व जातात. ]

———



लॅन्सलॉट—पहा तर खरी. आपली बढाई सांगून, ह्माताऱ्याची कशी गडबड उडवून देतों ती !

व्हेनिस नगरचा व्यापारी अंक २, पृष्ठ. ४४.

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

स्थळ—बेलमान्ट येथील पोर्शियच्या वाड्यांतील एक दालन.

( वाद्य वाजत असतां मोराक्को येथील राजा परिवारासह प्रवेश करतो. त्यावेळीं पोर्शिया, नेरिसा, व इतर एक दोन स्त्रियातेथें बसल्या आहेत. )

**मोरोक्कोचा राजपुत्र**—बाईसाहेब, माझ्या या कृष्णवर्णाकडे पाहून आपण माझा अव्हेर करूं नये, एवढीच आपणांस माझी विनंति आहे. नभोमंडलांत आपल्या दिव्य तेजानें प्रकाशमान होणारा हा जो सविता, ज्याच्या शेजाराला मी राहतों, आणि ज्याच्या कृपाछत्राखालीं मी लहानाचा मोठा झालों त्यानेंच माझ्या अंगावरील कृष्णवर्णाचा हा पोषाक मला नजर केला आहे. ज्या ठिकाणीं सूर्याच्या किरणानीं बर्फ कधीं वितळत नाहीं अशा उत्तरेकडील प्रांतांत जन्मलेल्या वाटेल त्या गौरवर्ण माणसाला माझ्या समोर येऊं द्या ह्मणजे कुलीन कोण आणि कुलहीन कोण याचा निवाडा करितां येईल. दोघेहि आह्मी आपआपल्या शिरा पाहिजे

तर आपणांस तोडून दाखवू. मग आपणच पहाल, कोणाचें रक्त अधिक लाल आहे तें. ज्याचें रक्त अधिक लाल तोच कुलीन हें उघड आहे. आतां स्वरूपाविषयीं ह्मणाल, तर मला पाहतांच मोठमोठ्या शूर विरांची त्रेधा उडाली आहे. तरी पण तें ह्मणजे उग्र आहे असें नाहीं. कारण आमच्या देशच्या रूपवती स्त्रिया मजवर मोहितहि झाल्या आहेत. खरें म्हणाल तर माझा हा वर्ण बदलावा असें मला तर वाटत नाहीं; तथापि आपली मर्जी संपादन करण्यासाठीं ह्मणून मी पाहिजे तें करीन. मागें पुढें पाहणार नाहीं.

पोर्शिया—स्वयंवरासंबंधानें म्हणाल तर कुमारिकेच्या प्रेरणेला अनुसरूनच केवळ मला वागतां येईल असें नाहीं. शिवाय स्वेच्छेनें कोणतीही गोष्ट करण्याचा अधिकार माझ्या दैवानें माझ्या हातीं ठेविलेला नाहीं. माझ्या वडिलांनीं दूरदृष्टीनें या प्रकरणांत कांहीं नेम करून ठेवला आहे. त्या योगानें माझ्या इच्छेला असावी तशी मोकळीक नाहीं, तो नियम कोणता तो तुह्मांला मघांशीं सांगितलाच आहे. सारांश, त्यांनीं ठरविलेल्या मार्गानेंच जो कोणी मला प्राप्त करून घेईल त्यालाच मी वरिलें पाहिजे असें आहे, तसें नसतें तर माझ्या प्राप्तीच्या हेतूनें जे कोणी येथें आले आहेत त्यांच्या प्रमाणेंच

आपणालाही माझ्या प्राप्तीची आशा धरण्यास माझ्या मतें जागा नव्हती असें नाहीं, कारण तेजानें व थोरवीनें आपण त्यांच्याहून कांहीं कमी नाहीं.

**मोरोक्कोचा राजपुत्र**—येवढ्याबद्दलही मी आपला आभारीच आहें; तर मग आतां त्या करंडकांकडेच मला घेऊन चला ह्मणजे झालें. महाविख्यात सॅलीमन बादशहावर तीनदां जय मिळविणाऱ्या इराणच्या शहाला व त्याच्या पुत्राला ज्या समशेरीनें मी समरांगणावर ठार केलें, त्याच या माझ्या समशेरीची शपथ वाहून मी आपणांस सांगतों कीं, कसलाहि क्रूर मनुष्य असला तरी त्याच्याकडे मी एकदां डोळे वटारून पाहिलें कीं पुरे त्यानें मान खालीं घातलीच. या भूतलावर कोणी कसाही प्रतापी पुरुष असो, तरी त्याला मी जागच्या जागीं बसवीन. अस्वलीचीं पिलें पत्यक्ष आपल्या आईच्या अंगावर पीत असतानांहि मी सहज हीसकावून आणीन. फार लांब कशाला ? भक्ष्य शोधण्यासाठीं गर्जना करीत संचरणाऱ्या सिंहाला मी आपल्या गर्जनेनें गर्भगळित करून टाकीन. इतकेंच नव्हे तर हे सुंदरी, तुझा हुकूम होण्याचा अवकाश कीं, या सर्वांहूनही पाहिजे तेवढी भयंकर अशी कोणतीही गोष्ट करावयाला मी कधींही डगमगणार नाहीं. पण ही केवढी दुःखाची गोष्ट ह्मणावी कीं,

यांतून एकाचाही उपयोग येथें होण्यासारखा नाहीं. पहा, भीमसेनाचा व एकाद्या सामान्य मनुष्याचा वाद पडला, व बलवान कोण?—तूं कीं मी? हें पाहण्याकरितां ते द्यूत खेळूं लागले तर त्यांत भीमसेनहि हारण्याचा संभव आहे. याच न्यायानें मी दुर्दैवानें फसणार नाहीं कशावरून? व असें झालें ह्मणजे ज्या लाभाच्या लोभानें मी येथें आलों आहें तो मला न होतां एखाद्या सामान्य मनुष्यास प्राप्त होईल. आणि माझ्या कपाळीं जन्मभर हाय हाय करीत बसण्याची पाळी येईल.

**पोर्शिया**—पण त्याला काय उपाय; यासाठीं मी ह्मणतें आपण हा नाद सोडून द्या; नाहीं तर अशी शपथ घ्या कीं, माझ्या हातून जर भलत्याच करंडकाची निवड झाली तर फिरून कोणत्याहि स्त्रीशीं लग्नाची गोष्ट ह्मणून काढणार नाहीं. तर मग करा काय तो विचार. पहा—काय ठरलें?

**मोरोक्कोचा राजपुत्र**—चिंता नाहीं, तुह्मीं ह्मणतां तसेंच करतों, पहातों नशिबाची परीक्षा, तर मला आतां त्या करंडकांकडे घेऊन चला.

**पोर्शिया**—बरें तर, पहिल्यानें देवळांत जाऊन तेथें शपथ घ्या. पुढें भोजनोत्तर तुह्मांला ते करंडक पहावयास मिळतील. मग तुह्मी आपल्या नशिबाची परीक्षा पहा.

**मोरोक्कोचा राजपुत्र**—बरें आहे. दैवांत जें कांहीं लिहिलें असेल ते होईल. जगांत एक धन्य तरी होईन किंवा दुःखी तरी होईन. ( पुन्हां तुताऱ्यांचा आवाज होतो व राजपुत्र जातो. )

---

## प्रवेश २ रा.

स्थळ—व्हेनिस शहरांतील एक रस्ता.

( लान्सलॉट प्रवेश करतो. )

**लान्सलॉट**—माझा धनी तो शायलॉक यहुदी, याच्या घरून निघून जावें अशी मला भारी इच्छा होते. हिला काय करूं ? मला वाटतें ही गोष्ट माझ्या मनाला पुसली तर तें खचीत हो ह्मणेल. हो, हो, खचीत हो ह्मणेल, नको ह्मणणार नाहीं. येथून कधीं निघून जाईन असें मला झालें आहे. ही काय बा वेडी हौस ! ही ह्मणते,—लान्सलॉट, ‘ अहो तुह्मी बडे गृहस्थ लान्सलॉट गोबो, येथून कूच करण्याची आपल्या पायांना एकदां खुण करा. आणखी एकदम चालते व्हा कसे. ’ पण मन मध्येंच ह्मणतें— “ नको असें करूं नको बाबा तूं शायलॉकयहुद्याचा विश्वासु नोकर आहेस तेव्हां असें करणें चांगले

नाहीं. " तें सांगतें—अमळ विचार कर, जरा दम धर, येथून अगदीं हालूं नको, आणखी तें मन त्या हौसेची गचांडी धरून ह्मणतें—" चल हो बाजूला, बाबारे हा बेत टाकून दे." पण निघून जाण्याची हौस पुन्हां ह्मणते—मुर्खा पहातोस काय ? चल नीघ चालता हो " मन घट्ट करावें आणखी चटकर पळ काढावा. असें वरचेवर वाटतें, पण पुन्हां हें बेटें मन पुढें येतें आणि ह्मणतें " अहो लान्सलॉट साहेब तुह्मी भल्या बापाचे लेंक. अथवा असेंच ह्मणावें, तुह्मी भल्या आईचे पोटीं जन्म घेतला आहे. कारण माझ्या बाबाला चबढब बरीच होती व भलभलते नाद होते हें कांहीं खोटें नाहीं. तेव्हां मन सांगतें बाबारे चाललास कोठें ? "छे येथून अगदीं हालूं नकोस" पण ती बया ह्मणते—" चल एकदम नीघ येथून; " "खबरदार, जाऊं नको," असें मन पुन्हां ह्मणतें. वाः तूं छान सल्ला देतेस. " असें मी त्याला उत्तर देतों. मन सांगतें त्याप्रमाणें ऐकलें तर मला माझ्या धन्याच्या घरीं राहणें भाग आहे. पण हा घरधनी तर असा कांहीं निव्वळ सैतान आहे ! पण देवारे, त्याला मी सैतान ह्मटलें ह्मणून मला क्षमा कर. बरें आतांच्या आंता येथून चालता झालों तर हौसेप्रमाणें वागल्यासारखें होईल, नाहीं का ? पण बये हौसे तूं तरी सैतान नव्हेस का ? तरी पण तुला सैतान ह्मटलें याची तूंहि क्षमा

कर. हा यहुदी शायलॉक खास सैतानाचा अगदीं अवतारच आहे. काय तरी हें मन निष्ठुर हो, हें वारंवार तूं या यहुद्याच्याच घरीं रहा असा सल्ला देतें. आणखी ही हौस तर फारच गोड गोड मसलत देते. छे, तें कांहीं नाहीं; तेव्हां खास पळून जावेंच. आतां माझ्या या पायांत—पळण्याचें सामर्थ्य मात्र आलें पाहिजे. बरें मी पळून जातोंच हा चाललों पहा.

( म्हातारा लान्सलॉट गोबो प्रवेश करितो. )

**वृद्ध गोबो**—कोण हो ते तरुण गृहस्थ चालले आहेत ? अहो, त्या प्रसिद्ध यहुद्याच्या घराचा रस्ता मला दाखवाल का हो ?

**लान्स**—अरे बाप्पा ! माझा बाबा इकडे कोठून आला ? याला चांगलेंसें दिसत नाहीं, म्हणून यानें मला ओळखलें नाहींसें दिसतें, तर आतां थोडी गंमत करूं या.

**वृद्ध गोबो**—अहो तुम्ही, शायलॉकच्या घराचा रस्ता कोणता तो कृपा करून मला सांगतां काय ?

**लान्स**—हो, हो, सांगतों. हें पहा असें याच रस्त्यानें जा. आणि जें पहिलेंच वळण लागेल तेथें उजव्या हाताला वळा. आणखी पुढें जेथें जेथें म्हणून वळण लागेल तेथें तेथें बेलाशक डावे हाताला वळा. त्याच्या पुढें जर एखादें वळण लागलेंच तर कोण-

त्याच हाताला वळूं नका. तर एकदम नाकासमोर जा व यहुद्याचे घरांत शिरा.

**वृद्ध गोबो**—अरे देवा! देवा! तुह्मी सांगतां तो रस्ता तर बुवा मोठा भानगडीचा दिसतो. पण काय हो त्या यहुद्याकडे कोणी लान्सलॉट ह्मणून मनुष्य होता तो सध्यां अजूनही त्याच्याच घरीं असतो का?— हें तुह्माला ठाऊक आहे काय?

**लान्स**—काय तुह्मी त्या लान्सलॉट धनीसाहेबाबद्दल विचारतां होय? (एका बाजूला वळून) पहा तर खरें आतां आपला मोठेपणा दाखवून ह्या ह्माताऱ्याची कशी गडबड उडवून देतों ती! काय हो, तुह्मी त्या बड्या लान्सलॉटबद्दल विचारलें होय?

**वृद्ध गोबो**—छे, बुवा बडा कशाचा, बोलून चालून गरिबाचा पोर. त्याचा बाप ह्मणजे गरिबांतला गरीब ईश्वराच्या कृपेनें मोलमजुरी करून पोटाला खाणारा आणि भलेपणानें राहणारा.

**लॉन्स**—बरें, असेल. त्याच्या बापाशीं आपणांस काय करावयाचें आहे. आपल्याला त्या राजश्रींची जरूर.

**वृद्ध गोबो**—होय, साहेब, आपला दोस्त खरा, पण तो कांहीं राजश्री नव्हे.

**लान्स**—अहो असें काय करतां ह्मातारबुवा. तुह्माला तो लान्सलॉट कोठें आहे तो पाहिजे ना?

**वृद्ध गोबो**—होय, होय, लान्सलॉटबद्दलच मी विचारतों.

**लान्स**—अहो बाबा, त्या तरुण लान्सलॉटची आतां कशाला गोष्ट हवी; कारण दुर्दैवाच्या फेऱ्यांत सांपडून तो बापडा केव्हांच स्वर्गाला गेला, ह्मणजे काय ह्मणतों, समजलां? गमावला,–मेला–झालें !

**वृद्ध गोबो**—नकोरे बाबा असें ह्मणूं, देव करो आणि तसें न घडो. अरे. तो मुलगा ह्मणजे या ह्मातार्‍याच्या हातची काठी.

**लान्स**—मग काय ह्मणतां, तुमच्या हातांतल्या काठीसारखा, सोट्यासारखा, मी दिसतों, होय? बाबा तुह्मी मला ओळखलें नाहींका?

**वृद्ध गोबो**—छे, रे, बाबा, मला चांगलसें दिसत नाहीं आणखी मी तुला ओळखलेंही पण नाहीं.

**लान्स**—बाबा, नाहीं खरेंच. पण जरी दिसलें असतें तरी देखील मी कोण हें तुह्मीं ओळखलें नसतें खचित्. ज्या बापाला आपल्या पोराची ओळख पटते, तो खराच मोठा भाग्याचा समजला पाहिजे. बरें असो ह्मातार बुवा, तुमच्या मुलाची आतां मी सारी माहिती सांगतों. बाबा हा तुमचा लेंक तुमच्या पायां पडतो आहे बरें. आतां आपल्या ह्या लेंकाला आशिर्वाद द्या तर, हं ठेवा तर डोईवर हात एकदा. अहो बाबा, मरण कधीं झांकलें आहे? एक वेळ बापाचा लेंक नाहींसा होईल. पण खरें तें खरें. तें नाहीं कधीं नाहींसें व्हावयाचें.

**वृद्ध गोबो**--असे इकडे उभे रहा पाहूं. छे, छे, झाली खात्री तूं नाहींस माझा तूं मुलगा लान्सलॉट.

**लान्स**—बाबा, कृपा करून हा घोंटाळा आतां पुरे करा, आणि मला आशिर्वाद द्या. हें पहा तुमचें मागचें पोर, आताचा मुलगा, आणि नेहमींचें लेंकरूं मीच बरें.

**वृद्ध गोबो**–छे, तूं माझा मुलगा?–मला नाहीं वाटत !

**लान्स**–यावर काय ह्मणावें हें मला नाहीं कळत. पण मीच तो लान्सलॉट तुमचा मुलगा आणि त्या यहुद्याचा नोकर. तुमची बायको मार्गरी तिचाच मी मुलगा नव्हे का ?

**वृद्ध गोबो**--हो, तिचें नांव मार्गरी हें खरेंच. आणखी खरोखरच तूं लान्सलॉट असशील तर तूं माझ्याच पोटचा मुलगा. अरे बापरे. पण ही तुझी दाढीरे केवढी मोठी वाढली ! अरे तुझ्या दाढीचे केंस माझ्या घोड्याच्या शेपटाहूनही लांब झाले आहेत!

**लान्स**—तसें झालें असलें तर घोड्याचें शेंपूट आंखूड होत चाललें आहे असेंच ह्मटलें पाहिजे. मी त्या घोड्याला मागें एकदां पाहिलें होतें तेव्हां तर त्याच्या शेंपटीचे केंस माझ्या दाढीपेक्षा किती तरी लांब दिसत होते.

**वृद्ध गोबो**–अबब ! केवढा तुझ्यामधें फरक झाला हा ! बरें, पण कायरे धन्याचें आणि तुझें कितपत पटतें ?

मी त्याला देण्याकरितां कांहीं भेट आणली आहे. हल्लीं तुझें आणि त्याचें कसें काय आहे ?

**लान्स**—त्याच्याकडे न थांबण्याचा मी बेत केला आहे. त्या अर्थी येथून पळाल्याखेरीज मी कांहीं थांबणार नाहीं. माझा धनी ह्मणजे पक्का मारवाडी, आणखी तुह्मी ही भेट त्याला देणार, होय ? मी ह्मणतों त्याला देणेंच तर फांसावर द्या. छे, बाबा त्याची चाकरी करतां करतां माझें पोट तर अगदीं पाठीला मिळालें. हें पहा, माझें हाड न् हाड दिसूं लागलें, बाबा, तुह्मी आलांत बरें झालें. तुह्मी भेट आणली आहे ना ? तर मग, ती मजपाशीं द्या. ह्मणजे ती मी बसॅनियोसाहेबांना देतों. ते कसे छान् छान् कपडे नोकरांना देतात. मी करीन तर त्यांचीच नोकरी करीन. नाहीं तर शहरांत खुशाल भटकत राहीन.——ओ हो काय नामी संधी आली. हे पहा बसॅनियोसाहेबच इकडे येत आहेत.. बाबा चला त्यांजकडे. यापुढें मी जर त्या यहुद्याची नोकरी केली तर माझें नांवच बदलून ठेवा.

( बसॅनियो प्रवेश करितो व त्याच्या बरोबर लियो-
नारडो व इतर नोकर येतात. )

**बसॅ०**—ठीक आहे; तूं ह्मणतोस तसेंच झालें तरी चिंता नाहीं. पण हें सारें लवकर आटोपलें पाहिजे. फार फार तर संध्याकाळीं पांच वाजतां जेवायला झालें तरी चालेल. त्याचें पलीकडे जातां कामा नये.

ही पत्रें येवढीं ज्यांचीं त्यांना नेऊन दे. सर्वांचे पोषाख ज्यांचें त्यांच्याप्रमाणें शिवून तयार करवा. आणखी ग्रॅशियानोला ह्मणावें कीं, माझ्या बिऱ्हाडीं लवकर येऊन मला भेट. ( नोकर जातो )

**लान्स**—होय बाबा, हेच ते.

**वृद्ध गोबो**—साहेब, ईश्वर तुमचें कल्याण करो.

**बसॅ०**—तुमचें मजकडे काम आहे काय ?

**वृद्ध गोबो**--होय साहेब. हा पहा माझा मुलगा, हा अगदीं गरीब आहे.

**लान्स**--महाराज, मी गरीब पोर नव्हे मी त्या श्रीमंत यहुद्याचा माणूस आहें. आणखी माझी अशी ईच्छा आहे—माझे बाबा काय ते आतां आपल्याला सांगतीलच.

**वृद्ध गोबो**--महाराज हा माझा मुलगा, नोकरीची ईच्छा करीत आहे.

**लान्स**--साहेब, हा मुलगा—थोडक्यांतच सांगतों तो त्या यहुद्याचा नोकर आहे. आणखी मला मनापासून असें वाटतें कीं,—माझे बाबा काय ते आपल्याला कळवितीलच—

**वृद्ध गोबो**—त्याच्या धन्याशीं—ह्मणजे आपल्याशी नव्हे बरें—त्याचें कधीं पटत नाहीं.

**लान्स**—महाराज अगदीं थोडक्यांत सांगू ? खरें पाहिले तर त्या यहुद्यानें मला अगदीं अगदीं

वाईट रितीनें वागविलें आहे. आणि माझा हा म्हातारा बाबा आपल्याला विनंति करणार आहेच-

**वृद्धगोबो**—महाराज, ही मी आपणाकरितां भेट आणली आहे. आणखी माझ्या मनांतून असें आहे कीं—

**लान्सलॉट**—मी लांबलचक बोलून चऱ्हाट नाहीं लावीत. माझे बाबा आपल्याला विनंति करणार आहेत ती माझ्या बद्दलच आहे—ते आपल्याला आतां कळवितीलच—आणखी माझा म्हातारा बाबा कीं नाहीं फार गरीब आणि भोळा आहे.

**बसॅनियो**—हें पहा, तुह्मी एकएकटे बोला. तुम्हाला काय पाहिजे ?

**लान्सलॉट**—साहेब, नोकरी.

**वृद्धगोबो**—सरकार, साऱ्या गोष्टींचें सार काय तें हेंच.

**बसॅनियो**—हं. समजलों तुझी ओळख पटली; ठीक आहे, जा; तुझ्या ह्मणण्याप्रमाणें होईल. तुझा धनी शायलॉक आजच तुझी शिफारस मजपाशीं करीत होता पण त्या श्रीमंत यहुद्याची नोकरी सोडून माझ्या सारख्या गरीब गृहस्थाच्या घरीं राहण्यामध्यें तुझें कल्याण आहे कीं कल्याण आहे याचा काय तो विचार कर.

**लान्सलॉट**—त्या यहुद्यामध्यें आणि आपणामध्यें किती तरी अंतर आहे. त्याच्यापाशीं पुष्कळ पैसा आहे हें खरें; पण परमेश्वराप्रमाणें दयाळूपणा मात्र आपल्या ठिकाणींच आहे.

**बसॅनियो**—ठिक बोललास, बरें ह्मातारबोवा, आतां आपल्या मुलाला बरोबर घेऊन जा. आपल्या पूर्वीच्या धन्याची रजा घ्या. आणि माझें ठिकाण पाहून ठेवा–( जवळच्या नोकरांस ) जारे जा, सर्वांत फार उंची असा एक पोषाक त्याला घालायला दे. जा. ( गोबो यांस) जा, तर तुह्मीं आतां.

**लान्सलॉट**—बाबा चला लवकर. छे बोवा! आह्मांला कसची नोकरी मिळायची? मिळणार कशी? बोलावें कसें हें सुद्धां आह्मांला धड कळत नाहीं. पण हें पहा–हा योग कसा जमून आला तो! माझ्या हातावर कशा भाग्याच्या रेषा आहेत पहा? अशा या साऱ्या देशांत कोणाच्याहीं नसतील. यावरून मला तर वाटतें माझें नशीब खचित उघडेल. ही पहा आयुष्याची रेषा कशी भरभक्कम आहे. आणखी ही बायकोची रेषा.–अबब १५ बायका! पण पंधरा ह्मणजे कांहींच नाहीं.–एका पुरुषाला पाटाच्या बायका अकरा आणि नऊ नव्या पोरी अः त्यांत काय मोठेंसें झालें! आणखी पाण्यापासून तिनदा भीति;--आणखी बायको केल्यावरची काळजी. ह्मणजे–त्यांत आहे तें काय? हें इकडे बारीक सारीक धोके.–बरें दैव जरी बायलें असलें तरी तें आह्मांला वाईट नाहीं, बाबा चला लवकर लवकर त्या यहुद्याला रामराम ठोकून मी असाच येतों.

( दोघे जातात. )

**बसॅनियो**--( लिओनारडो यास ) बाबारे मी काय ह्मटलें याचा नीट विचार कर. एवढें सामान विकत आण आणि व्यवस्थेनें लावून ठेव जा. एवढें कर आणि तसाच परत ये; कारण आज रात्रीं माझ्या एका जिवलग मित्राच्या घरीं मला मेजवानीला जायचें आहे, समजलासना जा. तर आतां.

**लिओनारडो**--ठीक आहे. या कामीं माझ्याकडून होईल तितकी खटपट मी करतोंच.

( ग्रॅशियानो प्रवेश करितो. )

**ग्रॅशियानो**—अहो तुमचे धनीसाहेब कोठें आहेत हो?

**लिओनारडो**--तें चालले आहेत ते!

( जातो. )

**ग्रॅशियानो**--साहेब,

**बसॅनियो**--काय ह्मणतोस ग्रॅशियानो?

**ग्रॅशियानो**—आपल्यापाशीं माझें एक मागणें आहे.

**बसॅनियो**--ठीक आहे तें दिलेंच ह्मणून समज.

**ग्रॅशियानो**—ऐकलें. मागणें ह्मणून इतकेंच कीं, तुमच्या बरोबर माझाही येण्याचा बेत आहे. नाहीं ह्मणूं नका.

**बसॅनियो**--एवढेंच ना? येणार तर चल. पण हें पहा मित्रा तूं कीं नाहीं बोवा पराकाष्ठेचा आडमुठा व असभ्य आहेस. आणि एकदा बोलूं लागलास ह्मणजे तुझी बडबड कांहीं थांबत नाहीं हा स्वभाव तुझा तुलाच शोभतो. बाकी खरें ह्मणशील तर आमच्या दृष्टीनें त्यांत ह्मणजे कांहीं वावगें आहे असें नाहीं.

तरी पण जेथें आपली ओळख पाळख नाहीं तेथें अशा गोष्टी फाजील पणाच्या सदरांत मोडण्याच्या संभव असतो. ह्मणून तुला एवढेंच सांगायचें आहे कीं, तुझा उच्छृंखळपणा अमळ कमी कर आणि सभ्यपणानें थोडासा वाग. नाहीं तर तुझ्या या अशा बेताल वागणुकीमुळें मी जाणार आहें तेथें तुझ्या बरोबर मलाहि लोक नांवे ठेवतील. व माझ्या सर्व आशा निष्फळ होतील.

**ग्रॅशियानो**–साहेब, पण मी,काय ह्मणतों तें पुरें ऐकून तर घ्याल? तुह्मी ह्मणतां त्याप्रमाणें मी अगदीं शांत व स्थिर वृत्ति धारण केली नाहीं; सभ्यपणानें भाषण केलें नाहीं, बरचेवर शपथा वाहिल्या नाहींत; आपल्या खिशांत नेहमीं धर्मपुस्तकें बाळगलीं नाहींत; आणि सलज्ज व नम्रपणानें वागलों नाहीं; हें तर काय? पण कोणी थोर मोठे गृहस्थ बोलूं लागले ह्मणजे खालच्या नजरेनें, अशा अशा माना हालवीत, व मिटक्या मारीत मारीत हो, हो, करणार नाहीं सारांश, गंभीरमुद्रा दाखविण्याचे कामांत पुरा वाकबगार अशा एकाद्या मनुष्याप्रमाणें जर मी वागलों नाहीं तर फिरून माझ्यावर तुह्मीं कधीं विश्वास ठेवूं नका, मग तर झालें !

**बसॅनियो**–बरें, तूं कसा काय वागतोस हें पाहूं आतां.

**ग्रॅशियानो**–पण छे बुवा! आजच्या रात्रीला बरीक नाहीं

हा नियम लागू. आज रात्रीं मी वागेन त्या व-रून तुह्मी पुढचा तर्क करतां कामा नये.

**बसॅनियो**—छे छे. नाहीं रे, आजचा तर प्रश्नच नाहीं! येवढेंच नव्हे तर उलट मी तुला असें सांगतों कीं, आमच्या मंडळीला थट्टामस्करी फार आवडते; तेव्हां आज रात्रीं तुला पाहिजे तितकी मजा तूं करून घे. बरें तर आतां पुढें जा. मीही इकडचें थोडें काम उरकून तुझें मागोमाग आलोंच.

**ग्रॅशियानो**—मलाही दुसरे कांहीं मंडळीकडे जायाचें आहे, तर आज रात्रीं मेजवानीच्या वेळींच आपली गांठ पडेल.

(जातो.)

---

## प्रवेश. ३ रा.

**स्थळ**—शायलॉक यहुद्याच्या घरांतील एक दालन.

(जेसिका व लान्सलॉट प्रवेश करितात.)

**जेसिका**—एकूण तूं आतां आमच्या घरून जाणार तर? हें ऐकून मला फार फार वाईट, वाटतें. आमचें घर ह्मणजे दुःखाचें केवळ माहेरघर. पण तुझ्या सा-रखा रंगेल प्राणी येथें असल्यामुळें मनाला तेवढीच करमणूक होती. पण तूं काय आतां जाणार ह्मण-

तोस. बरें तर जा. ईश्वर तुझें कल्याण करो, हें घे
( असें ह्मणून त्याच्या हातावर कांहीं नाणें टेवते. )
तुझ्या नव्या धन्याचे लोरेन्झो या नावांचे एक मित्र आहेत त्यांना आज रात्रीं जेवणाचे वेळीं भेटून हें एवढें पत्र देशील का ? पण तें फार गुप्तपणानें देहो. ये बरें आतां. कारण तुझ्याशीं बोलतांना बाबांनीं पाहिलें तर पंचाईत व्हावयाची.

**लान्सलॉट**—बरें तर बाईसाहेब, आतां जातों—मला किती वाईट वाटत आहे हें कांहीं बोलून सांगतां येत नाहीं.—पण बाईसाहेब.—हे पहा माझे डोळे कसे पाण्यानें अगदीं भरून आले आहे पण जातों आतांही माझ्या डोळ्यांतून निघणारीं टिपें मला कांहीं पुढें पाऊल टाकूं देत नाहींत—पण येतों आतां.

**जेसिका**—जा, देव तुझें कल्याण करो. ( जातो. ) माझ्या बापाची मुलगी ह्मणवून घेण्याची मला लाज वाटावी हें केवढें तरी बाई भयंकर पातक. पण मी जरी त्यांची मुलगी असले तरी बाई असला हा त्यांचा खाष्ट स्वभाव मी तरी किती दिवस सहन करणार ? लोरेन्सो, हे माझ्या प्राणप्रिया, मला दिलेलें वचन जर आपण पाळाल, तर माझ्या मनांत जें एकसारखें काहूर माजून राहिलें आहे तें नाहींसें होईल; व ख्रिस्तीधर्म स्विकारून तुम-

च्यावर अखंड प्रेम करणारी मी तुमची अर्धांगी होऊन राहीन.

( जाते. )

---

## प्रवेश ४ था.

एक रस्ता.

( ग्रॅशियानो, लोरेन्झो, सॅलॅरिनो, व सॅलॅनियो प्रवेश करितात. )

**लोरेन्झो**—छे, बुवा तसें नाहीं, मंडळी भोजनाला बसली कीं, आपण पाय काढूं या? आणि माझ्या घरीं जाऊन सोंगें घेऊन तसेच परत येऊं. याला काय एक तास पुरे आहे.

**ग्रॅशियानो**—पण आपली तयारी कोठें आहे?

**सॅलॅरिनो**—आपल्या सोंगांच्या बरोबर जाण्याकरितां आपण मशालजी बोलावले आहेत का?

**सॅलॅनियो**—आपल्या सोंगांची जर बरोबर तयारी झाली नाहीं तर आपल्याला नाहीं बोवा तें चालावयाचें.

**लोरेन्झो**—कोठे हे आत्तांच चाराचे ठोके पडले. तयारी करावयाला आपल्याला अजून चांगलें दोन तास आहेत.

( लान्सलॉट एक पत्र घेऊन प्रवेश करितो. )

लोरेन्झो—कायरे गड्या, काय खबर आणली आहेस?

लान्सलॉट—हें पत्र फोडून पहावयाचें असलें तर पहा; त्यांत कांहीं बातमी असावीसें वाटतें.

लोरेन्झो—हें अक्षर तर बुवा माझ्या ओळखीचें दिसतें. खचीत कोणा तरी बाईच्या हातचें आहे. आणखी ज्या हातानें हें अक्षर कागदावर लिहिलें, तो हात या कागदापेक्षांही शुभ्र असला पाहिजे, मी खचित् सांगतों.

ग्रॅशियानो—अहो मी खचित सांगतों, हें प्रणयपत्र आहे.

लान्सलॉट—काय हो मी जाऊं का हो?

लोरेन्झो—तूं रे कोठें चाललास?

लान्सलॉट—माझ्या जुन्या यहुद्याची रजा घेण्याकरितां, व आज रात्रीं नव्या धन्याच्या घरीं मेजवानीकरितां, आणखी कोठें?

लोरेन्झो—थांब अमळ. हें घे. ( त्याच्या हातावर कांहीं नाणें ठेवतो. ) आणि जेसिकेला हळूच एकीकडे सांग कीं, मी तुला ह्मटलें त्यांत चुकणार नाहीं. जा तर आतां तिकडे.

( लान्सलॉट जातो. )

लोरेन्झो—काय हो आज रात्रीं आपल्याला सोंगें घ्यावयाचीं आहेत का? आम्हाला एक मशालजी मिळाला आहे बुवा.

सॅलॅरिनो—हो, हो, हा पहा मीही चाललोंच तिकडे.

**सॅलॅनियो**--आणखी मीही पण निघालों.

**लोरेन्झो**-बरें जा. पण कांहीं वेळानें ग्रॅशियानोच्या विऱ्हाडीं ये. मी व ग्रॅशियानो तेथें आहोंत.

**सॅलॅरिनो**—हो, हो, तुमच्या सांगण्याप्रमाणें आम्ही येतों.

**ग्रॅशियानो**--कायरे, तें पत्र जेसिकेचेंच ना?

**लोरेन्झो**-तुह्माला आतां सर्व गोष्टी अगदीं उघड्या करून सांगतों. जेसिकेला तिच्या बापाच्या घरून आज काढून न्यायचें ठरलें आहे, तिनें कसें यायचें, कोठें यायचें, बरोबर जडजवाहीर किती घ्यायचें हें सर्व तिनेंच ठरवून मला कळविलें आहे. या शिवाय ती आपल्या बरोबर हुजऱ्याचा एक पोषाखही घेणार आहे. खरेंच सांगतों. तिच्या बापास जर स्वर्ग प्राप्त झाला तर तो केवळ हिच्या पुण्याईमुळेंच होईल; भाग्यवान आहे बिचारी! संकटें हिच्या पायाच्या नखालाही शिवणार नाहींत. शिवलींच तर तीं हिच्या बापाच्या पापामुळेंच शिवतील, समज. चला आपण जाऊं; आणि जातां जातां तुह्मी हें पत्र पाहिजे तर वाचा. आज माझ्यापुढें मशाल घेऊन चालण्याचें काम जेसिका करणार आहे. समजलां?

[ जातात. ]

———

## प्रवेश ५ वा.

शायलॉकच्या घरापुढचा रस्ता.

( शायलॉक व लान्सलॉट प्रवेश करतात. )

**शायलॉक**–काय जातों ह्मणतोस? चालता हो; पण लवकरच तुला कळेल कीं, हा ह्मातारा शायलॉक कसा आहे आणि तो बसॅनियो कसा आहे! थांब तुझे डोळेच तुला सांगतील. अग जेसिके! येथल्यासारखें त्या बसॅनियोच्या येथें तुला पाहिजे तसें चरायला नाहीं सांपडणार-कायग ए जेसिके!-आणखी येथें कसें रोज पाहिजे तितका वेळ निजावें, व घोरत पडावें; आणि दिलेले कपडे, चिरगुटें पाहिजे तशी वापरून चिंध्या चिंध्या कराव्या! जेसिके! अशी गप्प कां?

**लान्सलाट**––अहो जेसिका बाईसाहेब!

**शाय०**–तुला रे लेका कोणी सांगितलें हाका मारायाला?

**लान्सलॉट**–हो, हुकूम केल्याशिवाय कोणती गोष्ट तुला करतां येत नाहीं. असें तुह्मीच नाहीं कां मला नेहमीं ह्मणतां, ह्मणून मी हाक मारली.

( जेसिका प्रवेश करून )

**जेसिका**–बाबा, तुह्मी का मला हाक मारिलति? काय काम आहे?

**शाय०**–ऐकलेंस? आज रात्रीं मला मेजवानीला बोलावलें आहे. त्या पाहिल्यास तिकडे माझ्या किल्ल्या आ-

हेत,—पण मी मेजवानीला कां ह्मणून जावें बरें? त्यांनीं मला कांहीं प्रेमभावानें बोलाविलें नाहीं; त्यांच्या मनांतून मला खुष करायाचें आहे इतकेंच, दुसरें काय? असें आहे तर आपलें तरी काय जातें? चला जाऊं या. आपण त्या उधळ्या ख्रिस्त्याच्या घरीं चापून ताव मारूं. जाऊं चला, पण पोटांतील द्वेष मात्र नाहीं जाऊं द्यायाचा. बरें, पोरी, आतां मी जातों आहें; पण घराकडे नीट लक्ष ठेव बरें.—काय असेल तें असो, मला नाहीं आज जावेंसें वाटत. कालरात्रीं स्वप्नांत मी पुष्कळशा थैल्या पाहिल्या; तेव्हां मी जातों आहें तेथें काय संकट येणार आहे कोण जाणें.

**लान्स०**—शेटजी, जा, नाहीं कां ह्मणतां? आमचे तरुण धनीसाहेब, तुमच्या प्रयाणाची आशा धरून आहेत.

**शायलॉक**—आणखी मी त्याच्या मित्राच्या प्राणाची आशा धरून आहें.

**लान्सलॉट**—त्या सर्वांचा आज नाटक करून दाखविण्याचा बेत झाला आहे.—पण नको मी नाहीं सांगत सगळें. तुह्माला त्यांच्या तिथें कांहीं सोंगें बिंगें नाहींत हो दिसायचीं; त्यासाठीं तर माझें नाक तोंड फुटलें आहे. तरी पण दिसलींच तर तीं कांहीं उगीच दिसलीं असें नका समजूं.

**शाय०**—काय? तेथें सोंगेंबिंगें दिसायचीं? आणखी तीं कशाचीं?—ऐकलेंस का जेसिके,—दारांना नीट

कुलुपें घाल. आणखी रस्त्यांत ढोलकी, तुतारी वगैरे वाजतांना ऐकूं आलीं तर गडबडीनें रस्त्यांत काय चाललें आहे तें पहायला उगीच खिडकीशीं जाऊं नको; ऐकलेंस ? त्या ख्रिस्त्यांचीं रंगलेलीं तोंडें पहायला तूं रस्त्यावर तोंडही काढूं नकोस माझ्या घराचें सर्व कान बंद कर. ह्मणजे मी काय ह्मणतों समजलीस? घराची खिडकी न खिडकी बंद कर माझ्या या शांत घरांत तो त्याच्या तमाशाचा आवाज आलेला मला बिलकुल खपावयाचा नाहीं, खरोखरीं माझ्या मनांतून आजरात्रीं त्याच्या घरीं जेवायला जावेंसें वाटत नाहीं पण जावें आपलें. अरे ए, गड्या तूं पुढें जा आणि मी येणार आहें ह्मणून त्यांना सांग.

**लान्स**—बरें तर, मी पुढें जातों.—( जेसिकेला उद्देशून ) बाईसाहेब! इतकें आहे तरी तुह्मी खिडकींतून रस्त्याकडे पहाच बरें. आज रस्त्यांवर कोणी फक्कडसा ख्रिस्ती तुमच्या दृष्टीस पडेल. खरेंच तो तुमच्या सारखीला पहाण्यासारखा आहे.

( जातो. )

**शायलॉक**—( मुलीला उद्देशून ) काग ए तो हरामखोर काय पुटपुटला ?

**जेसिका**—दुसरें कांहीं नाहीं, बाबा.—"ताईसाहेब, येतों मी." हां हेंच.

**शायलॉक**—हा गुलाम स्वभावानें बरा आहे. पण खादाड. आणखी त्याच्या कडून कांहीं फायदा होईल ह्मणावें तर नांव नाहीं. बेटा गोगलगाईसारखा नेहमीं आपला सुस्त, साऱ्या दिवसभर एकसारखा निजून राहावयाचा. रानमांजरें देखील इतकीं निजावयाचीं नाहींत. खरोखरीं अशा धोंड्यांना उगाळलें तरी काय व्हावयाचें आहे? बरें, आतां मी याला सोडला, तो उगाच नाहीं सोडला. मजपासून कर्ज काढून नेणाऱ्याकडे यानें राहून, कर्ज घेतलेला पैसा पाहिजे तसा लवकर फस्त करावा ह्मणजे झालें. बरें, जेसिके आंत जा. मी इतक्यांतच जाऊन येतो. पण मीं सांगितलें त्याप्रमाणें कर हो. आंत जाऊन सारीं दारें नी खिडक्या लाऊन घे. जपून रहावें यांतच शहाणपण आहे; अशी ह्मण आहे ती कांहीं खोटी नाहीं.

**जेसिका**—फार उत्तम; माझें दैव जर मला प्रतिकूल झालें नाहीं तर बाबांना मी व मला ते आजपासून अंतरलेच ह्मणावयाचें.

( जाते. )

---

## प्रवेश ६ वा.

(सोंगें घेतलेले ग्रॅशियानो व सॅलॅरिनो प्रवेश करितात.)

**ग्रॅशियानो**—याच दारापुढच्या पडवीमध्यें लोरेन्झो यानें आपल्याला उभें राहण्याला सांगितलें आहे, नव्हे का?

**सॅलॅरिनो**—त्यानें आपल्याला सांगितलेली वेळ तर होऊन गेली.

**ग्रॅशियानो**—तरी या स्वारीचा ठिकाण नाहीं. याला काय ह्मणावें? मोठें आश्चर्य आहे. खरें ह्मटलें ह्मणजे कामी जन आपल्या संकेतस्थळीं ठरल्या वेळेच्या आधींच येऊन उभे राहायाचे.

**सॅलॅरिनो**—खरेंच तुवा! ज्यांचें प्रेम जडून जुनावलें आहे त्यांचेबद्दल काम देवाला मोठेंसें कौतुक वाटत नाहीं, पण नवे नवे प्रेमसंबंध जुळवून आणण्यांत मात्र त्याला मोठा आनंद वाटतो.

**ग्रॅशियानो**—हें तर ठरलेलेंच. अहो जेवायाला बसते वेळेस जशी उत्तम रुचि असते तशीच ती भोजन झाल्यावर असते का? किंवा शर्यतीला निघालेला घोडा जेवढ्या वेगानें जातो तेवढाच वेग तो परत येतांना असतो का? अप्राप्त वस्तु किंवा स्थिति मिळविण्याचा जितक्या ईर्षेनें मनुष्य यत्न करीत असतो तितकीच ईर्षा ती वस्तु किंवा स्थिति प्राप्त झाल्यावर राहते का? अथवा उत्तम उत्तम शि-

डांनीं व पताकांनीं, एखाद्या तरुणीप्रमाणें, श्रृंगारलेली नौका किनारा सोडून महासागरांत जेव्हां शिरते तेव्हां स्वच्छंदपणें वाहणाऱ्या वायूच्या योगानें तिचीं शिडें व पताका फडकत असतात; पण तीच परत येत असतांना पहावी तों विचित्र प्रकार. त्याच वाऱ्यानें तिचीं शिडें व पताका फाडून फळ्या वगैरे मोडून दैना उडविली आहे असें दृष्टीस पडत नाहीं का?

**सॅलॅरिनो**—हा पहा लोरेन्झो आला; तेव्हां सध्या पुरे या संबंधानें मग बोलूं.

( लोरेन्झो प्रवेश करितो. )

**लोरेन्झो**—प्रिय मित्रांनों मला तिकडे फार वेळ लागला ह्मणून तुह्मी रागावूं नका. तुमचा खोळंबा मी कांहीं मुद्दाम केला नाहीं. पण कांहीं कामामुळें झाला. मी त्याला काय करावें? पण कांहीं चिंता नाहीं. तुह्मी जेव्हां आपल्या प्रियपात्रांना पळवून नेण्याच्या खटपटींत पडाल तेव्हां मी तुमचेसाठीं असाच खोळंबून राहीन, मग तर झालें; चला तर, हें पहा, येथेंच आमचे ते यहुदि श्वशुर रहात असतात. अहो, घरांत कोणी आहे का हो?

( पुरुषाचा वेष घेतलेली जेसिका माडीवर प्रवेश करिते. )

**जेसिका**—कोण हो तुह्मी? ओळख पटेल अशी खूण सांगा.

**लोरेन्झो**—अग, मी तुझा प्रियकर लोरेन्झो दुसरें कोण?

**जेसिका**—-खचीत तुह्मीच कां ते? आणि माझे प्रियकर? हं, हं, हो तुह्मीच ते, ओळखलें; कारण प्रियकर दुसरें कोण आहे. पण मी तुमची प्रियकर आहें का? हें तुमचेवांचून कोणाला ठाऊक ?

**लोरेन्झो**–होय; आतां तूं अगदीं माझीच झालीस; आणि या गोष्टीला प्रत्यक्ष परमेश्वर व तुझें माझ्यावरील अकृत्रिम प्रेम, हींच साक्ष होत.

**जेसिका**–हें पहा. हा करंडा घ्या; हा कीं नाहीं अगदीं आपल्या बरोबर बाळगला पाहिजे. आज अंधेरी रात्र आहे; आणि मी तुह्माला नीटपणें दिसणार नाहीं, हें एक बरेंच आहे; कारण सध्यां मी घातलेल्या या पुरुषवेषाची कीं नाहीं मला बाई फार लाज वाटते. पण आतां जरी दिवस असता तरी सुद्धां कांहीं हरकत नव्हती; कारण प्रेम हें स्वतः-च मुळीं अंधळें आहे, आणि प्रेमी जनांना आपला स्वतःचा मूर्खपणा कधीं दिसत नाहीं, तसें असतें तर माझें सध्यांचें वेषांतर पाहून मदनानेंही लाजेनें खालीं मान घातली असती.

**लोरेन्झो**–बरें, पण आतां खालीं ये पाहूं ? माझ्या पुढें तुला आज मशाल धरून चाललें पाहिजे.

**जेसिका**—-काय? मी आपलेच हातांत मशाल धरून सध्यांचें हें माझें स्वरूप सर्वांना निर्लज्जपणें दाखवूं

ह्मणतां? हें काय बाई तुह्मी मला सांगतां यानें तर माझी फजिती होणार आहे.

**लोरेन्झो**—तें खरें, पण या पुरुषवेषांत तुला कोण ओळखणार आहे? तरी पण, हे सुंदरी, या वेषांतही तूं मला किती तरी रमणीय दिसत आहेस, ह्मणून सांगूं? पण आतां चटकन् खालीं ये. कारण कोणतीही गुप्त गोष्ट करण्याला सर्वस्वी अनूकूल अशी जी रात्र ती अगदीं कमी कमी होत चालली बॅसनियोच्या घरीं मेजवानीला जावयाला आह्मांला आधींच फार रात्र झाली आहे.

**जेसिका**—ही पाहा मी सारीं दारें घट्ट लावून, बरोबर आणखी थोडेंसें सोनें नाणें व रोख रक्कम घेतें आणि तशीच खालीं येतें.

( माडीवरच आंत जाते. )

**ग्रॅशियानो**—वाः ही तर भारीच सुशील दिसते, ही कांहीं बुवा यहुद्याची मुलगी दिसत नाहीं.

**लोरेन्झो**-तें कांहीं असो; पण माझें बुवा तिच्यावर अतिशय प्रेम बसलें आहे. माझ्या डोळ्यांना बऱ्या वाईटाची परिक्षा आहे असें धरलें तर ती सुंदर आहे. असें तेच सांगतात. आजपर्यंतच्या अनुभवावरून मी असें ह्मणतों कीं, तिचें प्रेम निष्कपट आहे; व ती हुषार, व सुस्वरूप आहे. ह्मणूनच माझ्या हृदयमंदिरांत तिच्या सुंदर प्रेममूर्तीची जी मी एकदां स्थापना केली आहे ती कधींही ढळणार नाहीं.

( जेसिका खालीं येते )

**लोरेन्झो**—काय ? तूं आलीस का ? चलाहो चला तर ( इतरांकडे पाहून ) तुह्मी जा आतां. सोंगें घेणारी व बाकीची मंडळी तुमची वाट पहात असतील.

( लोरेन्झो जेसिका व सॅलॅरीनो. हे एका बाजूनें जातात. ) व दुसऱ्या बाजूनें अन्टोनियो प्रवेश करितो.

**अन्टोनियो**—तिकडे कोण आहेरे तो ?

**ग्रॅशियानो**—काय ह्मणतोस, मित्रा ?

**अन्टोनियो**—अरे, इतका वेळ सारेजण, कोठें रे गेला होतां तुह्मी? आणखी ती बाकीची मंडळी कोठें आहेत? अरे, नऊ तर केव्हांच वाजून गेले. आमची सर्व मित्रमंडळी तुमच्याकरितां खोळंबली आहेत. आतां आज रात्रीं सोंगें बिंगें कांहीं एक नकोत. सध्यां वारा कसा अगदीं अनुकूल आहे; आणि बसॅनियो आतांच निघेन ह्मणत आहे, अरे तुमच्या शोधाला मी तर दहा विस जणांना पाठविलें असेल.

**ग्रॅशियानो**—ठीक आहे. तर आज कांहीं एक खेळ वगैरे न करितां आतांच निघून जावें हेंच चांगलें.

( जातात. )

———

## प्रवेश ७ वा.

स्थळ—बेलमान्ट येथील पोर्शियेच्या घरांतील एक दालन (वाद्यें वाजताहेत; आणि आपआपल्या परिवारासह मोरोकोचा राजपुत्र व पोर्शिया प्रवेश करितात.)

पोर्शिया—(नोकराला) जारे ते पडदे बाजूला कर आणि तेथें ठेविलेले ते तिन्ही करंडक यांना दाखीव. (राजपुत्राकडे वळून) हं, आतां कोणता करंडक निवडतां?

मोरोक्कोचा राजपुत्र—हा पहिला सुवर्णाचा, याच्यावर काय बरें लिहिलें आहे हें? (वाचतो) "जो मला निवडून घेईल त्याला ज्या गोष्टीची लोक इच्छा धरितात तें मिळेल." बरें दुसरा करंडक हा रुप्याचा आणि यावर असें लिहिलें आहे. "जो मला निवडून घेईल त्याला त्याच्या योग्यतेप्रमाणें काय तें प्राप्त होईल." बरें तिसरा हा क्षुद्र शिशाचा, अंः त्याच्यावर लिहून ठेवलेली ही धमकी तरी तितकीच क्षुद्र आहे. काय ह्मणे?—"जो कोणी मला पसंत करील त्यास आपल्या सर्वस्वाला मुकावें लागेल." आतां यांतून कोणता करंडक निवडून घ्यावा हें नाहीं बुवा मला नीटसे समजत.

पोर्शिया—त्यांपैकीं एकामधें माझी तजवीर ठेवलेली आहे; व ती तुम्ही नेमकी निवडून काढलीत म्ह-

णजे मी तुमची सर्वस्वीं अंकित झालें. म्हणून समजा.

**मोरोक्कोचा राजपुत्र**—या कामीं कोणा देवाचें जर मला सहाय्य मिळेल तर बरें. पण फिरून एकदां त्या करंडकांवरील लेखांचें निरीक्षण करून पाहूंया. या शिशाच्या करंडकावरील लेख काय ह्मणतो? "जो मला निवडील त्याला आपल्याला सर्वस्वाला मुकावें लागेल," पण तें कशासाठीं? शिशासाठीं एवढें साहस; वा: हा लेख तर मोठीच दहशत घालीत आहे; साहस करणारे लोक कोणत्या तरी विशेष लाभाच्या आशेनेंच असें करायला तयार होत असतात. पण थोर मनुष्य बाहेरच्या क्षुद्र डाम--डौलाला भुलतील असें केव्हांही होणार नाहीं. अर्थात असल्या या क्षुद्र शिशाकरितां कोणतेंही साहस करण्याचें मनांत देखील मी आणणार नाहीं. बरें, आतां हा मनोहर शुभ्र वर्णाचा चांदीचा करंडक काय सांगतो?—" जो मला निवडील त्याला त्याच्या योग्यतेप्रमाणेंच जें काय मिळावयाचें तें मिळेल" काय! योग्यतेप्रमाणें मिळणार? पण मोरोक्कोच्या राजपुत्रा अमळ थांब, व निःपक्षपातानें आपल्या स्वतःच्या योग्यतेचा आधीं नीट अंदाज कर. जगामध्यें तुझा जो मानमरातब आहे, त्याचा जर विचार केला तर तुला काय पाहिजे असेल तें तुला अनायासें मिळावें अशीच तुझी योग्यता आहे.

शिवाय इतकें असतांनाही ही स्त्री मिळविण्याची योग्यता नाहीं असेंही कदाचित् ठरेल, बरें, माझ्या स्वतःच्या मोठेपणाबद्दल शंका घेणें ह्मणजे आपण होऊनच आपलें उणेंपण कबूल केल्यासारखें आहे. माझ्या योग्यतेच्या मानानें ह्मटलें, तर ही स्त्री मला मिळावी हेंच योग्य आहे. माझें थोर कूल, माझें ऐश्वर्य, माझें सौंदर्य, माझे गुण, माझें शील, आणि या सर्वांपेक्षांही तिच्याबद्दल माझ्या मनांत असलेलें प्रेम या सर्वांचा विचार केला तर ही स्त्री माझ्याशिवाय इतर कोणाला मिळावी हें नीट दिसत नाहीं. ह्मणून आतां दुसरा तिसरा विचार न करितां, हाच करंडक पसंत करितों. बरें, त्या सोन्याच्या करंडकावर खोदून ठेविलेल्या वाक्याचा पुन्हां एकदां आपण विचार करूं. "जो मला निवडील त्याला पुष्कळ माणसांना जें कांहीं मिळावेंसें वाटतें, तें सर्व मिळेल." पुष्कळांच्या मनांत काय वाटत असतें? अर्थात या स्त्रीची प्राप्ति! सर्व जग ह्या स्त्रीच्या प्राप्तीकरितांच धडपडत आहे, नव्हे का? आणि ह्या लोकीं अवतरलेल्या या विमल लावण्यलतिकेला—या अप्सरेला—गाढ अलिंगन देण्यासाठीं सोत्कंठ झालेल्या लोकांच्या झुंडीच्या-झुंडी पृथ्वीच्या चारी दिशांकडून एकसारख्या इकडे येत आहेत, नव्हे का? तीं हिरकेनियेचीं

वालुकामय ठिकाणें, आणि अरबस्थानचीं तीं अफाट आणि सपाट निर्जन मैदानें, हीं आजामितीस या चारुगात्रीच्या दर्शनाला येणाऱ्या कित्येक राजपुत्रांच्या नेहमीं येण्याजाण्याचा केवळ हामरस्ता होऊन बसलीं आहेत. अस्मानाशीं स्पर्धा करूं इच्छिणाऱ्या, आणि आपल्या प्रचंड लाटांच्या तुषारांनीं त्यावर आपल्या मुखस्रावाचा वर्षाव करणाऱ्या अफाट महासागराला यत्किंचितही न जुमानितां एखाद्या लहानशा तडागाप्रमाणें त्याला सहज लीलेनें ओलांडून देशोदेशचे साहसी तरुण गृहस्थ या सुंदरीच्या सौंदर्याचें नेत्रसुख अनुभवण्यासाठीं येथें येत आहेत. बरें, या तीन करंडकांपैकीं एकामध्यें तिचें दिव्य चित्र ठेविलेलें आहे, असें ती ह्मणाली; पण तें या शिशाच्या करंडकांत असेल काय? छे! असला अमंगल विचार मनांत आणणें ह्मणजें हें केवढें पाप. तर मग सोन्यापेक्षां बरेंच हीन असणाऱ्या या चांदीच्या करंडकामध्यें तरी तें असेल काय? अरेरे! हीही कल्पना योग्य दिसत नाहीं. छे! असल्या तेजस्वी हिरकणीला सोन्याशिवाय दुसरें कोणतें कोंदण शोभणार आहे? इंग्लंडदेशामध्यें कोणत्याशा सोन्याच्या नाण्यावर एका देवतेचें चित्र असल्याचें ऐकिवांत आहे; परंतु, अहाहा! प्रत्यक्ष सुवर्णशय्येवर पहुड-

लेली ही अप्सरा तर या सुवर्णकरंडकांतच असली पाहिजे. हं, तर मग द्या पाहूं किल्ली. मी हाच करंडक उघडतों; मग माझ्या नशिबानें यामध्यें कांहींही निघो.

**पोर्शिया**—ही घ्या. त्या करंडकामध्यें जर माझी तसबीर निघाली तर मी तुमची झालें ह्मणून समजा.

( सुवर्ण करंडक उघडतो. )

**मोरोक्कोचा राजपुत्र**—अहारे हतभाग्या ! हें यामध्यें काय निघालें ? हा तर एक मेलेल्या माणसाचा अस्तिपंजर ! याच्या या डोळ्यांच्या खाचेंत कायसें हें लिहिलेलें दिसत आहे ! ( वाचतो )

**श्लोक.***

सोनें न तें केवळ जें चकाके,
अबाध हें सत्य कधीं न झांके ।
सुरम्य मोटें थडगें, परंतु
तयांत कीं नांदति जीवजंतु ॥ १

* या ठिकाणीं घालण्यासाठीं ह्मणून एका मित्रानें कांहीं पद्यें पाठविलीं. त्यांत दोन मात्र पसंत पडल्यावरून खालीं दिलीं आहेत.

सोनें न सर्वच जगांत चकाकतें जें
हें सत्यानित्य वदले बहु जाणते जे ।
जें शोभिवंत थडगें बघ त्यांत काय ?-
हे क्षुद्र जीव फिरती किति, हाय हाय ! ॥

हो पात्र मात्र बहिरंग विलोकनाला,
ह्या कारणें बहुजनीं बहुशीण केला ।
बाप्पा ! मदर्थ सगळे जन हे मिळाले
ज्यांहीं स्वजन्मफळ मानिस मेळविलें ॥

माझ्या निमित्तें जन हे मिळाले
बाह्यांग पाहूनाचि तुष्ट झाले।
रे कष्ट केले, फळ काय झालें ?
सौख्या यशा धूळिस मेळवीलें॥ २

बाप्पा! तुझें वानिन शौर्य धैर्य
स्तवीन तेंसें नव सौकुमार्य।
विवेकशून्यत्व परंतु मोटें
गड्या! तुझें पाहून दुःख वाटे॥ ३

आतां धरीं मार्ग बरा घराचा,
जा सोड, ह्या नाद विलासिनीचा।
संसारसौख्यावरि सोड पाणी,
दुर्जेय दैवासाचि जोड पाणि॥ ४

होय, फजित झालों त्यापेक्षां दैवाला हात जोडले पाहिजेत, खरेंच. मोरोक्कोच्या राजपुत्रा आतां तुझे सर्व यत्न निष्फळ झाले असून यापुढें तूं सर्व सुखांना अंतरलास! बरें, (पोर्शिया-कडे पाहून) मी जातों आतां- माझें हृदय दुःखानें इतकें भरून आलें आहे कीं, आतां तुमचा निरोप घेण्याचें देखील सामर्थ्य माझ्यांत उरलें नाहीं. अपयश येणाऱ्या माणसाचें असेंच होत असतें.

(मोरोक्कोचा राजपुत्र आपल्या परिवारासह जातो. वाद्यें वाजतात.)

पोर्शिया—बरी एकदांची ही पीडा गेली. आतां पडदे सोडा. ह्याचे सारखे जे येतील त्यांची अशीच गत होवो.

---

## प्रवेश ८ वा.

स्थळ--व्हेनिस नगरांतील एक रस्ता.

( सॅलॅरिनो व सॅलॅनियो प्रवेश करितात. )

**सॅलॅरिनो**—अरेबाबा, बसॅनियोला गलबतांत बसून जातांना मी आपल्या डोळयांनीं पाहिलें; आणि ग्रॅशियानोहि त्याच्याच बरोबर होता, पण त्यांच्यांत लोरेन्झो मात्र नव्हता हें मला पक्कें ठाऊक आहे.

**सॅलॅनियो**—कांहीं असो पण त्या दुष्टबुद्धि यहुद्यानें तर ओरडाओरड करून महाराजांचें अगदीं डोकें उठविलें आणि आपल्या मुलीच्या शोधाकरितां म्हणून त्यांना बसॅनियोच्या जहाजाकडे घेऊन गेला.

**सॅलॅरिनो**—खरें, पण ते दोघे बंदरावर उशिरां जाऊन पोहोंचले. जहाज तर आधींच हाकारून गेलें होतें. तेव्हां तेथल्या लोकांनीं एवढें मात्र सांगितलें कीं, लोरेन्झो, व त्याची आषक जेसिका हीं दोघें एका पडावांत बसून कोणीकडेशीं गेलीं. शिवाय अन्टोनियोयानें त्यांची अशीही खात्री केली कीं, बसॅनियोयाचा त्यांच्याशीं कांहीं संबंध नाहीं. ती त्याच्या गलबतावर सुद्धां नव्हती.

**सॅलॅनियो**—कायरे तरी बुवा तो यहुदी विक्षिप्त! रस्त्यानें जातांना इतकी कांहीं ओरडाओरड त्यानें चालविली होती, कीं कांहीं पुसूं नये.--जसा कांहीं

एखादा पिसाळलेला कुत्राच !—"हाय हाय रे माझी पोरगी ! हाय हाय रे माझा पैसा ! माझी पोरगी एका ख्रिस्त्याबरोबर कीं हो पळून गेली हाय रे ! हाय ! काय करूं? अरे दुष्टा लोरेन्झो, अरे माझा पैसा ! न्याय पाहिजे न्याय, बस कायदा पाहिजे. अरे माझी पोरगी! अरे माझा पैसा! पैसा गेला! पोरगी गेली! न्याय गेला ! कायदा गेला ! सर्वच कींहो नाहींसे झाले ! हाय हाय ! मोहरबंद एक तोडा अरे एकच नाहीं ! पैसा भरून मोहोर केलेले दोन तोडे ! माझ्या पोरीनें चोरून कींहो नेले ! आणखी रत्नें, दोन अतिशय मौल्यवान् हिरे माझ्या पोरीनें चोरिले. अन्याय! अन्याय ! आतां माझी पोरगी कोठें सांपडणार ? माझे हिरे तिजपाशीं सांपडतील. आणखी माझा पैसाही तिनेंच आपल्याबरोबर नेलेला आहे. आतां काय करावें? कारटीनें आपल्या बरोबर माझें सारें डबोलें कींहो लांबविलेंन ! आतां काय करूं ? अशी त्यानें रस्त्यानें एकसारखी बडबड चालविली होती.

**सॅलॅरिनो**—आणखी व्हेनीसमधलीं सारीं पोरेंही " हाय हाय ! माझे हिरे, माझी पोरगी, माझा पैसा " असें म्हणून त्याला वेडावीत त्याच्या मागें लागलीं होतीं.

**सॅलॅनियो**—अन्टोनियोयानें मात्र या वेळीं आपला करार बरोबर पाळला पाहिजे; नाहींतर हा पिसाळलेला म्हातारा आपला राग त्याच्यावर काढायाला कधींही कमी करणार नाहीं.

**सॅलॅरिनो**—अरे हो, बरी आठवण झाली. तुला सांगायला अगदींच विसरलों. काल मी एका फ्रेंच मनुष्याशीं बोलत होतों; तेव्हां त्यानें सांगितलें कीं इंग्लंड व फ्रान्स या दोन देशांमधल्या खाडींत तुमच्या देशचें एक जहाज बहुमोल वस्तूंनीं गच्च भरलेलें खडकावर आपटून फुटलें! नुकतीच ही त्याची खबर आली आहे. हे त्याचे शब्द ऐकतांच माझ्या पोटांत धस्स झालें आणि अन्टोनियोयाची आठवण झाली; आणि मी आपणाशीं ह्मणालों ईश्वर करो आणि हें त्याचें नसो.

**सॅलॅनियो**—मला वाटतें कीं हें तूं अन्टोनियोयाला सुचविलें असतेंस तर बरें झालें असतें; पण ही बातमी एकदमच त्याच्या कानावर घालतां कामा नये. कारण त्यामुळें त्याला पराकाष्ठेचें दुःख होईल.

**सॅलॅरिनो**—खरेंच, त्याच्या इतके कोमल हृदयाचे फार थोडे, अरे काय सांगूं तुला! बॅसॅनियो जावयास निघाला तेव्हां त्यानें अन्टोनियो याचा निरोप घेतांना ह्मटलें, मित्रा, मी लवकरच परत येतों बरें. त्यावर अन्टोनियोयानें काय ह्मटलें, तें आहे का तुझ्या लक्षांत. तो ह्मणाला—“छे, रे, असें करूं नको. माझ्याकरितां तूं आपलें काम घाईघाईनें कसें बसें आटोपून घेऊं नको, तर हें कार्य पूर्णपणें सफल

होई तोंपर्यंत थांब आणि हें पहा, त्या यहुद्याला करून दिलेल्या कारारपत्राच्या गोष्टीला तुझ्या प्रेमपूर्ण मनांत बिलकूल थारा देऊं नको, आनंदानें रहा. कामुकवृत्तीला साजतील अशाच गोष्टींना तूं आपल्या मनामध्यें प्रमुख स्थान दे. आणि प्रेम संपादनार्थ कितीही खर्च करावा लागला तरी तिकडे बिलकूल लक्ष देऊं नको." असें ह्मणतांना त्याचे डोळे पाण्यानें अगदीं भरून आले. ही आपली स्थिति बसॅनियोयाच्या दृष्टीस पडूं नये ह्मणून त्यानें आपलें तोंड फिरविलें. शेवटीं मोठ्या कष्टानें त्यानें आपला हात बसॅनियोयाच्या हातांत दिला व अत्यंत प्रेमानें व विनयानें त्याला जा ह्मणून निरोप दिला. त्यानंतर हात मागें घेतला.

**सॅलॅनियो**—वास्तविक गोष्ट तुला मी सांगूं ? तो जगांत राहत आहे तो केवळ बसॅनियोकरितां राहत आहे असेंच समजसना ! तर चला. आपण त्यालाच जाऊन भेटूं आणि त्याच्या उद्विग्न मनाला कांहीं तरी करमणूक काढून आनंदीत करूं.

**सॅलॅरिनो**—ठीक आहे चल, तर.

( जातात. )

## प्रवेश ९ वा.

स्थळ—पोर्शियेच्या वाड्यांतील एक दालन.

( नेरिसा व एक चाकर प्रवेश करितात. )

**नेरिसा**—हं! हं! पाय उचल लवकर ! तो पडदा तेवढा बाजूला सार. अरेगॉनच्या राजपुत्रानें शपथ घेतली असून, तो करंडकांची निवड करण्याकरितां इकडेसच येत आहे.

( वाद्यें वाजत असतांना अरेगॉनचा राजपुत्र व पोर्शिया कांहीं सेवकांसहित प्रवेश करितात. )

**पोर्शिया**—हे वैभवशाली राजपुत्रा, ते तेथें करंडक ठेविले आहेत. त्यांतून एकांत माझीच प्रतिमा आहे. ती जर तुह्मी निवडलीत तर मग आपला दोघांचा विवाह होण्याला कांहींच अडचण राहणार नाहीं. पण जर निवड करण्यांत चूक झाली तर तुमचें कांहीं एक बोलणें चालणार नाहीं. मग तोंडावाटे ब्रही न काढतां तुह्मांला एकदम येथून निघून जावें लागेल, हें लक्षांत ठेवा.

**अरेगॉनचा राजपुत्र**—मीं मुळीं तशी शपथच घेतली आहे. तीन गोष्टी करणार नाहीं. त्यांतली एक ही कीं, मी कोणता करंडक उघडला हें कधींही कोणाला सांगणार नाहीं. दुसरी, मी जर भलताच करंडक निवडला तर मी यापुढें जन्मांत कोणत्याही कुमारि-

केव्हांहि लग्नाची गोष्ट बोलणार नाहीं. आणि तिसरी ही की, नेमका करंडक मला ओळखतां आला नाहीं तर मी येथें क्षणभरही थांबणार नाहीं.

**पोर्शिया**—होय! माझ्या सारख्यायःकश्चित् कुमारिकेला वरण्याची इच्छा धरून जे कोणी येथें येतात त्यांना पहिल्यानें अशी शपथ घ्यावी लागते, हें कांहीं खोटें नाहीं.

**अरेगॉनचा राजपुत्र**—आणि मीही तसेंच केलें आहे. आतां सुदैवानें माझी आशा सफल होवो ह्मणजे झालें. पहिला करंडक सुवर्णाचा; दुसरा चांदीचा; व तिसरा क्षुद्र शिशाचा; ह्या शेवटच्यावर काय बरें हें येथें लिहिलें आहे?-"मला जो कोणी निवडील त्याला आपल्या सर्वस्वाला आंचवावें लागेल." अं:! पण तुझ्याकडे मी येण्यापूर्वी तुला हें आपलें ओंगळ स्वरूप टाकून देऊन दुसरें चांगलें धारण केलें पाहिजे. बरें, हा सोन्याचा करंडक काय ह्मणतो,-" जो मला पसंत करील त्याला पुष्कळ लोकांना जें कांहीं मिळावेंसें वाटतें तें सर्व मिळेल." पुष्कळ लोकांची काय इच्छा असते? पण अगोदर जगांतले पुष्कळ लोक ह्मटले ह्मणजे कोण?-मूर्ख लोक. असे लोक वस्तूच्या बाह्य स्वरूपाकडे पाहूनच भुलणारे असतात. अंतरंगाचा विचार करण्याची त्यांना संवयच नसते. थंडीवाऱ्या-

पासून, वादळापासून किंवा कोणत्याहि संकटापासून रक्षण होणें जेथें शक्य नाहीं अशा एकाद्या उंच कड्याच्या आश्रयानें आपलें घरटें बांधणाऱ्या पाकोळीसारखे हे होत. जें पुष्कळांना पाहिजे तें तर मी तुच्छ मानतों. कारण सामान्य लोक ज्यामुळें फसतात त्या गोष्टींनीं जर मला ही भुरळ पडली तर अडाणी लोकांत व माझ्यांत मग काय अंतर? बरें, हा दुसरा करंडक चांदीचा. ह्यावर काय आहे तें तर पाहूं? हे रौप्य करंडका, तुझें ह्मणणें काय आहे? सांग. " जो मला पसंत करील त्याला त्याच्या योग्यतेप्रमाणें जें कांहीं मिळावयाचें तें मिळेल. हेंच ह्मणणें बरोबर आहे. कारण अंगीं पात्रता असल्यावांचून उगीच मोठेपणाची हाव धरणें ह्मणजे आपल्या दैवाला फसवूं पाहणें असेंच मी समजतों, व असें कोणाला करतां येईल? कोणालाही येणार नाहीं. यास्तव नसता मोठेपणा मिरवण्याची हाव कोणींही धरूं नये. खरोखरी, ऐश्वर्य, अधिकार व सन्मानदायक पदव्या जर गुणी माणसांनाच मिळत गेल्या व अन्यमार्गानें मिळवूं पाहणारांस मिळत नाहींशा झाल्या, तर किती बरें होईल! मला तर वाटतें अनेक दरिद्री लोक संपन्न होतील, अधिकारमदाखालीं चिरडून गेलेले किती तरी लोक अधिकारारूढ होतील आणि काळाच्या

विपरीत गतीनें जे आज दैन्य भोगीत आहेत त्यांस उत्तमावस्था प्राप्त होईल. बरें तें असूंद्या. पण हा करंडक काय ह्मणतो तें पाहूं या ?—" मला जो पसंत करील त्याला त्याच्या योग्यतेप्रमाणें प्राप्ति होईल." मला तरी माझ्या योग्यतेप्रमाणेंच काय तें मिळालें पाहिजे. आणि जो हेतु धरून मी येथें आलों आहें तो साध्य करून घेण्याची माझी योग्यता आहेच. ठीक आहे द्या तर या करंडकाची किल्ली. ( रौप्य करंडक उघडतो )

**पोर्शिया**—आपण इतका पुष्कळ वेळ विचार केला. त्याचा अखेर उपयोग काय झाला ?

**अरेगॉनचा राजपुत्र**—काय! काय यांत काय निघालें बरें ! अरे हें तर एक सोंगच दिसत आहे. आणखी याच्या हातांत हा कागद कसला ? यावर काय बरें लिहिलें आहे ? काय ? " पोर्शिया व तूं या दोघांमध्यें जमीन अस्मानाचें अंतर आहे " एकूण यावर जें हें लिहिलेलें आहे. त्यामध्यें आणि माझी योग्यता व इच्छा यामध्येंहि जमीन अस्मानाचेंच अंतर आहे. वाचतो; " जो कोणी माझा स्विकार करील त्याला जें कांहीं मिळावयाचें तें त्याच्या योग्यते प्रमाणेंच मिळेल." या मधें मला हें सोंगाचें चित्र सांपडावें हीच काय माझी किंमत! याहून माझी योग्यता अधिक नाहीं काय ?

पोर्शिया—योग्य करंडकाची निवड करणें वेगळें, आणि हा निवडावा किंवा तो निवडावा याचा खल करीत बसणें वेगळें.

आरेगॉनचा राजपुत्र—( आंत लिहून ठेवलेला कागद पाहून ) हें कायबरें येथें लिहिलें आहे ?

श्लोक.

छायेसि मोहें कवटाळितील,
ते सौख्य छायामय पावतील
सिद्धांत हा थोर जुना पुराण॥–
हितार्थ कीं नित्य मनांत आणा ॥ १

सिद्धांत हा प्रत्ययसिद्ध झाला,
नयेकदा हो, दशलक्ष वेळां ।
जैसा गुणें शुद्धचि रौप्यगोळा,
अग्नींत टाका दशलक्ष वेळां ॥ २

मनोराज्य ज्यांनीं मनीं मांडिलेंसे,
जगीं काय थोडे महामूर्ख ऐसे !।
तयामाजि वाटे तुझें थोरपुण्य ॥
तुला त्यांत मी लेखित्तों अग्रगण्य ॥ ३

नको राहुं येथें, तुझें काम नाहीं,
चलावें, घराचा शिधा मार्ग पाहीं ।
खरी आपली योग्यता काय आहे
तुवां जाणिली ! अल्प हा लाभ नोहे ॥ ४

हो ! हा मोठाच लाभ झाला ह्मणावयाचा ! आतां मी येथें अधिक थांबणें ह्मणजे अधिकच मूर्खपणा करण्यासारखें आहे. येथें येतांना जितका मूर्ख मी होतों त्याहून अधिक मूर्ख ठरून मी आतां चाललों आहें ! बरें आहे. येतों आतां. दुर्दैवानें माझ्या आ-

शेचा भंग झाला तरी मी घेतलेली शपथ मोडीत नाहीं.

( आरेगॉनचा राजपुत्र व त्याच्या बरोबरचे लोक जातात. )

**पोर्शिया**—दिव्याभोंवतीं उडत राहणाऱ्या या पतंगाची कशी अवस्था झाली पहा! कोण हो हे मूर्ख तरी! यांना शहाणपणाची मोठी घमेंड असते. पण एकंदरीनें मूर्खच. कारण कोणत्याही गोष्टींत काय करावें हें ठरविण्याची पाळी आली ह्मणजे वास्तविक गोष्ट यांना सुचूं नये हेंच त्यांचें शहाणपण.

**नेरिसा**—बाईसाहेब, मरण येणें, आणि लग्न होणें, या दैवाधीन गोष्टी आहेत.

**पोर्शिया**—नेरिसे, इकडे येऊन तो तेवढा पडदा ओढून घे बरं.

(एक चाकर प्रवेश करतो.)

**चाकर**—बाईसाहेब कोठें आहेत?

**पोर्शिया**—अरे, ही पहा मी इकडेच आहें. काय ह्मणतोस?

**चाकर**—बाईसाहेब, दरवाज्यापाशीं व्हेनिस नगराहून आलेला कोणी दूत उभा आहे. व त्याचा धनी आपणाला भेटण्यास येत आहे ह्मणून सूचना देण्यासाठीं तो पुढें आला आहे. त्याजपाशीं बहुमोल नजराणा त्यानें आणला आहे. व आपल्या हुकमाची अदबीनें तो वाट पहात आहे.

आपल्या धन्याच्या प्रेमाचा निरोप आणणारा याच्यासारखा दूत मी आजपर्यंत पाहिला नाहीं. वसंतऋतूच्या आरंभावरून जशी त्या ऋतूंतील मजेच्या दिवसांची अटकळ होते, तशीच या नोकराच्या ऐटीवरून त्याच्या धन्याचीही होत आहे.

**पोर्शिया**—अरे, किती बोलतोस रे. तुझ्या या स्तुतीवरून मला वाटतें तो तुझा कोणी नातेवाईक तर नाहींना ? नेरिसे, चल गडे पाहूं ये, हा एवढा बहुमोल नजराणा पाठविणारा हा मदनमूर्ती कोण असावा ?

**नेरिसा**—बहुदा बसॅनियो साहेबच. हे मदना, तुझ्या कृपेनें हे नवीन येणारे गृहस्थ बसॅनियो साहेबच असोत.

(सर्व जातात.)

———

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

स्थळ—व्हेनिस नगरांतील एक रस्ता.

( सॅलॅरिनो व सॅलॅनियो प्रवेश करितात. )

**सॅलॅनियो**--कायहो? सराफ बाजाराकडील काय खबर आहे?

**सॅलॅरिनो**—आणखी काय? इंग्लंड देशच्या अरुंद खाडीमधून अन्टोनियोयाचें एक बहुमोल मालानें भरलेलें जहाज येत होतें तें खडकावर आपटून फुटलें अशी जी मध्यंतरी अवाई उठली होती तीच. विशेष कांहीं नाहीं. ज्या ठिकाणीं जहाज फुटलें तें ठिकाण मोठें भयंकर आहे ह्मणून सांगतात. बुवा! आजपर्यंत कित्येक जहाजांना तेथेंच जलसमाध मिळाली आहे. आतां ही बातमी कितपत खरी तें मात्र सांगवत नाहीं.

**सॅलॅनियो**--देव करो, आणि ही बातमी खोटी ठरो! पण हें पहा, मला तोंडदेखलें नाहीं बोलतां येत. काय हो!—धन्य आहे! त्या अन्टोनियो याची—केवढा त्याचा भलेपणा, खरेंच त्या महात्म्याच्या नांवाबरोबर जर माझेंही नांव लोक काढतील तर तें मी मोठें भूषण मानीन!



**शायलॉक**—आतां कोणी चांगला बेलिफ पाहून ठेवा......मी त्याच्या काळिजाला हात घालतों!

**व्हेनिस नगरचा व्यापारी अंक ३, पृष्ठ. ९२.**

**सॅलॅरिनो**--पुरेरे किती बोलशील ? तुझें पुरे झालें.

**सॅलॅनियो**--ह्मणजे, तूं काय ह्मणतोस--माझें बोलणें होय ? अरे तें इतकेंच कीं अन्टोनियोयाचें एक जहाज बुडालें.

**सॅलॅरिनो**--मी ह्मणतों इतक्यावरच भागलें तरी पुरे !

**सॅलॅनियो**—हो, हो, तूं ह्मणतोस तें खरेंच ! नाहीं तर आपलें बोलणें खोटें ठरवावयाला इतक्यांतच यहुद्याच्या रूपानें सैतान पुढें येऊन उभें राहावयाचें!

( शायलॉक प्रवेक करितो. )

**सॅलॅनियो**—काय शेटजी, तुमच्या व्यापारी मंडळींत नवीन खबर काय आहे ?

**शायलॉक**—तुह्मांला ठाऊक असून मला काय विचारतां ? माझी मुलगी पळून गेल्याची खबर तुह्माला कळलीच असेल.

**सॅलॅरिनो**—अहो ती तर जुनीच खबर. ती आहे मला ठाऊक, फार काय सागूं! पळून जातांना तुमच्या मुलीनें जो पुरुषाचा पोषाख घातला होता तो कोणत्या शिंप्यानें शिवला होता तें आहे मला माहीत. तें मला विचारा?

**सॅलॅनियो**—हं, त्यांत काय आहे, कोकिलेला पंख फुटले आहेत, तेव्हां तिनें भरारी मारून जावें हें साहजीकच आहे, हें शेटजींना कळत नाहीं कीं काय ?

**शायलॉक**—पोरीनें केवढें तरी पातक केलें हें! याबद्दल परलोकीं देव तिला चांगलें शासन करील.

**सॅलॅरिनो**--हो, हो, तिच्या हातून हा मोठाच अपराध झाला खरा. सैतानच जर न्यायाधीश झाला तर तो असें ह्मणेल यांत काय नवल?

**शायलॉक**--अहो प्रत्यक्ष आपल्या बापाशीं असें आचरण! ज्याच्या पोटीं जन्म घेतला त्याचेवर कारटी अशी उलटली हं!

**सॅलॅनियो**--पुरे पुरे तोंड आटप, ह्मातारपणांत ही बडबड शोभत नाहीं.

**शायलॉक**--तुह्मी काय समजलां? माझी मुलगी—माझ्या पोटची पोर—माझ्याच रक्तमांसाची.

**सॅलॅरिनो**--पण मला तर वाटतें तुझ्यांत व तिच्यांत जमीन अस्मानाचें अंतर आहे. तेवढें शुद्ध कोळसा व स्फटिक यांचे मध्यें नसेल. आणि तांबड्या दारूचें ऱ्हीनीश दारूशीं जितपत साम्य तितकें तरी तुझ्या व तिच्या रक्तामध्यें सांपडेल काय? तें असो. पण कायहो? अन्टोनियोयाच्या नफानुकसानीची कांहीं बातमी तुम्हांला कळली आहे का? असल्यास तर ती आह्मांला सांगा.

**शायलॉक**—हो! ही एक दुसरी नुकसानीची गोष्ट. कोणहो दिवाळखोर उधळ्या माणूस! आतां सराफकट्यामध्यें तोंड काढायची तरी त्याची छाती आहे का?—अरे चोरा! आमच्यांत मोठ्या

संभावितपणानें वावरत असस, नाहीं ? (सॅलॅरिनोकडे वळून) आतां रोख्याची आठवण ठेव ह्मणावें! मला नेहमीं काय ह्मणत असतोस-मारवाडी, मारवाडी ह्मणून ह्मणत असतोस नाहीं. (सॅलॅरिनोकडे वळून) पण ह्मणावें बच्चाजी! रोख्याची आठवण ठेव, चांगली ! ख्रिस्त्यांना बिनव्याजी पैसे देतोस, नाहीं ? पण आतां रोख्याची आठवण ठेव चांगली !

**सॅलॅरिनो**—पण शेटजी; त्यानें जरी मुदतींत तुमची रक्कम दिली नाहीं तरी तुह्मी ह्मणजे त्याच्या अंगाचें मांस काढून घ्याल असें कांहीं मला वाटत नाहीं. त्याचें मांस काढून घेऊन तुह्माला काय करायचें आहे ?

**शायलॉक**—त्याचें काय करावयाचें ? गळाला मासुर्डे लावतात, तसा तर त्याचा उपयोग होईलना ? मी त्याचा तसाच उपयोग करीन ! पण असें कां ? त्याचें मांस काढून घेतल्यानें जरी कोणाची भोजनेच्छा तृप्त न झाली तरी माझी सुडाची इच्छा तर तृप्त होईल ? अहो, त्यानें माझा एक प्रकारें का छळ केला आहे ? अहो, त्यानें माझी जिकडे तिकडे बेअब्रू तर केली ! कमींतकमी माझें पांच लाखांचें तरी नुकसान केलें आहे ! फार काय सांगावें मला ठोकर बसली कीं त्याला आनंद व्हावा. व मला नफा

झाला ह्मणजे यानें माझी टवाळी करावी. माझ्या जातीची यानें नेहमीं नालस्ती करावी. माझ्या व्यवहारांत यानें विघ्नें आणावींत! माझ्या मित्रांचे यानें कान भरावे; आणि माझ्या शत्रूंना त्यानें भर द्यावी. आणि हें सारें का तर मी यहुदी आहें ह्मणून. पण यहुद्यांना काय डोळे नाहींत? त्यांना काय हातपाय नाहींत किंवा इतर अवयव, इंद्रियें, मनोविकार यांतून काय नाहीं? ज्या अन्नानें ख्रिस्ती पोसला जातो त्याच अन्नावर आमचेंही पोषण होतें. ज्या शस्त्रांनीं त्यांना जखमा होतात त्यांनींच आह्मालाही पण होतात. जे रोग त्यांना होतात, व ज्या औषधांनीं तें बरे होतात, तेच रोग आह्मालाहि होतात, व तींच औषधें आह्मालाही कामास येतात. बरें, ज्या दिवसांत त्यांना थंडी वाजते व जे दिवस त्यांना उन्हाळ्याचे भासतात, त्याच दिवसांत आह्मी पण थंडीनें कुडकुडतों, व त्याच उन्हाळ्याच्या उष्णतेनें आमच्या अंगाची लाही होते. आह्माला जर कोणी टोंचले तर काय आमच्या अंगांतून रक्त येणार नाहीं! गुदगुल्या केल्या तर काय आह्माला हसूं येणार नाहीं? विष घातलें तर काय आह्मी मरणार नाहीं? मग याचप्रमाणें जर तुह्मी आमचा अपराध केला तर काय आह्मी तुमचा सूड घेऊं नये? इतर सर्व गोष्टींत जर तुह्मी आह्मी एकसारखेच आहों, तर याही गोष्टींत आह्मी तुमचे

सारखेंच कां करूं नये? कोणी यहुदी जर ख्रिस्त्याच्या वाटेला गेला तर तो ख्रिस्ती काय करितो?— तुह्मी ख्रिस्ती मोठे संभावीत ह्मणवितां व नम्रता हा तुमचा बाणा आहे; तर तुमची नम्रता त्याला काय सांगते? सूड घे ह्मणून सांगत नाहीं काय? मग हाच न्याय यहुद्यांना कां लागू करूं नये? समजा कोणा ख्रिस्त्यानें यहुद्याची खोडी केली, तर त्यानेंहि ख्रिस्त्याप्रमाणेंच संभावितपणा दाखवून नम्रपणानें ख्रिस्त्याचा सूड घेऊं नये काय? यासाठीं मी तुह्माला स्पष्ट सांगतो, माझ्याशीं तुह्मी जसें नीचपणाचें वर्तन करतां तसेंच मी तुमच्याशीं करीन. फार तर काय?—पण या बाबतींत मी तुमच्यावरही ताण करीन, कधीं चुकणार नाहीं.

( एक चाकर प्रवेश करितो )

**चाकर**—माझे धनी अन्टोनियो साहेब हे घरांतच आहेत; आणि त्यांनीं तुम्हाला भेटायाला बोलाविलें आहे.

**सॅलॅरिनो**—खरें कीं, काय? आम्हीं तरी त्यालाच पाहत आहों.

( ट्यूबॉल प्रवेश करितो. )

**सॅलॅनियो**—हा पाहा त्याच्याच जातीचा दुसरा एक यहुदी आला. सैतानच जर यहुद्याचें रूप घेईल तर न कळे, बाकी तिसरा मनुष्य यांची बरोबरी करील असा सगळे दुनियेंत कोणी सांपडायाचा नाहीं.

( सॅलॅरिनो. सॅलॅनियो व चाकर जातात. )

**शायलॉक**—कसें काय हो, ट्यूबॉल शेटजी ! जिनोआ शहराकडील काय वर्तमान आहे ? माझी मुलगी तुम्हाला कोठें आढळली काय ?

**ट्यूबॉल**—नाहीं बुवा ! तिचे विषयींची बातमी मात्र मीं चोहोंकडे ऐकली, पण तिचा शोध मला कोठेंच लागला नाहीं.

**शायलॉक**—छे ! छे ! छे ! काय करावें हो ! केवढा तरी किमतीचा एक हिरा—तो मीं अमेरिकेंत खरेदी केला होता. दोन हजार रोख मोजले होते. तो किहो गेला ! छे, छे! आपल्या लोकांवर असला घाला कधींही पडला नसेल ! आणखी खरें सांगू तुह्मांला, आतांपर्यंत याचें मला कांहीं वाटलें नव्हतें. पण एक हिरा गेल्यानें दोन हजार एकदम गेले ! त्याशिवाय आणखी कित्येक मौल्यवान रत्नें गेल्याचें आढळत आहे—काय सांगू हो ! यापेक्षां त्या रत्नांचे दागिने कारटीच्या अंगावर घालून ती जरी माझ्यायेथेंच मेली असती तरी पुरवतें ! किंवा तिला माझ्या पायापाशींच पुरून तिच्या थडग्यामध्यें जरी माझा तो हिरा राहिला असता तरीही चांगलें झालें असतें—पण काय हो कांहींच थांग पत्ता नाहींना ? कशाचा पत्ता आला आहे! या सर्वांच्या शोधांत आजपर्यंत किती पैसा खर्च झाला असेल कोण

जाणें? छे! छे! छे! नुकसानावर नुकसान! चोरानें नेलें एवढें आणि त्याचे शोधासाठीं तेवढेंच घातलें त्याचे भरीला; तरी कशाचाही उपयोग झाला नाहीं. गुलामाचा शोध लागला नाहीं, आणि सूडही घ्यायला मिळाला नाहीं, आणखी हा घाला मजवरच कसा पडला? दुसरे कोणावर कसा नाहीं पडला? काय करूं हो जगांत दुर्दैवी प्राणी मीच काय तो. रडून रडून माझे डोळे सुजले; पण दुसऱ्या कोणाच्या डोळ्याला एक टिपूस येईल तर शपथ; असा हळहळणारा प्राणी जगांत काय तो मीच.

**ट्यूबॉल**—असें कां ह्मणतां? पुष्कळांवर असे प्रसंग येतात. तोच अन्टोनियो पहाना. मला त्याच्याबद्दलची बातमी जिनोवा शहरीं लागली.

**शॅयलॉक**--काय काय ह्मणालांत, अन्टोनियोला दुर्दैवानें घेरलें?

**ट्यूबॉल**—ट्रिपोलीच्या वाटेवर त्याचें एक जहाज बुडालें.

**शायलॉक**--वाहवा! वाहवा! देवा छान केलेंस! पण तुह्मीं सांगतां तें अगदीं खरें का?

**ट्यूबॉल**--खरें ह्मणजे! त्या फुटलेल्या जहाजावरून वचावलेल्या कांहीं खलाशांशींच माझें बोलणें झालें.

**शॉयलॉक**—वा: शेटजी, तुह्मी तर मला ही फारच

उत्तम बातमी सांगितली. शाबास ! शाबास ! ठीक झालें. कुठें ऐकली ह्मणतां ? जिनोवा शहरीं ?

**ट्यूबॉल**--याच जिनोवा शहरीं तुमच्या मुलीनें एका रात्रींतल्या रात्रींत पन्नास पाउणशें मोहरा उधळल्या असेंही मी ऐकलें.

**शायलॉक**—हाय ! हाय ! तुम्ही ही माझ्या छातींत कट्यारच भोंसकली. हाय ! हाय ! माझा पैसा ! माझें सोनें आतां पुन्हां माझ्या दृष्टीस कसें पडणार ! पन्नास पाउणशें मोहरा एका बैठकीला उडविल्या ह्मणतां ? पन्नास पाउणशें अं !

**ट्यूबॉल**--व्हेनिसपर्यंत अन्टोनियोयाचे कित्येक धनको माझ्या बरोबर आले, ते सांगत होते कीं, अन्टोनियोयाचा मतलब आतां खाका वर करण्याचा आहे.

**शायलॉक**--फार उत्तम, मी आतां त्याचा चांगला छळ मांडीन. फार उत्तम, ही आनंदाची खबर आहे. मी त्याचीं हाडेंनी हाडें मोडीन.

**ट्यूबॉल**--शिवाय तुमच्या मुलीनें एक माकड घेतलें आणि आंगठी दिली, ती त्याच इसमानें मला दाखविली.

**शायलॉक**--धिःक्कार असो त्या कारटीला ! शेटजी, हें सांगून मात्र तुम्ही मला पराकाष्ठेचें दुःख देतां- अहो त्या अंगठीवर माझा तो अमोल सूर्य-

कांत बसविलेला होताना, लग्नाच्या वेळीं माझ्या बायकोनें तो मला दिला होता. अरेरे ? माकडांचे कळपचे कळप कोणी जरी मला देऊं केले असते तरी मी तें रत्न हातचें जाऊं दिलें नसतें !

**ट्यूबॉल**—पण कायहो ! अन्टोनियो आतां अगदीं जमीनदोस्त झाला; नाहीं का ?

**शायलॉक**—हो तें खरें. अगदीं खरें आहे. तर आतां कोणी चांगला बेलीफ पाहून ठेवा. आणखी पंधरा दिवसांनीं रोख्याची मुदत भरेल. ती टळून गेली कीं, मी त्याच्या काळजाला हात घालतों. आणखी एकदा ही पीडा नगरांतून गेली ह्मणजे सुटलों. मग वाटेल तसा व्यवहार करतां येईल. शेटजी, तर आतां जा, आणि मग आपल्या देवळांत मला भेटा.

( जातात. )

---

## प्रवेश २ रा.

स्थळः—पोर्शियेच्या घरांतील एक दालन.

( बसॅनियो, पोर्शिया, ग्रॅशियानो, नेरिसा व कांहीं नोकर प्रवेश करितात. )

**पोर्शिया**—हें पहा, आणखी एक दोन दिवस जाऊंद्या. कृपा करून एकाएकीं हें साहस करूं नका. कारण जर आपले हातून भलत्याच करंडकाची निवड झाली, तर मला आपल्या सहवाससुखाला मुकावें लागेल. ह्मणून ह्मणतें आणखी कांहीं दिवस तरी आपण येथें रहावें. हें ह्मणजे मी प्रेमवशतेमुळें ह्मणतें असें नाहीं, तथापि आपणाविषयीं मला तिटकारा आहे असेंही नाहीं. तरी पण बाई काय असेल तें असो. आपणाला जाऊं द्यावें असें कांहीं मला वाटत नाहीं, तथापि मला कायवाटतें हें माझ्यासारख्या कुमारीला उघड बोलून दाखवितां येत नाहीं, ह्मणून खरी स्थिती काय आहे हें आपणास नीटसें कळणार नाहीं. मला तर असें वाटतें कीं, आपण कीं नाहीं येथें आणखी दोन महिने तरी घालवावे. एवढे अवकाशांत कोणता करंडक निवडावा हें मी आपणाला चांगलें शिकवीन.पण काय करावें बाई मेली शपथ घेतली आहेना? ती तर मी कधीं नाहीं मोडणार. ह्मणून तसेंही करवत नाहीं. न जाणो आपण भलताच करंडक पसंत कराल अशी बाई

मला फार भिति वाटते. आणि असें झालें तर बाई आपल्याकरितां माझी शपथ मोडण्याचें पातक करण्याची न जाणो मला बुद्धि होईल. खचीत—कोण हे डोळे मोहक तरी! त्यांकडे पाहून तर बाई मी कीं नाहीं अगदीं भांबावून गेलें आहें. व माझें मनहि कसें कावरें बावरें झालें आहे. आतां फार काय सांगू ?—मी अर्धी अधिक तर आपलीच झालें आहें. पण माझ्या हृदयाचा कांहीं भाग माझा ह्मणून राहिला असला तर तोहि माझा ह्मणून आपलाच झाला. तात्पर्य, मी सर्वस्वीं आपलीच हें उघडच आहे. हा काळ तरी बाई किती विपरीत ह्मणावा ! मनुष्यांना आपल्या नैसर्गिक हक्काप्रमाणें जी वस्तु आपली ती आपली ह्मणून ह्मणण्याची देखील मेली या काळांत चोरी असावीना ? ह्मणून मनानें जरी मी तुमची आहे तरी बाहेर तसें कुठें सांगता येत आहे ? आग लागो माझ्या त्या दैवास! जर कांहीं उलट सुलट झालें तर मीं तरी काय करावें? त्यांत मजकडे काय बोल? खरोखर ही सारी माझी तुह्मांला बडबड वाटेल, पण करंडक निवडण्याचें काम थोडें तरी लांबणीवर पडावें ह्मणूनच मी येवढा वेळ बोललें.

**बसॅनियो**——मला कोणता तो करंडक एकदां लवकर निवडूं द्याल तर बरें. कारण हल्लीं माझा जीव जसा

चक्रावर पडला आहे—केवळ प्राणांतिक अवस्था झाली आहे.

**पोर्शिया**—काय? आपली प्राणांतीक आवस्था झाली आहे ह्मणतां? मग आपण आह्मांला तिचें खरें खरें कारण सांगाल काय? लग्नाविषयीं व प्रेमसंबंधीं गोष्टी बोलावयाच्या त्या सोडून अशा वेळीं प्राणांतीक अवस्था व्हायला असें तें कारण काय झालें?

**बसॅनियो**—छे, छे, तसें कांहीं नाहीं. तो आपला अविश्वास आहेना?—त्यामुळें मन अस्वस्थ होतें झालें. प्रेमसंबंधीं गोष्टी बोलायला मोकळेपणा वाटत नाहीं.

**पोर्शिया**—हं: हं: मी समजलें, मला वाटतें आपली प्राणांतिक अवस्था झाली आहे खचीत. ह्मणूनच आपण घाबरून गेल्यामुळें कांहीं तरी बोलत आहां.

**बसॅनियो**—मला जीवदान मिळत असेल तर मी काय खरें तें सांगतों.

**पोर्शिया**—जीवदान दिलेंच आहे. तर आतां मन मोकळें करा, खरें आणि काय तें सांगा.

**बसॅनियो**—आणखी खरें तें काय सांगायचें? सांगायचें मिळून इतकेंच कीं, मी आपल्या प्रेमाचा भुकेला आहें, वा: ज्यानें संकटांत घालावें त्यानेंच त्यांतून मुक्त होण्याचा मार्गहि दाखवावा हें योग्यच आहे. बरें असो. एकदां त्या करंडकांकडे जाऊं या

ब्रह्मदेवानें कोणता करंडक निवडण्याचें माझे नशिबीं लिहिलें आहे तें पाहतों.

पोर्शिया--ठीक आहे. चलावें, त्यांपैकीं एकांत माझी तसबीर घालून ठेवली आहे. माझ्यावर जर आपलें अकृत्रिम प्रेम असलें तर तो आपणांस सहज निवडून काढतां येईल. ( नोकरांकडे पाहून ) नेरिसे, तुह्मी कोणीही यांच्याजवळ असूं नका बरें; आणि करंडक पसंत करित असतांना वाद्यघोष चालू ठेवायाला सांग. कारण यांना या कामांत जर अपयश आलें तर यांची गती, अंतकालींही मंजुळस्वनीरत राहणाऱ्या राजहंसाप्रमाणें व्हावी हें योग्य आहे. राजहंसाशीं यांची मीं जी ही तुलना केली ती अगदीं बरोबर व्हावी. म्हणून मी आणखी असेंही ह्मणतें कीं, यांची अशी विव्हळ स्थिति झाली तर ह्या राजहंसाला मी आपल्या अश्रुपूरांनीं भरलेल्या डोळ्यांमध्यें निवासस्थान देईन.--बरें ! माझ्या सुदैवानें यांना यश आलें तर राज्याभिषेकाच्या वेळीं नूतन राजाला अभीष्ट चिंतन करणारी त्याची नवी राजनिष्ठ प्रजा वंदन करीत असतांना जसा वाद्यांचा जयघोष होतो तसा याही वाद्यांचा ध्वनि भासेल, अथवा विवाहाविषयीं उत्कंठित व स्वप्नसृष्टींत तल्लीन होऊन गेलेल्या वराच्या कानीं मंजुळ वाद्यांचे स्वर पडले असतां ते विवाहविधीची सिद्धता झाली असें

सुचवितात व त्याला आनंदित करतात, त्याचप्रमाणें हाही मंगल वाद्यांचा घोष मोठा शुभप्रद व अल्हाद्-कारक होईल. खोटें नाहीं सांगत—मला तर असें त कीं पुराणांतल्या गोष्टीप्रमाणें मला जशी बळी देण्यास काढली आहे वाटतें. आणि त्या गोष्टींत बळीद्यायाला काढलेल्या कुमारीकेला सोडविण्याकरितां जसा प्रतापवान् वीर पुरुष पुढें आला असें वर्णिलें आहे त्याचप्रमाणें हेही निघाले आहेत. यांची चालण्याची ऐट तरी कशी डौलदार आहे पहा ! ( बसॅनियोस उद्देशून ) तर जा बरें ! आपण तिकडे जा; आपण या कार्यांत यशस्वी झाला ह्मणजे माझे जीवांत जीव येईल. आपल्या या प्रकरणाचा शेवट कसा काय होतो हें मी आपल्याहूनही फार उत्कंठेनें पाहात राहतें.

( गाणें सुरू होतें. व त्याच वेळीं बसॅनियो करंडकाबद्दल स्वतःशीं विचार करतो. )

## प्रीति सावलीचें करुणगीत.

**श्लोक**—( कामदावृत्त. )

जन्मली कुठें प्रीतिकल्पना ?
सत्य तें वदा त्यजुनि जल्पना ।
हृदयपंकजीं ह्मणति जन्मली, । ह्मणतिही मनोऽभ्यंतरस्थलीं ॥१॥

मजसि तों गमें जन्म ही धरी
नयनमांदिरीं भुवनसुंदरी ।
निमिषचालनें उदय पावली । वीक्षणें तशी पुष्ट जाहली ॥ २ ॥

गोष्ट परि पुढें काय वर्तली ?–
ही चया क्षणीं नष्ट जाहली ।
दृष्टमात्रही केविं लोपली । हाय हायरे ! शुद्ध सावली ॥ ३ ॥

पाळण्यांतचि स्वर्ग गांठिरे !
प्रीति सावली हायहायरे !
करुणगीत या प्रीतिचें पुरें । तरि ह्मणूं मुखीं हायहायरे ! ॥ ४ ॥

क्षणिक मात्र हो प्रीति जी दिसे
कायतरि तिचें काम तें असे ?
शुद्धरूप जी हृदयभावना । तीच आदरूं बोध घ्या मना ॥ ५ ॥

( सगळे जातात. )

**बसॅनियो**––आणि अशाच रीतीनें या जगांत वस्तूंचें बाह्य स्वरूप पाहून कांहीं लोक फसत असतात. त्याचें कारण म्हटलें ह्मणजे कल्पनेचे नुसते तरंग हेंच होय. तरी पण बाहेरच्या डौलावरूनच ही दुनिया झुकत आलेली आहे. बरें न्याय अन्याय कोणता हें पाहिलें तर जी धडधडीत खोटी गोष्ट तिचा खोटेपणा एखादा वकील केवळ आपल्या पांडित्यानें व शब्दजालानें लपवून टाकतो, नाहीं काय ? धर्मसंबंधानें विचार करतांनाही हीच स्थिति दृष्टीस पडते. एखाद्या अधर्माच्या किंवा भ्रष्टतेच्या कृत्याचें समर्थन करण्याकरितां, त्याचें खरें घाणेरडें स्वरूप लपविण्याच्या हेतूनें धर्मग्रंथांच्या वचनांची ओढाताण करून पाहिजे तसे आधार काढून दाखवितां येत नाहींत काय ? मला वाटतें कीं, दुर्गुणांचें हिडीस अंतरंग उघडकीस न यावें

ह्मणून त्यांवर बहुधा सदगुणाचें सुंदरसें पांघरूण घातलेलें असतें. ज्यावर असें पांघरून घातलेलें नाहीं असा एकही दुर्गुण जगांत मिळावयाचा नाहीं. ज्यांचें अंतःकरण एखाद्या शोभिवंत इमारतीच्या वाळूच्या पायाप्रमाणें भुसभुशीत आहे असे कित्येक भित्रे लोक आपला भित्रेपणा लपविण्यासाठीं मोठ्या शूरांस शोभेल असा पोषाख चढवून शौर्याची बढाई दाखवितात. पण त्यांचे अंतरंगाकडे पाहूं गेलें तर तें केवळ मृदु असतें. बरें, सौंदर्याविषयीं विचार करावा तर असेंच दृष्टोत्पत्तीस येतें कीं, उसन्या सौंदर्याचीं पाहिजे तेवढीं साधनें व भूषणें विकत मिळतात. सौंदर्याच्या या साधनांनीं जगांत असे कांहीं विलक्षण चमत्कार घडून येतात कीं कांहीं पुसूं नये. अशा भूषणांनीं ज्या स्त्रिया आपलीं शरीरें नटवितात, त्यांच्या ठिकाणीं खऱ्या सौंदर्याचें नांवही नसतें. पण खरें पाहिलें तर तीं भूषणें दुसऱ्याच कोणाचें तरी—किंबहुना मेलेल्या माणसांचीं असतात. तीं जशाचीं तशींच किंवा त्यांत कांहीं फेरबदल होऊन त्यांच्या सौंदर्यांत भर घालतात. यामुळेंही भर म्हटली ह्मणजे उसनी. सारांश, ज्या किनाऱ्यावर नेहमीं तुफानें होतात तो जसा कित्येक वेळां रमणीय दिसतो व जलपर्यटण करूं इच्छिणाऱ्या प्रवाशाला भुरळ पाडतो, तसेच हें उसने अलंकार होत.

त्याचप्रमाणें कोणी स्त्री स्वतः कुरूप आहे व वर्णानें काळी आहे. तेव्हां ती तोंडावरून बुरखा घेते; हा तिचा हे दोष दृष्टीआड करणारा बुरखा किती बहुमोल व मनोहर असतो बरें? तात्पर्य, बाहेरून जें कांहीं चांगलें व सुरम्य दिसत असतें तें खरोखरी तसें नसतें; व त्यामुळें शहाणे शहाणे सुद्धां मोहाच्या जाळ्यांत सांपडतात. यासाठीं मी ह्मणतों, शहाण्या लोकांसही आपल्या मोहक वर्णाच्या नादीं लावून फशीं पाडणाऱ्या हे सुवर्णा, मी तुझें अवलोकनही करणार नाहीं. हें रुपें तर काय पुसतां?—माणसांमाणसांमध्यें भयंकर कलह लावितें. तेव्हां त्याचेंहि नांव मला नको. पण हें शिसें तर केवळ क्षुद्र व निस्तेज ना?—तरी तें काय ह्मणते पाहूं. अरे बाबा! तुझ्यापासून मला कांहीं लाभ नाहीं. हें मी कबूल करतों. व अशाविषयीं तूं मला धमकी देऊन वजावतेंस हेंही खरेंच. तथापि ज्या ह्या ओळी तुझ्यावर कोरल्या आहेत त्यांजकडे मी लक्ष देत नाहीं. पण केवळ तुझ्या या फिक्कटपणाकडे पाहून माझें मन तुझ्याकडे विशेष ओढ घेतें, तर मी तुझाच स्वीकार करतों. आतां, याचा परिणाम गोड होवो ह्मणजे झालें.

**पोर्शिया**—( स्वगत ) काय बाई तरी चमत्कार हा! निरुपायास्तव प्राप्त झालेली निराशा या क्षणीं पार

लयास गेली ! दृष्टी अंध करून टाकणारा मत्सर नाहींसा झाला ! व मनाला अस्वस्थ करणाऱ्या भीतीचा अंत झाला ! हे सर्व मनोधर्म क्षणभर टिकणाऱ्या धुक्यांप्रमाणें एकेच वेळीं कसे लयास गेले पहा ! रे मदना, सुखामृताचा माझ्यावर एकसारखा वर्षाव करून मला कां एवढी भांबावून सोडतोस ? मी ह्मणते हा हर्ष किंचित मर्यादितच ठेव. आनंदाच्या अतिरेकानें माझी किं नाहीं बाई कशी विलक्षण स्थिति होऊन गेली आहे ती बोलून दाखवितां येत नाहीं. बाई, बाई, बाई ! यानें मला वेड तर नाहींना लागणार !

**बसॅनियो**—यामध्यें हें काय बरें ठेविलेलें आहे ? ( शिशाचा करंडक उघडितो ) आहाहा, ही तर या चारुगात्रींची प्रतिमा ! आपल्या अलौकिक कौशल्यानें ब्रह्मदेवाप्रमाणेंच ही प्रतिमा तयार करणारा असा हा चित्रकार तरी कोण ? फार काय सांगावें ? हिच्या डोळ्यांमधलीं ही बुबुळें हालत आहेत ! अथवा, त्यांचें प्रतिबिंब माझ्या डोळ्यांत पडल्यामुळेंच तर मला असा भास होत नसेल ? आहाहा ! या बिंबाधरेच्या मुखांतून निघणारा हा निश्वास तरी किती मधुर आहे ? आणि या योगानें विलग्न झालेले हिचे हे ओष्ट तरी किती रमणीय दिसत आहेत ? जिवलग मित्रांचा जर वियोग होणें असेल

तर तो असाच व्हावा ! हिचे केशकलाप सिद्ध करतांना त्या चित्रकारानें तर आपल्या कौशल्याची कमाल केली आहे. असे तेजस्वी व बारीक व सुतेरे कोळ्यालाही तयार करतां येत नसतील. फार काय सांगावें. या चिताऱ्यानें केलेला हा तेजस्वी केशकलाप इतका सर्वोत्कृष्ट आहे कीं, मनुष्याचीं अंतःकरणें इतकी घट्ट व निश्चितपणें आकर्षून घेण्याची त्यानें ही एक युक्ति केली आहे, असेंच वाटतें. अशी खुबी त्या कोळ्याच्या जाळ्यांत कोठली ? त्याला या सुंदर चित्राचे हे डोळे इतके हुबेहुब कसे बरें तयार करतां आले ? मला तर वाटतें त्यानें चित्रांतले डोळे तयार केल्याबरोबरच त्याच्या स्वतःच्या डोळ्यांतील सर्व तेज यांमध्यें येऊन उतरलें असेल. आणि त्याची स्वतःची दृष्टी नाहींशी झाली असले. मग त्यानें हें चित्र पुरें तरी कसें केलें कोण जाणें बुवा ? माझ्यापुढें जी ही आहे ती केवळ प्रतिमाच आहे; पण मीं केलेलें हें वर्णन हिच्या पासंगासही पुरेसें नाहीं. मग, जीची ही प्रतिमा त्या सर्वांगसुंदरीच्या सौंदर्याची यथार्थ कल्पना माझ्या या वर्णनानें कशानें होणार ? बरें, पण या लिखितपत्रांत काय लिहिलें आहे, तें पाहूं—हो, या पत्रावरच माझें जीवीत अवलंबून आहे. ( वाचतो )

## श्लोक.

भलेरावजी ! ठीक केली परीक्षा,
नको बाह्य शोभा, तिचा काय लेखा ? ।
विवेकेंचकीं, दैव होतें प्रसन्न;
जगा दाविली गोष्ट ही शिष्टमान्य ॥ १ ॥

जिची मूर्ति येथें सुतेजें विराजे,
जिला लोभले मोटमोटेहि राजे,
वसे कीं तिची अंतरी प्रीति साची ?
तरि भेट घ्या आजि त्या सुंदरीची ॥ २ ॥

बरें योग्य दैवें दिलें जें तुह्माला,
जरि त्यांत संतोष वाटे जिवाला ।
जरि प्रीति साची, न गोडी दुजीची,
तरि भेट घ्या जा तिथें सुंदरीची ॥ ३ ॥

प्रिया ती शुभांगीं पहा येथ दारा,
पुढें बैसली तूमची हीच दारा-
स्वतां भेटीला जी हि उत्कंट झाली
करा धन्य ती भेटुनी कंट-नालीं ॥ ४ ॥

अहाहा ! ही पत्रिका किती मंगलसूचक आहे. हे कोमलांगि, या पत्रिकेंत जें लिहिलेलें आहे त्याला तुझी अनुमती आहेना ? तर हा पहा तुझा प्रियकर तुला आलिंगन देण्याला, व तुझें प्रेमपूर्ण चुंबन मिळावें ह्मणून किती उत्सुक झाला आहे पहा. एखाद्या मोठ्या साहस कृत्याला हात घातला आहे व त्यांत जो यशाची अपेक्षा करीत आहे अशा मनुष्याच्या आसपास जमलेले लोक जयघोष करून त्याची नावाजणूक करीत आहेत.

अशा वेळींही हा जयघोष आपणासाठींच होत आहे किंवा इतरांसाठीं होत आहे अशी क्षणोक्षणीं त्याला शंका येते. हे सुंदरी! या वेळीं माझीहि स्थिति अशीच झाली आहे. यासाठीं माझा हा प्रणयप्रस्ताव मान्य कर. आणि केला ह्मणून मला आश्वासन दे. ह्मणजे माझी वरील संशयवृत्ति दूर होईल. तोपर्यंत होणें कठीण.

**पोर्शिया**—महाराज, आपण माझा अंगिकार करण्याला कबूल आहां, हें माझें भाग्यच मी समजतें! आतां माझ्या मनांत कांहीं संशय उरला नाहीं. तथापि आपणाला मी शोभेन कीं नाहीं याची मात्र माझ्या मनाला असून शंका येते व तेवढ्याच करतां मला असें वाटूं लागतें कीं, सध्यां आहे त्याहून सहस्रपटीनें अधिक लावण्यसंपन्न व शतसहस्रपटीनें अधिक ऐश्वर्य संपन्न मी असतें तर बरें झालें असतें. सद्गुणानीं, स्वरूपानें, स्वभावानें वगैरे सर्व बाजूनीं मी कांहीं कमी नाहीं, असें समजून आपण मजवर सदोदीत प्रेम करावें एवढेंच आतां मागणें आहे. पण खरें पाहिलें तर माझे आंगीं असे गुण आहेत कोठें? मी आपली एक अजाण, अशिक्षित व वेडीबागडी अनुभवशून्य अशी एक कन्यका आहे! असें आहे तरी यांत ही एक समाधानाची गोष्ट आहे कीं, अजून माझें शिकण्याचें वय गेलें नाहीं. बरें,

लहानपणीं माझे मनावर शिक्षणाचा कांहींच संस्कार झालेला नाहीं असेंही नाहीं. तेव्हां ह्मणतें मी आपली यापुढेंहि शिकेन. सारांश, आपण कृपा करून जर माझा अंगिकार केला, व माझें तन-मन धन आपणांस अर्पण करण्याची माझी इच्छा आहे ती आपण पूर्ण केली ह्मणजे आपणच माझे प्राणेश्वर, माझे नियंते व माझे स्वामी असें मी समजेन. तर आपण ही गोष्ट मान्य करावी. ( बॅसॅनियो मान हालवितो. ) खरोखर मी जगांत धन्य झालें. महाराज, आजपर्यंत हें सर्व माझें होतें पण आतां आपलें झालें आहे. हें मोठें थोरलें माझें मंदिर, हे माझे नोकरचाकर, फार तर काय, हें माझें शरीर व प्रत्यक्ष मी या सर्वांची आजपर्यंत मी धनीण होतें; पण या क्षणापासून यांचा धनीपणा आपणाकडे आला आहे. तर आतां या सर्वांसह मी ही आंगठी आपणांस अर्पण करितें. हिचा आपण स्वीकार करावा. पण सांगून ठेवतें हो! आपण ही आंगठी कोणास देऊं नये किंवा आपणापासून जाऊं देऊं नये. असें झालें तर आपलें मजवरील प्रेम उडालें असें मला ह्मणावें लागेल व याबद्दल आपणांस निरुपायास्तव मला दोष द्यावा लागेल.

**बॅसॅनियो**--प्रिये! यापुढें मी काय बोलूं? बोलण्याला तूं जागाच ठेविली नाहींस तथापि माझे सर्वांगांत

रक्त सळसळूं लागलें आहे. यावरून माझा भाव काय आहे तो कोणालाही सहज कळण्यासारखा आहे. खरें विचारशील तर कोणा लोकप्रिय राजपुत्रानें लोकसमूहापुढें सुंदरसें वक्तृत्व केलें असतां तें ऐकून खुष झालेल्या त्या लोकांना आपला आनंद कसा प्रगट करावा हें कळेनासें होतें. व ते केवळ गोंगाट करूं लागतात. तद्वत् माझ्या मनाचा गोंधळ होऊन गेला आहे. असें झालें आहे तरी मी तुला निश्चयानें सांगतों कीं, ही प्रिय आंगठी माझ्या बोटांतून नाहींशीं होणार नाहीं. मी मरेन त्या दिवशीं नाहींशी झाली तर न कळे!

**नेरिसा**—(बॅसॅनियोकडे, पाहून व पोर्शियेस उद्देशून) बाईसाहेब, आपणां उभयतांचे मनोरथ पूर्ण झाले तर आतां परमेश्वरानें आपलें निरंतर कल्याण करीत जावें एवढीच त्याचेजवळ आमची सर्वांची प्रार्थना आहे.

**ग्रॅशियानो**—(पोर्शियेकडे पाहून व बॅसॅनियोस उद्देशून) महाराज, आपणां उभयतांस परमावधीचा आनंद प्राप्त होवो. एवढेंच मी इच्छितों. याहून आपल्या आनंदांत अधिक भर माझ्यानें तूर्त घालवत नाहीं. कारण महाराज, आपल्या विवाहाचा समारंभ जेव्हां करावयाचा आपले मनांतून असेल ते-

व्हांच माझ्याहि लग्नाचा विधी उरकून घ्यावा अशी आपल्यापाशीं या गरीब दासाची विनंती आहे.

**बसॅनियो**—हो हो, तूं ह्मणतोस तसेंच करूं बरें, हें तुला अगदीं मनापासून सांगतों. कोणी वरीशी बायको मात्र मिळाली पाहिजे.

**ग्रॅशियानो**—महाराज, आपल्या कृपेनें तीही मिळाली आहे; आपल्याप्रमाणेंच माझी दृष्टि पहिल्यापासून या बाबतींत चौफेर होतीच. आपलें मन बाईसाहेबांवर बसलें होतें; तर माझें मन या त्यांच्या दासीवर बसलें होतें. बाईसाहेबांवर आपलें जसें प्रेम आहे, तसें माझें हिच्यावर आहे. बरें आपला हेतु ह्मणजे माझ्या आधीं फळ झाला आहे असेंहि नाहीं. या बाबतींत दोघांनाही कांहीं दिवस वाट पाहावी लागली आहे. आपलें भाग्य ज्याप्रमाणें त्या करंडकांच्या त्रासदायक अटीवर अवलंबून होतें अर्थात आपले स्वाधीन नव्हतें, तसेंच माझेंहि दैव माझें स्वाधीन कुठें होतें? काय सांगूं हिची मनधरणी करितां करितां माझा घसा कसा कोरडा पडून गेला होता. हो ना करतां करतां एकदाची माझ्या ह्मणण्याला ही कबूल झाली; आणि त्याप्रमाणें हिनें मला वचनही दिलें तथापि ही गोष्ट आपल्या व बाईसाहेबांच्या या मंगलकारक योगावर अवलंबून राहिली होती.

नेरिसा—असं खरं. पण बाईसाहेब, आपली मर्जी असली तर!

बसॅनियो—कायरे बुवा तुझाहि विचार असाच आहेना?

ग्रॅशियानो—होय, महाराज, अगदीं खरोखर असाच माझा विचार आहे.

बसॅनियो—ठीक आहे. तुमच्या लग्नानें खरोखर आमच्या समारंभाला मोठीच शोभा येईल. अरे, इकडे हा कोण येत आहे? हा कोण? लोरेन्झो? आणि हीच का ती धर्मभ्रष्ट जेसिका? आणि तो पलीकडे कोण? व्हेनिस नगरचा माझा मित्र सोलॅनियो?

(लोरेन्झो, जेसिका, सोलॅनियो व व्हेनीस नगराहून आलेला एक दूत हीं सगळींजणें प्रवेश करतात.)

बसॅनियो—या या, असे इकडे या. या घराच्या धनिणीशीं इतक्यांतच, माझा संबंध झाला आहे. तेव्हां यांच्या घरीं मी तुमचें स्वागत केलें तर त्या नको ह्मणणार नाहींत अशी माझी खात्री आहे. (पोर्शियेकडे वळून) प्रिये, आलेल्या या माझ्या मंडळीचें आगतस्वागत केलें पाहिजे, नाहीं बरें?

पोर्शिया—महाराज, हें काय विचारावे? या मंडळीचें मी मनापासून स्वागत करितें.

लोरेन्झो—महाराज, हे आपले आम्हांवर मोठे उपकार होत. माझें आपल्याशीं जें कांहीं काम आहे,

त्याकरितां मला ह्मणजे येथवर आलेंच पाहिजे होतें असें नाहीं. माझा बेत तर दुसरीकडे आपली भेट घ्यावी असा होता. पण हा सोलॅनियो ऐकेना. इकडे येण्याविषयीं त्यानें मला मनस्वी आग्रह केला ह्मणूनच मी येथें आलों.

**सोलॅनियो**—होय, महाराज, मी याला आग्रह केला; नाहीं ह्मणत नाहीं. पण तो उगाच नाहीं केला. आपल्या ॲन्टोनियो शेटजींनीं कांहीं कामासाठीं आपल्याकडे माला मुजरत पाठविलें आहे.

( बसॅनियोला एक पत्र देतो. )

**बसॅनियो**—मी हें फोडून पाहतों; पण आधीं माझ्या परम प्रिय मित्राचें काय वर्तमान आहे, तें तर सांग.

**सोलॅनियो**—महाराज, मानसिक व्यथेवांचून त्यांना कांहीं पिडा नाहीं. आणि मानसिक व्यथा जर मागें आहे तर बरें आहे ह्मणून तरी कसें ह्मणावें? त्यांनीं दिलेल्या पत्रांत सर्व हकीकत लिहिली असेलच.

**ग्रॅशियानो**—( नेरिसेकडे पाहून ) आलेल्या या पाहुण्याबाई पलीकडे उभ्या आहेतना? त्यांचा नीट आदरसत्कार कर बरें. ( सोलॅनियो यांस ) अरे, अमळ इकडे ये. व्हेनीस नगराहून काय खबर आणली आहेस? तो श्रेष्ठ व्यापारी ॲन्टोनियो—

त्याचें कसें काय आहे ? आमच्या झालेल्या या नवीन संबंधाची बातमी ऐकून त्याला आनंद झाला असेलसें मला वाटतें. आह्मी आमच्या कामांत यशस्वी झालों आहों.

**पोर्शिया**—( स्वगत ) अग बाई ! आतां आलेलें पत्र वाचतां वाचतां, तिकडची मुद्रा एकाएकीं इतकी निस्तेज कां बरें दिसूं लागली ? यावरून पत्रांत कांहीं तरी विपरीत बातमी असावीसें वाटतें. तिकडचा कोणी जिवलग मित्र मरण पावल्याची तर बातमी यांत नसेलना ? नाहीं तर जगांत दुसरें असें दुःखद काय आहे ? येरवीं मुळची निश्चल व स्थिर अशी नेहमींची वृत्ति, एकाएकीं इतकीं बदलली नसती. ( मोठ्यान ) काय ? यांचें तोंड तर अधिक अधिक उतरत चाललें. महाराज, या पत्रांत काय लिहिलें आहे तें मला आपण सांगाल काय ? मी आपली अर्धांगी आहें, आपल्या सुखदुःखाची मी वांटेकरीण आहें, तर यांत जें कांहीं असेल तें मजपासून लपवून ठेऊं नका. खरें, खरें तें सांगा.

**बसॅनियो**—काय सांगूं ? प्राण वल्लभे, इतक्या अप्रिय शब्दांचा आजपर्यंत कोणत्याही कागदाला डाग लागला नसेल. यांत केवळ हृदयाला वेग आणणारे शब्द आहेत. प्रिये, माझें तुझ्या ठिकाणीं असलेलें

प्रेम ज्या वेळीं मी तुला पहिल्यानें कळविलें त्याच वेळीं मी तुला हेंही कळविलें होतें कीं, मजजवळ जी कांहीं संपत्ती आहे तें माझें थोर कुलशील; आणि तें कांही खोटें नाहीं. पण असें सांगण्यांत मी हें कांहीं तरी सांगून वेळ मारून नेली असें तुला वाटेल. पुढें, मी खरोखर अगदीं निर्धन आहें असें जेव्हां तुला सांगितलें तेव्हां मी किती कंगाल आहें याची तुला कल्पनाही झाली नसेल. प्रिये, काय सांगूं ? माझ्या या कार्यासाठीं मला जो पैसा पाहिजे होता, तो, मीं माझ्या एका जिवलग मित्राची मान प्रत्यक्ष त्याच्या वैऱ्याच्या हातीं देऊन, घेतला आहे. हें पहा त्याचें पत्र. हें पत्र केवळ त्याचें शरीरच होय. यांतील एक एक शब्द केवळ त्याच्या हृदयावरील जखमा होत. या जखमा त्याच्या हृदयांतील रक्ताचा प्रवाह कसा बाहेर पाडीत आहेत पहा ! (सॅलॅनियोकडे वळून) पण मित्रा, त्याला व्यापारांत पक्की ठोकर बसली ही गोष्ट खरीना ? त्याला कुठेंच यश आलें नाहीं ? ट्रिपोली, मेक्सिको, लिस्बन, बार्बरी, व इंडिया, इतक्या ठिकाणांहून त्याचीं जहाजें यावयाचीं होतीं. पण त्यांतून एकही जहाज निभावून नाहीं आलें ह्मणतोस? गलबतांचा नाश करून टाकणाऱ्या भयकर खडकावर सर्वच आपटलीं !

**सोलॅनियो**–होय महाराज, सर्व आपटलीं ! त्याशिवाय त्या यहुद्याचें कर्ज फेडण्याकरितां, ॲन्टोनियो याला कोणी रक्कम पुढें केली तर तीही घेण्याला तो यहुदी आतां कबूल नाहीं. छे, बुवा, असला कावेबाज, पाताळयंत्री, पैशाला हपापलेला, व मनुष्यघातक असा माणूस कधीं कोणीं पाहिला नसेल ! काय सांगावें ! महाराजसरकारकडे कसा तो रात्रंदिवस एकसारखा खेपा घालीत असतो; तो ह्मणतो आमच्या जातीच्या लोकांचे अमुक अमुक हक्क आहेत, त्यांचें तुह्मीं रक्षण करा–माझा योग्य न्याय करा ,' असें गयावया करून तो त्यांस ह्मणतो. स्वतः महाराजांनीं त्यास पुष्कळ सांगितलें, व दहावीस व्यापाऱ्यांकडूनही या बाबतींत त्याला सांगविलें पण तो कांहीं ऐकत नाहीं व रोख्यांतील अटीचा फांस यत्किंचीत्‌हि ढिला करण्यास तो तयार नाहीं.

**जेसिका**—नाहीं, तसें तो करणार नाहीं खराच. मी त्याचे घरीं होतें तेव्हां तो आपले जातभाईपाशीं ह्मणत असे कीं, ' अन्टोनियोनें ' कर्जाच्या वीसपट रक्कम जरी मला आणून दिली तरी ती मला नको. मला त्याच्या अंगाचें मांस पाहिजे. तें मी घेतल्यावांचून कधीं सोडणार नाहीं. मला तर वाटतें, कायद्याची कांहीं युक्ति निघाली तर बरें, असें कांहीं झालें नाहीं, आणि न्याय मिळण्याची

कांहीं खटपट झाली नाहीं, तशीच अधिकाऱ्यांची अनुकुलता करून घेतां आली नाहीं तर शेटजींच्या जिवावर बेतल्यावांचून खचीत राहणार नाहीं.

**पोर्शिया**—महाराज, आपला प्रियमित्र खराच का अशा संकटांत सांपडला आहे?

**बॅसॅनियो**—होय, अतिशय उदार अंतःकरणाच्या व अत्यंत थोर मनाच्या, कीं जो सर्व इटॅली देशामध्यें प्राचीन रोमन लोकांच्या नांवलौकिकाला शोभेल अशी ज्याची दिलदारपणाची वागणूक आहे, व चार चौघांत ज्याला मान आहे, ज्याला आजपर्यंत विपत्ति कधीं माहीत नव्हती, ज्याचे घरीं संपत्तीला कधीं तोटा नाहीं, अशा माझ्या परमप्रिय एका मित्रावर असा दुर्धर प्रसंग ओढवला आहे.

**पोर्शिया**—बरें, पण आपल्या मित्राला त्या यहुद्याचें असें देणें तरी किती आहे?

**बॅसॅनियो**—तिन हजार मोहरा.

**पोर्शिया**—इतकेंच का? तर त्याला तिहींच्या ठिकाणीं सहा हजार देऊन रोखा फाडून द्या, ह्मणजे झालें. केवळ आपल्या निमित्तानें जर एवढा थोर गृहस्थ अशा पेचांत आला आहे, तर मी ह्मणतें त्याच्या केसालाहि धक्का लागतां कामा नये. त्यास सोडविण्याकरितां तीन हजार किंवा साहा हजार किंवा

त्याच्या तिप्पट पैसे पडले तरी चिंता नाहीं. पण अगोदर माझ्या बरोबर देवळांत चला व धर्मोपदेशकाकडून आपला लग्नविधी उरकून घ्या. आणि मग क्षणाचाही विलंब न करितां व्हेनीस नगरीं आपला मित्र आहे तिकडे जा. जोंवर आपले जिवास समाधान नाहीं, तोंवर आपण मजजवळ रहावें असा हेका धरणें हें मला उचीत दिसत नाहीं. कर्जाच्या वीसपट रक्कम देण्याला माझ्यापाशीं सोनें तयार आहे. तें घ्या व कर्ज देऊन टाकून आपल्या मित्राला संकटांतून सोडून बरोबर आणा. आपण परत येईपर्यंत आह्मा दोघींना अगदीं चैन पडणार नाहीं. चला तर आतां अगोदर विवाहविधी उरकून घेऊं या; ह्मणजे आपणास एकमेकांचा आनंदानें निरोप घेऊन जावयास ठीक पडेल. ज्या अर्थी मी आपणाला एवढा खर्च करून आपलेसे केले आहेत त्या अर्थी मीही आपल्यावर नेहमीं मनापासून प्रेम ठेवून आपणाला जपत जाईन. बरें पण आधीं आपल्या मित्राचें तें पत्र मला वाचून दाखवा पाहूं?

**बसॅनियोः**–( पत्र वाचतो )

'प्रियमित्रा, माझीं सर्व जहाजें समुद्रांत बुडालीं. कर्जदारांनीं निर्दयपणें माझे मागें तगादा लावला आहे. माझी सर्व संपत्ती नाहींशी झाली. त्या यहुद्याच्या करार-

नाम्याची मुदत टळून गेली आणि त्यांतील अटी जर सरकार पुन्हा करून देईल तर मी जिवंत राहीन असें वाटत नाहीं. यापुढें तुझें माझें घेणें देणें संपलें असें समज. माझी शेवटची इच्छा तुला भेटावें एवढीच आहे. पण ती पुरी करणें किंवा न करणें हें सर्वस्वी तुझ्यावर अवलंबून आहे. माझ्यावर जर तुझें प्रेम असेल व मला भेटावेंसे तुला वाटत असेल तर मला येऊन भेट. केवळ पत्र आलें आहे येवढ्याचकरितां ह्मणून येण्याचें कारण नाहीं.'

**पोर्शियो**—प्रियकरा, सर्व कामें एका बाजूला ठेवून आधीं निघण्याची त्वरा करा पाहूं?

**बसॉनिया**—बरें आहे. तुझी परवानगी आहे तर मी हा निघालोंच. काम झालें कीं मी क्षणभर कोठें थांबणार नाहीं. एकदम इकडेच परत येईन.

( जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थळ**--व्हेनिस शहरांतील एक रस्ता.

(शायलॉक, सोलेनियो, अंटोनियो व बंदीपाल प्रवेश करतात.)

**शायलॉक**—अहो, बंदीपालहो, त्याजवर नीट नजर ठेवा बरें. (लोकांस उद्देशून) छे, छे, त्याजबद्दल दयेचा शब्दसुद्धां काढूं नका. अहो याच मुर्खानें लोकांना बिन व्याजी पैसे देण्याचा सपाटा लाविला होता !( बंदीखान्याच्या अधिकाऱ्यास उद्देशून. ) त्याजवर नीट नजर ठेवा ह्मणून ह्मणतोंना !

**ॲन्टोनियो**—अहो, शेटजी, मी काय ह्मणतों तें आधीं ऐका तर खरें.

**शायलॉक**--तें कांहीं नाहीं. रोख्यांत ठरल्याप्रमाणें मी करणार; त्याबद्दल मीं अगदीं शपथ घेतली आहे; आणखी त्या बाबतींत तूं मजपाशीं मुळींच बोलूं नको. कारण नसतांना तूं माझा अपमान केलास. मला श्वान ह्मटलेंस.-हो पण—मी ज्या अर्थी कुत्रा आहें, त्या अर्थी माझे सुळेही मोठे तीक्ष्ण आहेत, हें लक्षांत ठेव. आणि महाराजसरकार माझा न्याय केल्यावांचून राहणार नाहींत हेंही विसरूं नको. अहो बंदीपालहो, त्यानें काय सांगितलें; तुह्मी मूर्ख तर नाहीं झालां? अहो, त्यानें सांगितलें; ह्मणून काय झालें. तुह्मीं आपले त्याच्या बरोबर पाहिजे तितके लांब येणार कींकाय?

**ॲन्टोनियो**--मी काय ह्मणतों तें कृपा करून ऐकून तर घ्या.

**शायलॉक**--छत् तें कांहीं एक होणें नाहीं. ठरल्याप्रमाणें मी करीन. मी तुझें मुळींच कांहीं ऐकत नाहीं. ठरल्या कलमाची अम्मलबजावणी केल्यावांचून मी राहणार नाहीं, एकच सांगतों. तर तूं आतां तोंडांतून एक ब्र सुद्धां काढूं नको. तुझ्या जातीच्या या ख्रिस्त्यांची मध्यस्ती ऐकून घेऊन ते सांगतील त्या गोष्टीला मान डोलविण्याइतकें माझें अंतःकरण मृदु नाहीं. किंवा सहज फसण्याइतका मी अजागळ नाहीं. जा, चल जा, आतां माझ्यामागें येऊं नको, आणखी उगीच वटवटही लावूं नको. माझा निश्चय कधींही ढळणार नाहीं.

**सॅलॅरियो**--छे, असल्या दुष्ट हरामखोराशीं संबंधही नसावा.

**ॲन्टोनियो**--जाऊं दे. असल्या पाषाणाचीं कोण आर्जवें करतो. मी नाहीं त्याचे मागें लागत. येऊन जाऊन त्याचे मनांतून माझा प्राण घ्यावयाचा आहे, एवढेंच ना? आणि याचें कारण इतकेंच कीं जे कोणी त्याच्या तडाक्यांत सांपडून मजकडे रडत येत, त्यांस मी आधार देऊन त्या दुष्टापासून त्यांचें रक्षण केलें. याचसाठीं त्यानें माझ्यावर एवढा दांत धरिला आहे.

**सॅलॅरिनो**—मला तर खात्रीनें वाटतें कीं, तो ह्मणत आहे त्याप्रमाणें महाराजसरकार त्याला तसें कधीं करूं देणार नाहींत.

**ॲन्टोनियो**—कायदा जें ठरवील तें महाराजांच्यानें कधींही मोडवणार नाहीं. ते असें करूं लागले तर परदेशचे जे शेंकडों लोक या व्हेनीस नगरांत आले आहेत ते त्यांला याबद्दल नांवें ठेवतील. व यांच्या राज्यांत न्याय नाहीं असें ह्मणतील. कारण या शहरांतील व्यापार, व्यवहार व त्यासंबंधाचा नफा तोटा याच्याशीं त्या सर्व लोकांचा संबंध आहे. ह्मणून मी ह्मणतों हा नाद सोडून द्या. मला तर वाटतें माझ्यावर आलेल्या या विपत्तीमुळें व दुःखामुळें माझी जी विलक्षण स्थिति होऊन गेली आहे तीमुळें या रुधिरप्रिय यहुद्याला अस्थिपंजर मात्र उरलेल्या माझ्या या शरीरांत अच्छेर मांस सांपडेल कीं नाहीं याचीच शंका आहे. चला हो बंदीपाल. परमेश्वरा! त्या यहुद्याच्या ऋणांतून मुक्त होत असतांना बॅसॅनियोची व माझी एकदा भेट व्हावी हीच काय ती अखेरची माझी इच्छा राहिली आहे, आणखी कांहीं नाहीं.

( जातात. )

———

## प्रवेश ४ था.

**स्थळ**:–बेलमान्ट. पोर्शियेच्या घरांतील एक दालन.

(पोर्शिया, नेरिसा, लोरेन्झो, जेसिका, व बॅलथेसर प्रवेश करितात.)

**लोरेन्झो**—बाईसाहेब, मी तोंडापुरतें बोलतों असें समजूं नका. तर खरोखरच सांगतों, बॅसॅनियो महाराजांचा वियोग सहन करतांना आपणांस किती कष्ट पडतात, हें आपणच पाहा. हें जर आपण पाहाल तर अन्टोनियो आणि बॅसॅनिओ या दोघां मित्रांमध्यें केवढें असाधारण प्रेम असावें याची कल्पना आपणांस सहज होईल. आमच्या महाराजांवर अन्टोनियो शेटजींचें अत्यंत प्रेम आहे. आणि त्या अन्टोनियो शेटजींना संकटांतून मुक्त करण्याकरितां आपले यजमानांना आपण या वेळीं जाण्याची परवानगी दिली हें आपण मोठ्याच थोर मनाचें कृत्य केलें असें मला वाटतें. व या गोष्टीचा आपणास मोठा आनंद होईल. इतकेंच नाहीं तर अशा वेळीं सामान्य मनुष्य जें करील त्याहून आपणासारख्यांच्या हातून कांहीं तरी विशेष होईल असें मला खात्रीनें वाटतें.

**पोर्शिया**—हें पहा कोणतेंही कृत्य चांगलें म्हणून मीं एकदां केलें ह्मणजे मग त्याचा परिणाम कांहीं होवो. त्याबद्दल मला कधीं वाईट वाटायाचें नाहीं. तसेंच यावेळीं ही वाटणार नाहीं. ज्यांचीं अंतःकरणें प्रेमरज्जूनें बद्ध झालीं आहेत व ज्यांचा सर्व काल परस्परांच्या सहवासामध्यें गेला आहे अशांचे स्वभाव, गुण, व चालीरीती, सारख्याच असाव्या असा नियम आहे. त्यावरून मला असें वाटतें कीं, तुमच्या महाराजांचा हा जीवश्चकंठश्च स्नेही हुबेहुब त्यांच्याच सारखा असावासें वाटतें. माझ्या प्राणेश्वराच्या अशा या मित्राला प्राणसंकटांतून सोडविण्याकरितां जें कांहीं माझे हातून झालें तें ह्मणजे मोठेंसें आहे असें मुळींच नाहीं. तथापि जें मीं केलें तें बोलून दाखविणें ह्मणजे आत्मस्तुति केल्यासारखेंच होईल. तेव्हां आपले हातानें आपल्याच तोंडाभोंवतीं दिवा ओंवाळून घेण्याचें काम क्षणभर सोडून आतां आपणाला पुढें आणखी काय करावयाचें तें पाहूं ह्मणजे झालें. ( लोरेन्झो यास उद्देशून ) मी काय ह्मणतें ऐकलें ? माझे प्राणनाथ परत येईपर्यंत येथें राहून, तुह्मी आमच्या वाड्याची व सर्व सामानसुमानाची व्यवस्था ठेवा, असें मी ह्मणतें. माझ्याविषयीं म्हणाल तर एकांतांत

राहून, परमेश्वरचिंतन करण्याचें मीं व्रत धरलें आहे! व नेरिसेलाच मी जवळ ठेवून घेणार आहें; दुसरें कोणी नको. तिचा नवरा, व माझे प्राणवल्लभ दोघेही परत येईपर्यंत आह्मी ईश्वरचिंतनांत काळ घालवणार आहों. आह्मी कांहीं दूर नाहीं राहत; येथून दोनच मैलांवर एक मठ आहे तेथें आम्ही राहणार आहों. हें जें काम मी तुह्मांला सांगितलें आहे, ते तुह्मीं नाहीं म्हणूं नका. माझ्या वरील तुमचें प्रेम व सध्यांचा प्रसंग यांकडे लक्ष द्या; नाहीं म्हणूं नका.

**लोरेन्झो**—बाईसाहेब आपण जी जी आज्ञा कराल, ती माझे हातून झाली मात्र पाहिजे तिला मीं नाहीं ह्मणणार नाहीं.

**पोर्शिया**—तुह्माला सांगितलेली व्यवस्था माझ्या नोकर चाकरांना माहितच आहे. ते तुमची व जेसिका बाईची आज्ञा नेहमीं पाळतील. बरें, तर आतां आह्मी जातों. यापुढें तुमची भेट जेव्हां होईल तेव्हां खरी.

**लोरेन्झो**—ईशचिंतनांत आपला काळ सुखानें जावो असें माझें परमेश्वरापाशीं मागणें आहे.

**जेसिका**—बाईसाहेब इकडची कांहीं काळजी करूं नका.

**पोर्शिया**—फार उत्तम. तुह्मां सर्वांचे मजवर हे मोठे

उपकार होत. तुह्मालाही परमेश्वरानें सुखांत ठेवावें. बरें, जेसिकाबाई या बरें आतां.

( लोरेन्झो व जेसिका जातात. )

**पोर्शिया**—कायरे बुवा बॅलथेसर इकडे ये, पाहूं. तूं चांगला विश्वासू आहेस हें माझ्या अनुभवास आलेलें आहेच. तरी पण आतां ही तुझ्या परिक्षेचीच वेळ आहे. हें पत्र घे व जितक्या तातडीनें तुला जाववेल तितक्या तातडीनें पॅड्यूवा येथें जा. तेथें माझे चुलत भाऊ डाक्तर बॅलॅरियो ह्मणून आहेत ते राहतात. त्यांचेजवळ हें पत्र दे. ते तुला कांहीं कपडे व कागदपत्र देतील ते घेऊन अगदीं जलदीनें व्हेनीस नगराला जा—तुला कांहीं अडचण पडणार नाहीं, पॅड्यूवा येथें मचवे तयार असतातच. त्यांपैकीं एकावर चढ. तूं येत आहेस तों आह्मीं तेथ आहोंच.

**बॅलथेसर**—ठीक आहे हें मजकडे लागलें. माझ्याकडून होईल तितक्या जलदीनें मी जातो.

( निघून जातो. )

**पोर्शिया**—चल, नेरिसे. मीं कांहीं एक कार्य मनांत योजिलें आहे, त्याची तुला कल्पनाही नसेल. तर मी काय सांगतें हें नीट ऐकून घे. आपणाबद्दल आपल्या यजमानांच्या मनांत शंका सुद्धां येणार नाहीं, अशा रीतीनें त्यांची आज गांठ घ्यावयाची आहे.

**नेरिसा**—काय ! काय ह्मणतां ? त्यांची आपली गांठ पडेल ?

**पोर्शिया**—पडेल ह्मणजे?- पडलीच पाहिजे. मात्र मी ह्मणतें तें कार्य आपण अशा युक्तीनें केलें पाहिजे कीं, तें करतांना त्यांनीं जरी आपणास पाहिलें तरी तें कोण करीत आहेत हें त्यांच्या लक्षांत येणार नाहीं.—कायग नेरिसे ?—आपण दोघींनीं जर पुरुषवेश घेतला तर, मला वाटतें तुझ्याहून मीच अधिक पाणीदार दिसेन, नाहीं बरें ? खचीत, मीं हें अगदीं पैजेनें तुला सांगतें ऐकलेंस?—माझी ती समशेर मी अशी ऐटीनें कमरेला लटकावून देईन; मोठ्या गुर्मींत आलेल्या तरण्या माणसाप्रमाणें खणखणीत आवाजानें मी भाषण करीन; मोठ्या कुर्र्यानें व ऐटीनें मी अश्शीं अश्शीं पावलें टाकीत चालेन; एखाद्या बडबड्या तरुणाप्रमाणें मी सपाटून मारामारीच्या गप्पा मारीन; अलौकिक लावण्यसंपन्न युवतींचीं मनें माझ्या ठिकाणीं पराकाष्ठेची आसक्त झालीं असून, त्यांना आपण निष्ठुरपणें झिडकारलें व तेणेंकरून त्या दुःखानें विव्हळ होत्सात्या माझ्यासाठीं झुरणीला लागलेल्या पाहून आपणास फार फार पश्चात्ताप होत आहे, अशी मी खोटीच -तावणी करीन; शिकणें सोडल्याला मला वर्षे झालें

असेल–नसेल, असें मी सर्वांना सांगेन; अशा प्रकारच्या, एक कीं दोन, हजारों गप्पा ठोकून मी आपली स्वतःची पुष्कळशी स्तुति करीन–चल. बागेच्या फाटकापाशीं आपली गाडी उभी असेल, तिकडे चल. आपण गाडींत बसल्यावर माझा बेत काय आहे तो सविस्तर मी तुला सांगेन. चल तर आतां आपल्याला निघालेंच पाहिजे. कारण आपल्याला कमींत कमी वीस मैल आज जावयाचें आहे.

( जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

स्थळः—बेलमान्ट येथील बाग.

( लान्सलॉट व जेसिका )

**लॉन्सलॉट**–खरोखरींच तसें आहे. कारण, बापानें केलेलीं पातकें त्याच्या संततीला भोगावीं लागतात. ह्मणून बोवा, मला तुझी फार भीति वाटते. काय होईल नीं काय नाहीं, याचा काय नेम सांगावा?–आजपर्यंत मी तुझ्याशीं अगदीं निष्कपटपणें व निर्भीड-

पणें बोलत आलों.—आणखी त्या गोष्टीबद्दल मला काय वाटतें तें मी तुला सांगतों. तूं मोठ्या विचारानें वागावेंस हें बरें. कारण तूं खरोखर बाडगी झाली आहेस.

**जेसिका**—कसेंही असलें तरी माझा नवरा मला साह्य करून यांतून पार पाडील. खरें सांगू तुला ?—त्यानें मला ख्रिस्ती केलें, आहे समजलास ?

**लॉन्सलॉट**—व: ! मग तर दोषाचें खापर त्याच्याच डोक्यावर फोडले पाहिजे.—काय तुला ख्रिस्ती बनविलें ?—हें आह्मीं इतके ख्रिस्ती लोक येथें एकाशींएक बसलों आहों; आणि हे आणखी ख्रिस्ती कशाला ? नवीन नवीन ख्रिस्ती करणें ह्मणजे डुकराचें मांस खाणारे अधिक लोक तयार करण्यासारखें आहे ! आणखी सर्वच लोक ख्रिस्ती झालें ह्मणजे डुकराचें मांस महाग होणार दुसरें काय ?

( लोरेन्झो प्रवेश करतो. )

**जेसिका**—( लान्सलॉट यास उद्देशून ) अरे, हे पाहिलेस ?—माझे धनी इकडे आले. आतांच तूं जें काय ह्मणत होतास तें मी यांना सांगतें.

**लोरेन्झो**—अरे ए ! तूं जर माझ्या बायकोशीं असा एकांत करूं लागलास,—तर—हं—हं—मी साफ सांगतों, मला नाहीं खपावयाचें.

**जेसिका**—तसें नाहीं हो. आमच्याबद्दल तुह्मी अगदीं संशय घेऊ नका. याचें व माझें हें भांडण चाललें आहे.—तो मला अगदीं बेलाशक ह्मणतो कीं, तूं यहुद्याची लेक आहेस. तेव्हां परमेश्वर तुझ्यावर कधींही कृपा करणार नाहीं. आणखी काय ? ह्मणे—तूं ख्रिस्ती झालीस, तरी तुझा काय उपयोग ?—नवीन नवीन यहुदी लोकांना ख्रिस्ती करावयाचें ह्मणजे निवळ डुकराचें मांस महाग करावयाचें; दुसरें कांहीं नाहीं.

**लोरेन्झो**—आतां तोंड मीट ! गप्प बसणें ! हा एक मोठा शहाणपणाच आहे, असें मी समजतों. बडबड करणें ह्मणजे निवळ पोपटपंचीपणा.—अरे ए गध्द्या ! आंत जा. आणि आचाऱ्यांनीं जेवणाची तयारी केली आहे कीं नाहीं हें पाहून ये.

**लॉन्सलॉट**—तें तर केव्हांचें तयार आहे. कारण त्यांना स्वतः भूक लागली असेलना ?

**लोरेन्झो**—अरे वः ! तुला शब्दांवर बऱ्या कोट्या करतां येतात. त्यांना भूक लागली आहे कीं नाहीं हें का मीं तुला विचारलें ? जेवणाची तयारी आहे कीं नाहीं तें पहा.

**लॉन्सलॉट**—धनी तें सारें झालें आहे. आतां काय तीं पानें ठोकायची बाकी आहेत.—

**लोरेन्झो**—बरें तर, पानें कशाला मी तुलाच ठोकतां.

**लॉन्सलॉट**—धनी तें कशासाठीं ? मी तर तुमच्याच कामाला चाललों ! (पळत जातो)

**लोरेन्झो**—उगीच कांहीं तरी खुसपट काढून ही काय वटवट लावली आहेस ? बस कर तुझा फाजील पणा. मी काय सांगतों तें नीट समजून घेत जा. जा आंत जा आणि आचाऱ्यांना ह्मणावें वाढा, समजलास आतां ?

**लॉन्सलॉट**—हें पहा धनी, पानें वाढावयाचीं तीं मांडतीलच आणखी मांडायाचीं तीं वाढतीलच, पण आतां जेवायला यायची आपली मर्जी लागेल काय ?

(जातो.)

**लोरेन्झो**—काय गुलाम शब्द तरी जुळवितो पहा ! या मूर्खाच्या डोक्यांत शब्द जसे कांहीं उड्या मारीत आहेत ! मी असे कांहीं लोक पाहिले आहेत, कीं त्यांचा पोषाख सरासरी असाच विचित्र असतो, आणि ते मोठमोठ्या लोकांच्या पदरीं राहून शब्दावर जेव्हां तेव्हां कोट्या करून अर्थाचा अनर्थ करतात. आणि अशा गमती करणारांना ते थोर लोक खुषमस्करे ह्मणतात.—बरें जेसिके कसें काय ? तुझी काय मर्जी आहे ? काय हो बाईसाहेब, त्या आमच्या बॅसॅनियो महाराजांच्या कुटुंबाबद्दल तुमचें काय मत आहे ?

**जेसिका**—छे ग बाई ! त्यांचें कीं नाहीं, माझ्यानें

कांहीं वर्णनच होत नाहीं. बसॅनियो महाराजांचें कुटुंब इतकें कांहीं उत्तम आहे कीं, त्यांच्या सहवासानें त्यांना या पृथ्वीवर स्वर्गीय सुख प्राप्त झालें आहे, असें मी समजतें पण त्यानीं मात्र तिच्याशीं भलेपणानें वागावें ह्मणजे झालें. आणखी ते जर अशा स्त्रीशीं भलेपणानें वागले नाहींत तर त्यांना स्वर्गांत सुख मिळेल कीं नाहीं याची शंकाच आहे. फार काय सांगूं ?—स्वर्गांतल्या देवांनीं पण मांडला—कीं उत्तम स्त्री कोण ? आणि त्या पणांत जर एका देवानें पोर्शियेस पुढें केलें तर दुसरी स्त्री हिच्यासारखी हिच्या तोडीची कोणी सांपडेल कीं नाहीं याची शंकाच आहे.

**लोरेन्झो**—आणखी ती जशी एक अगदीं योग्य स्त्री आहे, तसा तुलाही अगदीं योग्य पती लाभला आहे, नाहीं बरं ?

**जेसिका**—हें काय ? या संबंधानें तरी माझें मत आधीं नको का विचारायाला ?

**लोरेन्झो**—हो, हो ! तेंही पण मी तुला विचारणारच होतों आतां तें जेवण झाल्यावर. विचारीन.


**जेसिका**—मग कशाला ?—मला वाटतें, जेवतांनाच त्याविषयीं बोलूं. ह्मणजे जेवणाला तेवढीच अधिक चव येईल.

**लोरेन्झो**—हो, तूं ह्मणतेस तेंही बरेंच. कदाचित् माझ्याविषयीं जर कांहीं वेडेंवांकडें बोललीस तर तेंही अन्नाबरोबर अनायासें गिळून टाकायाला ठिक पडेल.

**जेसिका**—ठीक आहे. तुमच्याविषयीं मला जें कांहीं वाटतें तें मी अगदीं उघड उघडच बोलेन.

( जातात. )

---




पोर्शिया—हे पहा त्यांत ‘ अच्छेर मांस ’ एवढेच शब्द आहेत.
व्हेनिस नगरचा व्यापारी अंक ४, पृष्ठ. १६३.

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

स्थळ:-व्हेनिस येथील न्यायमंदीर.

( डयूक, कांहीं बडे लोक, अॅन्टोनियो, बसॅनियो, ग्रॅशियानो व दुसरे कांहीं लोक प्रवेश करतात. )

**डयूक**-काय हो! अॅन्टोनियो शेटजी येथें हजर आहेत काय ?

**अॅन्टोनियो**-होय महाराज, हा मी आपल्या पुढेंच उभा आहें.

**डयूक**-शेटजी, ज्याच्या अंत:करणांत दयेला अणुमात्र जागा नाहीं, अशा पाषाणहृदयी दुष्ट माणसाशीं तुमचा व्यवहार झाला आहे, हें पाहून मला अत्यंत वाईट वाटतें.

**अॅन्टोनियो**-महाराज, त्यानें मजवर मांडलेल्या या नाशकारक वादाबद्दल त्याची समजूत घालण्याची महाराजांनीं पुष्कळ खटपट केली असें मीं ऐकलें आहे, पण इतकेंही करून तो आपला हेका सोडीत नाहीं. आणि ज्या अर्थीं कायद्याचे दृष्टीनें मी त्याच्या तावडींतून सुटेन असें वाटत नाहीं, त्या अर्थीं त्याचा हा त्वेष मी शांत वृत्तीनें

गिळून बसतों व त्याचें हें जुलमी कृत्य मी धैर्यानें सहन करितों.

**ड्यूक**–अरे, जा ! कोणी तरी त्या यहुद्याला या न्यायमंदिरांत बोलावून आणा.

**सोलॅनियो**–सरकार, तो दरवाज्याशींच उभा आहे,– हा पहा आलाच तो.

( शायलॉक प्रवेश करितो. )

**ड्यूक**–जरा बाजूला व्हा. त्यांना माझे समोर येऊं द्या. शायलॉकशेट तुम्ही तऱ्हेवाईकपणानें हा तुमचा तंटा निकराला नेणार असें सर्व लोकांना व मला लक्षण दिसत आहे. आणि आज जितका विलक्षण दुष्टपणा तुम्ही दाखवित आहां त्याहून जास्त पश्चात्तापांत पडण्याची तुह्माला पाळी येईल अशीही आम्हांला अटकळ होत आहे, म्हणून ह्मणतों कीं, त्या बिचाऱ्या गरीब व्यापाऱ्याच्या अपराधाबद्दल त्याचें एक अच्छेर मांस कापून न घेतां, त्या ऐवजीं, ठरलेला करारनामा रद्द करून तुह्मी कर्जाऊ दिलेल्या मुद्दल रकमेंतही याला उदारपणानें व दयाळूपणानें कांहीं तरी सूट घालाल तर बरें होईल. अहो, या लौकिकवान, उदार व्यापाऱ्याचें केवढें नुकसान झालें, तें तुह्मीं ऐकलेंच असेल. याशिवाय त्याच्या जिवावर एकामागून एक कशीं संकटें येत आहेत त्यांकडे

कांहीं नजर द्या. ज्यांना दया माया ह्मणजे काय हें माहीत नाहीं, अशा त्या निर्घृण अंतःकरणाच्या, पाषाणहृदयी तुर्की व तार्तरी लोकांप्रमाणेंच केवळ वागूं नका. तर, त्याच्या संकटावस्थेबद्दल तुमच्या अंतःकरणाला कांहीं पाझर फुटावा व तुह्मीं त्याजवर दया करावी, असें आम्हा सर्वांना वाटतें.

**शायलॉक**—मी काय करणार तें मी सरकारांना जाहीर केलेंच आहे. करारनाम्याची अम्मलबजावणी करावयाची व जें आपलें हक्काचें तें घ्यावयाचें, अशी मीं तर आमच्या पवित्र सॅबथच्या नावानें शपथ घेतली आहे. आतां आपण जर मला तसें करूं देणार नाहीं तर आपण या नगरवासी जनांना नागरिकत्वाचे जे हक्क दिले आहेत व जी जाहीर सनद दिलेली आहे, त्यांना हरताळ लावा. पण या गोष्टीचें लोकांना काय वाटेल याचा आपणच विचार करा ह्मणजे झालें. आतां, तीन हजारांची रक्कम घेण्याऐवजीं मी त्याचें निरुपयोगी मांस कां मागतों असेंहि आपण मला विचाराल. पण या प्रश्नाचें उत्तर देण्याची माझी मर्जी नाहीं. ही माझी आपली एक लहर आहे, असें आपण पाहिजे तर समजा. मग तर झालें ? अहो असें पहा कीं, उद्यां माझ्या घरीं, जर उंद-

राचा उपद्रव होऊं लागला, आणि त्याला पकडण्याकरितां माझी लहर लागली कीं तीन नाहीं दहा हजार रुपये खर्च करावयाचे, तर त्यांत इतरांचें काय गेलें ?—कां ? आतां तरी आपल्या प्रश्नाचें उत्तर मिळालें ? अहो, कोणा कोणाला डुकराचें तळलेलें मांस आवडत नाहीं; कोणी कोणी मांजर दृष्टीस पडलें कीं अगदीं भांबावून जातात; व कोणा कोणाचें तर सनई वाजूं लागली कीं, डोकें फिरून जाऊन, त्यांना कांहीं सुचेनासें होतें. तेव्हां कोणतीही गोष्ट मनुष्याला बरी किंवा वाईट वाटणें हें ज्याच्या त्याच्या मनोविकारांवर, खुषीवर व लहरीवर अवलंबून असतें. आतां आपल्याला उत्तर द्यावयाचें ह्मणजे मीच आपल्याला उलट विचारतों कीं, कोणा कोणाला तरी डुकरांचें मांस कां आवडूं नये ? आणखी निरुपद्रवी मांजरानें तरी असें काय केलें आहे ? त्याचप्रमाणें लाकडाच्या क्षुद्र सनईत तरी असें काय आहे ? ह्मणून मी असें सांगतों कीं, या अँन्टोनियोचें व माझें पुष्कळ दिवसाचें हाडवैर आहे, त्याची मला अतिशय किळस येऊन गेली आहे. यासाठींच या आंतबट्टयाच्या व्यवहारांत मला पडावें लागलें आहे—कां ? आतां तरी आपलें उत्तर आपल्याला मिळालें?

**बसॅनियो**–वाः रे ! हें बोलतांना तुझ्या जिभेला हाड तरी असावयाचें होतें ? जिवाला कांहीं तरी वाटतें ? सरकारांनीं विचारल्या प्रश्नाचें हें काय उत्तर झालें ?

**शायलॉक**–तुमच्या प्रश्नांचीं उत्तरें देत बसून, तुमचें समाधान करावयाला माझें कांहीं अडलें नाहीं.

**बसॅनियो**––जे जे प्राणी आपल्याला आवडत नाहींत त्या त्या प्राण्यांना काय आपण ठार मारून टाकतों ? जे पदार्थ आपल्याला आवडत नाहींत त्यांचा आपण नाश करून टाकावा असें तुमचें ह्मणणें आहे काय ?

**शायलॉक**—ज्यांचा आपण नाश करूं इच्छीत नाहीं त्यांचा द्वेष तरी आपण कोठें करतों ?

**बसॅनियो**—तिटकारा हा पहिल्यानेंच कांहीं द्वेष नसतो.

**शायलॉक**—तर मग काय ? सापानें तुह्मांला दुसऱ्यानदां चावलें पाहिजे ?

**अॅन्टोनियो**—मित्रा, हें पहा, या शेटजीशीं वाद करणें ह्मणजे समुद्रकिनाऱ्यावर जाऊन महासागराला, "तूं आपलें विशाल स्वरूप टाकून दे" असें ह्मणण्यासारखें किंवा लांडग्याला, 'तूं मेंढीचें करडूं कां आणलेंस' असें विचारण्यासारखें, अथवा गगनोदरीं झंझावात उत्पन्न झाला असतां नगाधिपाच्या शिरोभागीं असलेल्या महावृक्षांनीं, तुह्मी एकदम

स्थिर व्हा असें सांगण्यासारखेंच आहे. कितीही कठीण गोष्ट असो, तरी ती सहज करतां येईल. पण ज्याच्या निर्दयतेला दुसरी उपमाच नाहीं अशा या यहुद्याच्या अंतःकरणाला दयेचा पाझर ह्मणून कधींच फुटणार नाहीं. ह्मणून मी हात जोडून तुह्मांला सांगतों कीं, हा नाद तुह्मीं सोडून द्या व या बाबतींत कोणतीही खटपट न करतां, होईल तेवढ्या त्वरेनें एकदां काय तो या खटल्याचा निकाल मला ऐकूं द्या. आणि या यहुद्याची इच्छा परिपूर्ण होऊं द्या.

**बसॅनियो**--शेटजी, तुमच्या तीन हजारांच्या रकमे-बद्दल हे सहा हजार घ्या. हें काय वाईट झालें?

**शायलॉक**--या सहा हजारांतून एकेकाचे सहा सहा भाग केले व तो एकेक भाग जरी सहापटी एवढा असला तरीही मी त्यास शिवणार नाहीं. तर ठरलेल्या अटीची अंमलबजावणी करून घेईन; कधीं सोडणार नाहीं.

**ड्यूक**--जर तुह्मी कोणावरच दया करीत नाहीं तर तुह्मांवर तरी ईश्वरानें दया काय ह्मणून करावी?

**शायलॉक**--मी जर कांहीं वांकडें करीत नाहीं तर मला काय कोणाची भीति आहे? तुमच्या या लोकां-मध्यें पुष्कळांनीं गुलाम विकत घेतले आहेत; त्यांना तुह्मी पाळलेल्या गाढवांप्रमाणें, कुत्र्यांप्रमाणें

वागवून, त्यांचेकडून काबाड कामें करावयास लावून गुलामगिरींत खुशाल जखडून टाकतां; या गुलामगिरीच्या कष्टमय स्थितींत त्यांचे तुह्मी कसे कसे हाल करतां? तर मी ह्मणतों त्यांना बंधनांतून मोकळे करून, तुह्मी त्यांच्याशीं आपल्या मुलींचीं लग्नें कां लावून देत नाहीं? आणि मनाप्रमाणें वागण्याची, राहण्याची, खाण्यापिण्याची व निजण्याबसण्याची त्यांची यथास्थित सोय तुह्मी कां करून देत नाहीं?—असें मी तुह्मांला कां विचारूं नये? हा प्रश्न जर मीं तुह्मांला केला तर तुह्मी असेंच उत्तर द्याल कीं, हे आमचे बंदे गुलाम आहेत. यांचें आह्मी पाहिजे तें करूं. व मीही तसेंच उत्तर देतों कीं, ठरलेल्या अटीवर याचें जें एक अच्छेर मांस मीं विकत घेतलें आहे, तें मला फार कष्टानें मिळणार आहे, तरी त्यावर माझा हक्क आहे व तें मी घेणारच. तुह्मी जर माझ्या मनाप्रमाणें निकाल केला नाहीं; तर आग लावा त्या तुमच्या न्यायाला! या व्हेनिस शहरांत होणारे हुकूमनामे ह्मणजे अगदीं निरुपयोगी आहेत असेंच ठरेल. ह्मणून मी ह्मणतों, एकदां काय तो लवकर निकाल द्या. बोला? मला योग्य न्याय मिळत आहे कीं नाहीं? सांगा काय तें लवकर.

**ड्यूक**—बॅलॅरियो ह्मणून एक विद्वान् कायदे पंडित आहेत. त्यांना या खटल्याचा निकाल करण्याकरितां येथें बोलाविलें आहे. व ते येथें येईपर्यंत माझ्या अधिकारांत हा खटला मी तहकूब ठेवितों.

**सॅलेरिनो**—सरकार, बाहेर एक इसम आला आहे. तो पॅडच्यूवा येथून आला असून त्यानें बॅलॅरिओ साहेबांकडून कांहीं कागदपत्र आणिलें आहेत.

**बसॅनियो**—मित्रा तूं अगदीं स्वस्थ व शांत मनानें ऐस. अगदीं धैर्य सोडूं नको. तुझ्या केसालाही आह्मीं धक्का लागूं देणार नाहीं. तसा प्रसंग आलाच, तर आधीं मी आपलें मांस, रक्त व हाडें, त्या यहुद्याच्या स्वाधीन करीन.

**ॲन्टोनियो**—मेंढरांच्या कळपांत रोगानें ग्रासलेलें एखादें मेंढरूं जसें सर्वांच्या आधीं मरणें हेंच बरें असतें; किंवा नासून सडून गेलेलें फळ इतर फळांच्या अगोदर झाडांवरून गळून पडण्याला जसें योग्य असतें, तसेंच मी ह्मणतों आपणा सर्वांमध्यें अगोदर मरण्याला मीच योग्य आहें ( बसॅनियोस उद्देशून ) मित्रा स्वस्थपणानें राहून, मी मेल्यानंतर माझ्या थडग्यावर तूं माझ्या मरणाची सर्व हकीकत लिहून ठेव ह्मणजे झालें; याहून माझ्याकरितां तुला अधिक कांहीं एक त्रास घेण्याचें कारण नाहीं.

( वकीलाच्या कारकुनाप्रमाणें पोषाक केलेली नेरिसा प्रवेश करिते. )

**ड्यूक**—काय? पॅडच्यूवा येथून बॅलॅरिओ यांचें पत्र घेऊन तुह्मीच आलां आहां काय?

**नेरिसा**—होय. त्यांचेकडूनच आलों आहे. आपलें नेहमीं कुशल असावें असें ते इच्छितात.

( एक पत्र देते ).

**बसॅनियो**—शेटजी, तुह्माला आपला सुरा पाजळण्याची येवढी घाई कां झाली आहे?

**शायलॉक**—अहो, त्या दिवाळखोराचें मांस कापून घ्यावयाचें आहे म्हणून.

**ग्रॅशियानो**—त्याचे कापण्याकरितां किंवा स्वतःचेंच कापून घेण्याकरितां चालली आहे येवढी ही तयारी? पण कोणत्याही धातूच्या शस्त्राची किंवा गळेकापू मांगाच्या कुऱ्हाडीची धार तुझ्या मत्सराच्या धारे इतकी तीक्ष्ण असेल कीं नाहीं कोण जाणे! किती विनवण्या केल्या तरी तुझ्या अंतःकरणाला द्रव म्हणून येत नाहीं.

**शायलॉक**—नाहीं, नाहीं, बस! या कामांत तुम्ही कितीही अक्कल खर्च केलीत, तरी तिचा कांहीं एक उपयोग होणार नाहीं; मी खचीत सांगतों.

**ग्रॅशियानो**—अरे अधमा! निर्दया! धिःक्कार असो तुला! तुला जिवंत राहूं देणें म्हणजे खऱ्या न्यायाची विटंबना करण्यासारखें आहे. तुझी ही नीच कृती पाहिली म्हणजे अन्य प्राण्यांचे आत्मे मनुष्यांच्या

जड देहांत प्रवेश करितात, असें जें मत आहे तें मला खरें वाटूं लागतें. कायरे! तुझ्या या अधम आत्म्यानें पूर्वजन्मीं लांडग्याचा देह धारण केला होता का? व मनुष्यवधाबद्दल जेव्हां तुला सुळीं जाण्याचा प्रसंग आला तेव्हां त्या देहांतून निघून तुझी ही निंद्य कर्माची वासना अतृप्त राहिल्यामुळें, तूंच तुझ्या या सध्यांच्या देहाचा आश्रय केलास, नाहीं काय? कारण तुझ्याही वासना लांडग्याप्रमाणेंच अधमपणाच्या व कधीं तृप्त न होणाऱ्या अशा आहेत.

**शायलॉक**--तुह्मी काय वाटेल तें बोला, करारनाम्याची अट आतां कांहीं बदलतां येत नाहीं, हें तूं पक्कें समज; मग येवढ्या मोठमोठ्यानें ओरडून विनाकारण आपला घसा का फोडून घेतोस? तुमचा शहाणपणा आतां पुरे करा; नाहीं तर तुमचेपाशीं जी काय अक्कल असेल नसेल ती अशा शुष्क कामांतच तुह्मी गमावून बसाल! कायद्याची अम्मलबजावणी करून घेण्याकरितां मी येथें आलों आहें, समजलां?

**डयूक**—डॉ. बॅलॅरिओ यांनीं या पत्रांत शिफारस करून असें ह्मटलें आहे कीं, आपणांकडे एक तरुण व विद्वान कायदे पंडीत हें पत्र घेऊन ये-

तील, त्यास हा खटला चालवूं द्यावा.—बरें आहे. ते गृहस्थ कोठें आहेत ?

**नेरिसा**—सरकार, हे पहा ते आपल्या परवानगीचीच वाट पाहत येथें उभे आहेत.

**ड्यूक**—तर मग कोणी दोघांनीं तिघांनीं पुढें जाऊन त्यांना मोठ्या आदरानें इकडे घेऊन यावें. बरें ! तोंपर्यंत बॅलॅरिओ यांचें हें पत्र मंडळींना वाचून दाखवावयाला या कारकूनाला मी सांगतों.

**कारकून**—( वाचतो. )

'नम्रपणें मी आपणांस कळवितों कीं, मला आपले पत्र आले तेव्हांपासून माझ्या जीवास बरें नाहीं. पण आपल्याकडून पत्र घेऊन मनुष्य आला त्याच वेळीं आमच्या येथें रोमशहराहून महाविद्वान असे एक वकील मला भेटण्याकरितां आलेले होते. त्यांचें नांव बॅलथॅसर असें आहे. यहूदी शेटजींचा व ॲन्टोनियो या व्यापाऱ्यांचा व्यवहार काय आहे याची सर्व माहिती मी त्यांना करून दिली आहे. या कामांत आम्ही दोघांनीं मिळून कायद्यांचीं पुस्तकें चाळून पाहिलीं; या खटल्यासंबंधानें माझें स्वतःचें मत काय आहे हें मी त्यांना कळविलें आहेच. याशिवाय त्यांच्या सल्लामसलतीचाही या कामीं मला अतिशय उपयोग झाला आहे. तेव्हां आपणांकडून आलेल्या निमंत्रणाचा आदर करून माझ्या ठिकाणीं मी यांस पाठविलें आहे.

तरी हा खटला यांजपुढें चालूं देण्याची आपण परवानगी द्यावी अशी मी विनंती करतों. हे गृहस्थ वयानें लहान आहेत. यावरून त्यांची विद्वत्ता व अनुभवही बेताचाच असेल असें आपण समजूं नये तथापि हा खटला ते कसा चालवितात हें आपण प्रत्यक्ष पाहिलें ह्मणजे आपणच त्यांच्या विद्वत्तेची तारीफ कराल. मला तर वाटतें यांत त्यांना यश येईल, व त्यांची सर्वत्र कीर्ति होईल असा मला भरंवसा आहे.

**डयूक**--हे विद्वान कायदेपंडीत काय लिहीतात हें तुह्मीं सर्वांनीं ऐकलेंच आहे. मला वाटतें इकडे येत आहेत हेच ते तरूण विद्वान वकील असावेत.

( कायदेपंडिताचा पोषाख केलली पोर्शिया प्रवेश करिते. )

**डयूक**—या, या, असे या, वकीलसाहेब. आपण बॅलॅरियो यांजकडूनच आलां आहां, नाहीं ?

**पोर्शिया**—होय महाराज.

**डयूक**—या, असे-येथें बसा. या न्यायमंदिरांत आज हा जो खटला निघाला आहे, त्याचें मूळ कारण काय आहे याबद्दल तुह्मांला माहिती असेलच.

**पोर्शिया**—सरकार, या खटल्यांतली सर्व कच्ची हकीगत मला समजलेली आहे. बरें, पण शेटजी ह्मणतात ते कोण ? तें कोठें आहेत? व दुसरे व्यापारी ते कोणते ?

**ड्यूक**—( अन्टोनियो व शॉयलॉक यांस उद्देशून ) या, तुह्मी दोघे असे पुढें या.

**पोर्शिया**—तुमचेंच नांव शायलॉक, होय ना ?

**शायलॉक**—होय, मला शायलॉक ह्मणतात.

**पोर्शिया**—तुह्मां दोघांमध्यें उपस्थित झालेला हा खटला फारच विचित्र आहे. तरी त्याचें स्वरूप इतकें कांहीं व्यवस्थीत व सरळ आहे कीं, या व्हेनीस शहरच्या कायद्याच्या दृष्टीनें तुमच्या या खटल्यांत कोणतीही भानगड दिसत नाहीं. बरें, या शेटजींच्या तावडींत (अॅन्टोनियोस उद्देशून) तुह्मींच सांपडलां आहां; नव्हे कां ?

**अॅन्टोनियो**—होय, असें ते म्हणतात.

**पोर्शिया**—तुह्मांस हें करारपत्र कबूल आहे काय ?

**अॅन्टोनियो**—होय, मला तें कबूल आहे.

**पोर्शिया**—तर मग या शेटजींनीं तुमच्यावर दयाच केली पाहिजे.

**शायलॉक**—कां बरें—ती कां ? याजवर दया करावयाला मला भाग कां पडावें ? हें सांगा पाहूं ?

**पोर्शिया**—हें पहा शेटजी, दया करावयाची ह्मणजे ती कांहीं जुलमाची किंवा जबरदस्तीची गोष्ट नव्हे. बाबारे ती आकाशांतून सहजासहजीं पृथ्वीवर हळूहळू पडणाऱ्या पावसाच्या बिंदूंसारखी आहे. दया

करण्यांत दोहों रितींनीं कल्याणच आहे. जो कोणी दया करतो, त्याचें कल्याण होतें; आणि ज्याचेवर दया होते, त्याचें तर कल्याण होतेंच होतें. दया ही श्रेष्ठाहून श्रेष्ठ आहे. शिरावर धारण केलेल्या मुकुटापेक्षांहि दयेच्या श्रेष्ठ भूषणानें मंडित असलेला सार्वभौम राजा फारच शोभतो. त्याचा राजदंड हा त्याची सत्ता अपार आहे असें सुचवितो. तो पुष्कळ लोकांना व इतर राजांना भीति दाखविण्याचें एक साधन आहे. परंतु राजदंडाच्या दराऱ्यानें प्राप्त झालेल्या अधिकारापेक्षां दयेचें सामर्थ्य फारच आहे. दया ही राजे लोकांच्या हृदयांतील सिंहासनावर विराजमान झालेली असते. मनुष्याच्या ठिकाणीं दया हा एक इश्वरी गुण आहे. कोणत्याही कामांत न्यायाची आणि दयेची जर जोड झाली तर ऐहिक सत्ता ही परमेश्वरी सत्ते सारखी दिसूं लागते. ह्मणून मी ह्मणतो, शेटजी या गोष्टीचा नीट विचार करा. तुह्माला जरी न्याय पाहिजे आहे, तरी मी खचित सांगतों, नुसत्या न्यायानें कोणाचेंहि पारलौकिक कल्याण व्हावयाचें नाहीं. ईश्वरानें सर्वांवर दया करावी, अशी जर आपण त्याची नेहमीं पार्थना करित असतों, तर मग आपण एकमेकांशीं वागतांना एकमेकांवर दया करावी असेंच सिद्ध होतें, नाहीं काय?

तुह्मी ह्मणतां तशा प्रकारें न्याय होऊं नये, तर खरा खरा न्याय व्हावा, ह्मणजे दयेला धरून तो न्याय व्हावा, असें माझें ह्मणणें आहे. व एवढ्याच साठीं मी एवढा वेळा विवेचन केलं, आतां, तुह्माला केवळ न्यायच पाहिजे असेल तर तो व्हेनीस नगरच्या, या व्यापाऱ्याला प्रतिकूळ असाच द्यावा लागेल.

**शायलॉक**—अन्यायकरा असा जर हेका मी धरीत असेन तर त्याचें योग्य प्रायश्चित्त मला मिळेल, पण तसें यांत कांहीं नाहीं. माझें इतकेंच ह्मणणें कीं कायद्याप्रमाणें माझा खरा खरा काय तो न्याय व्हावा, व मला हें करारपत्र पुरें करून मिळावें; मला आणखी कांहीं नको.

**पोर्शिया**—पण तुमचें कर्ज फेडण्याला याला ऐपत नाहीं का ?

**बसॅनियो**—हो, हो, आपल्या समक्षच त्याची फेड करण्यास आह्मी तयार आहों. इतकेंच नाहीं, पण त्याच्या दुप्पट रक्कम देण्यालाही आमची ना नाहीं, व एवढ्यावर भागत नसेल तर दसपट रक्कम देण्याचें मी आपल्या शिरावर घेतों. आणि ह्मटल्याप्रमाणें माझे हातून घडलें नाहीं, तर माझे हात, मस्तक, किंवा काळीज यांतून पाहिजे तें कापून देण्याला मी तयार आहें. आणखी येवढ्यानेंही जर

त्यांचें समाधान होत नसेल तर न्याय मागण्याच्या ऐवजीं सूड उगविण्याचीच इच्छा शेटजींच्या मनांत जास्त प्रबल झाली आहे, असें ह्मणावें लागेल. आतां आपणच कायदा हातीं घ्या, आणि पुष्कळ हित कशांत आहे हें पहा; मग त्यांत थोडाबहुत अन्याय झाला तरी तिकडे दुर्लक्ष करूनहि पुष्कळ हित साधण्याविषयीं यत्न करा. आणि शेटजींचा नीच हेतु जागच्या जागीं दाबून टाका. एवढेंच आमचें मागणें आहे.

**पोर्शिया**—छे, छे, असें कधींही होणार नाहीं. मान्य केलेला करारनामा रद्द करण्याचे सामर्थ्य या व्हेनीस नगरच्या कायद्यांत नाहीं. या खटल्यांत जर असा निकाल दिला, तर तें एक उदाहरण होऊन बसेल. व एका चुकीमुळें कायद्याच्या प्रकरणांत पुढेंही अनेक चुका वेळोवेळीं होत जातील; ह्मणून तसें करतां येत नाहीं.

**शायलॉक**—आहाहा ! या वेळीं येथें प्रत्यक्ष धर्मराज अवतरले आहेत असें मला वाटतें. सरकार, खरोखर आपली जितकी स्तुति करावी तितकी थोडीच.

**पोर्शिया**—तुमचा तो करारनामा मला पाहूं द्याल काय?

**शायलॉक**—हा घ्या, महाराज—हा घ्या. हा पहा.

**पोर्शिया**—शेटजी, कर्जाच्या रकमेच्या तिप्पट पैसे तुमच्या पुढें ठेवले आहेत.

**शायलॉक**—छे! छे! छे! महाराज, तसें नाहीं व्हावयाचें ! मी अगोदरच परमेश्वराची शपथ वाहून चुकलों आहें. आतां मला जरी कोणी व्हेनीस शहर देऊं केलें तरी तें मला नको. मी आपली शपथ मोडणार नाहीं.

**पोर्शिया**—अहो पण हें काय ? या कागदाची मुदत तर टळून गेली आहे; आणि यावरून पाहिलें असतां त्या व्यापाऱ्याच्या काळजाजवळचें मांस कापून घेण्याला या शेटजींना पूर्ण हक्क पोंहचत आहे. तर शेटजी, एवढी कृपा करा, व हे कर्जाच्या तिप्पट पैसे ठेवले आहेत ते घेऊन हा कागद मला फाडून टाकूं द्या.

**शायलॉक**—अहो, त्यांत लिहिलेली शर्त पुरी झाली ह्मणजे तो आपण खुशाल फाडून टाका. आपण खरोखरींच फार उत्तम न्यायाधीश आहा. आपण मूर्तिमंत न्यायकर्ते आहां. आतांपर्यंत आपण केलेलें कायद्यांच्या कलमांचें विवेचनही सर्वोत्कृष्ट झालें आहे. आणि आतां कितीही माझीं आर्जवें केलीं तरी मीं केलेला निश्चय कालत्रयीं फिरणार नाहीं; तो मी शेवटास नेईन, सोडणार नाहीं.

**ॲन्टोनियो**—सरकार, काय तो निकाल सांगून टाका, अशी माझी आपणास विनंति आहे-हें मी मनापासून सांगतों.

**पोर्शिया**—असें आहे, तर मग आपल्या काळजाजवळचें मांस कापून देण्याला तयार व्हा.

शायलॉक—आपण थोर आहां. आपलें वर्णन मीं काय करावें !

पोर्शिया—या करारपत्रामध्यें लिहिलेली अट अगदीं कायदेशीर आहे; व तीप्रमाणें अम्मलबजावणी होणें जरूर आहे.

शायलॉक—आपण ह्मणतां तें अक्षरशः खरें आहे. आपण सुज्ञ आहां. प्रत्यक्ष न्यायमूर्तीच आहां. आपल्या मुद्रेवरून तर आपण केवळ तरुण दिसतां पण ज्ञानानें व विचारानें आपण फार वृद्ध *आहां.

पोर्शिया—तर, छाती उघडी करा, कपडे काढा, हा सुरा तयार आहे.

शायलॉक—सरकार काळजाच्या अगदीं जवळचा भाग कापावयाचा असें या करारपत्रांत लिहिलें आहे; नाहीं का ?—अगदीं हेच शब्द आहेत, नाहींत का ?

---

*असेच उद्गार शंकुतलेविषयीं दुष्यंताच्या मुखांतुन मुक्तेश्वरानें वदविले आहेत, ते येथं ताडुन पाहण्यासारखे आहेत. वरील वाक्याचें मूळ असें:—

*Shylock*—'

Tis very true: O wise and up right Judge !
How much more elder art thou than thy looks !

याशीं समानार्थक पद्य हें:—

ऐकोनि चातुर्याची गोष्टी, ।
राजा चमत्कारला पोटीं ।
ह्मणे हे वयें अति धाकुटी, ।
विचारें वृद्ध दिसता आहे, ।

महाभारत आदिपर्व

**पोर्शिया**—हो, हो, तसेच आहेत–अगदीं हेच शब्द आहेत. पण मांस बरोबर तोलून घेण्याकरितां तुम्ही कांटा आणला आहे ना?

**शायलॉक**--होय, सरकार! माझ्याकडून सर्व तयारी आहे.

**पोर्शिया**—बरें तर आतां, एखाद्या शस्त्रवैद्याला बोलावा, व या मनुष्याच्या काळजाजवळचें मांस तुम्हीं कापून घेतलें ह्मणजे त्याच्याकडून लागलीच याच्या जखमा नीट बांधण्याची तजवीज करा; नाहीं तर त्याच्या शरीरांतून अतिशय रक्तस्राव होऊन तो बिचारा तात्काळ मरण पावेल.

**शायलॉक**--सरकार, या करारपत्रांत असें नाहीं कोठें लिहिलें.

**पोर्शिया**--नसेल–तसें स्पष्ट म्हटलें नसेल; म्हणून काय झालें? त्याच्याशीं काय करावयाचें आहे? तरी पण सदय मन करून तुम्ही त्याच्यावर एवढी मेहेरबानी केली तर चालणार नाहीं का?

**शायलॉक**—छे! छे! या कागदांत तर तसें मला नाहीं कोठें दिसत! छे! तसें यांत कोठें लिहिलेलें नाहीं.

**पोर्शिया**--(अॅन्टोनियोस उद्देशून) काय हो, यावर तुमचें कांहीं ह्मणणें आहे?

**अॅन्टोनियो**—कांहीं नाहीं. मी हा पहा अगदीं तयार आहें. तर (बॅसॅनियो याजकडे पाहून) मित्रा, ये तुला

एकदां अखेरचा भेटून घेतों. बरें आहे, आतां येतों तुझ्याकरितां माझा अशा रीतीनें अंत झाला असें मनांत आणून दुःख करून घेऊं नको. दैव फिरलें ह्मणजे त्याचा विचित्र खेळ दृष्टीस पडतो. हें लक्षांत आण. म्हणजे दैवाची आपल्यावर मोठी मेहेरबानी झाली आहे असें तूंच म्हणशील. कारण दैवाचा नेहमींचा क्रम म्हटला ह्मणजे हा कीं, 'पैसा,' 'पैसा' करीत जन्मभर दुःखांत तळमळ- णाऱ्या मनुष्याची सर्व गात्रें जर्जर झालीं अस- लीं, व त्याचे डोळे स्मशानाकडे लागले असले तरीही त्याला या यातनांतून तें मुक्त करीत नाहीं ! तेव्हां अशी कष्टमय स्थिति प्राप्त न होतां मला मरण येत आहे हें काय वाईट ! माझा कोणत्या प्रकारें अंत झाला ही सर्व हकीकत तूं आपल्या प्रियपत्नीला सांग. माझें तुझ्यावर के- वढें प्रेम होतें हें तिला सांग. मी मेल्यावर मागें मला वाईट ह्मणून माझी निंदा करूं नको.—आणि तिला ही सर्व काहणी सांग.—चुकूं नको बरं ! तुला प्राणापेक्षांही प्रिय मानणारा असा एक मित्र होता कीं नाहीं हें मग तीच सांगेल. आतां, आपला मित्र मेल्याचें तुला अतिशय दुःख व पश्चात्ताप होईल हें खरें; पण मी तुझ्या कर्जाची फेड करीत आहें, याचा मात्र मला पश्चात्ताप

होत नाहीं. कारण एकदां या यहुद्यानें माझ्या काळजांत आपली सुरी भोंसकली कीं तुझें कर्ज फिटलेंच ह्मणून समज.

**बसॅनियो**--मित्रा ॲन्टोनियो ! प्राणापेक्षांही प्रिय अशा एका स्त्रीशीं माझें लग्न झालें आहे हें खरें; तरी पण माझ्या जिवाची, माझ्या स्त्रीची, किंवा सर्व जगाचीही तुझ्यापुढें मला कांहींच किंमत वाटत नाहीं. व तुला या राक्षसाच्या तावडींतून वांचविण्यासाठीं त्या सर्वांची आहुती देण्याची पाळी आली तरी मी देईन; कां कूं करणार नाहीं.

**पोर्शिया**--काय हो, तुमची स्त्री येथें असती, व तिच्या कानीं हें तुमचें बोलणें पडलें असतें तर तिला हें आवडलें असतें काहो? मला नाहीं वाटत तिला आवडलें असतेंसें.

**ग्रॅशियानो**--मलाही पण बायको आहे; व तिच्यावर माझी फारच प्रीति आहे, हें मी खात्रीनें सांगतों. पण ती जर या वेळीं स्वर्गांत असती आणि तिनें कोणा देवाचें सहाय्य संपादन करून या नीच यहुद्याची मति बदलून टाकली असती तर किती बरं झालं असतं !

**नेरिसा**—ती येथें नाहीं ह्मणून बरें आहे. नाहीं त हें तुमचं बोलणें ऐकून तिनें सारें घर डोक्यावर घेतलें असतें !

**शायलॉक**—हे ख्रिस्ती लोक आपआपल्यावरील संकट नाहींसें व्हावें ह्मणून, पहा कसें आपल्या बायकांच्या जिवावर उदार झाले आहेत! मला पण एक मुलगी आहे. आणि ती ख्रिस्त्याच्याहातीं पडण्यापेक्षां तिला एखादा कसाबसा यहुदीच नवरा मिळता तरी बरें होतें.-अरे पण हें काय ? यांच्या बडबडींत विनाकारण वेळ निघून चालला. सरकार! आपण आतां एकदाचा निकाल देऊन टाका.

**पोर्शिया**—हो, हो. शेटजी, त्या व्यापाऱ्याच्या शरीरांतील एक अच्छेर मांस तुमचें आहे; तें तुमचें ह्मणून मी ठरवित आहें, आणि न्यायासन तें तुह्माला देववीत आहे.

**शायलॉक**—वाः! वाः! उत्तम! उत्तम! आपण अगदीं योग्य न्याय केला.

**पोर्शिया**—तुह्मी त्याचें मांस कापून घ्यावें असें कायद्यानें मी ठरविलें आहे; व त्याप्रमाणें हें न्यायासन तुह्माला तें देववीत आहे.

**शायलॉक**—न्यायाधीश महाराज, आपण सुज्ञ आहांत; आपण सांगितलेला निकाल अगदीं अगदीं योग्य आहे.—यांत शंका नाहीं. ठीक आहे. तर मग, ये! ए ॲन्टोनियो चल असा पुढें ये!

**पोर्शिया**—शेटजी, पण जरा थांबा. यांत आणखी कांहीं आहे. या कागदावरून पहातां, तुम्हाला त्या-

च्या रक्ताचा एक बिंदुही मिळत नाहीं. हें पहा, यांत " अच्छेर मांस " एवढेच शब्द आहेत. हा घ्या तुमचा कागद. आतां तुह्माला त्याच्या शरीरांतलें अच्छेर मासंच काय तें घ्यायचें; समजलां ना? पण हें मांस कापून घेतांना, त्याच्या ख्रिस्ती रक्ताचा एक थेंबहि खालीं पडतांकामा नये! जर पडला तर संभाळा बरें—या व्हेनीस नगरच्या कायद्याअन्वयें तुमचा जमीनजुमला, तुमची सर्व माल मिळकत, तुमचें घरदार, वगैरे जें काय असेल तें सर्व जप्त होईल. व तें या व्हेनीस संस्थानांत जमा केलें जाईल.

**ग्रॅशियानो**—महाराज, आपण अगदीं बरोबर ह्मणतां! कांहो शेटजी ! ऐकलें का ? हे विद्वान न्यायधीश महाराज, काय सांगत आहेत ?

**शायलॉक**—काय ? कायदा असा का आहे ?

**पोर्शिया**—शेटजी, कायद्याचें कलम काय आहे, तें तुह्मीच पहा. ज्या पक्षीं, ' माझा न्याय व्हावा, ' ' माझा न्याय व्हावा, ' असें तुह्मी मोठ्या निक-रानें ह्मणत आहां त्यापक्षीं तुह्मी ह्मणत आहां त-साच खरा खरा न्याय झाला पाहिजे असें आम्हीहि म्हणतों.

**ग्रॅशियानो**—सरकार, आपण किती तरी सुज्ञ आहां; शेटजी, न्यायधीश अतिशय सुज्ञ आहेत खरेंच ! समजला का ?

**शायलॉक**—असें आहे तर मग सरकार, न्यायाधीशांनीं दिलेला निकाल मान्य करून, त्यांनींच काढलेली तडजोड, मी पसंत करितों. आणि कर्जाच्या तिप्पट रक्कम मला त्याच्याकडून देववा ह्मणजे मी त्या ख्रिस्त्याला सोडून देतों.

**बसॅनियो**—हं, हं, हे घ्या पैसे.

**पोर्शिया**—अहो जरा थांबा, इतकी घाई कां ? या शेटजींना अगदीं पूर्ण न्याय मिळाला पाहिजे !— जरा दम धरा, असे उतावीळ होऊं नका.— करारनाम्यांत नमूद केलेली शर्त मोडल्याबद्दल ठरलेल्या दंडावरच काय तो शेटजींचा हक्क आहे. त्याशिवाय त्यांना एक कवडीही मिळणार नाहीं.

**ग्रॅशियानो**—कसें काय शेटजी! न्यायाधीश महाराज कसे काय न्यायी व सुज्ञ आहेत !

**पोर्शिया**—ह्मणून शेटजी, मी तुह्मांला असें सांगतों कीं, आपली या व्यापाऱ्याचें मांस कापून घेण्याची तुह्मी तयारी करा. पण सांभाळा ब़रें—रक्ताचा एक थेंबही पाडूं नका; व अच्छेरापेक्षां कमी कापूं नका, किंवा अधिकही कापूं नका. तुह्मी अच्छेरांत उणें अधिक कापाऽ तर चालणार नाहीं. फार तर काय?—पण वजनांत अच्छेराहून एक रेसभर उणें अधिक कराल किंवा एका केंसाचाही फरक पाडाल तर तुमचे प्राणावर येऊन बेतली ह्मणून

समजा. याशिवाय तुमच्या सर्व मालमत्तेची जप्ती होईल, ती वेगळीच.

ग्रॅशियानो—शेटजी, न्यायाधीश कसे आहेत ?–प्रती धर्मराज अवतरले आहेत बरें का!–कायरे निंदका, आतां कशी खोड मोडली !

पोर्शिया—अहो! हे शेटजी स्वस्थ उभे कां ?–शेटजी, आतां अडले कोठें ?

शायलॉक—माझी मुद्दल रक्कम तरी मला आतां देव-वा ह्मणजे मी आपला चाललो.

बसॅनियो--अहो ही इकडे केव्हांची तुमच्यापुढें ठेविली आहे.

पोर्शिया—पण रक्कम घेण्याचें तर त्यांनीं भर कोर्टांत नाकारिलें आहे. त्यांना त्यांचा न्याय, व हुकूम-नाम्याची अम्मलबजावणी येवढें त्यांना आतां काय तें मिळावयाचें.

ग्रॅशियानो—अहो, कसे आहेत धर्मराज!—मूर्तिमंत धर्मराज,–शेटजी, तुह्मी मला हा शब्द शिकविलात, हें बरें केलें.

शायलॉक--मग काय ह्मणतां? नुसती मुद्दल रक्कम मिळेल असें तरी करतां का ?

पोर्शिया—नाहीं,नाहीं. कांहीं एक करतां यायचें नाहीं! केवळ दंड मात्र तुला द्यावा लागेल; आणि तो देखील, मघांशीं सांगितल्याप्रमाणें, तुझ्या मालमत्तेची जप्ती करून वसूल केला जाईल.

**शायलॉक**--फार उत्तम! सैतान त्याचें वाटोळें करो! यापुढें तुमचे प्रश्नाचें उत्तर देण्याला मी येथें थांबत नाहीं.

**पोर्शिया**—शेटजी, अम्मळ थांबा हो, येवढ्यानेंच कुठें भागत आहे? कायद्याचें दुसरें एक कलम तुमच्यावर लागू होत आहे. व्हेनीसनगरच्या कायद्यांत असें सांगितलें आहे--बरें कां शेटजी—कीं कोणी परक्या मनुष्यानें व्हेनीस नगरच्या कोणाहि नागरिकाचा जीव घेण्याचा प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीतीनें यत्न केला असें कायद्यानें सिद्ध झालें तर तो एक भयंकर अपराध होईल. व त्याबद्दल त्या इसमाच्या मिळकतीचा व मालमत्तेचा अर्धा भाग सदरहू नागरिकाला देववावा. व बाकीची मालमत्ता खासगीकडे जप्त करावी. शिवाय अशा अपराध्यावर दया करून त्याला जीवंत ठेवणें न ठेवणें हें केवळ येथल्या महाराज सरकारच्या मर्जीवर अवलंबून राहील. त्या बाबतींत इतर कोणालाच बोलण्याचा अधिकार नाहीं. तर आतां मी असें सांगतों कीं, हें कलम तुमच्यावर पूर्णपणें लागू होत आहे; प्रतिवादीचा जीव घेण्याचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष यत्न तुह्मीं केल्याबद्दलचें आतांच सर्वांसमक्ष शाबीत झालें आहे. ह्मणून या अपराधाबद्दल मी मघांशीं सांगितलेल्या शिक्षेस तुह्मी सर्वस्वीं

पात्र झालां आहां. तेव्हां आतां ड्यूक साहेबांच्या पायां पडा, व त्यांची क्षमा मागा.

ग्रॅशियानो--शेटजी, आतां आपण फाशीं जावें, अशी आपल्याला माझी विनंति आहे. पण हो !– तुमची सर्व मालमत्ता सरकारांत जप्त झाली आहे, तेव्हां फासाची दोरी तरी आतां तुह्मी कोठून आणाल ? पण मी ह्मणतों तुम्हांवर सरकार दयाळू होऊन तेवढी सरकारी खर्चानें तुम्हांला मिळेल; कांहीं हरकत नाही !

ड्यूक--शेटजी, आमच्या व तुम्हां यहुदी लोकांच्या स्वभावांत किती फरक आहे, तो पाहिलात ? असो. आतां तुम्हांवर दया करून आह्मी तुम्हाला जीवदान देतों. अहो कायद्यांत लिहिल्याप्रमाणें तुमची अर्धी जिंदगी ॲन्टोनियोला मिळावयाची ती तर त्याला मिळेल पण अर्धी सरकारांत जमा व्हावयाची ती, तुम्ही ताठा सोडून नम्रपणें वागू लागाल तर, तुम्हांकडे ठेवूं, केवळ दंडाची रक्कमच कायती तुमच्यापासून घेऊं.

पोर्शिया—हें पाहिजे तर सरकारतर्फे आपण म्हणावें. हें म्हणणें ॲन्टोनियोला लागू नाहीं.

शायलॉक–असें तरी कशाला करतां ? माझा जीव किंवा जिंदगी कांहींच सोडूं नका. अहो, ज्या पायावर माझें घर उभारलें आहे तो पाया मजपासून काढून

घेतल्यावर मग घर माझें तें कशाचें ? कारण ज्या साधनानें मी आपला जीव जगवितों तें साधनच तुम्ही घेतलें, तर तुह्मी माझा प्राणच घेतला असें होत नाहीं काय ?

**पोर्शिया**-- ( अॅन्टोनियो याजकडे पाहून ) काय हो, याजवर तुम्ही दया करून याला काय सोडून देण्यास तयार आहा ?

**ग्रॅशियानो**--मी तर बुवा याला फाशी द्यावयाला लागणारी दोरी देण्यास तयार आहें. अधिक कांहीं मिळणार नाहीं.

**अॅन्टोनियो**—महाराज, आपली व सरकारची परवानगी मिळेल, तर मी बोलतों. अर्धी जिंदगी दंड म्हणून जप्त करावयाची ती त्याला आपण सोडली तर मला समाधानच आहे. आतां दुसरा अर्धा भाग मला मिळावयाचा तो, याची मुलगी पळवून नेणाऱ्या मनुष्याला याच्या मरणानंतर मिळावा असें मी इच्छितों; मात्र, याबद्दल त्यानें दोन गोष्टी केल्या पाहिजेत:--एक ही कीं, यानें आतांचे आतां ख्रिस्ती व्हावें, आणि दुसरी ही कीं, मरणसमयीं यानें आपली जिंदगी, याचेपाशीं जी कांहीं असेल ती, त्यानें आपल्या मुलीच्या व जांवयाच्या नांवानें करून द्यावी.

**ड्यूक**—ठीक आहे. आह्मी म्हणतों, त्यानें असेंच करावें. हें त्याला कबूल नसेल तर आह्मी मघांशीं सांगि-त्याप्रमाणें त्याच्यावर कोणत्याहि प्रकारें दया केली जाणार नाहीं.

**पोर्शिया**—काय हो शेटजी, बोला, या सर्व गोष्टी तुम्हाला कबूल आहेत काय? किंवा यावर तुमचें कांहीं म्हणणें आहे?

**शायलॉक**—होय, हें सर्व मला कबूल आहे.

**पोर्शिया**—तर मग, ( शिरस्तेदार यांस उद्देशून ) या सर्व गोष्टी एका कागदावर लिहून घ्या.

**शायलॉक**—आतां मजवर मेहेरबानी करून मला एकदां येथून जाऊं द्या. सध्यां माझ्या जिवाला बरें नाहीं. कागद लिहून मागाहून माझ्याकडे पाठवून द्या; मी सही करून देईन.

**ड्यूक**—जा आतां; पण कागदावर तुमची सही मात्र झाली पाहिजे.

**ग्रॉशियानो**—मी जर न्यायाधीश असतों तर या यहु-द्याला दहा वेळां फाशीं देण्याचा हुकूम केला असता.

( शायलॉक जातो. )

**ड्यूक**—आतां कृपा करून, आमच्याबरोबर आमच्या येथेंच जेवायाला चला.

**पोर्शिया**—महाराज, मेहेरबानी करून मला एवढी माफी करावी. आजचे आज मला

पॅडूवा येथें गेलें पाहिजे. ह्मणून आतांच्या आतांच मी निघणार आहें.

**ड्यूक**--आपल्याला वेळ नाहीं, याचें आम्हांला फार फार वाईट वाटतें. ( अॅन्टोनियो याजकडे वळून ) या सद्गृहस्थांना संतोषित करा बरें का. यांचे तुह्मांवर अनंत उपकार झाले आहेत.

( ड्यूक व त्याचे नोकर जातात. )

**वसॅनियो**--महाराज, आज आपण केवळ आपल्या विद्वत्तेच्या व बुद्धिकौशल्याचा बळावर माझ्या मित्रावर व मजवर आलेले आरोप दूर करून आह्मांला मोठ्याच संकटांतून मुक्त केलें, यांत संशय नाहीं. आतां या यहुद्याला देण्याकरितां तीन हजार रुपये आह्मी जे आणले आहेत, ते आपल्या सन्मानार्थ खर्च करावें असें आमचें मानस आहे. तर आमची ही नम्र सेवा आपण स्वीकारावी अशी आमची आपणास विनंति आहे.

**अॅन्टोनियो**--प्रेमाच्या किंवा सेवेच्या मोबदल्यानें आपले आह्मांवरील उपकार कधीं फिटणार नाहींत. आह्मी आपले निरंतरचेच ऋणबद्ध झालों आहों.

**पोर्शिया**--ज्याला समाधान झालें, त्याला सर्व कांहीं मिळालें असें मी समजतों. तुह्मांला या संकटांतून सोडविण्याचा माझा यत्न सफल झाला हें पाहून मला अत्यंत समाधान होत आहे. व त्यांतच जें

कांहीं मिळावयाचें तें सर्व मला मिळालें. मोबदल्याच्या इच्छेनें मीं आजपर्यंत कोणतीच गोष्ट केली नाहीं. आपली आमची पुन्हां भेट होईल तेव्हां आह्मी काय ह्मणतों त्याचा खुलासा होईल. आतां आपण यावें, व आह्मीही आपली रजा घेतों.

**बसॉनियो**--आपण नको नको ह्मणतां तरी आह्मी कांहीं तरी देणारच; हें बक्षीस ह्मणून नव्हे, तर आह्मा गरीबांची आठवण राहावी एवढ्याचकरितां आपण आमचें हें ह्मणणें मान्य करावें. सारांश, आह्मी आपणापाशीं दोन गोष्टी मागतों—एक ही कीं, आह्मीं देत आहों तें नको ह्मणूं नका. आणखी, दुसरी ही कीं, आपणाला फारच त्रास पडला त्याबद्दल आपण आह्माला क्षमा करा.

**पोर्शिया**—बरें आहे. तुह्मीं तर बुवा भारी आग्रह करतां. तेव्हां मलाहि तुह्मांला नाहीं म्हणवत नाहीं. (बसॅनियोयास उद्देशून) तुमचे तेवढे हात मोजे आम्हाला देतां का? तुमची आठवण म्हणून मी ते नेहमीं आपल्या हातांत घालीत जाईन.

(बसॅनियो हातमौजे काढून देतो.)

आणि तुम्ही म्हणतां तसाच जर तुमचा मजवर लोभ आहे तर ही एवढी आंगठी आम्हांला द्या. (बसॅनियो हात मागें घेतोसें पाहून) तुम्ही आपला हात असा मागें मागें कां घेतां?

तुम्हापाशीं आणखी कांहीं मागत नाहीं. स्नेहाखातर एवढी आमची ही विनंति अमान्य करूं नये.

**बसॅनियो**—ही अंगठी ? छे, ही तर अगदीं क्षुल्लक वस्तु. असली हलकी देणगी आपणाला देण्याला मला संकोच वाटतो.

**पोर्शिया**—पण आम्हाला आपली हीच हावी; दुसरें कांहीं नको. आमचें मन हिच्यावरच बसलें आहे.

**बसॅनियो**—या अंगठीची किंमत कांहीं फारशी नाहीं पण दुसऱ्या एका बाबतींत हिचें महत्व विशेष आहे. तरी चिंता नाहीं; सर्व व्हेनीस शहरांत अत्यंत मौल्यवान अंगठी कोणापाशीं आहे ही चवकशी करवितों वाटेल ती किंमत पडो-ती देऊन ती मी अंगठी खरेदी करतों आणि आपणाला अर्पण करतों. पण ही अंगठी मात्र मला देतां येत नाहीं; निरुपाय आहे. याबद्दल क्षमा असावी.

**पोर्शिया**—वाहवा ! एकंदरींत आपण मोठेच दानशूर आहां. अहो, मजपाशीं कांहीं मागा म्हणून आपणच ना आम्हांला म्हणाला आणि आह्माला जें मागावेंसें वाटलें तें मागितल्यावर, आतां असें कां म्हणतां ?

**बसॅनियो**—काय सांगू महाराज ! ही आंगठी मला माझ्या प्रिय पत्नीनें दिलेली आहे. आणि तिनें जेव्हां ही माझ्या बोटांत घातली तेव्हांच मला बजावून सांगितलें कीं, ही कोणाला देऊं नका, विकूं नका, किंवा हरवूं नका.

**पोर्शिया**—हो, हो, मनांतून वस्तू द्यावयाची नसली ह्मणजे पुष्कळ लोक अशीच कांहीं तरी सबब सांगतात. तुमची बायको जर वेडी नसली, आणखी ही अंगठी घेण्याला आमचा अधिकार किती पोंचतो हें जर तिला नीट समजलें, तर ती ह्मणजे तुमच्यावर रुसूनच बसेल असें वाटत नाहीं.

( पोर्शिया व नेरिसा रागावून जातात. )

**ॲन्टोनियो**—मित्रा बसॅनियो, जाऊं दे,-अंगठी त्यांना दे. त्यांचे आपणांवरील अनंत उपकार स्मरून व मज-वरील प्रेमाकडे लक्ष देऊन ही अंगठी त्यांना दि-ल्याबद्दल तुझी बायको तुला जें बोलेल तें बोलूं दे; निमूटपणें ऐकून घे.

**बसॅनियो**—( ग्रॅशियानो यांस उद्देशून ) अरे, जा, त्यां-ना गांठून ही अंगठी दे, आणि कसेंहि करून ॲ-न्टोनियो याच्या घरीं त्यांना परत घेऊन ये. जा-जा–लवकर जा.

( ग्रॅशियानो जातो. )

( ॲन्टोनियो यास उद्देशून ) चला तर, आपणहि असेंच तुझ्या घरीं जाऊं. उद्यां मोठ्या पहाटे आपण दोघेहीं बेलमान्ट येथें जावयास निघूं बरं का. तर चला लवकर.

( जातात. )

## प्रवेश २ रा.

स्थळः—व्हेनीस नगरांतील एक रस्ता.

( पोर्शिया व नेरिसा दोघी प्रवेश करितात. )

**पोर्शिया**—अग नेरिसे ! त्या यहुद्याचें घर कोणतें याचा तपास आधीं कर; त्याला भेटून ह्या कागदावर त्याची सही घे. बरें तें असो. आपणास आज रात्रींच येथून निघायाचें बरं का. आपले प्रियकर बेलमॉन्ट येथें जाऊन पोहोंचले नाहींत तों आधींच आपण तेथें जाऊन पोहोचूं—खरोखर, या कागदानें लोरेन्झो याचेंहि कल्याणच होईल.

( ग्रॅशियानो प्रवेश करितो. )

**ग्रॅशियानो**—महाराज, आपल्याला मी तर एकदांचें—गांठलेंच-आमचे धनी बसॅनियोसाहेब यांनीं पुष्कळ विचार केला आणि बऱ्याच विचारानंतर ही आंगठी आपणांस द्यावी ह्मणून त्यांनीं ठरविलें; तरी हिचा स्वीकार करून, आज रात्रीं आपण दोघांनीं ॲन्टोनियो शेटजींच्या घरीं भोजनास आलें पाहिजे, अशी विनंति करण्याकरितां त्यांनीं मला आपणांकडे पाठविलें आहे.

**पोर्शिया**—नाहीं, नाहीं, असें कधीं होणार नाहीं. तथापि त्यांनीं पाठविलेल्या अंगठीचा आह्मी सं-

तोषानें स्वीकार करतों. आह्माला यायला सवड नाहीं, असें तुह्मी मेहेरवानी करून त्यांना कळवा.—आणि या आमच्या मनुष्याला तेवढें त्या यहुद्याचें घर दाखवा.

**ग्रॅशियानो**—बरं आहे, दाखवितों.

**नेरिसा**—महाराज, माझ्या मनांतून आपल्याला कांहीं सांगायाचें आहे. ( एका बाजूला वळून पोर्शियेस ) माझ्या प्रियकरांना मी जी एक अंगठी दिली आहे, व जी नेहमीं जवळ बाळगण्याविषयीं त्यांना मी शपथ घातली आहे, ती जर त्यांच्या पासून मला मागून घेतां आली तर पहातें.

**पोर्शिया**—( एका बाजूला ) बरें, पहा मिळाली तर—मी सांगून ठेवतें तुला, घरीं गेलें ह्मणजे आपणांला पूर्वीप्रमाणेंच फिरून शपथांवर शपथा वाहिलेल्या पहावयास सांपडतील. ते म्हण-तील आह्मी आंगठ्या आमच्या स्नेह्यास दिल्या—पुरुषांना दिल्या. पण मग आपणही त्यांचे तोंडा-वर त्यांना धुडकावून ह्मणूं, आणि तशाच ठासून शपथा वाहूं कीं, त्या तुह्मी पुरुषांना नाहीं दिल्यात, कोणा स्त्रियांनाच दिल्यात. मग कशी पण बहार होईल !--( मोठ्यानें ) जा, लवकर जा. मी कोणत्या

ठिकाणीं तुझी वाट पाहत राहणार आहें, हें तुला माहीतच आहे.

ेरिसा—( ग्रॅशियानो यांस उद्देशून ) चला हो, मला त्या यहुद्याचें घर दाखवितां ना ?

जातात.

---




जेसिका—अशा प्रकारच्या बोलण्यांत मी तुह्मावर सरशी करून रात्र थोडी केली असती !

व्हेनिस नगरचा व्यापारी अंक ५; पृष्ठ. १६९.

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

स्थळः—बेलमान्ट, पोर्शियेच्या
वाड्यासभोंवतालचा बाग.

( लोरेन्झो, व जेसिका प्रवेश करितात. )

**लोरेन्झो**—आज चांदणें तरी किती स्वच्छ पडलें आहे हे! हा मंद मंद वाहणारा शीतळ वारा वेलींचें जणो चुंबन घेत आहे; पण त्या बिलकूल गडबड करीत नाहींत. मीं असें वाचलें आहे कीं, ट्रॉईलस हा ट्राय शहराच्या तटावर चढून बाहेर मैदानावर ग्रीक लोकांचे तंबू होते, त्यांकडे पहात बसला होता. त्याची आवडती स्त्री क्रेसिडा ही एका तंबूत अटकेंत होती, तिची कशी व केव्हां गांठ पडते ह्मणून तो फार उत्कंठीत झाला होता.—केवळ उतावळेपणानें धापा टाकीत होता. ती वेळ अशीच रात्रीची होती व त्या रात्रीं—ऐकलेंस काग, असेंच सुंदर स्वच्छ चांदणें पडलें होतें; नव्हे का?

**जेसिका**—हो, हो, खरेंच! पण अशाच एका रात्रीं थिसबी ही आपल्या प्रियकराची भेट होण्यापूर्वींच सिंहाची सांवली पाहून भयानें गांगरून धापा टाकीत पळत गेली ह्मणतात.

**लोरेन्झो**–आणि अशाच एका रात्रीं डिडोहीनें आपल्या प्रेमाची निराशा झाल्यामुळें, समुद्राच्या कांठीं उभी राहून आतां कार्थेजला परत चल अशी आपल्या प्रियकराला खूण केली.

**जेसिका**—अशाच प्रकारच्या एका रात्रीं मीडीया हिनें कांहीं मंतरलेल्या वनस्पतीच्या साह्यानें आपला वृद्ध सासरा एसन याला तरुण केलें. केवढा तरी हा पराक्रम !

**लोरेन्झो**—आणि अशाच एका रात्रीं जेसिका नांवाच्या एका तरुणीनें आपल्या बापाच्या घरचें वरेंचसें डबोलें घेऊन, मनांत कांहीं एक शंका न आणतां, आपल्या प्रियकराबरोबर पोबारा केला,–आणि बेलमान्ट येथें आली !

**जेसिका**—अशाच एका रात्रीं लोरेन्झो नांवाच्या एका तरुण गृहस्थानें तिला आपल्या नादीं लावून, मी तुझ्यावर नेहमी प्रेम ठेवीन अशा खोट्या खोट्या शपथा वाहिल्या व त्या खऱ्या मानून तिनें त्याला आपलें तनमनधन अर्पण केलें.

**लोरेन्झो**—अशाच एका रात्रीं ती जेसिका एकाद्या त्राटिकेप्रमाणें आपल्या प्रियकराला पाहिजे तसें टाकून बोलूं लागली. पण त्या बिचाऱ्यानें तिला सर्व अपराधांची क्षमा केली, आणि तें सर्व निमूटपणें ऐकून घेतलें !

**जेसिका**--आसपास जर कोणी आलें नसतें तर अशा प्रकारच्या बोलण्यांत मीं तुम्हांवर सरशी केली असती. पण थांबा, माणसांची चाहूल लागत आहे.

( स्टिफॅनो प्रवेश करतो )

**लोरेन्झो**--अरे, अशा या मध्यरात्रीं इतक्या जलदीनें तिकडे कोण चालला आहे तो ?

**स्टिफॅनो**--एक दोस्त.

**लोरेन्झो**-दोस्त ? असा दोस्त कोण बुवा ? अशा दोस्ताचें नांव काय ?

**स्टिफॅनो**--माझें नांव स्टिफनो. आणखी आमची धनीण, उजाडलें नाहीं तों, बेलमान्ट येथें येऊन पोहों-चेल असा निरोप सांगावयाला मी आलों आहें. ती यात्रेकरूसारखी अशीच इकडे तिकडे हिं-डत असते; आणखी लवकर लगीन व्हावें म्हणून जिथें तिथें देवाची आराधना करीत बसते.

**लोरेन्झो**--तिच्याबरोबर आणखी कोणी आहे का ?

**स्टिफॅनो**--दुसरें कोणी नाहीं. दिसण्यांत जोगिणी-सारखी अशी तिची एक दासी मात्र तिच्या बरोबर असते.-पण आमचे धनीसाहेब इकडे परत आले का?

**लोरेन्झो**--छे हो, ते तर अजून आले नाहींत. त्यांची आम्हांला कांहीं एक खबर नाहीं.-पण जेसिके, चल यजमानीण येईल तिचा

आदरसत्कार केला पाहिजे, तर तयारी करून ठेवून त्यांना सामोरे जाऊं.

(लॉन्सलाट कर्णा वाजविल्याप्रमाणें मोठ्यानें शब्द करीत प्रवेश करितो.)

**लोरेन्झो**--अरे, कोणरे तो ओरडत आहे ?

**लॉन्सलाट**—आमचे धनी लोरेन्झो तुह्मांला भेटले होते का ?

**लोरेन्झो**--असा उगीच ओरडूं नको. हा पहा येथेंच आहे तुझा धनी.

**लॉन्सलाट**--कुठे ? कुठे ?

**लोरेन्झो**--हा येथेंच.

**लॉन्सलाट**--तर मग त्यांना सांगा कीं, आमच्या थोरले धनीसाहेबांकडून अगदीं आनंदाची बातमी आली आहे कीं, सरकार उजाडलें नाहीं तोंच इकडे येणार आहेत. (लॉन्सलाट जातो.)

**लोरेन्झो**--चल आपण आंत जाऊं आणि त्यांच्या येण्याची वाट पहात बसूं. पण नको. आंत तरी कशाला जायला पाहिजे ? स्टिफॅनो, तुझी धनीण घरांत आहे, तिला ही बातमी जाऊन सांग लवकर. आणखी आपलीं सारीं वाद्यें इकडेच घेऊन ये. (स्टिफॅनो जातो.)
अहाहा ! या समुद्राच्या कांठीं शयन करणारी ही कौमुदी कशी रमणीय दिसत आहे ! तर मग

आपण येथेंच बसूं. वाद्यें वाजूं लागलीं म्हणजे त्यांचे मधुर स्वर सहज आपल्या कानीं पडतील. खरोखर, रात्रीच्या अशा शांतवेळीं वाद्यांचे सुस्वर ध्वनि कानाला किती तरी मंजुळ लागताहेत! ये जेसिके, अशी इकडे बैस. ती पाहिलीस का गग-नाची तकतकीत तक्तपोशी सुंदर अशा सुवर्णाच्या पत्र्यानें जणों मढविली आहे! त्या पहा, जितक्या म्हणून चांदण्या दिसत आहेत, तितक्या साऱ्या अप्सरांप्रमाणें नृत्य करून गीतें गात आहेत. या स्वर्गीय नृत्यगीतापासून पुराणांतरी वर्णिलेल्या सुकुमार सुंदर बालकांना किती तरी आनंद होत असेल! असा आनंद या अजरामर प्राण्यांमध्यें नेहमीं नांदत असलेला आढळून येतो; पण या जड कुत्सित मानवी शरीरांत हे जीव गुरफटून गेले असल्यामुळें त्यांना मात्र त्याचा सुखानुभव होत नाहीं.

( वाद्यें वाजविणारे प्रवेश करितात. )

अरे असे या. गगनांत स्वस्थ झोंपीं गेलेल्या त्या रजनीनाथ चंद्रम्याला तुमच्या मधुर मंजुळ आलापांनीं जागें करा, व त्यास त्याचे घरीं लाउन द्या.

**जेसिका**—काय असेल तें असो—मंजुळ वाद्यांचा स्वर माझ्या कानीं पडला कीं, माझा उतावीळपणा मावळून माझे जिवाला बाई मोठें समाधान वाटूं लागतें.

**लोरेन्झो**—मी सांगू त्याचें कारण? वाद्यांच्या मंजुळ स्वरांनीं तुझें चित्त एकाग्र होतें हेंच. पहा बरं, जीं

जनावरें जंगलांत स्वछंदानें रानोमाळ फिरत असतात व आपआपल्या स्वभावाप्रमाणें कर्कश आवाज काढून ओरडत असतात; त्याचप्रमाणें जे वळू घोडे ज्यांना कधीं मनुष्याचा संपर्क झाला नाहीं, व जे ताज्या दमामुळें वांकडच्या तिकड्या उड्या मारीत फिरतात, तेच घोडे व तींच जंगली जनावरें मंजुळ वाद्यांचा मधुर ध्वनि कानीं पडतांच एकदम थांबून, हा आवाज कोठून येत आहे असें मोठ्या कौतुकानें व शांतपणें पाहूं लागतात. हा सर्व मंजुळ ध्वनीचा प्रभाव आहे. ही गोष्ट लक्षांत आणूनच, कवींनीं अशी कल्पना केली आहे कीं, कोणी प्रतापवान् देव केवळ आपल्या मंजुळ गाण्यानें निर्जीव झाडांना व पाषाणांना जागचें ढळवून आपणाकडे आणतो; खवळलेल्या समुद्राला व महापुरांनाही शांत करतो. *ज्या मनुष्याला स्वतः-

---

*साहित्य संगीतादिकांचें महत्त्व जसें येथें वर्णिलें आहे, तसेंच सरासरी भर्तृहरीनेंहि आपल्या नितीशतकांत वर्णिलें आहे, त्याकडे लक्ष देण्यासारखें आहे. दोघांचे विचार ताडून पाहतां यावे, म्हणून येथें देतों भाषांतराचें मूळ असें आहे:—

...Music for the time doth change his nature.
The man that hath no music in himself,
Nor is not moved with concord of sweet sounds,
Is fit for treasons, stratagems and spoils;
The motions of his spirit are dull as night.
And his affections dark as Erebus;
Let no such man be trusted.

याशीं पुढील उद्गार ताडून पहाः—

( पुढें चालू. पृष्ठ १७३ पहा. )

ला कधींही गावेंसें वाटत नाहीं, किंवा उत्तम गायनानें जो मोहित होत नाहीं, तो मनुष्य ह्मणजे फंदफितुरी, किंवा अशींच कोणतीं तरी नीच कर्में करण्यास योग्य आहे. त्याच्या मनांत जे विचार चालतात, ते नेहमीं अंधकाराप्रमाणें व त्याचे मनोविकार कोळशाप्रमाणें काळे असतात. अशा माणसाचा कोणीं कधींही विश्वास करूं नये. बरें तें जाऊं द्या. पण गाण्याकडे तुझें लक्ष आहे ना ?

( पोर्शिया व नेरिसा प्रवेश करितात. )

**पोर्शिया**—तो पाहिलास का आपल्या दिवाणखान्यांतला दिवा दिसत आहे. मेणवत्ती ती काय, पण किती लांबपर्यंत तिचा उजेड येतो आहे हा ! या पापी जगांत एखाद्या चांगल्या कृत्याचा असाच दूरवर प्रकाश पडतो !

---

( मा० पृ० चालू. )

साहित्य-संगीत-कलाविहीनः
साक्षात् पशुः पुच्छविषाणहीनः ।
तृणंन खादन्नपि जीवमानः
तद्भागधेयं परमं पशूनाम् ।

**भर्तृहरिकृत नीतिशतक**

याचप्रमाणें पुढील पद्यहि सुप्रसिद्धच आहे:—

सुभाषितेन गीतेन युवतीनां च लीलया ।
यस्य न द्रवते चित्तं स योगि ह्यथवा पशुः ॥

**जिनधर्म विवेक**

**नेरिसा**--पण बाईसाहेब, चांदणें होतें तेव्हां हा दिवा आपल्याला कुठें दिसत होता

**पोर्शिया**--तेंहि खरेंच. मोठ्या वैभवापुढें लहान वैभव फिकें पडतें. जोंपर्यंत राजा जवळ नाहीं तोंपर्यंत सुभेदाराचें तेज राजतेजाप्रमाणेंच चमकतें. पण तेंच राजा स्वतः राज्यकारभार पाहूं लागला, ह्मणजे महासागराला मिळणाऱ्या लहानशा ओढयाप्रमाणें, त्या सुभेदाराचें तेज राजाच्या तेजांत कोठं मिळून जातें तें कळत सुद्धां नाहीं ! ऐकलेंसग नेरिसे ? हा वाद्यांचा आवाज कोठून बरें येत आहे ?

**नेरिसा**--खचीत बाईसाहेब, आपल्या वाडयांतच वाद्यें वाजत आहेत.

**पोर्शिया**--कोणत्याहि गोष्टीची किंमत आजूबाजूच्या गोष्टीशीं तुलना केल्यान होते. अशा रात्रीच्या समयीं, हे स्वर दिवसा लागतात त्याहून किती तरी मधुर लागतात !

**नेरिसा**--बाईसाहेब, खरेंच. पण हा सारा रात्रीच्या शांततेचा प्रभाव आहे; आणखी काय ?

**पोर्शिया**--सूर कोणाचा आहे इकडे जर कोणाचें लक्षच नाहीं तर कावळ्याचा सुरहि उत्तमच! दोघांची किंमत सारखीच ! पहा कीं, दिवसा बदकांची चिलबिल कानीं पडत असतां बुलबुल पक्षी गातो काय आणि

रातकिडा करकरतो काय, दोन्ही सारखींच नव्हत. काय ? ह्मणून मीं ह्मणतें, कोणत्याहि गोष्टी व्हावयाच्या तेव्हां झाल्या तरच त्या गोड लागतात व सर्वांच्या स्तुतीलाहि पात्र होतात. अरे ऐकारें ! वाद्यें आतां बंद करा. ह्यावेळीं अगदीं मध्यरात्रीचा समय झाला आहे यामुळें रात्रीच्या शांततेचा भंग करणें बरोबर नाहीं.

( वाद्यें वाजण्याचीं थांबतात. )

**लोरेन्झो**--मला भास झाला तो जर खोटा नसला तर हे शब्द बाईसाहेबांचेच होत.--पण फसलों कीं काय ?

**पोर्शिया**--चांगल्या वाईट स्वरावरून आंधळा मनुष्यहि कोकिलेला ओळखतो याप्रमाणें केवळ माझ्या शब्दावरून यानें मला बरोबर ओळखलें.

**लोरेन्झो**—बाईसाहेब, बाहेर कां ? चला, आंत चला.

**पोर्शिया**--आह्मां दोघींचे यजमान, सुखरूप परत यावे, ह्मणून आमची रात्रंदिवस ईश्वरापाशीं प्रार्थना चालली आहे. आणि ते आतां लवकरच येतीलसें वाटतें ! हो, आमचे शब्द खरें होणारच. तर मग काय ह्मणतां, ते परत आले होय ?

**लोरेन्झो**--बाईसाहेब, ते आले तर नाहींत; इतक्यांतच ते येतील असा त्यांचा निरोप घेऊन एक माणूस मात्र पुढें आला आहे.

**पोर्शिया**—बरें. नेरिसे, झालं—तर तूं आंत जा. आणि आतां आपणालाही इकडेसच रहावयाला यावयाचें, समजलीसना ? ( नोकरास उद्देशून ) आतांपर्यंत आपण कुठें बाहेर राहत होतों तें कोणालाही कळवावयाचें नाहीं. अशी दरोबस्त नोकरांना ताकीद दे—जेसिके, समजलीसना ? बरें का लॉरेन्झो ?

( पडद्यांत कर्णा वाजतो. )

**लॉरेन्झो**—बाईसाहेब, हा ऐकलात कर्णा? मी खात्रीनें सांगतों कीं आपले यजमान अगदीं जवळ येऊन पोंचले. आह्मीं कांहीं आपले उगीच पाहिजे तशा गप्पा ठोकणारे नाहीं; याबद्दल आपल्याला मुळींच शंका नसावी.

**पोर्शिया**—ही पाहिलीस का रात्र, कशी अगदीं अंधक दिवसाप्रमाणें भासूं लागली. आणि एकाद्या दिवशीं ढगांमध्यें सूर्य लोपला ह्मणजे तो दिवस जसा उदास वाटूं लागतो, तशीच तऱ्हा या वेळीं झाली आहे.

( बसॅनियो, ॲन्टोनियो, ग्रॅशियानो, व त्याच्या बरोबरची मंडळी प्रवेश करतात. )

**बसॅनियो**—रात्रीच्या समयीं, तूं जर अशी बाहेर हिंडूं लागलीस तर पाताळांत जसा या वेळीं दिवस आहे, तसाच आम्हांलाही दिवस होईल !

**पोर्शिया**—मी तुह्माला प्रकाश दिला असं जरी ह्मटलं तरी चिंता नाहीं, पण स्त्रिया ह्मणजे पुरुषांना ओझं असं मात्र ह्मणूं देणार नाही. पण ईश्वरानें काय योजिलें असेल तें खरें. आपण आला, बरें झालें चलावें आंत चलावें.

**बसॅनियो**—प्रिये, मी तुझा आभारी आहे. या माझ्या मित्राचें स्वागत कर. हाच तो माझा मित्र बरें.—याचे माझ्यावर अनंत उपकार आहेत.

**पोर्शिया**—खरोखर तुमच्यासाठीं यानींच का त्या यहुद्याला करारनामा लिहून देऊन आपल्याला बद्ध करून घेतलें होतें ?--ह्मणून आपणहि त्यांच्या उपकारांनीं बद्ध झालां आहां, हें ठीकच आहे.

**ॲन्टोनियो**--पण आतां मी निर्दोषी ठरलों असल्यामुळें माझ्यावर माझ्या मित्राचेच उपकार अधिक झाले आहेत.

**पोर्शिया**—महाराज, आपण आलां फार उत्तम झालें, आह्माला सर्वांना फार फार संतोष होतो. आपला आदरसत्कार केवळ शब्दांनींच करणें योग्य नाहीं, तर तो, कृतीनें केला पाहिजे. तेव्हां मी अधिक बोलत नाहीं.

**ग्रॅशियानो**--(नेरिसेस उद्देशून) मी खोटें बोलत नाहीं. मी त्या चंद्राचीच शपथ घेऊन सांगतों कीं, तूं अशी भांडतेस हें कांहीं बरें करीत नाहींस. मी ती अंगठी वकिलाच्या कारकुनाला दिली; दुसरे कोणाला दिली नाहीं.

**पोर्शिया**—हें काय? तिकडे ती धुसपूस कसली चालली आहे? कायग आहे?

**ग्रॅशियानो**—बाईसाहेब, दुसरें कांहीं नाहीं, हिची सोन्याची एक अंगठी होती; आणखी चाकूवर जशीं अक्षरें खोदलेलीं असतात तशीं तिच्यावरही 'माझ्यावर नेहमीं प्रेम असूं द्या.' अशीं अक्षरें खोदलेलीं होतीं. ती अंगठी हिनें मला दिली इतकेंच.

**नेरिसा**—तिच्यावर काय खोदलें होतें, आणखी ती किती किंमतीची होती हें तुह्मांला कोणीं विचारलें आहे? मी जेव्हां ती तुह्मांला दिली त्या वेळीं तुम्हाला शपथ घालून बजावलें नव्हतें का?—तुह्मी जन्मभर ती आपल्या बोटांत बाळगावी ह्मणून? व मरणसमयीं देखील ही तुमच्याबरोबर थडग्यांत पुरली जावी ह्मणून? आणखी मी ह्मणतें, माझ्याकरितां एक राहो, पण तुम्हीं त्या वेळीं ज्या येवढ्या मोठमोठ्या शपथा घेतल्या त्या तरी लक्षांत ठेवावयाच्या होत्या? हें सगळं राहीलें एकीकडे, आणि काय ह्मणे त्या न्यायाधिशाच्या कारकुनाला दिली. मी खचीत सांगतें त्याला जरी ती मिळाली असली तरी तो ती कशी घालतो तें मी पाहीन!—न्यायाधीश कसला आणि काय कसलं!

**ग्रॅशियानो**—हो, हो, कशी ह्मणजे? वयानें मोठा

झाला ह्मणजे, तो ती घालील, आणखी काय ?

**नेरिसा**—हो, स्त्री जर पुरुष होईल तर तसें घडेल !

**ग्रॅशियानो**—खरोखरी मी शपथ घेऊन सांगतों कीं, मी तर ती एका तरुणाला दिली. हो, हो! अगदीं अल्पवयी तरुण-मुलगासा होता. तो कारकून तुझ्यापेक्षां कांहीं मोठा नव्हता. तो मुलगा कशी सारखी बडबड करित होता-त्यानें ही मला बक्षीस द्या ह्मणून मागितली आणि माझ्यानें त्याला नाहीं म्हणवेना.

**पोर्शिया**—मी तुम्हाला कायते स्पष्ट सांगूं ? हा सगळा अपराध तुमचा आहे. आपली पहिली देणगी म्हणून हिनें जी आंगठी तुम्हांला अर्पण केली व शपथा घालून जी तुमच्या बोटांत बसविली, व जणों तेथें खिळून टाकशी कीं तेथून ती भ्रष्ट होऊं नये,-ती तिची आवडीची आंगठी तुम्हीं कोणाला देऊन टाकली, हा तुमचा दोष नव्हे ?-मीही आपल्या प्राणनाथांना अशीच एक आंगठी दिली आहे. आणि देतेवेळीं ही कधींही दूर होऊं देऊं नका, अशी त्यांना शपथ घातली होती. ते आतां येथें आहेतच. माझी खात्री आहे कीं, जगांतील सर्व संपत्ती जरी कोणी त्यांना देऊं केली तरी ते ती आंगठी कांहीं जाऊं देणार नाहींत. ( बसॅनियो याजकडे वळून ) मी काय म्हणतें, ऐकलें ?

खचीत सांगतें, मला जर कोणी असं दुःख दिलें असतें तर मी वेडी होऊन गेलें असतें.

**बसॅनियो**—छे, आतां माझा डावा हात तोडून फेंकून दिला पाहिजे, दुसरी तोडच नाहीं; आणि आंगठी काढून नेत असतां नेणाराला ती दिली नाहीं म्हणून त्यानें माझा हात छाटून नेला अशी बतावणी केली पाहिजे, दुसरी तोडच नाहीं.

**ग्रॅशियानो**—असें म्हणत असाल तर बाईसाहेब, आमचे बसॅनियो महाराज यांना आपण दिलेली आंगठी त्या वकिलानें मागितली; व त्या वेळीं तो मागेल ती वस्तु त्याला देणें योग्यच होतें, ह्मणून महाराजांनीं ती त्याला देऊन टाकली. आणि त्याच वेळीं त्याच्या कारकुनानेंही मजपाशीं माझी आंगठी मागितली. आम्हीं पुष्कळ आढेवेढे घेतले; पण काय करावें ? ते त्या दोन्ही अंगठ्यांवांचून अडून बसले. म्हणून आह्मी त्यांना त्या दिल्या.

**पोर्शिया**—प्राणनाथ, आपण कोणती आंगठी दिली ? मी आपणाला अर्पण केलेली आंगठी तर कांहीं आपण दिली नाहीं ना ?

**बसॅनियो**—माझ्या हातून एक अपराध तर घडलाच आहे. तसाच खोटें बोलण्याचा आणखी एक करायचा असला तर मात्र मी ती आंगठी दिली नाहीं, असेंच मला ह्मटलें पाहिजे. पण आतां तूंच पहा,

कीं, या माझ्या बोटांत कांहीं ती आंगठी नाहीं. अर्थात ती नाहींशी झाली !

**पोर्शिया**—खरेंचना एकूण ?—तर मग आपल्या कपटी अंतःकरणांत सत्याचा पूर्ण अभावच आहे ना ?

**बसॅनियो**—प्रिये, मी ती आंगठी कोणाला दिली हें जर तुला कळेल—कोणाकरितां तिला दूर केली—हें तूं लक्षांत घेशील—आणि आंगठीवांचून इतर कोणत्याहि वस्तूनें काम होईना, असें पाहूनच निरुपायास्तव ती मला द्यावी लागली. हें जर तुझ्या ध्यानांत येईल तर तूं माझ्यावर इतकी रागावणार नाहींस.

**पोर्शिया**—त्या आंगठीमध्यें काय गुण आहे किंवा ती आपल्याला अर्पण करणाऱ्या स्त्रीची काय योग्यता आहे, हें आपणांला खरेंच कळलें नाहीं. आंगठी आपल्या हातची जाऊं दिली तर निष्काळजीपणाचा दोष पदरीं येऊन, आपली अब्रू जाईल, याचा जर आपण विचार केला असता, तर आपण ती आपल्यापासून खचीत नाहींशी होऊं दिली नसती. त्या आंगठींत कांहीं मंत्र भरलेला आहे, व तिला आपण प्राणाहूनही अधिक जपतों असें निक्षून सांगून त्या गृहस्थाची आपण खात्री केली असतीं तर चाललें नसतें असं नाहीं. कारण तुमच्या

बोलण्याकडे दुर्लक्ष करून आपला आंगठीचा हेका धरून बसेल असा असभ्य व वेडगळ कोणी मनुष्य असेल असें मला वाटत नाहीं. असो. या संबंधाचा सर्व वृतांत नेरिसेच्या तोंडून मला कळलाच आहे; व आपणहि आपली सबब मला सांगितली—मी खचीत सांगतें ती आंगठी आपण कोणा तरी स्त्रीला दिली आहे. याबद्दल आतां तिळमात्रही शंका उरली नाहीं. मी ह्मणतें हें खोटें झालें तर मी आपला प्राण देईन.

**बसॅनियो**--प्रिये! प्रिये! माझ्या गळ्याची, माझ्या प्राणाची शपथ घेऊन मी सांगतों कीं, ती आंगठी मीं कोणाही स्त्रीला दिली नाहीं. प्रिये, मीं ती एका वकिलाला दिली आहे दुसऱ्या कोणालाही दिली नाहीं. त्यानें आमच्यावर मोठे उपकार केले. त्या ऋणांतून उतराई होण्याकरितां आह्मीं त्याला तीन हजार रुपये देण्यास काढले पण तो ते घेईना; व म्हणाला द्यावयाची असली तर ती आंगठी द्या. असें ह्मणून तो रागावून जाऊं लागला. त्यानें आमच्यावर केवढे उपकार केले आहेत ह्मणून सांगू? प्रिये, त्यानेंच माझ्या प्रियमित्राचा प्राण वांचविला, व याचसाठीं मीं ती

त्याला दिली. प्राणवल्लभे ! फार काय सांगू ? त्या-वेळीं लज्जेनें माझी अशी स्थिति होऊन गेली कीं, माझ्यानें नाहीं ह्मणवेना—तो गृहस्थ तर रागावून चालला! शेवटीं ती अंगठी मनुष्याचे हातीं मीं त्याजकडे पाठविली; एवढा कृतघ्नपणा माझ्यानें होईना. तेव्हां प्रिये, या अपराधाबद्दल आतां तूं मला क्षमा कर. या आकाशस्थ दीपकांची शपथ घेऊन तुला मी सांगतों कीं तूं जर त्या वेळीं तेथें असतीस व घडलेला सर्व प्रकार डोळ्यांनीं पाहतीस, तर सर्वथा योग्य अशा त्या कायदेपंडिताला देण्याकरितां तूंच ती आंगठी माझ्यापासून मागून घेतली असतीस.

**पोर्शिया**—असो, जाऊं द्या आतां—त्या तुमच्या कायदेपंडिताला आमच्या या बाजूला येऊं द्या तर खरं- याला इकडे पाऊल टाकूं देणार नाहीं, कारण न जाणों, ज्या आंगठीवर माझा येवढा जीव होता व जी नेहमीं जवळ ठेवीन म्हणून आपण मला वचन दिलें होतें, ती आंगठी जशी आपण उदारपणानें त्याला दिली, तशीच तेवढ्याच औदार्यानें दुसरी एकादी वस्तु त्यास देण्याची मला बुद्धि होईल.

**ॲन्टोनियो**—अरेरे ! एकूण या सर्व अप्रिय भांडणाला मीच कारण झालोंना ?

**पोर्शिया**—महाराज, आमचें हें कांहीं असो, तरी त्याबद्दल आपण बिलकूल खेद करूं नये. आपणाकडे याचा कांहीं एक संबंध नाहीं.

**बसॅनियो**—प्रिये, आतां माझें एवढेंच मागणें आहे कीं, निरुपायानें घडलेल्या या अपराधाची मला क्षमा कर. प्रिये, तूंचना म्हणत असतेस मी तुह्मा ला माझ्या डोळ्यांत सांठवून ठेविलें आहे म्हणून ? आणि हें जर खरें तर ज्या या तुझ्या डोळ्यांत माझें स्वरूप उमटलेलें दिसत आहे त्या तुझ्या सुरम्य डोळ्यांचीच शपथ घेऊन या सर्व मंडळीच्या समक्ष सांगतों कीं, मी ह्मणतों ती हकीकत अक्षरशः खरी आहे--त्यांत अणुरेणूइतकें सुद्धां खोटें नाहीं.

**पोर्शिया**—सर्व मंडळीहो ! ऐकलेंना तुह्मीं, यांनीं आतां काय ह्मटलें तें? हे ह्मणतात, तुझ्या दोन्ही डोळ्यांमध्यें माझी मूर्ती मला दिसत आहे. याचा अर्थ असा कीं, माझ्या दोन डोळ्यांत यांचीं दोन स्वरूपें उमटली आहेत, तर, महाराज, या आपल्या दुहेरी मूर्तीची आपण शपथ घ्या ह्मणजे माझें बोलणें संपलें.

**बसॅनियो**—पण मी काय ह्मणतों तें आधीं ऐकून तर घे. माझ्या अपराधाची मला क्षमा कर. आणि मी आपल्या प्राणांची शपथ घेऊन सांगतों कीं, इतः-

पर मी आपली ही शपथ ह्मणून कधीं मोडणार नाहीं.

**ॲन्टोनियो**—माझें ह्मणणें अम्मळ ऐकून घेतां?-माझ्या मित्राच्या कल्याणाकरितां मी एकदां आपला देह खर्चीं घालण्याला तयार झालों होतों; व आपल्या यजमानांपासून आपली आंगठी मागून घेणाऱ्या त्या सद्गृहस्थाच्या कृपेमुळेंच त्या माझ्या देहाचें रक्षण झालें. पण यापुढें आपले यजमान जाणून बुजून आपली शपथ मोडणार नाहींत. मोडली तर मी जामीन-सांगून ठेवतों, मी फिरून तोच देह अर्पण करीन; मागें पुढें पाहणार नाहीं.

**पोर्शिया**--तिकडच्याकरितां तुह्मी जर जामीन राहात असलां तर मग चिंता नाहीं. ही आंगठी पुनः त्यांना द्या, व मागच्यासारखी ही नाहींशी होऊं देऊं नका, म्हणून सांगा.

**ॲन्टोनियो**--हं, मित्रा, ही घे बाबा आंगठी; हिचें प्राणापलीकडे रक्षण करीन म्हणून शपथ वहा, पाहूं?

**बसॅनियो**--अरे वा, ! कायदेपंडिताला दिली तीं अंगठी हीच ! संशय कशाला ?

**पोर्शिया**-हो, हो ! मी ती त्यांच्यापासूनच मागून घेतली. तुम्हां सर्वांना याचें आश्चर्य वाटेल; पण हें पहा पत्र. मागाहून केव्हां तरी स्वस्थपणानें वाचा. पॅडूवा येथून बलॅरिओ याजकडूनच हें आलें आहे. हें पत्र

वाचून पाहिल्यावर आपल्याला कळेलच कीं, ही पोर्शियाच कायदेपंडित झाली होती, आणि नेरिसाच माझी कारकून होती. तुह्मी येथून निघून गेलां, आणि लागलींच आह्मीही दोघीजणी पाठोपाठ निघालों.-हें खरें कीं खोटें याची साक्ष हाच ( लोरेन्झो यास उद्देशून ) देईल. आणि आह्मी परत आलों त्याहि इतक्यांतच-तुमचे पुढें.-अजून वाड्यांत सुद्धां गेलों नाहीं. ॲन्टोनियो महाराज ! आतां आपण आंत चलावें, ह्मणजे ज्याची आपल्याला मुळींच माहिती नाहीं व जी गोष्ट तुमच्या ध्यानीं मनीं नाहीं, असें शुभ वर्तमान मी आपल्याला सांगेन. हें पत्र येवढें फोडून पहा बरें? आपल्या जहाजांपैकीं उंची उंची मालानें भरलेलीं तीन जहाजें या वेळीं आपल्या बंदरांत सुरक्षित येऊन पोहोंचलीं आहेत, हें वर्तमान आपणांस कळेल. हें पत्र माझ्या हातीं कांहीं विलक्षण रितीनें आलें,--कसें आलें तें एकाएकीं कळणार नाहीं.

**ॲन्टोनियो**—काय ह्मणतां ?—काय ? यावर माझी तर अक्कल अगदीं गुंग होऊन गेली आहे.

**बर्सानियो**—काय ? तूंच कायदेपंडित झाली होतीस?-आणखी तुला मी ओळखलं सुद्धां नाहीं ?

**ॲन्टोनियो**—खरोखरी, तुह्मी तर आज माझा प्राणच माझ्या कुडींत आणून घातला. माझीं जहाजें बंदरांत सुखरूप येऊन पोहोंचल्याचा मजकूर यांत आहे. मीं तो वाचला.—हा अगदीं खराना ?

**पोर्शिया**—कायरे बुवा, (लोरन्झो याजकडे पाहून) तुझें कसें काय? मला वाटतें माझ्या कारकुनाच्या हातून तुमचेंही कल्याणच झालें आहे.

**नेरिसा**—असें खरें ! आणखी मला त्याबद्दल बक्षिसही देण्यास लागणार नाहीं.—हें घ्या. जेसिका व तुह्माला देण्याकरितां ही एक देणगी मीं आणली आहे. हें त्या धनाढ्य यहुद्याचें मृत्युपत्र ! त्याच्या मरणानंतर जेवढी म्हणून त्याची मालमत्ता आहे, तेवढी सगळी तुम्हाला दोघांना मिळावी असें यांत त्यानें लिहून ठेविलें आहे.

**लोरेन्झो**—उत्तम ! उत्तम ! धन्य आहे बुवा, तुमची ! तुम्ही दोघींनीं अन्नान झालेल्या माणसांवर ही अमृतवृष्टीच केली म्हणावयाची !

**पोर्शिया**—आतां बहुतेक उजाडलेंच. या ज्या इतका वेळ गोष्टी घडल्या त्या खऱ्या खऱ्या घडल्या. अशी तुमची कोणाची खात्री झाली आहेसें

दिसत नाहीं. यासाठीं आतां आपण सर्वांनीं आंत चलावें. आंत गेल्यावर सर्वांच्या शंकाचा व प्रश्नांचा मीं उलगडा करीन. म्हणजे तुमचें समाधान होईल.

**ग्रॅशियानो**--झालें हें सगळें ठीकच झालें. आतां एकच काय ती चिंता आमच्यामागें लागली. आणि तिच्या संबंधानें आमचा काय निश्चय झाला आहे, तो येथेंस्पष्टपणें सर्वांना जाहिर करितो. ऐकाहो मंडळी !:—

श्लोक. ( चामर. )

मला असे प्रिया, तिनें दिली सुवर्ण आंगटी<br>
जगांत हेंचि मागतों, कधीं नहो हिची तुटी।<br>
कशास फार बोलूं मी ?– पडेल ही न विस्मृत्ति,<br>
जरी घडेल अन्यथा, तरी बरीच कीं मृति ॥

( सर्व जातात. )

( समाप्त. )

# शेक्स्पिअर-कृत नाट्यमाला.

## पुरवणी.

# जाहिरात-पत्रिका.


| | | | |
|---|---|---|---|
| जी. वी. नाईक कंपनी. | ... २ | रिमिंग्टन. ... | ... ४ |
| होजियरी मशीनरी.... | ... ५ | गोखले यांचीं उपहार गृहें. | ... ६ |
| दंत वैद्य. ... ... | ...१० | नानू यांचा पितळी कारखाना. | ११ |
| छोटालाल छगनलाल. | ...८।९ | लाव्हा मलम. ... | ...११ |
| वैद्य गोपीनाथ कृष्णाजी. | ...१२ | के. टी. डोंगरे. ... | ...११ |
| पी. पी. रेळे कंपनी. | ... ७ | वझेकृत कफनाशक गोळ्या. | ११ |
| प्रो. वेहेरे.... ... | ... १ | बाळंतरोग व क्षय यांवर. | ...११ |
| वनौषधी सार्सापरेला. | ...१० | हेरॉन केमिकल वर्क्स. | ... ३ |



## PROF. BEHERAY'S

# School of Hypnotism.

This is the first and only School of its kind in India, where personal and practical instructions are given. Those who cannot come up to Bombay and join the School, we teach them by post corrospondence. Student's success is guaranteed. Terms moderate. Patients suffering from mental disorder, Insanity, convulsion, paralysis, Rheumatism etc. etc. are also cured by the Hypnotic Treatment, no drug or medicine to be taken !!

Address: —**School of Hypnotism**

Mohon Building, Bombay No. 4,


# INDIA'S HEAD QUARTERS

FOR

# WATCHES, CLOCKS, TIMEPIECES.

SUPPLIERS TO,

## Government, Railways, States &c.



जगप्रसिद्ध व लोकप्रिय मेकरचीं सर्व प्रकारचीं लहान मोठ्या आकाराचीं टिकाऊ, दिखाऊ, व बरोबर वेळ दाखविणारीं.

**वाचेस**-मध्यम व लहान आकाराचीं किलेस् लिव्हर ज्युवेल्ड वगैरे **नाईक, वेस्टेंड, वर्ना, रास्कोप पेटंट**, वगैरे, मेटल किं. रु. ६, ७, ९, ११. १४ ते ३०, चांदीचें किं. रु. १२, १५, १७ ते ५०. सोन्याचें किं. रु. ५५, ६५, ७५ ते ३००. **रिस्ट** अथवा **लेडीज** वाचेस किं. रु. १०, १२, १५ ते ११० ग्यारंटी वर्ष १ ते ५

**टेबल टाइमपिसेस**-रोजच्या किल्लीचें २, ३, ४, इंच डायलचें किं. रु. २॥, ३॥, ४॥ ते १० अलार्मचें किं. रु. ३, ३॥ ते ४॥, १५ मिनीट अर्लामचें किं. रु, ५॥, ६ ते १०

**फ्यामिली क्लाक्स**-आठ दिवसाचे चावीचें तास अर्धातास वाजणारें, डायल ६ इंच उंची १९॥ ते २२ किं. रु. ८॥ ते १२; अलार्म किंवा क्यालेंडर करितां १ रुपया जास्त.

**ऑफिस क्लाक्स**-८ दिवसांचे चावीचें तास अर्धातास वाजणारें डायल ८, १०, १२ इंच, उंची १९॥ ते २२, २४ किं. रु. ११, १३ १४ ते २० तारीख व गजरचे करितां १ रु. जास्त.

**ऑफिस रेग्युलेटर क्लाक्स**-वरील प्रमाणें, परंतु डायल १२ इंच व उंची ३२ इंच किं. रु. १८, २० ते ३०

सर्व प्रकारचे दुरुस्तीचीं कामें उत्तम, माफक आकारानें वेळेवर तयार केलीं जातात. स. इंग्रजी क्याटलाग फुकट.

जी. बी. नाइक कंपनी मुंबई.

ट्रेचर, फिलिप्स, वगैरे कंपनीं मध्यें २५ वर्षे केमिस्टचे काम केलेले व अलेंबिक केमिकल वर्क्सचे भागीदार व प्रारंभींचे केमिस्ट

रा. माधवराव आबाजी गोविलकर.

यांचे प्रत्यक्ष देखरेखीखालीं

# हेरॉन केमिकल वर्क्स

२५ वर्षांचा सतत अनुभव.

## हेरॉनचें

## कोलन वाटर

## अ र्ब ल टॉ नि क


अपचन, अरुचि, अग्निमांद्य, बद्धकोष्ठ व कोठ्यांतील वातविकार वगैरे जठर, प्लीहायकृत्संबंधीं रोगावर वस्ताद व **क्षयाचे प्रथमावस्थेंत** व एकंदर **अशक्तपणांवर** याच्यासारखें दुसरें पौष्टिक औषधच नाहीं. दर वाटलीस रु. १ ट. ख. निराळा.

याशिवाय कोलनवाटर, मस्कलव्हेंडर सेंट्स, कांचनहेअर आईल गोल्ड क्लोराइड, क्लोरोडाईन, केमिकल फूड, ईस्टन्स सिरप, टिंक्चर्स, एक्स्ट्रॅक्टस्, डिसइन्फेक्टंटस् पॉलिशेस इ० पदार्थ व रसायनेंही हेरॉनची तयार आहेत.

जागोजाग एजंट पाहिजेत.

धी हेरॉन केमिकल वर्क्स, गिरगांव, मुंबई.

# REMINGTON TYPEWRITERS.




If you ask any one which is the best type-writer of the past and present with all the improvements possible in a writing machine the reply will be "The Remington"–specially the numbers 10 and 11. 'Visible' models shown at the Remington Typewriter company's office 75 Hornby Road Bombay.

# गोखले यांचीं उपहार-गृहें.

१ लें—**मुख्य गृह विश्रांतिगृह या नांवाचें**:—ग्रांट रोड रिपन थियेटराच्या शेजारीं. येथें चहा, कॉफी, फराळाचें स्वच्छ सामान मिळेल; तसेंच सोडा, लिंबू, चिरूट, सिगरेट, अमेरिकन तंबाकु वगैरे माल मिळेल.

हें ठिकाण फारच मोठें व शोभिवंत असून विश्रांतिसाठीं अगदीं योग्य आहे. त्यांत जागेच्या व पदार्थांच्या स्वच्छतेकडे फार लक्ष दिलेलें आहे.

२ रें—**हिंदु उपहार गृह या नांवानें** :—आम्हीं आमच्या विश्रांति गृहाची एक शाखा बोरिबंदर नजीक, बागेसमोर स्थापन केली आहे. येथेंही वरील प्रमाणेंच फराळाचें सर्व सामान अतिशुद्ध व अतिस्वच्छ असें मिळेल. शिवाय सोडा, लिंबू, रॉसबेरी, पिकमीअप, वगैरे सर्व तऱ्हेची पेयेंहीं मिळतील.

३ रें—**क्षुधाशांति गृह या नांवाची**:—दुसरी शाखा राणीच्या बागेसमोर काढली आहे. येथेंही वरच्याप्रमाणें चहा, कॉफी, फराळाचें सामान वगैरे मिळेल; व तशींच सोडा, लिंबु, वगैरे हरतऱ्हेचीं पेयेंहि ठेविलीं आहेत.

**लक्षांत ठेवा**—आमचीं हीं उपहार गृहें टोलेजंग इमारतींत काढलीं असून आंतील व्यवस्था स्वच्छ व उत्कृष्ट तऱ्हेची असते व सामानही नेहमीं शुद्ध व स्वच्छ असेंच असतें जिवाला खरोखर विश्रांति मिळेल. अवश्य अनुभव घ्या.

**मालक-गोविंद लक्ष्मण गोखले.**



# पी. पी. रेळे आणि कं.,

## रबरस्टँप मेकर्स आणि एनग्रेव्हर्स,

१७९ काळकादेवीरोड, मुंबई.

आमच्या कारखान्यांत तऱ्हेतऱ्हेचे टिकाऊ रबर स्टँप, लाखेवरील पितळी सीला, शिपायांचे पट्टे व बकलें, वुडकट स्टीरीओ, इलेक्ट्रो, फोटोझिंकोब्लॉक, चांदी सोन्यावरील प्रेक्षणीय कोरीव काम, स्टील डायवरील इंग्लीश फॅशनप्रमाणें निरनिराळ्या डिझाइनचे मोनोग्राम, व्हिजिटिंग कार्डें, छापण्यासाठीं कॉपर प्लेट कोरणें वगैरे कामें काळजीपूर्वक, व वक्तशीर आणि माफक दरानें केलीं जातात.

या शिवाय वाटेल तो मजकूर घर बसल्या छापतां येण्यासारख्या रबर टाईपांच्यां पेट्या, डेटर, स्टायलो पेना, आंगठा छापाचें साहित्य, कपड्यावर मार्क करण्याची शाई वगैरे सामान विक्रीस ठेविलें आहे.

---

॥ आण्याची पोस्टाची तिकिटें पाठविणारास आमचा सचित्र कॅटलॉग पाठविला जाईल.

अपूर्व सुगंध युक्त

# स्वदेशी सेन! सेन!!

गाणाराचा आवाज मोठा करण्याकरितां, खोकल्या करितां, दम्या करितां, रक्तशुद्धी करितां, व गरमीचे रोगावर २४ तासांत हटकुन गुण देणारें हें एकच. उत्तमांत उत्तम, तांबुल विहारा पेक्षां हें सर्वोत्तम आहे. १८०० गोळ्याचे १ डबीस रु. १. ४००० गो. रु. २ ट. ख. प्रत्येकी ८४. निराळा.

मिळण्याचा पत्ता—छोटालाल छगनलाल महाजन.

काळकादेवीरोड—मुंबई.

बिलकूल त्रासासिवाय

केंस काढण्याचा,

# बादशाही साबू.

वाटेल त्या जागीं हा साबू लाविला तरी केंस अत्यंत सफाईनें निघून जातात. व चामडीस कोणत्याही प्रकारचा डाग न पडतां ती अतिशय मृदु होते. ३ वड्यांचे १ पेटीस १ रु. ट. ख. ८४.

एजंटः—छोटालाल छगनलाल महाजन.

काळकादेवी रोड—मुंबई.

कार्ड साईज ४।×३।

# फोटो काढण्याचा छुपा कॅमेरा.

**किंमत अवघे ३ रुपये.**

वाटेल त्या मनुष्याचा फोटो पाहिजे त्या इसमास ज्याचा फोटो घेण्याची इच्छा असेल त्यास समजूं न देतां या कॅमेऱ्यानें काढतां येतो. सपाट्यानें धांवणारी गाडी, उडता पक्षी वगैरेचे फोटो सहज काढतां येतात. यांत शिकण्याजोगें कांहींच नाहीं. या कॅमेऱ्याची माहिती खरेदीदारांस आम्हीं घरबसल्या देऊं. पुष्कळ ठिकाणीं त्यास रुपये १० ते १५ किंमत पडते; परंतु त्यांना खरी किंमत पोस्टेज शिवाय ३ रुपये आहे.

**पत्ता—छोटालाल छगनलाल महाजन.**

**काळकादेवीरोड—मुंबई.**

---

पांढरे केश काळे करण्यासाठीं.

# बादशाही हेअर डाय.


हा कलप केवळ एकदांच लावल्यानें कित्येक महिने पर्यंत, काळ्या स्वाभाविक केंसां प्रमाणेंच केश राहतात. दुसऱ्या कलपा प्रमाणें ह्या कलपा पासून केश तांबूस, भुरे किंवा रांठ न होतां, चमकणारे काळे कुळकुळीत मात्र होतात.

किंमत केवळ एक बाटलीस ०।२ आणे.

**सोल एजंटः—छोटालाल, छगनलाल महाजन.**

**नव्यामार्केट समोर, काळकादेवी—मुंबई**

# दंतवैद्य.



**डॉ. धरगळकर** हे विलायतेहून नुकतेच शिकून आले असून दांतांसंबंधानें हरएक रोगावर उपचार करण्यास तयार आहेत. तसेंच अकीकाच्या वगैरे दंतपंक्ति तयार करून देऊन कुशळतेनें वसवून देतात

**भेटण्याचें स्थळ**—अलीस बिल्डिंग हॉरनबीरोड, कोट-मुंबई.

---

# वनौषधी सार्सापरिला.

हा सार्सापरिला कोणीही सेवन केल्यास त्यापासून रक्त-शुद्धि व रक्तवृद्धि होऊन शरीर पुष्ट व सतेज होतें. स्मरण-शक्ति वाढून मेंदूला बळकटी येते, आणि शक्ति वाढते.

**महाकुष्ट व पांढरें कोड यांवर खालील दोन अत्युत्तम गुणदायक औषधें.**

१ **भारतमधुवल्ली**—खाण्यासाठीं किं. रु. १।.

२ **नागवल्ली तेल**—लावण्यासाठीं किं. रु. २.

ही मधुवल्ली सेवन केल्यानें व नागवल्ली तेल लाविल्यानें अठरा प्रकारचीं कुष्टें खात्रीनें बरीं होतात. साधारण गुण दिसण्यास पंधरा दिवस लागतात.

**डॉ० धाकजी भानजी सावंत,**

**फणसवाडी, कोळयाची वाडी, चाळ नं. २ मुंबई.**